१२०६

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ७५३५

नोंद क्र.
३०६

REFBK-0000306

१५३५ ७-५-६१।५८

॥ श्री ॥

प्राकृत

# कवि चरित्र

द्वितीयखंडापैकीं

## भाग पहिला.

लेखक

दत्तात्रय अनंत आपटे-खेड-पुणे.

प्रकाशक

द. गो. सडेकर खानापूर धनंजय छा. मालक.

REFBK-0000306

REFBK-0000306

कों

फुकट.

इतरांस

किंमत ०८ आणे.

या पुस्तकासंबंधानें सर्व अधिकार प्रकाशकांनीं
आपले स्वाधीन ठेविले आहेत.

द. गो. सडेकर–खानापूर.

३०६

हें पुस्तक

# लोकमित्राचे प्रियवाचक

यांस

त्यांची रसिकता, मित्रावरील प्रिति, स्वदेशभक्ति

आणि

उदारता जाणून प्रकाशकानें

प्रेमपूर्वक अर्पण केलें

आहे.

नम्र

दत्तात्रय गोविंद सडेकर.

श्रीशिवन्दे.

# खुलासा.

'कविचरित्र' या नांवाचें पुस्तक इ. स. १८६० त **जनार्दन रामचंद्रजी** या नांवाच्या एका रसिक गृहस्थांनीं प्रसिद्ध केलें होतें परंतु त्या लोकमान्य ग्रंथाच्या प्रती कालपरत्वें अगदीं दुर्मिळ झाल्यामुळें **लोकमित्राचे** संपादक रा. रा. **दत्तात्रय गोविंद सडेकर** यांनीं या लेखकास तशाप्रकारचा एकादा ग्रंथ लिहिण्याविषयीं सुमारें दोन वर्षांपूर्वीं सांगितलें होतें व त्यांच्या ह्मणण्यास मान देऊन त्यानें गेल्या वर्षापासून या ग्रंथाच्या लेखनास प्रारंभ केला. वाचक हो! त्याचेंच हें अल्पसें फल आज आपणांपुढें आहे.

रा. रा. जनार्दन रामचंद्रजी यांनीं लिहिलेल्या **कवि चरित्रा**त कवींचीं जीं चरित्रें आलीं आहेत तीं फारच त्रोटक आहेत व या नूतनावृत्तींत प्रत्येक कवीचें वृत्त थोडक्यांतच पण सविस्तर देण्याचा प्रयत्न केला असून प्रत्येक कवीच्या चरित्राचे शेवटीं त्याच्या काव्यांतील पांच चार वेंचे दिलेले आहेत; व त्यामुळें हा ग्रंथ जनार्दन रामचंद्रजींच्या मूळ ग्रंथाच्या तिपटीनें तरी वाढला आहे. श्रीमत् शंकराचार्यांपासून आजतागाईत प्रसिद्ध असलेल्या अर्वाचिन कवींचींही त्रोटक चरित्रें यांत दिलीं आहेत. या ग्रंथाचे दोन खंड केले असून **प्रथम खंडांत** संस्कृत कवींचीं चरित्रें देऊन **द्वितीय खंडांत** प्राकृत कवींचीं चरित्रें दिलीं आहेत. **प्रथम खंड** अद्याप लिहून पूर्ण झाला नसाल्यामुळें दुसरा खंडच छापावयास आधीं आरंभ केला आहे. हा द्वितीय खंडाचा **पहिला भाग** आहे. यांत आद्यमहाराष्ट्रकवि **मुकुंदराज** यांपासून तों श्रीसमर्थ **रामदासां**पर्यंत कवि घेतले आहेत. या खंडाचे या भागाएवढालेच आणखी निदान दोन भाग तरी होतील असा अजमास आहे; परंतु हें एवढें अवाढव्य काम सध्यांचे दिवसांत तरी केवळ अंगावर छापून काढणें अगदीं अशक्य आहे. उदारधि वाचकमंडळींनीं हातभार लावल्यास रा. रा. सडेकर यांचा हें काम एक दोन वर्षांत पूर्ण करून देण्याचा विचार आहे.

हा भाग लिहिण्याचे कामीं रा. रा. **पांगारकरां**चे मोरोपंती वेंचे, **भिडे** यांनीं प्रसिद्ध केलेला कवि वामनावरील निबंध, **सहस्त्रबुद्धे** यांचें श्रीएकनाथचरित्र, **मुळे** यांचें श्रीनामदेवचरित्र, **यंदे** यांनीं प्रसिद्ध केलेले श्रीरामदासांचे समग्र ग्रंथ, कोल्हापूर येथें प्रसिद्ध होत असलेल्या ग्रंथमाला मासिक पुस्तकांतील महाराष्ट्र सारस्वत वगैरे ग्रंथांचा बराच उपयोग करून घेतला आहे; ह्मणून त्या त्या ग्रंथांच्या कर्त्यांचा हा लेखक अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत प्रसंगीं कवि चरित्र वाचनापासून होणाऱ्या फायद्याबद्दल व त्याप्रमाणें काव्यशास्त्राबद्दल बराच ऊहापोह करावयाचा होता, परंतु तो हा ग्रंथ पूर्ण झाल्यावर करावयाचें अभिवचन देऊन हा छोटासा प्रास्तावीक लेख पूर्ण करितों.

मुक्काम खेड.<br>शके १८२८ आषाढ वद्य ११ } आपला कृपाभिलाषी<br>दत्तात्रय अनंत आपटे.

---

# प्रकाशकाचे दोन शब्द.

---

मित्राच्या प्रियवाचकांस प्राकृत कविचरित्राचा हा पहिला भाग ११ वी भेट ह्मणून अर्पण करीत आहों. यापासून त्यांना थोडातरी उपयोग झाला व पुढील भाग प्रसिद्ध करण्यांस त्यांचें अनुमोदन मिळालें तर तेही भाग लौकरच स्वतंत्ररीतीनें छापून अल्प किंमतींत देऊं.

आमचेकडे शिल्लक असणाऱ्या प्राकृत कविमंडळाचे या पुस्तकापेक्षां किंचित् मोठे असे दोन भाग तरी होतील असा अजमास आहे. दरएक भाग सुमारें २० फार्मचा ( ८ पृष्ठांचा १ फार्म ) केला तर ४० फार्मांत काम संपेल. अशा प्रत्येक फार्मास फक्त मित्राच्या वाचकांकडून मात्र ०।- आणाप्रमाणें किंमत घेतली तर ०१० आणे किंमत व शिवाय खर्च ०२।०३ आणे मिळून ०१२।०१३ आणेपर्यंत दोन्ही भाग देतां येतील. प्रत्येक भाग तयार होईल तसा आश्रयदात्यांकडे ०५।०६ आण्याच्या व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल. तरी अपेक्षा असणारांनीं हा भाग वाचून झाल्यावर आपला अभिप्राय कळविण्यास विसरूं नये.

यापुढें मित्रांत बरीच सुधारणा झालेली दिसेल. आपल्या आश्रयदात्यांचें हित कोणत्या उपायांनीं होईल व ते मित्रावर याहीपेक्षां जास्त प्रेमा काय केलें असता करतील या विचारांतच मित्र गुंग होऊन गेला आहे इतकें सांगितलें ह्मणजे पुरे.

या पुस्तकांत कांहीं हस्तदोष आढळून आल्यास त्यांचा हंसक्षीरन्यायानें स्विकार करावा अशी विनंती करून व ज्याच्या कृपेनें ही अल्प कृति सिद्धीस जात आहे त्या सर्वसमर्थ जगदीश्वरास अनन्यभावें नमस्कार करून वाचकाची रजा घेतों.

प्रकाशक.

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| मुकुंदराज. | १ |
| ज्ञानेश्वर. | ११ |
| नामदेव. | ३४ |
| एकनाथ. | ५२ |
| दासोपंत. | ७५ |
| मुक्तेश्वर. | ८७ |
| रामदास. | १०४ |




॥ श्री ॥

# कवि चरित्र.

### भाग पहिला.

## मुकुंदराज.

३०६

नमस्कार असो त्या काळाला कीं, ज्याच्या अवाढव्य जबड्यांत हजारों नररत्नें-नुसतीं नररत्नेंच काय-युगेंचींयुगें आणि कल्पेंचीकल्पें पार गडप होऊन गेलीं आहेत! प्राचीनकाळीं ही आमची भरतभूमि इंद्राच्या अमरावतीसारखी होती. परंतु बापा काळा तुझ्या तडाख्यांत तिचें चंदन चंदन किरे उडून गेलें आहे! आमच्यांत काडीचीही शक्ति राहिली नसून कर्तो ह्मणून बोट करण्यास क्वचितच कोणी दृष्टोत्पत्तीस येतें. अस्तु.

त्वां आमचीं नररत्नें आमच्यांतून नेलींस तीं नेलींस, निदान त्यांचीं चरित्रें आणि ग्रंथ तरी उपलब्ध ठेवावयाचे होतेस. पण छे. तुझ्या त्या निर्दय अंतःकरणांत युक्तायुक्ततेचा विचार कोठून येणार! अरे मुकुंदराजासारखे भगवतश्रेष्ठ कीं ज्यांचे नाममात्रेंकरून आह्मीं पतीत तरून जावयाचे, त्यांच्याबद्दल विश्वसनीय माहिती आह्मांला मिळूं नयेना? कांहीं दंतकथांवरच आह्मांला सारी भिस्त ठेवणें भाग पडावें याहून आमचें दुर्भाग्य तें कोणतें!

ह्या प्रख्यात सत्पुरुषाच्या जन्ममृत्युकालाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाहीं. ज्या कांहीं दंतकथा ऐकिवांत आहेत त्यांवरून इतकेंच कळतें कीं, हे जातीचे देशस्थ ब्राह्मण असून, मोंगलाईंतील जोगाईच्या आंब्याचे राहणारे. बारा तेराशें वर्षांपूर्वीं जयपाळ नांवाचा एक लाहोरप्रांतीं मोठा विख्यात राजा होऊन गेला, त्याचेवेळीं हे होते असें ह्मणतात.

मुकुंदराजाच्या काळनिर्णयासंबंधानें जरी कांहीं नक्की सांगतां येत नाहीं तरी ते महाराष्ट्र कविमंडळांत पहिले होते हें निर्विवाद सिद्ध आहे. श्रीज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी प्रसिद्ध होण्यापूर्वींच ह्यांचे ग्रंथ लोकविश्रुत झाले होते असें दिसतें. असें ह्मणतात कीं, श्रीज्ञानराजांनीं आपली ज्ञानेश्वरी पूर्ण करून श्रीनिवृत्तिनाथाकडे अभिप्रायार्थ नेली. तेव्हां त्यांनीं ती बरोबर उतरली नाहीं असें आपलें स्पष्ट मत देऊन मुकुंदराजाच्या विवेकसिंधूची फार वाखाणणी केली; ह्मणून श्री ज्ञानदेवांनीं आपला ग्रंथ तसाच अप्रसिद्ध ठेवून

' अमृतानुभव ' नांवाचा दुसरा ग्रंथ तयार केला. येवढ्यावरून मुकुंदराज हे ज्ञानदेवाच्या पूर्वीं होऊन गेले, असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

आतां कोणी अशी शंका काढतील कीं, मुकुंदराजांची भाषापद्धती सरळ असून तींत ज्ञानदेवांच्या भाषेप्रमाणें जुने शब्द व दुर्बोधत्व मुळींच नाहीं, पण एवढ्याच मुद्यावरून त्यांना त्यांच्या उच्चपदावरून कोणीही खालीं उतरूं शकणार नाहीं. ' भिन्नरुचिर्हि लोकः; किंवा—पिंडे पिंडे मतिर्भिन्ना: ' या उक्तीवरून श्रीज्ञानराजांना शब्दवैचित्र्याची आवड ह्मणून त्यांनीं आपल्या ग्रंथांत निरनिराळ्या भाषेंतील शब्द घातले असतील. असो.

या साधूविषयीं अशी एक गोष्ट सांगतात कीं, जयपाळराजानें एकदां पुष्कळ सत्पुरुष कारागृहांत टाकिले होते. तो त्यांस ह्मणे कीं, तुह्मी जेव्हां तेव्हां ब्रह्माविषयीं गोष्टी सांगता, तरी तें ब्रह्म मला दाखवा. तें दाखवितां न आलें कीं तो त्यांची छळणूक करीत असे. पुढें एकदां मुकुंदराज त्या राजाकडे गेले. तेव्हां त्यांसही राजानें त्यांप्रमाणेंच ब्रह्माबद्दल प्रश्न करून तें दाखवा ह्मणून ह्मटलें. मुकुंदराजांनीं पाहिलें कीं, जर या वेळेस आपण हातपाय गाळिले तर अनेक गरीब ब्राह्मण जन्मभर कारागृहवास भोगणार. ह्मणून त्यांनीं लागलींच ईश्वरास अनन्यभावें शरण जाऊन मनांतील हेतु कळविला. परमात्म्यानेंही क्षणभर आपल्या भक्तराजाकरवीं राजास ब्रह्मस्वरूप दाखवून त्याची खात्री केली. मग राजानें मुकुंदराजांस आपले गुरु करून बंदींत टाकलेले साधु मुक्त केले. या कथेवरून निदान इतकें तरी सिद्ध आहे कीं, मुकुंदराज हे तत्कालीन सत्पुरुषांमध्यें श्रेष्ठ होते.

मुकुंदराज हे तत्कालीन साधुपुरुषांत श्रेष्ठ होते इतकेंच नव्हे तर कवि या नात्यानें ही त्यांची प्रतिष्ठा थोडीथोडकी होती असें नाहीं. गीर्वाणभाषेंत आद्यकवीची भूमिका जशी श्रीवाल्मिकीकडे येते तशी मराठीची मुकुंदराजांकडे होती. अनुष्टुप वृत्ताचें जनकत्व ज्याप्रमाणें वाल्मीकाकडे आहे त्याचप्रमाणें ओंवीछंदाचें यांजकडे आहे.

त्यांचीं जरी सर्व काव्यें तूर्त उपलब्ध नाहींत तरी जीं आहेत त्यांवरून वेदांत शास्त्र हा त्यांचा फार आवडता विषय होता असें स्पष्ट दिसून येतें. प्रस्तुत प्रसिद्ध असलेले त्यांचे ग्रंथ ह्मटले ह्मणजे ' विवेकसिंधु ' व ' परमामृत ' हे होत. ह्या दोहोंचाही विषय एकच ह्मणजे वेदांत हा होय. सत्यशोधनाखेरीज उगाच वायफळ बरळणें ह्मणजे वाणीस निरर्थक शीण देणें होय, असें त्यांना वाटे. परमामृतांत त्यांनीं एकेठिकाणीं ह्मटलें आहे.—

'सद्गुरुमुखें वेदांत श्रवण । न घडे तयाचें मनन ॥
जंव न पाविजे निज ध्यासन । तंवरी मोक्ष कैचा ॥ १ ॥
सांडोनि वेदांतसिद्धांत । जे बोलती पाखांडमत ॥
त्यांची नायकावी मात । महा-वाक्यार्थ अनुभविजे ॥ २ ॥
वेद बोलिला सृष्टिक्रम । तो सांडोनि सकळ धर्म ॥
वेदांताचें निजवर्म । लाहिजे गुरुमुखें ॥ ३ ॥'

विवेकसिंधुमध्यें ब्रह्म ह्मणजे काय आहे, खरें ज्ञान कशाला ह्मणावें आणि हें सर्व जग केवळ मायामय कसें आहे याची विस्तारेंकरून चर्चा केली आहे. त्याचप्रमाणें जीव आणि परमात्मा यांमध्यें अभेद कशावरून याचें निरूपण करून गुरूची महती सांगितली आहे. परमामृतांत मन निश्चळ कसें करावें, हस्तपादादि इंद्रियें हीं केवळ आज्ञेचीं चाकर असून हृदयांतरवासी सर्वव्यापी आत्मा हाच त्यांमध्यें कसा प्रमुख आहे, खरें ज्ञान आणि मोक्ष यांची थोरवी केवढी आहे आणि तेंच अखंड सुखाचें निवासस्थान कसें आहे वगैरे वेदांताचीं मूलतत्वें जगांत हरहमेष नजरेखालीं येणारे वेगवेगळे दृष्टांत देऊन मोठ्या मनोहर रीतीनें सांगितलीं आहेत.

खऱ्या ज्ञानप्राप्तीशिवाय केलेलीं पूजा, स्नान, तीर्थें वगैरे केवळ औपचारिक गोष्टींवर मुकुंदराजांचा मोठा कटाक्ष दिसतो. परमामृतांत ते ह्मणतात.—

'जो निरुपाधि स्वरूप । अनुभविलें नाहीं आपोआप ॥
तोंवरी कष्टासी माप । कवण करी ? ॥ १ ॥
व्रतानियमाचीं या सांकडीं । संदेहीं गुंतलीं बापुडीं ॥
तीं केंवि पावतील पैलथडी । संसार सागराचिया ॥ २ ॥
पूजा स्नान तीर्थें दानें । मंत्र यंत्र योग हवनें ॥
कीजे तितुकें फल भोगणें । स्वर्गादिक सर्वथा ॥ ३ ॥
जप-तप-अनुष्ठानें । आणि नानापरींचीं साधनें ॥
मोक्ष न पाविजे आत्मज्ञानें । वांचोनिया सर्वथा ॥ ४ ॥'

त्याचप्रमाणें ते ह्मणतात आपपर भाव नाहींसा झाला ह्मणजे मोक्षाची अर्धी वाट चढून गेल्याप्रमाणें आहे —

"जोंवरी तो एक मी एक । हा न तुटेची कलंक ॥
जंव न प्रकाशे सम्यक् । तंव परम-प्राप्ति न घडे ॥ १ ॥

आणि हा आपपर भाव निरर्थक असून जग हें सर्व मायेचें गारुड आहे, हें सिद्ध करतांना त्यांनीं दृष्टांतांची कशी गर्दी केली आहे पहा.—

' दोन्ही नयनीं एक दृष्टी । दोहीं श्रवणीं एक नाद उठी ॥
दोहीं अधरपुटीं । एकाचि शब्द ॥ १ ॥
तैसें दोहीं पदींचें एक विवरण । करितां जीवेश्वराचें निरसन ॥
शुद्ध लाधे तया कवण । द्वैत कल्पी ॥ २ ॥
जैसें महदाकाश अखंड पूर्ण । घट–मठीं दिसे भिन्न ॥
घटमठाकाश ऐसें जाण । बोलती तया ॥ ३ ॥
ते घटमठ दोन्ही भंगता । ठायिंचेंचि ऐक्य तत्त्वता ॥
तैसें जीवेश्वर–उपाधि निरसता । स्वस्वरूप एकु ॥ ४ ॥
माया अविद्या–नाशी । ऐक्य होय जीवेश्वरासीं ।
ऐसें बुझोनिया मानसीं । सुखीया होइजे ॥ ५ ॥ '

अंतःकरण आणि त्यापासुन निघणाऱ्या अभिमान अहंकारादिवृत्ति यांची कापूस आणि दोरा किंवा पाणी आणि त्यावर उठणारे तरंग, यांजबरोबर सांगड घालुन मुक्त अंतःकरणाचें उज्वलस्वरूप कवीनें फारच उत्कृष्टरीतीनें प्रतिपादिलें आहे.–

' अंतःकरणवृत्तींचें स्फुरण । तें संकल्पविकल्पात्मक मन ॥
तेंचि निश्चयात्मक ह्मणोन । बुद्धि ह्मणविजे ॥ १ ॥
निश्चयात्मक जो अर्थू । तेथें अनुसंधानात्मक हेतु ॥
तें चित्त हें जाण तूं । तत्प्रवृत्ति तो अहंकारू ॥ २ ॥
ऐशी अंतःकरणपंचक स्फूर्ति । तूं जाणिसी स्वयंज्योति ॥
यालागीं स्वसंवेद्य मूर्ति । आत्मा तूंची ॥ ३ ॥
जैसा कापुसापासूनि निघे दोरा । तोचि तया भासे दुसरा ।
तैसें मन बुद्धि चित्त अहंकारा । होणें स्वरूपापासूनी ॥ ४ ॥
तो पीळ उकलितां दोरा । ह्मणावा परि कापुस खरा ॥
उकलितां उकलितां दुसरा । भासु नाहीं ॥ ५ ॥
नातरी उदकाचा तरंग । तेथें दुसरा नाहीं भाग ॥
तो विरालिया चांग । उदक उदकीं ॥ ६ ॥
परि जळावांचोनि कांहीं । आणीक विजातीय नाहीं ॥
तैसें मन माघारें आत्मयाचे ठायीं । तंव तें नाहींच होय ॥ ७ ॥
तो तरंग कां दोरा । उठवी पीळ आणि वारा ॥
तैसा हा लिंगदेहाचा उभारा । कारण माया करी ॥ ८ ॥

उकललिया कां मुरालिया । पीळ वारा जाय लया ।
तैसी आत्मज्ञानें कारण माया । मिथ्या होय ॥ ९ ॥

अशारीतीनें पायरीपायरीनें गेल्यावर शेवटीं आनंदीआनंद होऊन विषयादि सुखें किंवा अहंकारादि मनोविकार हे कसे तुच्छसे भासूं लागतात याविषयीं लिहितांना मुकुंदराज ह्मणतातः—

‘सदा स्वानंदाचे सोहळे । विषय विजाती वितळे ॥
स्वरूप सुखाचेनि मेळे । इंद्रियां तृप्ति ॥ १ ॥
परम सुखाचेनि भयें । एकही स्फूर्ति न स्फुरे ॥
कार्य जाती विसरे । निमिष्यांत ॥ २ ॥
करूनि यज्ञाचिया कोडी । उभविती स्वर्गाची गुढी ॥
तें सुखकीजे कुर्वंडी । या ब्रह्म सुखासी ॥ ३ ॥’

सद्गुरूची योग्यता त्यांनीं कशी वर्णिली आहे पहाः—

‘ॐ नमोजी गुरुनाथा । तूं परमप्राप्तीचा दाता ॥
कृपासिंधू जी समर्था । अनंता अपारा ॥ १ ॥
तूं आनंदमय स्वयंप्रकाश । कैवल्य दाता परमईश ॥
तूं निजरूप अविनाश । निराकार ॥ २ ॥
तूं निःसंग निरंजन । तूं निरंतर अभिन्न ॥
नाहीं तुजसमान । कांहीं देवा ॥ ३ ॥
तूं जंव कृपा करिशी । तंव संसारबंधन तोडिसी ॥
अविद्येपासूनि सोडविसी । तारिसी जडजीवां ॥ ४ ॥
नव्हे जें देवां असुरां । तें तुझें करणें दातारा ॥
समर्थ न देखों दुसरा । तुजवांचोनी ॥ ५ ॥
आणीक कोणा नमस्कारूं । कवणाचें स्तवन करूं ॥
जयजयाजी सद्गुरू । अगाध महिमा ॥ ६ ॥
जैसा सर्व पटांमाजीं एक तंतू । तैसा तूं विश्वीं विश्वभरितु ॥
सर्व व्यापूनि विरहितु । आलिप्त तूं ॥ ७ ॥
हीं अनेकें सगुणरूपें । तूं धरिसी आपुलेनि व्यापें ॥
शिव शक्तीचीं साकाररूपें । दाखविसी तूं ॥ ८ ॥
तुजवीण आन न देखों कोण्ही । ह्मणोनी आणिकातें नमनी ॥
हा मस्तक तुझिये चरणीं । ठेविला सत्य ॥ ९ ॥

गुरूची पहिल्यानें ह्मणजे प्राचीनकाळीं किती महती होती याचीं उदाह-

रणें थोडींथोडकीं नाहींत. सद्गुरू शिवाय मोक्षप्राप्ति नाहीं ह्मणून तर प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीं व प्रभुवर श्रीरामचंद्रांनींसुद्धां अनुक्रमें संदीपन व वसिष्ठ यांस गुरु केले होते. पंढरपूरनिवासी श्री विठ्ठलांनीं देखील आपला परमभक्त जो नामदेव त्याकरवीं विसोबा खेचरास गुरु करविलें होतें. सांप्रत गुरु व शिष्यांचें परस्परांशीं वर्तन कसें असतें व त्याचे उभयतांवर कसकसे परिणाम होतात याचा अनुभव सर्वत्रांस आहे. असो. सद्गुरूसी शिष्यांचें वर्तन कसें असावें याबद्दल मुकुंदराज लिहितात.—

‘ आतां असो बहु बोलणें । श्रीगुरुसी धरी जीवें प्राणें ॥
नाहीं सार तयाविणें । अन्य कांहीं ॥ १ ॥
तयाचे वचनीं राहीं । करूंनको येर कांहीं ॥
तरी अनायासें स्वरूप पाहीं । पावसी तूं ॥ २ ॥
वृद्धि पावे गुरुकृपा । ऐशिया स्थिति राहें पां ॥
गुरु कष्टी होय बापा । ऐसा न वर्ते ॥ ३ ॥
गुरुमहिमा अपारू । गुरु तो परात्परू ॥
तुज न कळे ह्मणोनी परिहारू । देऊन सांगो ॥ ४ ॥
आतां तन मन धन । करी सद्गुरुसी समर्पण ॥
नाहीं तयावीण । अन्य दैवत जगीं ॥ ५ ॥
गुरुतत्पद शिव । शिष्यत्वं पद जीव ॥
ह्मणोनी तयाचे चरणीं भाव । धरी ऐक्यतेचा ॥ ६ ॥
गुरुतत्पद सागरू । शिष्यत्वं पद तरंगाकारू ॥
दोन्ही हारपोनि ब्रह्मनिर्विकारू । आपण होइ जे ॥ ७ ॥
गुरुभयें प्रेम वाहसी । तरी अवश्य स्वरूप पावसी ॥
कीटक भयें आळीशीं । कैसें जाळें ॥ ८ ॥
जैसी गुरुमार्गाची परवडी । तैशी असावी गुरुपदाची गोडी ॥
तरि प्रकाश होतां अर्ध घडी । न लागे बापा ॥ ९ ॥
गुरुसांप्रदायाची वाट । न धरितां करशील प्रगट ॥
तरीं गुज घेवोनि चावट । होतील बहू ॥ १० ॥
या लागीं हृदयीं गुप्त राख । स्वयें परमामृत चाख ॥
सर्व योगियांचा तिलक । होशील तूं ॥ ११ ॥ ’

विवेकसिंधु—दधिचें मंथनकरून पुढें जें नवनीत काढिलें आहे, त्यांत ब्रह्म-स्वरूपाचें विवरण केलें आहे ब्रह्म कसें आहे? नित्य व अविनाशी ह्मणजे

चिरकाळ टिकणारें असून ज्याला नाश नाहीं, ज्ञानरूप स्वानंदांत निमग्न, जें उपाधिरहित, व मायेहून वेगळें, अदृश्य असून ज्याचा निर्देश करतां येत नाहीं असें तें आहे. जसें:–

ज्ञान ह्मणों तरी नाहीं जाणीव । अज्ञान ह्मणों तरी नाहीं नेणिव ॥
अभाव ह्मणों तरी ठेव । नवल आनंदाची ।। १ ॥
आहे ह्मणो तरी कैसें नि घ्यावें। नाहीं ह्मणों तरी कैसें नि सांडावें॥
असो हें ब्रह्मभावें अनुभवावें । ज्याणें त्याणेंचि ॥ २ ॥
जें निद्रिस्तातें चेववी । चेवलियातें जागवी ॥
जागलियातें भोगवी। परी अक्रिय तें ॥ ३ ॥
नातरी गगना ऐसें पोकळ । व्यापक परी व्याप्यासी वेगळ ॥
निजप्रकाशें सोज्वळ । आपणा आपेची ॥ ४ ॥'

हें निर्गुण ब्रह्माचें लक्षण झालें. त्याचप्रमाणें सगुण ब्रह्म अथवा परमात्मा याविषयीं ते असें लिहितातः—

'जो सर्वात्मा सर्व साक्षी । सर्वेश्वर सर्व कुक्षीं ॥
जो कांहींच नुपेक्षी । निजभक्ता ॥ १ ॥
जो देव अनादि लाघवी । नाहीं तो ब्रह्मगोळ दाखवी ॥
गेले ह्मणवूनि लपवी । जेथिचें तेथेंची ॥ २ ॥
जयासी कानावीण ऐकणें । हातेवीण देणें घेणें ॥
जिव्हेवीण चाखणें । सर्व रसातें ॥ ३ ॥
पायावीण सर्वत्र हिंडणें । चक्षूवीणें देखणें ॥
जेणें जीवासी उद्धरणें । इच्छामात्रें ॥ ४ ॥
प्रतिबिंबीं आभासक । जैसा का तरणी सर्वत्र एक ॥
तैसा सर्व जीवांसी प्रकाशक । परमात्मा तोची ॥ ५ ॥'

परमात्मा सर्वव्यापी, ज्ञानमय, आणि अमूर्त असा असतांहीं भक्तांकरितां कधीं कधीं मूर्त होतो ह्मणजे अवतार धारण करितो. मुकुंदराज ह्मणतात कीं, अशा अवतारांचें भजनपूजन केलें तरी तें ईश्वरास अर्पण होतें. 'हर हाच खरा ईश्वर,' नाहीं, 'हरी हाच खरा ईश्वर,' वगैरे असल्या क्षुल्लक प्रकारचा हट्टवाद त्यांना पसंत नव्हता. त्यांनीं ह्मटलें आहेः—

'तूं ब्रह्मरूपें उत्पत्ती करिसी । विष्णुरूपें प्रतिपाळिसी ॥
रुद्ररूपें संहारिसी । पुनरपि रचावया ॥ १ ॥'

एकंदर आपल्यामध्यें झालेल्या साधूंच्या चरित्रांकडे पाहिलें तरी वरील

सिद्धांत त्यांस पूर्णपणें मान्य होता असें दिसतें. आतां कालस्थित्यनुरूप त्यांनीं एकाद्या विशिष्टदेवतेची उपासना केली ही गोष्ट निराळी.

ब्रह्म आणि माया यांचें विवरण वर दिलेल्या उताऱ्यांमधून बरेंच झालें आहे तरी खालील उतारा विशेष हृदयंगम वाटल्यावरून तो वाचकांकरितां सादर करून हें चरित्र आटोपतें घेतों.--

'गगनीं नाथिलें आभाळ । तैसें ब्रह्मीं माया पडळ ॥
तें विरालिया केवळ । ब्रह्मचि असे ॥ १ ॥
जें ध्यानावीण ध्याइजे । जें चित्तावीण चिंतिजे ॥
जें जाणिवेवीण जाणिजे । परब्रह्म तें ॥ २ ॥
जें परब्रह्म निर्गुण । सर्वेश्वराचें निजरूप जाण ।
मूळमायेचें अधिष्ठान । पूर्ण चैतन्य जें ॥ ३
माया ब्रह्मीचा विवर्त । ऐसा बोले वेदांत सिद्धांत ॥
जो उपनिषदांचा मथितार्थ । प्रमाणसिद्ध ॥ ४ ॥
ब्रह्मनिर्विकार जैसें तैसें । तें असतचि सदा असे ॥
तेथें अन्यथा भास भासे । तो तद्विवर्त गा ॥ ५ ॥
ना तरी जैसा दोरु । न मोडे तेथचा आकारु ॥
नाथिलाचि आभास थोरू । सर्प जैसा ॥ ६ ॥
तैसें ब्रह्म उपमारहित । तेथें कायसा दृष्टांत ॥
परि एकदेशी होय उचित । बुझावया उद्देशें ॥ ७ ॥
सृष्ट्यादि व्यापार । जो करींतसे सर्वेश्वर ॥
तोही मायेचा बडिवार । ऐसा जाणिजे ॥ ८ ॥
हे असंभवनीय माया । अनिर्वचनीय शिष्यराया ॥
ह्मणवूनी मिथ्याचि गा परि वाया । आभासत असे ॥ ९ ॥
अहो ब्रह्म आपणि यातें । मी ब्रह्म ऐसें न ह्मणतें ॥
तरी ब्रह्मीचें काय उणें होतें । ब्रह्मपणासी ॥ १० ॥
ह्मणवुनी मिथ्याभूत माया । आणि विश्व हें मायामय ॥
तरी ब्रह्म तें अद्वय । कां न ह्मणावें ? ॥ ११ ॥
जें मिथ्या तें काय असें । जरी साचासारिखें आभासें ॥
गगनीं गंधर्वनगर जैसें । नाथिलेचि गा ॥ १२ ॥
ऐसी माया उठली । ते परब्रह्मीं आधिष्ठिली ॥
तियें प्रकृति पुरुषें बोलिली । सांख्यमतें ॥ १३ ॥

हे मायामूळ प्रकृति । परमपुरुषाची निजशक्ति ॥
तियेशीं तयाची संगती । तें ऐक पां ॥ १४ ॥
घट जो जो निपजे । तो तो आधींच गगनें व्यापिजे ॥
तैसें जें जें तत्व उपजे । तें व्यापिजे चैतन्य ॥ १५ ॥
नातरी उठलीया तरंगातें । जळ आधींच व्यापूनि वर्ते ॥
तैसें पूर्वीं मायेतें । व्यापिजे परब्रह्म ॥ १६ ॥
जेणें मायेतें व्यापिलें । तें सगुण ब्रह्म बोलिलें ॥
येर जैसें तैसें उरलें । केवळ ब्रह्म पैं ॥ १७ ॥

## पद.

उबगल्यें सासऱ्या आतां मज माहेरासि न्याहो । तोडा एवढा जाच, पडतें तुमच्या पायां हो ॥ धृ० ॥ त्रिविधताप सासरा प्रभु मज उगाचि गांजतो । भेद भयंकर भाऊ हा तर उगाचि जाळितो ॥ क्रोध माझा दिर तो मजला भलतेंच बोलतो । काम माझा दादला सखे गे! भलतिकडे जातो ॥ १ ॥ सासू ही कल्पना मजला करिति जाच नाना । अविद्या हि नणंद बाई! तर उगीच राहीना ॥ आशा ममता जावा यांनीं मांडियली दैना । कुठवर सोसूं जाच? आतां कदापि राहीना ॥ २ ॥ अहेव मायेचा तंतू हा तर बळेंच तोडीन । प्रपंचाचें लुगडें हें तर उभेंच फाडीन । जो मज माहेर दाविल त्याची मी सेवा करीन । मुकुंदराज ह्मणे लाज बाइ! गेली उडोन ॥ ३ ॥

वर घेतलेल्या उताऱ्यांवरून मुकुंदराजांच्या ग्रंथांचीं योग्यता सहज ध्यानांत येईल. त्यांचे ग्रंथांत अध्यात्मज्ञानाखेरीज इतर भाकड विषयांना थोडासा देखील अवकाश दिलेला नाहीं, यावरून त्यांचें चित्त ब्रह्मविचारांत अहर्निश किती निमग्न असे हें उघड होत आहे. त्यांची वाणी शुद्ध आणि प्रौढ असून थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थ आणण्याची हतोटी त्यांना पूर्ण-पणें साधली होती. ओंव्या सरळ असून रसाळ आहेत. त्यांनीं कवित्वास घेतलेले विषय जरी फार अवघड होते तरी ते त्यांनीं वाचकांस बरेच सुगम करून दिले आहेत. त्यांच्या कवितारूपी कुसुमांचा परिमल जे कोणी आघ्राण करतील ते पूर्ण ब्रह्मानंदांत चिरकाल डोलत राहतील.

काळाच्या निर्घृणतर स्वरूपाचें वर्णन मागें केलेंच आहे; तरी विवेकसिंधु

अद्याप आपणास आपल्या शांत व गंभीर स्वरूपाचें दर्शन देत आहे, ही आपणावर मोठीच खैर आहे. अहो पण खैर कसची! बोलूनचालून तो 'विवेकसिंधुच.' त्यानें जर काळमहाराजांपुढें . कचर खाशी तर मग त्यास आकळावें तरी कोणी! त्यांच्या सपाट्यांतून पार पडून त्यानें स्वतःचा बचाव केला आहे असें नाहीं तर आपणाबरोबर आपल्या पित्यासही अजरामर करून ठेविलें आहे.

मोरोपंतादि प्राकृत कवीश्वरांनीं मुकुंदराजांची व त्यांच्या कवितेची बरीच प्रशंसा केली आहेः-

'जो वेदांतक्षीरार्णवींचा मीन। जेणें विवेकसिंधू निर्मिला पूर्ण ॥
तो मुकुंदराज गुणनिधान। तयाचे चरण वंदिले ॥ १ ॥

-श्रीधर.-

'वंदन नंदनसा मी करितों भावें मुकुंदराजाला।
वश झाल्या सद्विद्या सत्कीर्ति सु-युक्ति सुंदरा जाला ॥ १ ॥

-मोरोपंत.-

'मुकुंदराज जगविख्यात। जयानें विवेकसिंधु केला ग्रंथ ॥
जो सिद्धांतज्ञानी पूर्ण बहुत। तयासी प्रणिपात सद्भावें ॥ १ ॥

-महीपती.-

---



# ज्ञानेश्वर.

कोणत्याही देशांतले साधुपुरुष किंवा ज्ञानी ह्मटले ह्मणजे त्यांजविषयीं त्या देशांतल्या लोकांस मोठा अभिमान असतो आणि त्या ज्ञानी पुरुषांत किंवा साधूंत ज्या मानानें अलौकिक गुण अधिक असतात, त्या मानानें तो अभिमान अधिक असतो. त्याप्रमाणें आह्मांस आमच्यांतल्या ज्ञानी पुरुषांविषयीं आणि साधूंविषयीं मोठा अभिमान असणें साहजिक आहे. कां कीं, तेराव्या आणि चौदाव्या शतकांत जे कोणी कवि, साधु आणि ज्ञानी होऊन गेले, त्यांच्या कृतींनें, भारतधर्माची ग्लानी बरीच नष्ट होऊन, लोकांच्याठायींचें मूळचें स्वत्व इतकें बळावलें कीं, आज पांचशें वर्षें जरी त्यागोष्टीस लोटलीं आहेत–ह्मणजे ज्या पांचशें वर्षांत कितीएक मोठमोठीं जुनीं राज्यें नाहींतशीं होऊन त्यांच्याजागीं नवीं स्थापित झालीं आहेत–किंवा 'ज्या पांचशें वर्षांत कालचक्राच्या आघातांनीं पाषाणांची मृत्तिका झाली आहे–त्या पांचशें वर्षांमध्यें भारतधर्माचें माहात्म्य कमी झालें नाहीं, एवढेंच केवळ नव्हे, तर नव्या ज्ञानप्रभेनें त्यास विशेष तेज येण्याचीं लक्षणें दिसत आहेत.' ह्या महत्कार्यास ज्या महात्म्यांचे प्रसाद साधनीभूत झाले आहेत, त्यांत अग्रस्थानीं ज्ञानेश्वरमहाराज होते.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें नांव ज्याला माहीत नाहीं असा मनुष्य निदान महाराष्ट्रांत तरी सांपडणें विरळा! ह्या भागवतशिरोमणीचें जनन आळंदी येथें महासाध्वी रखमाबाई यांचे पोटीं शके ११९३ श्रावण कृष्ण आष्टमीस बरोबर दोनप्रहरीं रात्रीं झालें. याच दिवशीं परमात्म्यांनीं श्रीकृष्ण नामक पूर्ण ब्रह्मावतार धारण केला व त्याच तिथीला व त्याचवेळीं मोरोपंतांनीं ह्मटल्याप्रमाणें श्रीविष्णूंनीं अकरावा अवतार घेतला, ही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. यांच्या तीर्थरुपाचें नांव विठ्ठलपंत. यांचें मूळचें गांव प्रतिष्ठान उर्फ पैठण जवळील आपेगांव. यांचें उपनांव कुळकर्णी असून हे शाखेनें देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण होत. विठ्ठलपंत लहानपणापासूनच फार विरक्त होते. यांच्या प्रीत्यर्थ यांच्या वडिलांनीं ह्मणजे गोविंदरावांनीं गायत्रिपुरश्चरणें केलीं होतीं. ब्रह्मचारी असतांच ते मातापितरांचे मायाजाळ खाडकन् तोडून व गृहधनास विषवत् मानून तीर्थयात्रेचे उद्देशानें बाहेर पडले. तीर्थाटण करीत करीत ते सहजगत्या अलंकापुरीस ( आळंदीस ) आले. त्यावेळीं तेथें शिदोपंत नांवाचे एक सुखवस्तु गृहस्थ होते. हे गृहस्थ परम धार्मिक असून

ते आल्यागेल्या अतीत–अभ्यागताचा चांगला परामर्ष घेत असत. या नियमानुरूप त्यांनीं या ब्रह्मचाऱ्यालाही आपल्या घरीं नेऊन त्यांचा चांगला आदरसत्कार केला. कर्मधर्मसंयोगानें त्यांनां त्या रात्रीं ईश्वरी दृष्टांत झाला कीं, "तूं आपली उपवर कन्या विठ्ठलपंतास अर्पण करून धन्य हो." सकाळीं त्यांनीं हा रात्रीं घडलेला प्रकार पंतांस निवेदन केला; तेव्हां पंत ह्मणाले, 'ज्याप्रमाणें परमेश्वरांनीं तुह्मांस दृष्टांत दिला तसाच मला दिला तर मी आपल्या ह्मणण्यास रुकार देईन.' तेच दिवशीं रात्रीं विठ्ठलपंतानांही असाच साक्षात्कार झाला. मग काय तात्काळ तिथिनिश्चय ठरवून लग्नसमारंभ मोठ्या थाटाचा केला.

पुढें पुष्कळ दिवस हें दंपत्य तेथेंच सुखानें कालक्रमणा करीत होतें; परंतु तुकारामबोवांनीं ह्मटल्याप्रमाणें:–

'आधीं होता संतसंग । तुका झाला पांडुरंग ॥
त्याचें भजन राहीना । मूळ स्वभाव जाईना ॥ १ ॥'

विठ्ठलपंतांना दिवसेंदिवस संसारव्यथा फार दुःसह होऊं लागली. त्यांचें संसारांत चित्त लागेना. संन्यास घेण्याची उत्कंठा फारच अनिवार होऊं लागली. पत्नीतर अनुमोदन देईना. ठीकच आहे. बायकांना संसार ह्मणजे अत्यंत प्रिय. मग ऐन तारुण्यांत सती रखुमाबाईनीं पतीस संन्यासदीक्षा घेण्याची परवानगी कशी बरें द्यावी? पण इकडे तर विठ्ठलपंतांना अगदीं तळमळ लागून राहिली होती. शेवटीं एके दिवशीं पत्नी निद्रिस्त असतां तिला जागृत करून नेहमींचा "संन्यास घेऊं कां" ह्मणून प्रश्न विचारिला. बिचारी आधींच कावलेली व त्यांत झोंपेंतून बळेंच उठविलेली. तिनें त्रासून 'घ्या एकदांचा' ह्मणून उत्तर केलें. येथें काय? पडत्या फळाची आज्ञा. स्वारी लगेच तडक निघाली ती मजल दरमजल करीत थेट श्रीक्षेत्र काशी येथें येऊन दाखल झाली. त्या वेळीं काशीस श्रीपादयतीश्वर सकलशास्त्र पारंगत असून तत्कालीन तत्रस्थ विद्वानांमध्यें प्रमुख होते. त्यांजपाशीं विठ्ठलपंतांनीं जाऊन साष्टांग प्रणिपात केला आणि 'मी संन्यास घेण्यास पत्नीची आज्ञा घेऊन आलेलों असून दीक्षा आपल्या हातून मिळावी, असा माझा मनोदय आहे,' असें त्यांस सांगितलें. स्वामींनीही विठ्ठलपंतांची कुशाग्रबुद्धि पाहून त्यांस संन्यासाश्रमाची दीक्षा दिली. अशा प्रकारें आपला इष्टहेतु निर्विघ्नपणें सिद्धीस गेला हें पाहून विठ्ठलपंतास अत्यानंद झाला. श्रीपादयतीश्वरांनीं आपल्या या नवीन शिष्याचें नांव 'चैतन्य' असें ठेविलें. नवीन

अंगिकारिलेल्या आश्रमाप्रमाणें चैतन्यानें आपलें आह्निक मोठ्या दक्षतेनें संभाळून जी पुढें अपूर्व गुरुसेवा केली, तीवरून स्वामींनीं अत्यंत प्रसन्न होऊन त्याला आपल्या मठाचें सर्व आधिपत्य दिलें व ते तीर्थयात्रा करण्याच्या उद्देशानें बाहेर निघाले. रामेश्वरास यात्रेस जातांना ते सहज मुकामास आळंदीस उतरले. त्यांस तेथें विठ्ठलपंताची पत्नी, सासरे आणि सासू हीं भेटलीं. त्यांची हकीकत ऐकून घेऊन, ते स्वामी त्यांस बरोबर घेऊन परत काशीस गेले आणि, त्यांनीं, पत्नी जिवंत असतां संन्यास घेणें अशास्त्र आहे, असें चैतन्यास पढवून, आणि त्यांस पुनः गृहस्थाश्रमीं विठ्ठलपंत बनवून, परत आळंदीस पाठवून दिलें. हें सगळें आश्रमांतर अशास्त्र झालें, असें आळंदीच्या ब्राह्मणांनीं ठरवून, विठ्ठलपंतांस बहिष्कार घातला. त्याची खंती विठ्ठलपंतांस तिळमात्रहि वाटली नाहीं. कांकीं, त्यांत कांहीं पाप नव्हतें. ते आपली कालक्रमणा ध्यानधारणा, भजनपूजन आणि पुराणपठण यांत मोठ्या आनंदानें करीत असत.

अशाप्रकारें आळंदीस बारावर्षें लोटल्यावर, विठ्ठलपंतास इ. स. १२६८ या वर्षीं एक मुलगा झाला. त्याचें नांव निवृत्ति ठेविलें. हा श्रीशंकरांचा अंश होय. त्यानंतर इ. स. १२७१ त त्यांस दुसरा एक मुलगा झाला. त्याचें नांव ज्ञानेश्वर ठेविलें. हा श्रीविष्णुचा अवतार ह्मणून मागें सांगितलेंच आहे. तिसरा मुलगा इ. स. १२७४ त झाला. ते सोपान होत. हे ब्रह्मदेवाचे अंशानें होते. त्यांच्या मागून इ. स. १२७७ त त्यांस एक कन्या झाली. हीच मुक्ताबाई होती. ती आदिमायेच्या अंशानें होती.

ज्ञानेश्वराचेवेळेस जनाबाई या नांवाची एक दासी नामदेवांच्यायेथें होती; तिनें केलेले अभंग पुष्कळ उपलब्ध आहेत. त्यांत ह्यांच्या जन्मशकाबद्दलचा एक अभंग आहे. तो ह्याचा दर्शक जाणून आमच्या जिज्ञासु वाचकां करितां येथें देतों. तो अभंग असाः—

शालीवाहनशके, अकराशें नव्वद ॥
निवृत्ति आनंद, प्रकटले ॥ १ ॥
त्र्याण्णवचे सालीं, ज्ञानदेव प्रकटले ॥
सोपान देखिले, शाण्णवांत ॥ २ ॥
नव्व्याण्णवांचे सालीं, मुक्ताबाई देखिली ॥
जनी ह्मणे केली, मात त्यांनीं ॥ ३ ॥

हीं चारी भांवडें उपजत ज्ञानसंपन्न होतीं. तीं बोलत तसें मोठ्या पंडि

तांस बोलतां येईना. त्याचें कौतुक आळंदीचे ब्राह्मण करीत; परंतु, त्यांचीं वयें, मुंजी लग्नें न होता, जरी १५, १२, ९, आणि ६ अशा वर्षांचीं झालीं, तरी त्यांस पावन करून घेण्याचें नांव कोणी काढीना. विठ्ठलपंतांनीं त्यांच्या हातांपाया पडून आपली पराकाष्ठा करून पाहिली, तरी त्यांची दया कोणास आली नाहीं. शेवटीं, त्यांनीं आणि त्यांच्या पत्नीनें, वैतागून, प्रयाग येथें जाऊन त्रिवेणींत जलसमाधि घेतली. मुलें उघडीं पडलीं. तरी, तीं दुःखी झालीं नाहींत. एकेवेळीं जातिशुध्दीच्या संबंधानें ज्ञानदेव खिन्न झालेले पाहून, त्यांस समाधानार्थ, सोपानदेव ह्मणाले; 'पहा! जाति, कुळ, ह्यांशीं काय कर्तव्य आहे? मात्र ईश्वरचरणांच्याठायीं ज्याची भक्ति तोच थोर; मग तो या लोकराहटींतील कितीही हलक्या जातीचा असला तरी तो थोर नामांकित कुलवान् होतो.' ह्याजबद्दल मग सोपानदेवांनीं पूर्वकाळचे कांहीं ऋषि आणि राजे ह्यांचीं नावें सांगितलीं. त्याजबद्दल ज्ञानेश्वराच्या आदि नामें ग्रंथांत नामदेव लिहितात तें असें:—

"पांडवांचें कुळ शोधितां निर्मूळ। कुंड जार गोळ वृद्धिकैंची॥१॥
भक्ति हे सरती ज्ञाति न सरती। ऐशी आत्मस्थिति स्वसंवेद्य॥२॥
दुर्वास वसिष्ठ अगस्ती गौतम। हे ऋषि उत्तम कुळिंचे कैसे॥३॥
व्यासादि वाल्मीक कोण कुळ यांचें। तैसोंचि आमुचें सोपान ह्मणे ४"

पुष्कळ भवतिनभवति झाल्यावर, शेवटीं आळंदीच्या ब्रह्मवृंदानें ह्या चौघां भावंडांस असें सांगितलें कीं, तुह्मी पैठणच्या ब्रह्मवृंदाचें पावनपत्र घेऊनया ह्मणजे आह्मी तुह्मांस पावन करितों. त्याप्रमाणें हीं चौघें पैठण्यास जाण्यास निघालीं, तीं वाटेंत त्र्यंबकेश्वरीं मुकामास उतरलीं. तेथें निवृत्तिनाथांस गैनीनाथ या महापुरुषांनीं ज्ञानोपदेश दिला. तोच उपदेश त्यांनीं आपल्या तिघां भावंडांस दिला. ह्यापुढें निवृत्तिनाथांचें बंधूचें नातें सुटून गुरुशिष्यांचें नातें झालें! मग तर ती प्रीति विशेष झाली, हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. आतां ह्यांना उपदेश तो काय? दूध असलें तर त्याचें दहीं करण्यास मध्यें विरजण घालावें लागतें; मग तर हें लोणकढें उत्तम प्रकारचें तूप, येथें काहींच श्रम नाहींत. कारण ईश्वराचे अंश उपजत ज्ञानी-जीवन्मुक्त, पण या मनुष्यसृष्टींत असल्यामुळें सर्व मनुष्यपद्धतीस अनुसरून ह्यांस उपदेश, प्रायश्चित्त इत्यादि घेणें भाग पडलें. नाहीं पेक्षां हे लोकोत्तर पुरुष ह्यांना या गोष्टींची कांहींच जरुर नव्हती. असो. नंतर तीं चौघें पैठणास आलीं. त्या चौघांच्या कौटिक्रमाचें सयुक्तिक खंडण तर

त्यांच्यानें करवेना, आणि त्यांस पावन करण्यास धैर्यही होईना. शेवटीं रेड्याच्या मुखें वेद बोलविणें, प्रत्यक्ष पितरें श्राद्धास आणणें, इत्यादि अनेक अद्भुत साक्षात्कार ज्ञानदेवांनीं तेथल्या मंडळीस दाखविल्यावर, त्यांची योग्यता त्यांस कळली आणि त्यांनीं निमूटपणें त्यांस पावनपत्र दिलें. तें पत्र घेऊन ही मंडळी परत आळंदीस येतांना मुक्कामाकरितां नेवासें येथें उतरली. तेथेंही ज्ञानदेवांनीं सती निघालेल्या स्त्रीस "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" असा आशीर्वाद देऊन, तिच्या मृत पतीस जीवंत करून चमत्कार दाखविला. ह्या जीवंत केलेल्या गृहस्थाचें नांव 'सच्चिदानंद' असें होतें. ह्या अमानुष कृत्यावरून त्यांचा मोठा लौकिक होऊन पुष्कळ लोक त्यांस देवाप्रमाणें भजूं लागले. नेवाशास मुक्काम असतां ज्ञानेश्वरांनीं **ज्ञानेश्वरी** ह्मणजे गीतेची प्राकृत टीका लिहिली. हा ग्रंथ अप्रतिम आणि साधुमान्य आहे. या ग्रंथाचें वर्णन किती करावें! ह. प. भिंगारकरबुवा ह्मणतात; 'श्रीभगवद्गीतारूप एक नदी असून तीमध्यें वेदार्थप्रमेयाचें उदक अनस्फत वहात आहे. त्या भगवद्गीतारूप नदींतील वेदार्थप्रमेयरूप उदक प्राशन करण्याकरितां शांकर मध्वप्रभृतींनीं द्वैताद्वैत टीकेचे तट बांधिले आहेत; परंतु ते तट गहन व फार उंच असल्यामुळें जीवांच्या हातांत गीतानदीचें वेदार्थप्रमेयरूप जल येत नाहीं. तें पाहून दीनवत्सल श्रीज्ञानेश्वरांनीं बुद्धिमंजुषेंतील ज्ञानद्रव्याचा व्यय करून त्या तीरास मराठी शब्दरूप सोपान बांधिला; त्यायोगानें ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्व जातीस गीतारूप नदींतील वेदार्थप्रमेयरूप जल उपयोगीं पडूं लागलें आहे.' असो. ही ज्ञानेश्वरी त्यांनीं एका दगडी खांबावर बसून लिहिली तो खांब अद्याप तेथें आहे. त्याची जत्रा भरत असते. या ज्ञानेश्वरीची प्रथम प्रत वर सांगितलेल्या सच्चिदानंदबावांचे हातून ज्ञानेश्वरांनीं करविली हें ज्ञानेश्वरीच्या अंतिम ओव्यांवरून सिद्ध होत आहेः—

"त्रिभुवनैक पवित्र। अनादि पंचक्रोशक्षेत्र॥
जेथ जगाचें जीवनसूत्र। श्रीमहालया असे॥ १॥
तेथ यदुवंश विलास। जो सकळ कळा निवास॥
न्यायातें पोषी क्षितीष। श्री रामचंद्र॥ २॥
तेथं महेषान्वयसंभूतें। श्री निवृत्तिनाथसुतें॥
केलें ज्ञानदेवें गीतें। देशीकार लेणें॥ ३॥
शके बाराशतें बारोत्तरें। तै टीका केली ज्ञानेश्वरें॥
सच्चिदानंद बावा आदरें। लेखकू जाहला॥ ४॥"

तीं भावंडें आळंदीस परत आल्यावर, पावनपत्र पाहून, तेथल्या लोकांनीं त्यांचें मोठें देव्हारें केलें, आणि त्यांच्या पाया पडून त्यांस पावन केलें. त्यांस पंक्तीस घेऊन ते जेवूं लागले, आणि आपल्यायेथें मोठ्या आदरानें त्यांस भोजनास बोलावूं लागले. **विसोबाचेटी** ह्मणून आळंदीस एक कुचेष्टखोर मनुष्य होता; तो या चौघां भावंडांचा उपहास करीत असे. तो सर्व गांवांत सुखी असल्यामुळें व लोकांकडे त्याचें येणें असल्यानें सर्वांवर त्याची छाप होती. तो खल व कुटिल ब्राह्मण या भावंडांना पाहिलें कीं ह्मणे, हीं संन्याशाचीं कारटीं, ह्यांचें तोंड पाहिल्यास सहा महिनें द्वाड! एकदां दिपवाळीच्या सुमारास निवृत्तिनाथांनीं मुक्ताबाईस सांगितलें कीं, उद्यां आपल्यायेथें मांडे कर. वडील भावाच्या आज्ञेप्रमाणें तिनें मांड्यांस लागणारें सर्व साहित्य आणविलें; पण तिला मांडे भाजण्याकरितां लागणारें खापर मिळालें नाहीं. तें आणण्याकरितां ती कुंभाराचे घरीं गेली पण विसोबाचाळ्याच्या धाकामुळें कुंभार मडकें देईना. **मुक्ताबाईनें** ही गोष्ट ज्ञानेश्वरांना सांगितली. ते ह्मणाले, “ कांहीं हरकत नाहीं. माझ्या पाठीवर मांडे भाज ” तात्काळ ज्ञानेश्वरांनीं योगधारणा करून पंचाग्नि पेटविला; त्यासरसें मुखांतून एकसारख्या ज्वाळा चालल्या; नेत्र आरक्त झाले व पाठ बावनकशी सुवर्णासारखी लाल झाली. मग त्यांनीं मुक्ताबाईस विचारिलें; ‘ कां बाई, आतां या पाठीवर मांडे सहज भाजतील नाहीं बरें? त्यावेळीं मुक्ताबाईस जो आनंद झाला तो काय सांगावा? तिनें मोठी त्वरा करून मांडे लाटून ते ज्ञानेश्वराच्या पाठीवर भाजले. अशारीतीनें मांडे तयार झाल्यावर मुक्ताबाईनें दुसरा स्वयंपाक तयार केला. मग कांहीं वेळानें त्या चौघांनीं भोजनास प्रारंभ केला. तो असाः—‘ स्वानंदाच्या ताटामध्यें प्रेमभक्तीची खीर घेऊन तिजवर त्यांनीं सौख्याची साखर वाढली आणि तिजमध्यें हे स्वानुभवाचे मांडे चुरून जय श्रीहरी भोक्ता असें ह्मणून हीं चौघेंजणें आनंदानें भोजन करूं लागलीं. ’ इकडे **मुक्ताबाईस** मडकें मिळालें नाहीं तर ही मांडे कसे करील हें पाहण्यासाठीं **विसोबाचाटी** तिचे मागोमाग येऊन गवाक्षांतून पहात होता. हें अद्भुतकृत्य पाहून त्याच्या मनांत जो अनुताप झाला तो सांगतां येत नाहीं. असो. नंतर तो एकाएकीं दार न वाजवितां त्याचे मठांत शिरला. ह्यास पहातांच ज्ञानेश्वरादि मंडळीस मोठें आश्चर्य वाटलें; त्यांनीं भोजनाचें ताट एकीकडे केलें; तें विसोबानें पाहून बळें झडप घालून ताटाजवळ गेला; आणि त्यांतील उच्छिष्टाचा एक कवळ घेऊन तो तोंडांत टाकिला व त्याचवेळेस श्रीज्ञानेश्वराच्या चरणावर मस्तक ठेवून

कृतकृत्य झाला. एक ग्रास तोंडात टाकताच विसोबाचें मन अगदीं निर्मळ झालें. ज्ञानेश्वरांनीं त्यास ह्मटलें, अरे छळबुद्धे, एकीकडे हो. तूं खेचर होशील. पण ह्याच्या गांवींही ती गोष्ट आली नाहीं. त्याला मुळींच देहाची शुद्धि राहिली नाहीं. हें त्याचें शुद्ध मन पाहून श्रीज्ञानेश्वर सदय अंतःकरणानें ह्मणाले, खेचरा, एकीकडे हो; तरी विसोबा पाय सोडीना. मग ज्ञानेश्वरांनीं त्यास अभय देऊन आपल्या हातांनीं उठविलें; व त्यानंतर पूर्ण कृपानुग्रह केला; तो फक्त उपनामाचा खेचर झाला. प्रसिद्ध बालभागवत नामदेव याचे गुरु जे विसोबा खेचर ते हेच होत. ह्यांस पुढें मोठें वैराग्य प्राप्त होऊन ह्यांनीं आपल्या जन्माचें सार्थक केलें!

लौकिकामागें मत्सर उभा असतोच. ज्ञानेश्वरादि मंडळीची कीर्ति ऐकून नारायणडोह येथील सिद्ध पुरुष चांगदेव—जे काशींहून अजिंक्य पत्र घेऊन नामांकित झाले होते—ते हजार दोन हजार शिष्यगणांसहवर्तमान, व्याघ्रारूढ होऊन, आणि हातांत सर्पाचा चाबूक घेऊन, ज्ञानेश्वरादि साधुमंडळीचें सत्त्व हरण करण्याच्या संकेतानें आळंदीस आले. हे वयानें १४०० वर्षांचे होते, ह्यांचा मठ तापीच्या काठीं होता, आणि ह्यांस सगळ्या विद्या साध्य होत्या, असें ह्मणतात. त्यावरून त्यांस चौदा नांवें होतीं. चांगदेवचांगा, वटेश्वरचांगा, चक्रपाणीचांगा, सिद्धचांगा, शिवयोगीचांगा, मणिसिद्धचांगा, अनकरचांगा, नागेशचांगा, मुधेशचांगा, सत्यसिद्धचांगा, निश्चळदासचांगा, विद्यावयवीचांगा, बुटीचांगा आणि नाहमाचांगा, परंतु या चौदा नांवांपैकीं ते वटेश्वरचांगा या नांवानें विशेष प्रसिद्ध आहेत. मुधेशचांगा या नांवाविषयीं बराच मतभेद आहे. मुधेशचांगदेव हे वटेश्वरचांगदेवांहून अगदीं भिन्न होते असें महाराष्ट्रकविकर्ते रा. रा. भावे ह्मणतात; व तें त्यांचें ह्मणणें बरोबर आहे असें वाटतें. कारण शामजी गोसाव्यानें मुधेशचांगदेव वटेश्वरचांगदेवाचा अवतार होता असें वर्णन केलें आहे. रा. रा. बळवंत खंडूजी पारख यांनीं ज्ञानेश्वरांचें एक चरित्र लिहिलें आहे, त्यांत या दोन्ही चांगदेवांची गफलत व भेसळ केली आहे, परंतु हरिभक्तिपरायण श्रीपतिबुवा भिंगारकर यांनीं वटेश्वरचांगदेव व मुधेशचांगदेव ह्या दोन व्यक्ति भिन्न होत्या असें स्पष्ट ह्मटलें आहे व तें वर लिहिल्याप्रमाणें साधार आहे. असो. वटेश्वरचांगदेवाचा हेतु अंतरसाक्षित्वानें जाणून, त्यांच्या गर्वपरिहारार्थ, ज्या भिंतीवर ज्ञानदेव बसले होते, ती भिंतच त्यावेळीं त्यांनीं हत्तीप्रमाणें चालवून ते त्यांस सामोरे गेले. तें पाहून चांगदेवांचे डोळे उघडले, त्यांचा गर्व नाहींसा झाला व ते ज्ञानदेवांस शरण आले. ज्ञानदेवांनीं त्यांस गुरुमंत्र दिला, परंतु या गोष्टीबद्दलही

बराच मतभेद आहे. शिवकल्याणानें आपली गुरुपरंपरा दिली आहे त्यांत तो असें दर्शवितो कीं, वटेश्वरचांगदेवांस मुक्ताबाईनीं गुरुपदेश दिला. तसेंच पुनः सदरहु शिवकल्याण ह्मणतो कीं, मुक्ताबाईला निवृत्तिनाथांचा आजेगुरु जो गोरखनाथ त्यानें उपदेश दिला; याबद्दल त्याच्या ओंव्या आहेत त्याः-

**'असो हे एका हेलावयाची मातु। आतां तोचि श्रीगोरक्षनाथु॥**
**जो श्री आदिनाथाचा नातु। मच्छेंद्रद्वारा ॥ १ ॥**
**बो तैसाचि रसु वोसंडला। तंव मुक्ताबाईया प्राशिला॥**
**प्राशून तैसाचि उरला। तो वटेश्वरा दिधला ॥ २ ॥'**

इतर ठिकाणीं अशी माहिती मिळते कीं, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई ह्या शिष्यांस निवृत्तिनाथांनीं उपदेश दिला; व आह्मींही मागें याचाच अनुवाद केला आहे. परंतु ही शिवकल्याणांनीं दिलेली वंशावळही बरीच विचारणीय आहे; कारण ती शके १६९७ त ह्मणजे सरासरी २०० वर्षांपूर्वी लिहिलेली आहे.

ह्यानंतर साधुशिरोमणी **नामदेव आणि ज्ञानेश्वर** ह्यांची गांठ पडली. ते उभयतां यात्रा करण्यास बरोबर निघाले. ते दोघेही महाज्ञानी होते, त्यांचीं भाषणें अत्यंत श्रवणीय असत. तीं सगळीं उपलब्ध नाहींत, हें जगाचें दुर्भाग्य होय!

नामदेवांसमवेत पुष्कळ तीर्थयात्रा केल्यानंतर लवकरच ज्ञानदेव यांचे वयास २२ वर्षे पुरीं होत आलीं, आणि आपलें अवतारकृत्य आटपलें आहे, त्यापक्षीं या मृत्युलोकीं राहण्याचें कारण नाहीं, असें त्यांस वाटून त्यांनीं, अलकापुरीं इ. स. १२९३ ह्यावर्षी, शके १२१९ च्या कार्तिक वद्य १३ स देह ठेविला. यांच्या मागून श्री सोपान देवांनीं कऱ्हा नदीचे तीरीं संवत्सर (सासवड) येथें शके १२१९ वैशाख शुद्ध एकादशीस समाधि घेतली. त्या वेळचा नामदेवाचा अभंग असा सांपडतो:—

**"देव ह्मणे नाम्या मार्गशीर्ष गाढा। जावें सासवडा उत्साहासी ।१।**
**सोपानासी आह्मीं दिधलें वचन। चला अवघेजण समुदाय ॥ २ ॥**
**अलकापुरीची यात्रा केली सांग। मग पांडुरंग सिद्ध झाले ॥ ३ ॥**
**दुरोनी पताका दिसती मनोहर। उठावले भार वैष्णवांचे ॥ ४ ॥**
**निवृत्ति मुक्ताई घेतला सोपान। जातो नारायण कऱ्हे तीरीं ॥ ५ ॥**
**नामा ह्मणे देव गंधर्व सुरगण। चालले सोपान समाधीसी ॥ ६ ॥"**

सोपानदेव समाधिस्थ झाल्यापासून मुक्ताबाई फार उदास झाल्या. त्यांना

शरीराचा वीट आला व तेव्हांपासून त्यांनीं अन्नोदकही वर्ज केलें. त्यांची चित्तवृत्ति ईश्वरस्वरूपीं अगदीं तल्लीन होऊन गेली होती. त्यांचा काल आतां अगदीं जवळ आला असें पाहतांच श्रीविठ्ठलांनीं निवृत्तिनाथास मुक्ताबाईना तापी नदीच्यातीरीं न्यावयास सांगितलें. ही समाधि १२२० वैशाख वद्य ११ स झाली. मुक्ताबाईविषयीं अनेक मतें आहेत; कोणी ह्मणतात त्यांना ब्रह्मकल्पपर्यंत समाधीच नाहीं; कोणी ह्मणतात त्या पंढरपुरांत आहेत आणि कोणी ह्मणतात, त्यांना एदलाबाद ह्मणून खानदेशांत एक गांव आहे, तेथें समाधि दिली. हल्लीं त्या गांवीं दहा पंधरा हात जिवंत पाण्याचा प्रवाह असून दोहों बाजूंस कांहींच नाहीं असें सांगतात. आतां ह्यांच्या समकालीन साधु जे नामदेव ते तर मुक्ताबाईस समाधि दिल्याचें लिहीत नाहींत, मग ह्यांत काय असेल तें असो! विचक्षण वाचकांकरितां नामदेवांचा त्यावेळचा एक अभंग येथें मुद्दाम उतरून घेतों:—

'तापिचीये तीरीं महत् ग्राम थोर । असे सोमेश्वर पुरातन ॥१॥
वद्य वैशाखमास दशमी निर्मळ । फार उष्णकाळ तापतसे ॥ २ ॥
येथें परशुरामें मारियेला बाण । पाहती पुरातन पश्चिमेसी ॥ ३ ॥
पाहिलें ग माय आह्मी तापी तीर । उतरले भार वैष्णवांचे ॥४॥
धन्य तापी तीर दिसे मनोहर । दोहीं थडीं भार पताकांचे ॥ ५ ॥
नामा ह्मणे हरी आवडीचें स्थळ । कण्हेर कमळ उदय झाला ॥६॥'

या एदलाबादेपासून तापीनदी व चांगदेवांची समाधि दोन कोसांवर आहे. यावेळेचें वर्णन नामदेवांनीं फारच मजेदार केलें आहे:—

'निवृत्तीनें एकांत केला मुक्ताईसी । गमन कोणे दिवशीं आरंभिलें ।१।
मुक्ताबाई ह्मणे जावें यावें कोठें । आवघे निघाटे स्वरूप स्वामी ॥२॥
गर्जता गगन कडाडली वीज । स्वरूपीं सहज मिळयेली ॥ ३ ॥
मावळला दीप ज्योत कोठें होती । सहज समावती निरंजनीं ॥ ४ ॥
नामा ह्मणे हरी जाईल पाहतां । ऐसें माझे चित्ता कळों आलें ॥५॥

निवृत्तिनाथ त्र्यंबकेश्वरीं शके १२२० ज्येष्ठ वद्य द्वादशीस समाधिस्थ झाले. हे नाथपंथी होते, हें त्यांच्या नांवास जोडलेल्या 'नाथ' या शब्दावरूनच सिद्ध आहे. यांनीं एक ग्रंथ केला होता; परंतु दुर्दैवानें सांप्रत तो कोठें उपलब्ध नाहीं. कोणी ह्मणतात कीं, 'वृत्तिबोध' या नांवाचा ग्रंथ निवृत्तिनाथांनींच केला आहे. कोणचा कां होईना; नाथांनीं एक ग्रंथ केला

आहे एवढें खचीत, कारण, नामदेवांनीं एकेठिकाणीं त्याचा उल्लेख केला आहे. ते ह्मणतात:—

**निवृत्तिदेवें ग्रंथ केला होता सार । ठेविला समोर विठोबाच्या ॥ १ ॥**

यांच्या समाधीच्या वेळचें नामदेवांनीं केलेलें वर्णन फारच हृदयंगम असून करुणरसानें अगदीं ओथंबलेलें आहे.—

**'निवृत्तिराज बैसले समाधि सुचित्त । चिन्मययोगयुक्त उजळला १**
**पुंडलीकें मीठी निवृत्तीच्या गळां । अवघीयांच्या डोळां आसुवें येती २**
**विठोबाचें हृदय आलेंसें भरून । झांकियेले नयन निवृत्तिराजें ॥ ३ ॥**
**पुंडलीकें आणिलें विठोबासी बाहेर । केला नमस्कार वैष्णवांनीं ॥४॥**
**राही रखुमाई बैसले गंहीवरत । आणीक संतमहंत वोसंडती ॥ ५ ॥**
**नामा ह्मणे हरी शुद्धि नाहीं सकळां । घाला आतां शीळा समाधीसी ६**

असो. पूर्वीं यांच्या समाधिस्थानीं एक लहानसें देऊळ होतें; आणि त्यांचे दर्शनालाही कोणी फारसे जात नसत; परंतु शके १७५४ सालीं संतमंडळीस श्रीविठ्ठलांचा दृष्टांत झाल्यावरून तेथें पौष्य कृष्ण एकादशीस वारकरी मंडळींची मोठी यात्रा जमूं लागली. प्रख्यात धर्मपरायण बायजाबाई शिंदे यांनीं तें पहिलें छोटेखानी मंदीर कायम राखून हल्लीं त्याच्या सभोंवार मोठा घुमजली सभामंडप उभारला आहे.

हीं चौघेंही भावंडें ईश्वरांश असून ते अनुक्रमें शिव, विष्णु, ब्रह्मदेव व माया यांचे अवतार होते हें मागें एकवार सांगितलेंच आहे. त्यांविषयीं मोरोपंत ह्मणतात.—

**"शंकर निवृत्ति हरि! तूं ज्ञानेश ब्रह्मदेव सोपान ॥**
**विद्या मुक्ता; तुमच्या कीर्ति सुधेचें सदा असो पान ॥ १ ॥**

तसेंच पैठणास ब्राह्मणांनीं दिलेल्या शुद्धिपत्रांतही असाच उल्लेख केला आहे.—

**'ज्ञानेशो भगवान् विष्णुः निवृत्तिर्भगवान् हरः ॥**
**सोपानो भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ॥ १ ॥'**

याप्रमाणें निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई व चांगदेव ह्यांच्या पूर्वजापासून तों समाधिपर्यंत यथामति चार शब्द लिहिले आहेत. आंतां ज्ञानेश्वरांच्या व त्यांच्या बंधूंच्या कवितेबद्दल थोडेंसें लिहून आपण या महापुरुषाचा निरोप घेऊं.

ज्ञानेश्वरांनीं, ज्ञानेश्वरी, अथवा भावार्थदीपिका, अमृतानुभव, पवनविजय, योगवाशिष्ठावर टीका पंचिकरण, चांगदेवपासष्टी, समास व स्वानुभव असे मुख्य ग्रंथ केले आहेत; शिवाय त्यांचे हरिपाठाचे स्फूट अभंग व पदें पुष्कळच आहेत. ज्ञानेश्वरीची ग्रंथसंख्या ९०३४ असून अमृतानुभवाची १००० आहे. हे दोन्ही ग्रंथ दुर्बोध आहेत तरी फारच सुरस आहेत. अर्थ उपमा-दृष्टांतादिकांनीं जरी स्पष्ट करून दाखविला आहे तरी पण हे दोन्ही ग्रंथ गुरुमुखाशिवाय समजण्यासारखे नाहींत. अमृतानुभव ग्रंथांत वेदांच्या दहाही उपनिषदांचा सारांश देऊन त्याची रचना, तो ग्रंथ नीट समजावून घेतला असतां अमृत ह्मणजे चित्स्वरूपाचा अनुभव येईल अशी केली आहे. चांगदेवपासष्टी हा ग्रंथ अद्वैतपर आहे. समास ग्रंथाचीं सहा प्रकरणें असून त्यांत जगाच्या उत्पत्तीचा क्रम, त्रिविध अहंकार, देहांतील षट्चक्रें इत्यादिकांचें फार खोल विवेचन आहे, असें ह्मणतात.

सर्व प्राकृत ग्रंथांमध्यें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ श्रेष्ठ होय. हा जरी श्रीभगवद्गीतेवर टीका ह्मणून लिहिला आहे तरी त्याची योग्यता केवळ टीकेपेक्षां फारच वेगळी आहे. मूळ गीतेचे श्लोक ७०० आणि त्यांवरील टीकेच्या ज्ञानोबारायाच्या ओंव्या ९०३४! ह्मणून ज्ञानेश्वरी हा ग्रंथ गीतेच्या आधारें लिहिलेला आध्यात्मशास्त्रावरील एक स्वतंत्रच ग्रंथ आहे असें ह्मटलें तरी चालेल. ह्या ग्रंथाच्या उपयुक्ततेवर आह्मीं लिहिणें ह्मणजे आंधळ्यानें राजमार्गावरील रोषनाईचें मोठ्या बढाईखोरपणानें वर्णन करण्यासारखेंच आहे. ज्ञानेश्वरांनीं ह्मटल्याप्रमाणें ती आमची प्रत्यक्ष चिमुकली श्रुतीच होऊन बसलेली गीतारूपनदी आणि ज्ञानराजांच्या सरस्वतीतुल्य वाणीचा प्रवाह यांच्या संयोगरूप प्रयाग क्षेत्रावर स्नान करण्याचा सुसमय ज्या नरश्रेष्ठांना प्राप्त होईल त्यांचेपुढें या संसारसमुद्राच्या—कां संशयसमुद्राच्या दुस्तरतेची ती काय मातबरी आहे? ईश्वर आहे कीं नाहीं? असल्यास तो दिसत कां नाहीं? तो न्यायी आहे ह्मणतात तर मग ‘ बळीतो कानपिळी ’ हा न्याय प्राधान्येंकरून जगांत कां चालत असावा? मरणोत्तर आपलें काय होतें? सर्वच जर अविनाशी आहे तर मग मेल्यावर आपली स्थिति काय? वगैरे वगैरे जीं मध्यंतरीं संदेहरूपी वादळें उद्भवतात त्यांचा त्या महातीर्थांत अवगाहन केल्यामुळें शांतप्रशांत झालेल्या मनोगिरीपुढें लय होण्यास उशीर तो किती? सारांश, ह्या ज्ञानेश्वरी ग्रंथांत वरील प्रकारच्या कुतर्कांनीं तळमळ लागलेल्या जनांस जें पाहिजे तेंच आहे!

श्रीज्ञानेश्वरांचें मन नेहमीं अध्यात्मज्ञानांतच गुंग असे, असें नाहीं.

त्यांचें सृष्ट्यवलोकन किती जाडें होतें हें खालील उदाहरणांवरून चांगलें लक्षांत येईल:—

‘ नातरी नगरांतरीं वसिजे । तरी नागरची होईजे ॥ १ ॥ ’

( शहरांत राहिल्यानें चातुर्य येतें. )

‘ जियां उत्तम कुळींचीया होती । आणि गुण लावण्य आथी ॥
तियां आनिकीतें न साहती । सुतेजपणें ॥ २ ॥ ’

( बायकांना वरचढपणा खपत नाहीं. )

‘ जैसीं जळींचीं जळीं न विरतीं । मुक्ताफळें ॥ ३ ॥ ’

( पाण्यांत उत्पन्न झालेलीं मोत्यें पाण्यांत विरत नाहींत. )

‘ जैसा वेश्याभोगी कवडा वेचे । मग दारही चेपूंनये तियेचें ॥ ४ ॥ ’

( जवळची कवडीन कवडी संपली कीं, वेश्या दाराला बोट लावूं देत नाहीं. )

‘ जैसा ह्मैसा नुठी कीं पुरा । तेसा उगाचि असे ॥ ५ ॥ ’

( पूर आला तरी रेडा उठत नाहीं. )

‘ वोढाळाच्या खुरीं । आषाढवातें बुरी ॥ ६ ॥ ’

( आषाढांत गुरांना लाळ येते. )

‘ पाहे पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदराआड ॥
परितें अव्हेरुनी गोचीड । अशुद्धाचि सेवी ॥ ७ ॥ ’
‘ कां कमलकंदा आणि दर्दुरीं । नांदणूक एकेचि घरीं ॥
परि पराग सेविजे भ्रमरीं । येरा चिखलचि उरे ॥ ८ ॥ ’

( दूध हें पवित्र व गोड असून अगदीं नजीक—एका पदराच्या—त्वचेच्याच आड असतें; पण तें टाकून गोचीड रक्तच पितो; किंवा भ्रमर आणि बेडूक एकाच जागीं राहतात, पण भ्रमर भक्षण करतो पराग आणि बेडकाना उरतो चिखल. )

‘ जरी आवडी आथी साच । तरी जीवितही सलच ॥ ९ ॥ ’

( खऱ्या प्रीतीपुढें प्राण तुच्छ. )

‘ जैसें न सांगणें वरी । बाळा पतीसी रूप करीं ॥ १० ॥ ’

( बायका न सांगण्यानेंच नवऱ्याचें नांव घेतात; घ्या ह्मटल्यानें घेत नाहींत. )

‘ जैसें सत्रीं अन्न जालें । कां सामान्या बीक आलें ॥ ११ ॥ ’

( अन्नछत्रांतील जेवण व वेश्येचें सौंदर्य पाहिजे त्यांनीं लुटावें. )

ज्ञानेश्वर अध्यात्मविद्येंत जसे निपुण होते तसेच ते ज्योतिषांत व कला-कौशल्यांत फारच वाकबगार होते. सदरहुप्रमाणेंच शेतकी, जनरीती व जनावरें वगैरेंची त्यांना भरपूर माहिती होती.

'आणि उदोअस्ताचेनीप्रमाणें। जैसें न चलतां सूर्याचें चालणें।१।'

(सूर्य हा खरोखर चालत नसतां उदयास्ताचेयोगानें तो चालल्याचा भास होतो.)

'जैसा मेघाचेनि तोंडें। सिंधु एके आंगे काढे।
आणि नदी येरीकडे। भरितीचि असती॥ २॥'

(मेघाच्या एका तोंडांतून समुद्र आंत जात असतो; आणि दुसऱ्या तोंडानें नद्या भरतात.)

'राजाज्ञेचीं अक्षरें आहातीं। तियें चामा एका जया पडती॥३॥
तया चामासाठीं जोडती। सकल वस्तु॥ ३॥
'वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे। एथ राजाज्ञाचि समर्थ आहे॥
तेंचि चाम एक जैं लाहे। तेणें विकतीं आघवीं॥ ४॥'

(राजाज्ञेचीं अक्षरें असतात आणि तीं एखाद्या चामड्यावर पडलीं, तर त्या चामड्यानें पाहिजे ती वस्तु प्राप्त होते. त्यापुढें सोनें रुपेंसुद्धां कोणी अधीक मानीत नाहीं. तेथें राजाची आज्ञाच समर्थ असते. तेंच एक चामडें मिळालें कीं, त्यानें सारें विकत मिळतें. यावरून हें सिद्ध आहे कीं, ज्ञानेश्वरांचेवेळीं चामड्याच्या नोटी प्रचारांत होत्या.)

'निंब निंबोळिया मोडोनि आला।
तरि तो काउळियासींचि सुकाळ जाहला॥ ५॥'

(निंब निंबोळ्यांनीं भरून गेला तर तो कावळ्यांनाच सुकाळ होतो.)

'येऱ्हवीं करेयाच्या ठायीं चांग। तें तयासि कैंचे नीट आंग॥ ६॥'

(उंटाचें वर्णन करावयाचें तर त्याला नीट आंग आहे कोठें?)

ज्ञानेश्वरांस साकारदेवतोपासना संमत नव्हती, हें त्यांनीं लिहिलेल्या अद्वैतपर ग्रंथांवरूनच सिद्ध होत आहे. त्यांनीं ज्ञानेश्वरीच्या प्रथमाध्यायांत व स्वानुभव ग्रंथाचा आरंभ करतांना कोणत्याही विशिष्ट देवतेचें स्मरण न करितां निराकार, अव्यक्त जगदात्म्याचेंच ध्यान केलें आहे. उदाहरणार्थः—

'ॐनमोजी आद्या। वेदप्रति पाद्या॥
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा॥ १॥

देवा तूंचि गणेश । सकळ मति प्रकाश ॥
ह्मणे निवृत्तिदास । अवधारी जो जी ॥ २ ॥

—श्रीज्ञानेश्वरी.

‘ऐसी इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ॥
तीं वंदिलीं मिया मूळकें । देवो-देवी ॥ १ ॥’

—स्वानुभव.

ते साकारदेवतोपासकांचा अगदीं तिरस्कार करीत. त्यांनीं एका अभंगांत ह्मटलें आहे.—

‘निर्जीव दगडाची काय करिसिल सेवा । तो तुज निर्दैवा देईल काय? १
कवणें गुणें भुली पडली गव्हारा । तीर्थाच्या माहेरा नोळखीसी ॥ २॥
अष्टोत्तरशें तीर्थें जयाच्या चरणीं। तो तुझ्या हृदय-भुवनीं आत्मारामु ३’

‘देव देवळीं असतां । जासी आना तीर्था ॥
मुकलासी आतां । ह्मणे ज्ञानदेवो ॥ १ ॥’

ते विठ्ठलोपासना करीत ही गोष्ट खरी; पण निराकारनिर्गुण जगदीशासच ते नांवानें संबोधीत असत. त्यांनीं आपल्या उपासना देवतेचें वर्णन फारच सुंदर केलें आहे.—

‘दुर्गाना जवळी त्रिभुवन मंडळी । ते मनाच्यामुळीं बैसलेसे ॥ १ ॥
पाहतां न दिसे भानुप्रकाशें । येऱ्हवीं ते असे मशकीं रया ॥ २ ॥
बोलों जातां जेणें जिव्हाची खादली। पाहतां पाहतां नेली चर्म दृष्टी ३
दांतेविण जेणें मूळ देह खादले। शस्त्रेंविण छेदिले लिंगदेह ॥ ४ ॥
त्वं पदिं सिद्ध निवृत्ति लाधलें । गुरुलक्षीं हारपलें लक्ष ॥ ५ ॥
निवृत्तिदासा तुह्मी बहुत न बोला । रखुमादेवीवरा ध्याइजे सुउगवला६’

ज्ञानेश्वरांना मराठी भाषेचा किती अभिमान होता हें खालील ओंव्यावरून चांगलें सिद्ध होत आहे:—

‘माझा मऱ्हाठाची बोल कौतुकें । परि अमृतातेंही पैजा जिंके ॥
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ १ ॥
जैसी अंगाचेनी सुंदरपणें । लेणिया आंगचि होय लेणें ॥
तेथ अलंकारिलें कवणकवणें । हें निर्वचेना ॥ २ ॥
तैसी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं ॥
शोभती आयणी । चोखट आयिका ॥ ३ ॥

ज्ञानेश्वरांची, त्यांच्या भावंडांची व त्यांच्या ग्रंथांची मोठमोठ्या महाराष्ट्र कवींनीं व साधूंनीं केलेली प्रशंसा खालील पद्यांत आढळते.—

## अभंग.

विवेकसागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।। १ ।।
मरोनीयां जावें । बा तुझ्याच पोटा यावें ॥ २ ॥
ऐसें करीं गा माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ।।३।।
जाईन ओंवाळूनी । जन्मोजन्मीं ह्मणे जनी ।। ४ ।।
गीतेवरील टीका । जैसें ओगरिलें ओका ॥ १ ॥
रत्नताटामाजी । जैशी ओपियेली कांजी ॥ २ ॥
माझ्या ज्ञानियावांचूनी । ह्मणे नामयाची जनी ।। ३ ।।

—जनाबाई.

तिन्ही देव जसे परब्रह्मीचे ठसे । जगीं सूर्य ऐसे प्रकाशिले ।। १ ।।
धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान । धन्य तें निधान ज्ञानदेव ।। २ ।।
उपजत ज्ञानी हें वर्म जाणोनी । आले लोटांगणीं चांगदेव ।। ३ ।।
प्रत्यक्ष पैठणीं भटें केला वाद । रेड्यामुखीं वेद बोलवीले ।। ४ ।।
सुकृताची गांठी उघडी ज्ञानदृष्टी । केलीसे मराठी गीतादेवी ।। ५ ।।
नामा ह्मणे सर्व सुकृत लाहिजे । एकदां जाईजे अलंकापुरीं ।। ६ ।।

नामदेव.

तीन अक्षरें ' निवृत्ति ' जो जप करील अहोरात्रीं ।।
त्यासी सायोज्यतामुक्ति । ब्रह्मस्थिति तत्काळ ।। १ ।।
चार अक्षरें ' ज्ञानदेव , जो जप करील धरूनी भाव ।।
त्यासी ब्रह्मपदीं ठाव । ऐसें शिवादि देव बोलिले ।। २ ।।
' सोपान ' तीन अक्षर । जो जप करील धरूनी निर्धार ।।
त्यासी ब्रह्मसाक्षात्कार । तात्काळचि होय पैं ।। ३ ।।
' मुक्ताबाई ' चतुर्थी । जो तप करील सदा ।।
तो पावे मोक्षपदा । सायोज्य संपदा जेथें असे ।। ४ ।।
ऐसीं चवदाही अक्षरें । जो ऐकेल कर्णविवरें ।।
कीं उच्चारील मुखद्वारें । त्यासी ज्ञानेश्वर प्रत्यक्ष भेटे ।। ५ ।।
एका जनार्दनीं प्रेम । जो जप करील धरुनी नेम ।।
त्यासी पुनः नाहीं जन्म । ऐसें पुरुषोत्तम बोलिला ।। ६ ।।

ज्ञानेश्वरी पाठीं ॥ जो ओंवी करील मऱ्हाठी ॥
तेणें अमृताचे ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥ १ ॥

एकनाथ.

ज्ञानराजा माझा योग्याची माउली । जेणें निगमावली प्रकट केली ।१।
छपन्न भाषेचा केलासे गौरव । भावार्णवीं नाव तारावया ॥ २ ॥
गीता आलंकारी नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंद लहरी प्रकटली ॥ ३ ॥
श्रवणाच्या मिषें बैसावें येवोनी । समरस होवोनी सुखें नांदा ॥४॥
अध्यात्मविद्येचें करूनीयां रूप । उजळीला दीप चैतन्याचा ॥ ५ ॥
तुका ह्मणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओंवी अनुभवी ॥ ६ ॥

ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखीं ह्मणतां चुकती फेर ॥ १ ॥
तुह्मा जन्म नाहीं एक । तुका ह्मणे माझी भाक ॥ २ ॥

-तुकाराम.-

नमो ज्ञानेश्वरा नमो ज्ञानेश्वरा । निवृत्ति उदारा सोपानदेवा ॥ १ ॥
मुक्ताबाई नमो त्रिभुवनपावनी । अद्वैतजननी देवाचिये ॥ २ ॥
जगदोद्धारालागीं धरिला अवतार । मिरविला बडिवार सिद्धाईचा ३
निळा शरणागत ह्मणवी आपुला । संतीं निराविला देउनी हातीं ।४।

-निळोबाराय.-

## श्लोक.

श्रीज्ञानेश्वर श्रीनिवृत्ति तिसरा सोपान तो सद्गुरु ।
तीघेही मिळतां प्रयाग ह्मणिजे अत्यंत तीर्थेश्वरू ॥
मुक्ताई मणिकर्णिका विलसते काशी अळंदीपुरी ।
इंद्राणी सकळाघसंग शमनी भागीरथी दूसरी ॥ १ ॥

-निरंजनकवि.-

## आर्या.

ज्ञानेशा त्वत्कृतितें करिति ज्ञाते समस्त ही प्रणती ।
ज्ञानेश्वरी भवानी होय महामोह महिष हे ह्मणती ॥ १ ॥
त्वां बहु जड उद्धरिले प्रकट ज्ञानेश्वरा दयालो हे ।
तारी मयूरहि तुला परिसासि हिणाविजे नया लोहें ॥ २ ॥
जो ज्ञानराज भगवान् श्रवणीं सुज्ञान ज्ञानदेवाचा ।
अवतार गमे अकरा वा कां सुज्ञां न देव देवाचा ॥ ३ ॥

-मोरोपंत.-

ओंवी.

तारावया जग समग्र । पुन्हां अवतरला रमावर ॥
गीतार्थ केला साचार । तो ज्ञानेश्वर जगद्गुरु ॥ १ ॥

—श्रीधर.

तेथें गीतेवरी प्राकृत टीका । ज्ञानेश्वरें केली देखा ॥
जड मूढ अज्ञान सकळिकां । मार्ग सोपा दावीला ॥ १ ॥

—महीपति.

'ज्ञानेश्वर ह्यांनीं एक खेळ काढिला. तो अध्यात्मिकच आहे. त्यास 'ज्ञानपट' ह्मणतात. त्यांत असें दाखविलें आहे कीं, कामक्रोधादि दुष्ट शत्रूंच्या घरांत डाव पडला कीं, नरकप्राप्ति व्हावयाची, आणि शुद्धभाव, सुबुद्धि इत्यादिकांच्या घरांत डाव पडला कीं, स्वर्गप्राप्ति व्हावयाची. असाच सोपानदेवांचा एक 'सोपानपट' आहे.'

'ज्ञानदेव हे आपल्या नांवाप्रमाणें खरोखर ज्ञानदेव आमच्या महाराष्ट्रांत झाले, आणि ते सगळ्या साधुजनमालेचे मेरु होऊन राहिले आहेत, हें आमच्या देशाचें मोठें भाग्य आहे, असें समजून आणि त्यांच्या चरणांस अनन्यभावें प्रणाम करून, हें त्यांचें छोटेसें चरित्र येथें संपवितों.'

---

## ज्ञानेश्वरांच्या कवितेंतील वेंचे.

मागें चरित्रांत ज्ञानेश्वरांच्या बऱ्याच कविता आल्याकारणानें वास्तवीक आतां फार उतारे घेण्याचें प्रयोजन नाहीं; तरी पण ज्ञानेश्वरींतून एक दोन वेंचे घेतल्याशिवाय राहवत नाहीं! वाचकहो आपल्याला अश्वासन देऊन या ज्ञानेश्वरीरूपी ज्ञानसमुद्राच्या तीरीं कांहीं उत्तम मुक्ताफळें शोधून काढण्याच्या हेतूनें येऊन उभा राहिलों खरा! परंतु येथें पाहतों तर सगळींच मुक्ताफळें अमोलीक. इतर समुद्रांत मुक्ताफळें तळाशी असतात पण हा समुद्र तर थेट खालपासून वरपर्यंत सर्व उत्तमोत्तम मोत्यांनींच भरला आहे! मग त्यांतून कोणतें घ्यावें व कोणतें न घ्यावें याचा विचार करून एक बुडी मारिली; व मोठ्या कसोशीनें दम धरवेल तोंपर्यंत धरून हीं एक दोन मौक्तिकें आणिलीं आहेत, तीं तुह्मांला मोठ्या आनंदानें सादर करितों.

श्रीमद्भगवद्गीतेच्या सातव्या अध्यायांतील टीकेंत ज्ञानेश्वरांनीं अतिशय उत्कृष्ट अशीं रूपकें योजिलीं आहेत. तीं सर्व स्थलसंकोच्यामुळें न घेतां 'इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्व मोहेन भारत' या श्लोकावरचें एक येथें घेऊं.—

'ते इच्छा हे कुमारी झाली । मग ते कामाचिया तारुण्या आली ॥
तेथ द्वेषेसी मांडिली । वराडिकें ॥ १ ॥
तया दोघांस्तव जन्मला । ऐसा द्वंद्व मोहजाला ॥
मग तो अजेयानें वाढविला । अहंकारें ॥ २ ॥
तो धृतिसी सदा प्रतिकूल । नियमाही नागवे स्थूळ ॥
आशा रसें दोंदिल । झाला सांता ॥ ३ ॥
असंतुष्टीचिया मदिरा । मत्त होउनी धनुर्धरा ॥
विषयाचे वोवरा विकृतीसी असे ॥ ४ ॥
तेणें भाव शुद्धिचिया वाटे । विखुरले विकल्पाचे कांटे ॥
मग चिरिले अव्हांटे । प्रवृत्तीचे ॥ ५ ॥
तेणें भूतें भांबावलीं । म्हणोनि संसाराचिया आडवामाजी पडलीं ।
मग महादुःखाचा घेतलीं । वाझ वरी ॥ ६ ॥'

[ कामाला इच्छा ही कन्या झाली. ती उपवर झाली म्हणजे द्वेषाशीं तिचें लग्न लागतें नंतर त्या दंपत्यापासून द्वंद्व व मोह हीं अपत्यें जन्मास येतात आणि अहंकार आजोबा त्यांचे लाड पुरवून लालनपाल करतात. त्याचें आणि धैर्याचें सदा वांकडें; तो आशारूप दूध पिऊन भला दोंदिल झाला असल्यामुळें तो दांडगा नियमांच्यासुद्धां कबजांत येत नाहीं. अर्जुना! हा असंतोषरूपी मद्यप्राशन करून मदोन्मत्त होत्साता, विषयाच्या खोली-मध्यें लोळत पडलेला असतो. हा स्वभाव शुद्धीच्या मार्गावर विकल्पकंटक पसरतो आणि कुमार्गाचे अनेक फांटे फोडून ठेवतो. त्यांमुळें प्राणिमात्र भ्रमांत पडतात आणि संसारारण्यांत सांपडून महत्दुःखाच्या ओझ्याखालीं दडपून जातात. ]

बाराव्या अध्यायांतील 'समःशत्रौच मित्रेच' या श्लोकावर टीका कर-तांना ज्ञानेश्वरांनीं साधूंचीं लक्षणें अत्युत्कृष्ठ वर्णिलीं आहेत. त्यांचें वर्णन होत नाहीं. ते सर्व श्लोक टीकेसहीत वाचकांस दाखवावा असें मनांत होतें, परंतु स्थलसंकोचास्तव उपाय नाहीं; म्हणून त्यांपैकीं चार पांच ओंव्या मात्र येथें देऊं:—

'पार्था जयाचिया ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं ॥
रिपु मित्रां दोहीं । सरिसा पाडु ॥ १ ॥
कां घरिंचिया उजेड करावा । पारखिया अंधार पाडावा ॥
हें नेणेचि गा पांडवा । दीप जैसा ॥ २ ॥

जो खांडावया घाव घाली । कां लावणी जेणें केली ॥
दोघां एकचि साउली । वृक्ष जैसा ॥ ३ ॥

नातरी इक्षुदंडु । पाळी तया गोडु ॥
गाळि तया कडु । नोहेचि जेवीं ॥ ४ ॥
अरि मित्रां तैसा । अर्जुना जया भाव ऐसा ॥
मानापमानी सरिसा । होत जाय ॥ ५ ॥

[ अर्जुना ! ज्याच्याठिकाणीं वैषम्याची वार्ता सुद्धां नाहीं. शत्रु आणि मित्र या दोहोंची योग्यता सारखीच. किंवा अर्जुना ! घरच्या मनुष्यांना उजेड करावा आणि परका कोणी आला तर आंधार पाडावा हें जसें दिव्याला माहीत नाहीं; किंवा जो तोडावयास घाव घालतो, अथवा ज्यानें लावणी केलेली असते त्या दोघांनाही वृक्ष ज्याप्रमाणें सारखीच सावली देतो; किंवा ऊस हा पालन करतो त्याला मात्र गोड व गाळतो त्याला कडू असा कधींच होत नाहीं, त्याप्रमाणें अर्जुना ! शत्रूच्या ठिकाणीं आणि मित्राच्या ठिकाणीं सारखा भाव. मान झाला किंवा अपमान झाला तरीही जो सारखाच. ]

ह्या पांच ओंव्यावरून ज्ञानेश्वरांचा ह्या श्लोकाविषयींचा अभिप्राय स्पष्ट कळेल. ह्याच श्लोकावरील आणखी पुष्कळ ओंव्या आहेत. त्याही वरच्या-सारख्याच सुबोध असून लौकर समजण्यासारख्या आहेत. सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं, सर्वठिकाणीं समता ठेवून कोणाचाही द्वेष करूं नये. तशींच ह्या गोष्टीच्या पुष्टिकरणार्थ जीं उदाहरणें दिलीं आहेत, तींही अत्यंत लौकिकाचारांतलीं असून सुबोध आहेत. गाय, पृथ्वी, दिवा, वृक्ष, ऊंस इत्यादिकांचीं उदाहरणें सुरसरीतीनें दाखविलीं आहेत. या मासल्याच्या रस-भरीत ओंव्या साऱ्या ज्ञानेश्वरींतही फारच थोड्या आढळतील.

असो. वर सांगितल्याप्रमाणें हे ज्ञानेश्वरींतील दोन लहान लहान उतारे दिले आहेत. जास्ती न देण्याचें कारणही वर निर्दिष्ट केलेंच आहे. या दहापांच ओंव्यावरूनसुद्धां ज्ञानेश्वरांची वर्णन करण्याची शैली वाचकांच्या लक्ष्यांत येईल; कारण एका शितावरून हांडाभर भाताची परीक्षा होते. आतां ज्ञानेश्वरांच्या हरिपाठांतील सर्व आबालवृद्धांचे तोंडीं असलेला एक अभंग देतों.—

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥ १ ॥
हरि मुखें ह्मणा हरि मुखें ह्मणा । पुण्याची गणना कोण करी ॥ २ ॥
असोनि संसारीं जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥ ३ ॥
ज्ञानदेव ह्मणे व्यासाचिये खुणें । द्वारकेचे राणे पांडवां घरीं ॥ ४ ॥

[ ह्या अभंगाचा अर्थ सकृद्दर्शनीं जितका सोपा दिसतो तितका तो नाहीं हें खालील विवेचनावरून लक्ष्यांत येईल. 'देवाच्या द्वारीं क्षणभर उभें राहिल्यानें सलोकतादि चारी मुक्तींचा लाभ होतो हें सकृद्दर्शनीं असंभवनीय दिसतें. परंतु द्वारीं उभें राहणें ह्मणजे, "सेवकाच्या नात्यानें सेवातत्पर होणें" असा अर्थ घेतला पाहिजे. श्रीतुकोबारायांनीं ( सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेद काम सारोनियां ॥ ) परमप्रीतीनें भगवन्नामोच्चार करणें हीच हरीची सेवा आहे, असें सांगितलें. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनींही पुढील ध्रुवपदांत 'हरि मुखें ह्मणा, हरि मुखें ह्मणा" असें द्विरुक्तीनें सांगण्यांत हरीचें नामस्मरण हेंच देवाचें द्वार असें सुचविलें आहे. "क्षणभर ह्या पदाचा अर्थ अति अल्पकाळ असा घ्यावा," अत्यल्पकाळ हरिनामोच्चरणसेवा केली असतांदेखील चारीमुक्तींचा लाभ होतो, असा पहिल्या कडव्याचा सरळ अर्थ आहे. ज्ञान हेंच देवाचें मुख्यद्वार आहे, असें शास्त्र प्रतिपादन करतें. यास्तव त्या ज्ञानरूपी द्वाराचा क्षणभर आश्रय करण्यांत मुक्तता आहे, ह्मणजे बाह्य पंचविषयांपासून अंतर आनंदमय—कोशापर्यंत सर्व अनात्म, जड आहेत; असें विचारानें जाणून त्यांचें तादात्म्य सोडणें व अंतरमुखवृत्तीनें ज्ञानरूप आत्माकार क्षणभर वृत्ति करणें यांत मोक्ष आहे पण अशा सिद्धांतानें हरीचें नाम हेंच देवाचें द्वार सुचविलें त्यास व्यर्थत्व येतें; अशी कोणी शंका घेईल, तर हरिनामस्मरण केल्यावांचून चित्तशुद्धि होणार नाहीं व चित्तशुद्धि झाल्यावांचून आत्मविषयक वृत्तीचीही उत्पत्ति होणार नाहीं; ह्मणून हरिनामस्मरणाच्या आश्रयानेंच मुख्य ज्ञानद्वाराचा लाभ होतो. 'क्षणभर' ह्याचा लाक्षणिक अर्थ घेतला तर अनंत जनजन्मांतरींच्या दृष्टीनें आपलें आयुष्य क्षणसमानच आहे. अशा दृष्टीनें क्षणभर ह्मणजे जन्मभर असा अर्थ होतो, ह्मणून जन्मभर हरिनामस्मरणाचा आश्रय करणारा जो साधक त्याला चारी मुक्तींचा लाभ होतो. ॥ १ ॥ ( हरिनामोच्चार करण्यांत रत होऊन राहण्याविषयीं ध्रुवपदांत मोठ्या अट्टहासानें सकळ जनांस बोध करीत आहेत. ) मुखानें हरिनाम घ्या, हरिनाम घ्या असें द्विवार सांगून त्यापासून अगणित पुण्याचा लाभ होईल असें सांगतात. ॥ ध्रु० ॥ देहस्त्रीपुत्रगृहरूपी संसारामध्यें राहून जिव्हेला हरिनामाचें प्रखर व्यसन लावून घ्या असें वेदशास्त्रादिक हात वर करून सांगत आहेत. ॥२॥ श्रीज्ञानेश्वरमहाराज ह्मणतात कीं, अशाप्रकारचें व्यसन पांडवांनीं आपणांस लावून घेतल्यामुळें त्यांच्या घरीं द्वारकाधीश श्रीकृष्णपरमात्मा कसा राबत होता हें श्रीमत् व्यासकृत महाभारतावरून दिसून येईल. ॥ ४ ॥

## ज्ञानदेवकृत पद.

सोही कच्चा वे कच्चा वे । नहीं गुरूका बच्चा ॥ धृ० ॥ दुनियाँ त्यजकर खाक लगाई जाकर बैठा बनमों । खेचरि मुद्रा वज्रासनमों ध्यान धरत है मनमों ॥ १ ॥ तीरथ करके उंमर खोई जोगजुगुतमों सारी । धनकामिन कुंजर लागे जोग कमाया भारी ॥ २ ॥ गुप्त होकर परगट होये गोकुल मथुरा काशी । सिद्धजी हुवे प्राण निकाले सत्य लोकके बासी ॥ ३ ॥ शास्त्रमें तो कुच नहिं रहा पुरान गायन भाया । भेद विदीका मारग चलता तनका लगका लीया ॥ ४ ॥ कुंडलनीक खूब चढावे ब्रह्मरंध्रकू जावे । चलता है पानीके उपर बोलत सोई होवे ॥ ५ ॥ हुकुम निवृत्तिका ज्ञानेश्वरकू तीन उपर मेना । सद्गुरूकी कृपा भई जद आपी आप पिछाना ॥ ६ ॥

या वरील लांबलचक विवेचनावरून ज्ञानेश्वरांची वरवर सोपी दिसणारी कविता किती खोल अर्थाची आहे हें चांगलें लक्षांत येईल. त्यांचे सगळेच लेख असे आहेत. ते आहेत तशी त्यांची विचारसरणीही कठीणच आहे. ती गुरुमुखाशिवाय कळतच नाहीं. वारकरी मंडळींतल्या जुन्या अनुभविकांस तिचें मर्म चांगलें कळतें. आतां निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई व चांगदेव यांच्या अभंगाचा एकेक मासला देऊन हें लांबत चाललेलें प्रकरण आटोपूं.

### अभंग.

भाव भक्ति प्रेम दया शांति क्षमा । अखंडित प्रेमा असो द्यावा ॥१॥
सर्वभूतीं भजन करावें सर्वथा । रामनामकथा आरंभाव्या ॥ २ ॥
आपपरदेहीं विचार करावा । हरिनामें दोहावा सर्वारूपीं ॥ ३ ॥
निवृत्तीचें जाप्य आन नाहीं चित्तीं । रामनामें तृप्ति सदा असे ॥४॥

या वरील अभंगावरून निवृत्तिनाथांची कविता कशी आहे, हें सुज्ञांस सहज कळेलच. यांच्या कवितेंत नाममहात्म्य, भक्तिमाहात्म्य, सर्वभूतीं भगवद्भाव, क्षमा, दया इत्यादिकांचें वर्णन फारच चांगलें केलें आहे.

### अभंग.

मन आधीं मुंडीं वासनेतें खंडी । विठ्ठल ब्रह्मांडीं एक आहे ॥१॥
मन हें सोंवळें सदा शौच करी । तुज निरंतरी हरी पावे ॥२॥
विवेक वैराग्य ज्ञानाचें सौभाग्य । सोंवळा आरोग्य हरी देख ॥३॥
सोपान नेणे सलगीचा सोंवळा । नित्य वेळोवेळा स्मरे हरी ॥४॥

वरील अभंग पाहतां आपणांस कळेलच कीं, सर्व विषयांचें आकलन करून परब्रह्मस्वरूपीं लीन झालेले सोपानदेव ह्यांची कविता फार प्रेमळ असून भाविकपणानें केलेली आहे. ह्यांचा स्वतंत्र ग्रंथ कांहीं दिसत नाहीं.

### अभंग.

परब्रह्मीं चित्त निरंतर धंदा । तया नाहीं कदा गर्भवास ॥१॥
उपजोनी जनीं धन्य ते योनी । चित्त नारायणीं मुक्तलग ॥२॥
अव्यक्त पै व्यक्ति चित्तासि अनुभव । सर्वसर्वीं देव भरला दिसे ॥३॥
ज्ञेय ज्ञाता ज्ञान उन्मनी विज्ञान । चित्त नारायण जालें त्याचें ॥४॥
आदि अंतीं हरी सर्व त्याचा जाला । परतोनि अबोला प्रपंचेसी ॥५॥
मुक्ताईचें चित्त निरंतर मुक्त । हरि हेंचि संचित आह्मां घटीं ॥६॥

अहाहा!!! हें केवढें नवल कीं, मुक्ताबाईचे अभंगही, भक्तिज्ञान वैराग्येंकरून ज्ञानदेवांच्या कवितेप्रमाणेंच रसरसलेले आहेत! अशी कविता करितां येणें हा अधिकार सामान्य नव्हे. याचा विचार पूर्णपणे केल्यास ' मुक्ताख्याब्रह्मचित्कला ' असें जें तिला विशेषण दिलें आहे, तें अक्षरशः खरें आहे, असें कोण ह्मणणार नाहीं? ह्यावरून एक मोठें अनुमान असें निघतें कीं, आमच्या महाराष्ट्रामध्यें १३ व्या शतकांत देखील बायका फार विद्वान् होत्या!

मुक्ताबाईच्या किंवा ज्ञानेश्वरांच्या उपदेशाच्यायोगानें उपरति होऊन कृतकृत्य झालेल्या चांगदेवांनींही बरीच कविता केली आहे. यांना श्रीनिवृत्तिनाथांनीं पुणतांबेंयेथें शके १२१९ माघ वद्य १३ रोजीं समाधि दिली. यांची कविताही अभंगरूपानेंच आहे. त्यांच्या अभंगापैकीं एक अभंग मासल्याकरितां घेऊं.—

### अभंग.

भावें भक्ति करूनी वैराग्य जोडसी । तरी तूं पावसी ब्रह्मसुख । १ ।
ज्ञानतत्वीं करीं करीं हा विचार । निर्गुणीं आकार निरामय ॥ २ ॥
चांगा सोयधरी ज्ञानवटेश्वरीं । मुक्ताई जिव्हारी बोध करी ॥ ३ ॥

पहा एवढे समर्थ चांगदेव, पण सत्समागमानें किती नम्र झाले!! या अभंगावरून स्पष्टच वाटतें कीं, चांगदेवांना उपदेश मुक्ताबाईनीं केला.

### पद.

व्यर्थ भुललासी काय राया । देह जाइल वायां ॥ ध्रु० ॥ ह्मणसी संपदा माझी किती । अंबाऱ्या हत्ती ॥ हत्ती घोड्यांचि होइल माती । यम तुजला नेती ॥ १ ॥ ह्मणसी पालखी माझा घोडा । कां भुललासी मूढा ॥ अंतीं काळाचा पडेल खोडा । ह्मणुनी राम जोडा ॥ २ ॥ ह्मणसी गाइ ह्या माझ्या ह्मैसी । आणि बटकी दासी ॥ अंतीं काळाचे पडसिल फांशीं । मग काय करिसी ॥ ३ ॥ झां झां झांगड नोबत गाजे । वाजंत्रें वाजे ॥ लोडा तीवाशा बसले राजे । हें येथेंचि साजे ॥ ४ ॥

असो. वाचकांस वरील उताऱ्यांवरून ज्ञानेश्वरांच्या व त्यांच्या भावंडांच्या कवित्वाचा थोडा तरी मासला कळेल; आणि ह्याच्या अभिरुचीनें ह्या महापुरुषांचे समग्र ग्रंथ वाचण्याची लालसा उत्पन्न होईल अशी आशा आहे.

ह्या साधुपुरुषांच्या पवित्र नामस्मरणाचा गजर आमची संतमंडळी प्रत्यही मोठ्या प्रेमानें करीत असते त्याचप्रमाणें आपणही एकदां करूं.

### भजन.

निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई,
एकनाथ नामदेव तुकाराम ॥ १ ॥

# नामदेव.

ज्ञानाची सांगता परमेश्वराच्या अनन्यभक्तीशिवाय होत नाहीं; किंवा ज्ञानास विज्ञानाचें स्वरूप परमेश्वराच्या अनुग्रहाशिवाय येत नाहीं ब्रह्मज्ञान होण्याला ईश्वरीस्वरूपाचें ज्ञान, ईश्वरी उपासना आणि ईश्वरी अनुग्रह हीं अवश्य साधनें आहेत. 'कर्मानें चित्तशुद्धि होते' हा सिद्धांत खरा; पण अंतःकरण निर्मळ होण्यास, अंतःकरणांतील अहंकार, वासना व अज्ञान यांचा नायनाट करण्याला सर्व चैतन्यघन जो परमेश्वर त्याचें ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. सर्व सृष्टीचा नियंता जो परमेश्वर तोच एक वंदनीय आहे अशी दृढभावना झाल्याखेरीज सर्व भूतांचेठायीं समदृष्टि उत्पन्न होणार नाहीं. तात्पर्य ज्ञानमार्गाला जर खरी सार्थकता यावयाची असेल, आपल्याला खरी शांति मिळावी अशी जर लालसा असेल, मानवबंधूंत व नंतर जीवबंधूंत परस्पर निष्कपट प्रेम वाढावें आणि कठीण व दुस्तर संसारयात्रा सुतर व सुलभ व्हावी हें जर इष्ट असेल व ईश्वर आणि आपण एकच असून भिन्न नाहीं असें समजविणारें व पूर्णत्व देणारें ज्ञान जर संपादन करावयाचें असेल तर त्याला एकच मार्ग आहे व तो मार्ग ह्मटला ह्मणजे परमेश्वराची दृढभक्ति हा होय. हा दृढभक्तिमार्ग साध्य करावयाला नामदेवासारख्या भगवद्भक्तांच्या चरित्रावलोकनाशिवाय दुसरें सुलभ असें साधन नाहीं.

सर्व सद्गुणांचें केवळ निधानच अशा या बालभागवताची महती काय वर्णावी! हा मूळ शूद्रकुलांत उत्पन्न झालेला, पण आपल्या पांडुरंगचरणींच्या निस्सीम आणि दृढभक्तीच्या योगेंकरून कसल्या असामान्य पदास चढला. पहा कीं, मोठमोठ्या ब्रह्मनिष्ठांनीं देखील तिकडे पाहून मान खालीं घालावी! लहानपणींच ईश्वराचा आणि ज्याचा अगदीं लंगोटीमित्राप्रमाणें वरोबा झाला होता त्या बालभागवताच्या निःसीम भक्तीची शिकस्तच ह्मटली पाहिजे. याच्याबरोबर देवांनीं हसावें, खेळावें, भजन करावें, हा देईल तें खावें आणि दिवाळींत मंगलस्नान करून फटाक्या देखील उडवाव्या! तेथें भेद कसा तो उरलाच नव्हता. हा एवढा कसला बरें परिपाक? तर त्याच्या केवळ अद्वितीय भक्तीचा! ज्ञानेश्वरींत ह्मटलें आहे.—

'जयाचिये वाचें माझे आलाप। दृष्टि भोगी माझेंचि स्वरूप॥
जयाचें मन संकल्प। माझेचि वाहे॥ १॥

माझिया कीर्तिवीण । जयाचे रिते नोव्हे श्रवण ॥
जया सर्वांगा भूषण । माझीच सेवा ॥ २ ॥
जयाचें ज्ञान विषो नेणें । जाणीव मज एकांतीं जाणें ॥
ऐसें होय तरी जिणें । एरव्हीं मरण ॥ ३ ॥
ऐसा आघवाची परी पांडवा । जिहीं आपुलिया सर्व भावा ॥
जियावयालागीं ओलावा । मीचि केला ॥ ४ ॥
तें पापयोनीही हो तुकां । तें श्रुताधीत ही न होतुकां ॥
परि मजसी तुकितां तुका । तुटी नाहीं ॥ ५ ॥'

ठीकच आहे. ओढे नाले या संज्ञा कोठपर्यंत ? तर ते गंगाबाईस पोंचले नाहींत तोंपर्यंत. त्याचप्रमाणें चंदन, खैर, बाभूळ हा भेद कोठपर्यंत ? तर तीं अग्नयेस्वाहा झालीं नाहींत तोंपर्यंत. भक्तिभावानें एकदां तत्तुल्य झाले म्हणजे तेथें यातीचा किंवा व्यक्तीचा भेदच नाहीं. समुद्रापासून उत्पन्न झालेले मिठाचे खडे जसे एकदां समुद्रांत टाकले म्हणजे ते वेगळे काढितां येणें शक्य नाहीं तीच स्थिति ईश्वरासंबंधी प्राणीमात्राची होय.

या बालभागवताचा जन्म शके ११९२ सालीं प्रभवनाम संवत्सरीं कार्तीक शुक्ल एकादशीस रवीवारीं सूर्योदयीं झाला. ह्याच्या आईचें नांव **गोणाई,** बापाचें नांव **दामाशेटी** व आडनांव रेळेकर शिंपी. नामदेवाचे आईबाप परमधार्मीक असून अत्यंत भगवद्भक्त होते. गोणाईनें पुत्रप्राप्तीस्तव देवादिकांना पुष्कळ नवस केले. आपणांस कुलदीपक पुत्र व्हावा अशी प्रत्येक आईबापाची इच्छा असते मग गोणाईच या नियमाला कुठून अपवाद असणार! पहिल्या खेपेला तिला एक मुलगीच झाली. तिचें नांव **आऊबाई** ठेविलें होतें.

नामदेवाचे पूर्वज पूर्वीं श्री क्षेत्र कऱ्हाडाजवळ कृष्णातीरीं नरसीबामणी म्हणून एक लहानसें गांव आहे तेथें रहात असत. यास हल्लीं कोणी कोळे-नरसींगपूर व कोणी भये नरसिंगपूर असें म्हणतात. याच्या मुळपुरुषाचें नांव यदुशेट. यांचा धंदा फेरीने कापड विकण्याचा असे. याचे पूर्वज सर्वच महाविठ्ठलभक्त होते. ते स्वभावानें शांत असून व्यवहारांत एकवचनी असत. नामदेवांनीं एका अभंगांत आपलें मुळगांव व गोत्र या संबंधी उल्लेख केला आहे. तो अभंग असा.--

' कल्याणीचा शिंपी हरिभक्त गोमा । त्याची कांता उमा नरहरी भजनी॥
सरिता सुकृताची त्या पोटीं उत्पन्न । झाली संबोधन गोणाबाई ॥२॥

गोणाई दामशेटीं झाले पाणी ग्रहण । संसारीं असोन नरसीगांवीं ॥३॥
गोत्र संज्ञा एका पूर्वजांच्या सहज । गाधिज भारद्वाज दोन्ही कुळें ॥४॥
आऊबाई कन्या झाली गोणाईसी । पुढें देवा नवसी पुत्रासाठीं ॥५॥
नामा ह्मणे होते विठोबाचे मनीं । तोंचि नित्य जननी नवस करी ॥६॥

नामदेव ‘ अयोनी संभव ’ ( शिंपल्यांत चंद्रभागेंतून वहात आला )होता असा पुष्कळांचा समज आहे, व भक्तिविजयांत ही तशीच कथा आहे, परंतु जनाबाईच्या अभंगावरून तो समज चुकीचा ठरत आहे.–

## अभंग.

‘ लाहो लागला अंबेचा । विठाबाई आनंदीचा ॥१॥
अधिष्ठान पंढरपुर । नांदे कान्हाई सुंदर ॥२॥
गोणाईनें नवस केला । देवा पुत्र देई मला ॥३॥
देखोनीया शुद्ध भाव । पोटा आले नामदेव ॥ ४ ॥
दामशेटी हरूषला । दासी जनीस आनंद झाला ॥ ५ ॥ ’

तसेंच त्यानें आपल्या ‘ नारायण ’ नांवाच्या मुलास स्वतःचा जन्मसंबंधीं वृत्तांत एका अभंगांत सांगितला आहे.–

‘ माझें जन्मपत्र बाबाजी आपण । लिहिलें त्याची खूण नारु एक १
अधिक ब्याण्णव गणित अकराशतें । उगवतां आदित्य रोहिणीसी २
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार । प्रभव संवत्सर शालिवहान शक ३
प्रसवली माता मज मळमूत्रीं । तेव्हां जिव्हेवरी लिहिलें देवें ॥ ४ ॥
शतकोटी अभंग करिल प्रतिज्ञा । नाममंत्र खुणा वाचुनि पाहे ॥ ५ ॥
ऐंशीं वर्षें आयुष्य पत्रिका प्रमाण । नामसंकीर्तन नामया वृद्धि ।६। ’

‘ पोटा आले नामदेव ’ व ‘ प्रसवली माता मज मळमूत्रीं ’ या दोन चरणावरून नामदेव अयोनीसंभव नव्हता हें उघड सिद्ध होत आहे.

नामदेव हा उद्धवाचा अवतार. यानें प्रत्येक अवतारीं परमात्म्याबरोबर अवतार धारण केला होता. तो अवतारिक पुरुष होता हें इतर गोष्टींनीं सिद्ध करून दाखविण्यापेक्षां जनाबाईचा त्या बद्दल एक अभंग सांपडला आहे तो दिला ह्मणजे बस्स आहे.–

‘ हिरण्यकश्यपूचे कुळीं नामा प्रल्हाद । पद्मिनी नाम माझें श्रेष्ठ दासीचें पद ॥ १॥ दुसरा अवतार अंगद राम भक्त । मंथरा नाम माझें भरतें दिधली लाथ ॥ २ ॥ कृष्ण सेवेलागीं गोकुळीं उद्धव जन्मला । कुब्जा

नाम माझें देवें उद्धार केला ॥ ३ ॥ कलिमध्यें नामदेव विठ्ठल-कीर्तनीं ।
त्याचे सेवेलागीं जन्मली दासी जनी ॥ ४ ॥'

ज्याप्रमाणें प्रल्हाद लहानपणापासून तोंडानें नित्य नारायण नामाचा जप करीत असे त्याप्रमाणें नामदेवसुद्धां बोलतां येऊं लागल्यापासून 'विठ्ठल' 'विठ्ठल' ह्मणत असे, इतकेंच नाहीं तर प्रल्हादाप्रमाणें गुरूंनीं 'श्री गणेशायनमः' असें ह्मणावयास सांगितलें असतां, तसें न करितां 'श्री विठ्ठल,' 'श्री विठ्ठल' असा त्यानें नामोच्चार करावा, व तसें करण्याबद्दल सर्व मुलांस उपदेश करावा.—

'गुरु ह्मणे नामयासी । काढी करें ॐ नमः सिद्धासी ॥
येरू ह्मणे तो आलिया हातासी । नकारासी ठाव कैंचा ॥ १ ॥
गुरु ह्मणती करूं ताडन । ताडनरूपीं हरि जाण ॥
सद्गुरु ताडिती देहाभिमान । तेंही ताडन हरिरूपीं ॥ २ ॥'

नामदेव बालपणापासूनच अत्यंत भगवन्निष्ठ होता. तो परम भगवद्भक्त होता इतकेंच नाहीं तर त्याचे अंगीं पितृभक्ति, निस्पृहता, औदार्य, सत्यवादित्व, दृढनिश्चय, व वैराग्य अशा अनेक सद्गुणांचें एकीकरण झालें होतें. यानें आपल्या वयाच्या पांचव्या, सहाव्या वर्षींच अशीं कांहीं चमत्कारिक कृत्यें आरंभिलीं कीं, तीं पाहून त्याचे आईबाप व ग्रामस्थजन आश्चर्यचकित झाले. त्याच्या बालपणच्या लीला व खेळ पाहून त्यावेळच्या धूर्त वृद्धांनीं असें अनुमान बांधिलें होतें कीं, 'हा मुलगा अत्यंत भगवन्निष्ठ होईल;' आणि तेंच खरें झालें.

नामदेव आपल्या वयाच्या सातव्या वर्षापासूनच दगडाचे टाळ घेऊन भजन करूं लागला होता. घरांतील कामकाज त्यानें बहुतेक कधीं केलें नाहीं व त्याला कोणी सांगतही नसे; तरी पण प्रसंगोपात सांगितल्यास त्यानें वडिलांची अवज्ञा कधींच केली नाहीं. याच्या भजनांत प्रेमरस इतका ओतप्रोत भरलेला असे कीं, प्रत्यक्ष श्रीविठ्ठल इंद्रवीटेवरून खालीं उतरून अत्यंत प्रेमानें त्याच्याबरोबर नाचूं उडूं लागत. बाळपणींच्या नैसर्गिक हूडपणामुळें हा देवांवर वारंवार रुसे; तेव्हां, 'मला तुजवांचून क्षणभरही करमत नाहीं, तूं मागशील तें मी तुला देईन, पीतांबराची तुजवर छाया करीन, वैकुंठीं नेऊन मी आपले ठिकाणीं तुला बसवीन' वगैरे प्रकारांनीं श्रीविठ्ठल त्याला समजाऊन आणीत.

नामदेवाच्या आठव्या वर्षीं त्याला गोविंदशेट सदावर्ते यांची मुलगी

राजाबाई वधु सांगून आली. दामशेटीनें ही मुलगी सुलक्षणी आहे असें पाहून विवाहास संमति दिली. लोकव्यवहारानुरूप ग्रामजोशाकडून उभयतांच्या पत्रिका पाहविल्या. ईश्वरी संकेतच तो; मग पत्रिका जमण्यास काय उशीर! उभयतांच्या विचारें लग्नतिथी नेमून साखरपुडा वगैरे जेथल्यातेथें होऊन लग्नसमारंभही मोठा बहारीचा उडाला. असो. अशाप्रकारें नामदेव आपल्या वयाच्या आठव्या वर्षीं गृहस्थाश्रमी झाला.

नवव्या वर्षापासून त्याची संतमंडळींत गणना होऊं लागली; व तो कांहीं प्रसंगीं संतांच्या संगतीनें भक्तिपर व ज्ञानपर गोष्टीही बोलत असे; परंतु त्याजवर सद्गुरूचा अनुग्रह झालेला नसल्यामुळें त्याला शुद्ध ब्रह्मतत्वाची ओळख झालेली नव्हती; ह्मणून एकेदिवशीं श्रीज्ञानेश्वरादिक भक्तमंडळी चंद्रभागेच्या वाळवंटांत आत्मानात्मविचार करीत बसली असतां ज्ञानेश्वरांनी **गोराकुंभार** यास सांगितलें कीं, 'या सकल संतांत खरे ब्रह्मज्ञानी कोण आहेत व फोलकट बोलणारे कोण आहेत; तसेंच गुरुकृपेनें पूर्ण ह्मणजे पक्के व गुरुकृपेवांचून अपूर्ण ह्मणजे कच्चे कोण आहेत याची परीक्षा कर.' तेव्हां गोरोबानें आपल्या हाताची तर्जनी ( आंगठ्याजवळील बोट ) वांकडी करून प्रत्येक संतांचे मस्तकावर मारण्यास आरंभ केला. अशाप्रकारें सर्वांची परीक्षा झाल्यावर गोरोबा ज्ञानेश्वराजवळ येऊन सांगूं लागला कीं, 'सर्व श्रीगुरुकृपेनें पूर्ण आहेत; परंतु नामदेव मात्र श्रीगुरुवांचून कच्चा आहे असें या परीक्षेनें मला दिसून आलें. तेव्हां ज्ञानेश्वर नामदेवाला ह्मणाले, 'नामदेवा, तूं आतां येथून ऊठ व गुरु करून ये.' असें बोलून नामदेवाचा हात धरून त्यांनीं त्यास सर्व संतमंडळींच्या बाहेर काढून दिलें. त्यामुळें त्यास फार वाईट वाटलें व मग त्यानें श्रीविठ्ठलाच्या सांगण्यावरून विसोबाखेचरास आपले गुरु केले. विसोबाखेचरांची व वाचकांची ज्ञानेश्वरांचे चरित्रांत ओळख करून दिलीच आहे; ह्मणून त्यासंबंधी येथें कांहीं जास्त सांगत नाहीं. नामदेवाची गुरुचरणीं अत्यंत निष्ठा होती. त्यानें आपल्या गुरूस आपल्या अभंगद्वारें पुष्कळ आळविलें आहे.—

'सद्गुरुचे पाय जीवें न विसंबावे। मन वळवावें वृत्तिसहित ॥१॥
डोळियांचे डोळे उघडले जेणें। आनंदाचें लेणें लेवविलें॥ २ ॥
जन्ममरणाचें फाडिलें सांकडें। कैवल्याचि पुढें दाखविलें ॥ ३ ॥
मोहरले तरु पुष्पफळ भारें। तेचि निर्विकार सनकादिक ॥ ४ ॥
नामा ह्मणे स्वामी खेचर माउली। कृपेची साउली केली मज ॥५॥'

गुरुकृपा संपादन केल्यावर नामदेवानें पुष्कळ अलौकिक व अद्भुत चमत्कार करून दाखविले. असो. अशारीतीनें संसारयात्रा क्रमीत असतां कांहीं कालानें राजाईस पुत्र झाला. बारावे दिवशीं जनाबाईनें देवाचे सांगण्यावरून त्या मुलाचें नांव नारायण ठेविलें. यावेळीं श्रीविठ्ठलांनीं रुक्मिणी, सत्यभामा यांसह नामदेवाचे घरीं येऊन त्यास अहेर केला. त्याबद्दल जनाबाईचा अभंग आहे तो असा:—

‘ नामदेवा पुत्र झाला । विठो बारशासी आला ॥ १ ॥
साडी चोळी हो पैरण । शेला मुंडासें घेऊन ॥ २ ॥
सरी बिंदली माथळीं । नाना रत्न मुक्ताफळीं ॥ ३ ॥
अवघीं आनंदलीं चित्तीं । पायीं लोळण घालती ॥ ४ ॥
ह्मणे याचें नांव काय? । दासी जनीस आनंद होय ॥ ५ ॥’

वाल्मीकीनें शतकोटी रामायण केलें असें एकदां नामदेवानें सहज ऐकिलें व तात्काळ त्यानें असा पण केला कीं, ‘ मी ही शतकोटी अभंग करीन.’ भक्तांचे मनोरथ पुरविण्यास प्रभु सदा तयारच. त्यांतून नामदेव गळ्यांतला ताईत मग त्याची कां परमेश्वर उपेक्षा करणार ! श्री विठ्ठलांनीं नामदेवाच्या जिव्हाग्रीं बसण्यास सरस्वतीस आज्ञा केली व आपण स्वतः नामदेवानें केलेले अभंग वह्या बांधून लिहिले; याबद्दल नामदेवानें एका अभंगांत उल्लेख केला आहे.—

‘ नामा ह्मणे अंगें बांधोनिया वह्या । बैसे लिहावया पांडुरंग ।१। ’

या शतकोटी अभंगांपैकीं, देवांनीं, रुक्मिणीनें व नामदेवाच्या घरच्या सर्व माणसांनीं मिळून पुष्कळ अभंग केले आहेत. त्यावेळीं नामदेवाच्या कुटुंबांत किती माणसें होतीं याचा खालील अभंगावरून चक्क उलगडा होतो.—

‘ गोणाई राजाई दोघी सासुसूना । दामा नामा जाणा बापलेक ।१।
नारा महादा गोंदा विठो चौघे पुत्र । जन्मले पवित्र त्याचे वंशीं ।२।
लाडाई गोडाई येसा साखराई । चौघी सुना पाही नामयाच्या ॥३॥
लिंबाई ते लेकी आउबाई बहिणी । वेडी पिशी जनी नामयाची ।४। ’

असो आतां नामदेवाच्या कुटुंबांतील मंडळींनीं कोणी किती अभंग केले व त्याचप्रमाणें श्री विठ्ठलांनीं व रुक्मिणीनें किती केले याविषयीं तुकारामबोवानीं एक अभंग केला आहे, तो असा:—

‘ सांगावी हे वाणी वेगळाली करूनी । जेणें पुरे धणी आवडीची ।१।

प्रथम ही कवि आत्मा अनुभवी । ब्रह्मरस ठेवी ऊतं आली ॥ २ ॥
पिता दामशेटी अभंग दोन कोटी । भक्तिभावें ताटी निवेदी देवा ।३।
तीन कोटी अभंग गोणाईचा वाद । स्वात्मसुखबोध सुखाचा तो ।४।
तीन कोटी अभंग नारोबाची कविता । उगवी स्वात्महिता दिवस रजनी
तीन कोटी अभंग विठाचा झगडा । प्रेमरस गोडा प्रेमाचा तो ॥ ६ ॥
महादा आणि गोंदा अडीच अडीच कोटी । प्रेमरस पोटीं प्रेमळ तो ७
एक कोटी अभंग लक्षवरती सोळा । प्रेमरस जिव्हाळा आऊबाईचा ८
चौऱ्याण्णव लक्ष रंगाईची करुणा । प्रेमें नारायणा आळवीलें ॥ ९ ॥
दोन कोटी अभंग राजाईची वाणी । प्रेमें चक्रपाणी आळवीले ।१०।
लाडाई गोडाई येसा साखराई । कवित्व हे पाही दीड दीड कोटी ११
एक कोटी देव पन्नासलक्ष रुक्मिणी । कोटी दासी जनी साडेबारा १२
एकुणहत्तर लक्ष चोपन्न कोटी । कविता गोमटी नामयाची ॥ १३ ॥
तुका ह्मणे येथें कोणी फुटूं नका । पूर्वींचा हा डंका वाजिन्नला १४'

नामदेवानें काशीपासून रामेश्वरापर्यंत सर्व तीर्थें केलीं. या तीर्थाटनाचे वेळीं त्याचेबरोबर ज्ञानेश्वर होते. त्यानें तें सर्व वृत्त आपल्या तीर्थावळी प्रकरणांत अभंगवाणीनें लिहून ठेविलें आहे; ह्मणून तें आह्मी आपल्या शब्दांनीं न देतां त्याच्याच अभंगांतील वेंचे घेऊन देतों. एकदां ज्ञानेश्वर महाराज तीर्थयात्रेस जाण्याच्या उद्देशानें आळंदीहून आपल्या भावंडांसह निघून पंढरपुरास आले. तेथें नामदेवाची व त्यांची भेट झाल्यावर ते त्याला ह्मणाले, ' नामदेवा '

'भूतळींचीं तीर्थें पहावीं नयनीं । ऐसें आर्त मनीं आहे मज ॥१॥
तुझ्या संगतीचें नित्य सुख घ्यावें । सार्थक करावें संसाराचें ॥ २ ॥
ऐशी उत्कंठा बहुत माझे पोटीं । भाग्यें जाली भेटी तुजसी आजी ३
ज्ञानदेव ह्मणे पुरवीं मनोरथ । करावे मुहूर्त प्रयाणासी ॥ ४ ॥'

त्यावर नामदेव ह्मणाला, ' ज्ञानेश्वरा ! पंढरीसारखें भूवैकुंठक्षेत्र सोडून इतर तीर्थीं जाण्यांत काय फायदा ? त्यांतून–

'विठोबाचे पायीं काय मज उणें । वासनाची मनें गिळिली माझ्या १
पाळिलें पोशिलें जन्मोनि जयाचा । विकलों काया वाचा मनें त्यासी २
नामा ह्मणे स्वामी विठोबासी पुसा । आज्ञा देईल शिरसा धरीन त्याची ३'

यावर मग ते उभयतां राउळांत गेले व त्यांनीं हा सर्व मजकूर श्रीविठ्ठ-

ह्मास निवेदन केला. तेव्हां श्रीपंढरीनाथ किंचित् हासून ज्ञानेश्वरांस ह्मणाले, ' ज्ञानोबा '—

' ह्मणे तूं ज्ञानशील चिद्रूप केवळ । सबाह्य निर्मळ स्फटिक जैसा ॥ १ ॥
सहज तीर्थरूप तूंचि निरंतर । असतां हा विचार काय करशी ॥ २ ॥
येरु ह्मणे स्वामी बोलिलेती बरवें । परि सार्थक करावें या देहाचें ॥ ३ ॥
प्रसंगें नामयाचे संगतीं सुख घ्यावें । ह्मणोनि ज्ञानदेवें धरिले चरण ४ '

तेव्हां देव नामदेवाचे तोंडाकडे पाहून किंचित् हासले व त्याला ह्मणाले, ' नामदेवा.—

' प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ति ज्ञानेश्वर । करितसे आदर संगतीचा ॥ १ ॥
ऐसें भाग्य जेणें सर्वस्वें साधावें । तरिच जन्मा यावें विष्णुदासा २
जावें स्वस्तिक्षेम यावें शीघ्रवत । करावें स्वहित कळेल तैसें ॥ ३ ॥

त्यावर ज्ञानेश्वरांकडे वळून त्यांना ह्मणाले, ' ज्ञानदेवा, मी सांगतों इकडे नीट लक्ष दे. हा नामदेव माझा फार आवडता आहे, किंबहुना तो माझ्या गळ्यांतला ताईत आहे असें ह्मटलें तरी चालेल! त्याच्याशिवाय मला एक पळभरसुद्धां करमत नाहीं; ह्मणून तुला पुनः सांगतों.—

' हें कृपेचें पोसणें माझें आवडतें । क्षण जिवापरतें न करी कदां ॥ १ ॥
परि त्वां सांकडे घातलें सर्वथा । दाटलें अवस्था हृदय माझें ॥ २ ॥
आरुष सांवडें नामें माझें वेडें । मार्गीं मागें पुढें सांभाळावें ॥ ३ ॥
तहानभूक तुवां जाणावी जिवीची । मज चिंता याची वाटे थोर ॥ ४ ॥ '

इतकें बोलून—

' मग नामयाचा हात धरूनि श्रीपति । देतसे हातीं ज्ञानदेवा ॥ १ ॥
रानीं वनीं जनीं विसंबसी झणी । धाडितों देखोनि आर्त तुझा ॥ २ ॥ '

अशाप्रकारें देवाची आज्ञा मिळाल्यावर—

' चरणीं ठेवुनि माथा निघते जाले दोघे । आले चंद्रभागे केलीं स्नानें १
पुंडलिकाचे चरण वंदुनियां नामा । उतरले भीमा पैलतीर ॥ २ ॥ '

असो. अशाप्रकारें नामदेव तीर्थयात्रेला गेल्यावर देवांना त्याचा विरह फार दुःसह झाला. त्यांना त्याच्याशिवाय चैन ह्मणून पडेना. त्यांच्या विरहावस्थेचें नामदेवानें फार उत्तम वर्णन केलें आहे. देवांची मुखश्री म्लान झालेली पाहून रुक्मिणीनें त्यांना तसें होण्याचें कारण विचारिलें. तेव्हां देव तिला सांगतात.—

'वाटतें जड भारी नाम्याच्या वियोगें। दाटलें उद्वेगें चित्त माझें।१।
'कवण्या सुखें स्थीर न राहे माझें मन। केव्हां डोळां देखेन प्राण माझा २
इष्टमित्र बंधु माय बाप सखा। हीं नामें मज देखा ठेविलीं तेणें॥ ३॥
तो कैसा मजवीण राखेल आपुला प्राण। हे चिंता दारुण वाटे मज। ।
तें मार्गी शिणलें असेल कोमाईलें। सुख दुःख आपुलें सांगेल कवणा ५
त्याचिया जिवीचें मीचि जाणें सर्व। हा माझा अनुभव आहे त्यासी ६
तें माझें आवडतें दास अंतरंग। त्यजिले सर्व संग मजची लागी॥७॥
देखुनि ते आवडी अभिनव वाटलें। सप्रेम दाटले सकळ भक्त॥ ८॥
परिसा भागवत आनंदें नाचत। लोटांगणीं येत गरुडपारीं॥ ९॥

असो. इकडे ज्ञानेश्वर नामदेवादि संतमंडळींचा मेळा श्रीक्षेत्र पंढरपुराहून निघाला तो, आमरणभेंडी, लाउळ, जोगाईचेंआंबें, तेर, पैठण, देवगिरी, जुनागड आणि चित्रकूट आदिकरून सर्व लहान मोठीं स्थानें, कीं—जीं विख्यात साधुपुरुष अनुक्रमें सावतामाळी, कूर्मदास, मुकुंदराज, गोराकुंभार, भानुदास, सज्जनकसाई, नरसीमेहता, आणि तुलसीदास यांच्या तेथील वास्तव्यामुळें लोकमान्य होऊन गेलीं होतीं—तीं सर्व पाहून आणि प्रसंगविशेषीं न भूतो न भविष्यति असे अनेक सिद्धाईचे चमत्कार दाखवीत एकदांचा श्रीक्षेत्र काशी येथें येऊन दाखल झाला. या तीर्थाटनामध्यें ज्ञानेश्वरासंबंधानें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, त्यांनीं सावतामाळी, गोराकुंभार, सज्जनकसाई, अशा शुद्रवर्णामध्यें उत्पन्न झालेल्या संतमंडळींनीं केलेल्या सत्काराचा मोठ्या आनंदानें स्वीकार करून त्या सर्वांना आपल्याबरोबर घेतलें. वास्तवीक पाहतां ही गोष्ट आपल्यासारख्या क्षुद्रबुद्धीच्या लोकांचेच मनांत यावयाची, पण "उरला भेद न ज्या कांहीं" अशा त्या साधुश्रेष्ठांना कसली हो त्याची दाद फिर्याद! आपल्या अतुल भगवद्भक्तीच्यायोगानें जी मंडळी ब्राह्मणाहून ब्राह्मण होऊन बसली होती त्यांच्याविषयीं कां ज्ञानराजांसारख्या सत्पुरुषाचे मनांत प्रतारणा येणार आहे?

असो. नंतर काशींतलीं सर्व तीर्थें करून, त्याचप्रमाणें रामानंद कबीरादि सर्व भगवद्भक्तांचीं दर्शनें घेऊन हें संतमंडळ प्रभासद्वारादि तीर्थें करण्याकरितां पश्चिमेकडे वळलें. तिकडची सर्व तीर्थयात्रा आटोपल्यावर ते मारवाडांत गेले. मारवाडदेश ह्मणजे रखरखीत, तेथें पाण्याचें कित्येक कोसपर्यंत दर्शनसुद्धां व्हावयाचें नाहीं, व झालें तरी नुसत्या डोळ्यांनीच. कारण एखादे विहिरीला पाणी असलेंच, तर तें अत्यंत खोल. अशा त्या निर्जल प्रदेशांतुन

ती मंडळी चालली असतां नामदेवास फार तहान लागली; व मला तहान लागली असें त्यांनीं ज्ञानेश्वरांस सांगितलें; परंतु ते ह्मणाले कीं, अरे नामदेवा! हें निर्जल अरण्य, यांत पाणी कुठचें मिळणार? बरें पुढें एक गांव दिसत आहे तेथें असेल तर पाहूं. असें ह्मणून ते कोलादजी नांवाचें बिकानेर पासून १०।१२ कोसांवर एक गांव आहे तेथें आले. तेथें येऊन पहातात तों एक कूप अकस्मात् त्यांचे दृष्टीस पडला. कूपाजवळ जाऊन उदक पाहूं लागले, तों तें अतिशय खोल आहे असें त्यांना आढळलें. आतां हें पाणी प्यावें कसें? जर काढून प्यावें तर दीडशें दोनशें हात लांब दोर लागणार! तेव्हां नामदेवास फार काळजी पडली. पुढील हकीकतीबद्दल जनाबाईचा एक अभंग सांपडला आहे तो दिला ह्मणजे बस्स आहे.—

'बोलत चालत सिद्धि गगनांत । पुढें कैशी मात झाली ऐका ॥ १ ॥
गेले मारवाडा तेथें अल्प जळ । तृषेनें पिडीले उभयतां ॥ २ ॥
पक्षियाचे वेशें स्वामी ज्ञानेश्वर । प्राशियलें नीर जाउनियां ॥ ३ ॥
नामदेवें तेथें मांडिलें कीर्तन । उचंबळलें जीवन पाताळींचें ॥ ४ ॥
मार्गशीर्षमासीं भरतसे मेळा । संत सुखसोहळा पहाताती ॥ ५ ॥
यवनाचे सभे उठविली गाय । तेव्हां यासि रायें मानियलें ॥ ६ ॥
नागनाथीं जेणें फिरविलें देऊळ । ऐसें आंगीं बळ वैष्णवांच्या ॥७॥
जनी ह्मणे संगें होते ज्ञानदेव । निर्जिवासी जीव सत्ता ज्याची ॥८॥

या हकीकतीसंबंधी नामदेवाचा ही एक अभंग उपलब्ध आहे. तृषाक्रांत होऊन नामदेव श्रीविठ्ठलाचा धावा करीत असतां इकडे श्रीविठ्ठलास अपशकून होऊं लागले. या बद्दल रुक्मिणी एकाग्र चित्तानें विचार करीत असतां तिला नामदेवाचा आर्तध्वनि ऐकूं आला तेव्हां ती देवास ह्मणते.—

"तंव ती विश्वमाता विचारी नावेक । अवचितां शोक पडे कानीं ॥ १॥
तृषाक्रांत नामा करितसे धावा । वेगीं जाउनि देवा सांभाळावें ॥२॥
तंव तो आर्तबंधु ऐकुनि वचन । मनाचेनि मनें वेगु केला ॥३॥
तंव गडगडीत कूप उदकें ओसंडला । कल्पांतिं खवळला सिंधु जैसा ॥४॥
ज्ञानदेव ह्मणे झालें अभिनव । कैसा ऋणी देव केला यानें ॥५॥
सावध करुनिया दिलें आलिंगन । जिवें लिंबलोण उतरिलें ॥६॥
येथें चरणावरि ठेवियेला माथा । ह्मणे माझी चिंता आहे विठोबासी ७
नामा ह्मणे माझे बहु लळे पाळिले । कैं देखेन पाउलें विटेवरी ॥ ८ ॥

याप्रमाणें तो कूप कल्पांताचेवेळीं जसा समुद्र खवळावा त्याप्रमाणें

खवळून पाताळाचें पाणी वर उचंबळून वाहूं लागलें. त्या वेळेपासून त्या विहिरीस मारवाडांत 'नामदेवजीरोकुवो' असें ह्मणतात.

मग तेथून हे सद्भक्तशिरोमणि निघाले ते पुण्यक्षेत्रें पहात पहात श्री पंढरपुरीं सुखरूप येऊन पोहोंचले. नामदेव सुखरूप आलेला पाहून देवांस फार समधान वाटलें. त्या वेळीं नामदेव व श्रीपांडुरंग यांचें जें कांहीं संभाषण झालें तें सर्व नामदेवानें अभंगरूपानें लिहून ठेविलें आहे. त्यांतील शेवटचा एक वेंचा घेऊन हें लांबलेलें तीर्थयात्रा प्रकरण आटोपूं.

**मग केशव ह्मणे नाम्या खंती वाटे मनीं । निद्रा न लागे नयनीं पाहतां वाट**
**तुजविण उदास वाटे हे पंढरी । न पडे क्षणभरी विसर तुझा ॥ २ ॥**
**'तुज माजी सर्व मज तुझी आवडी । गुळासी न सोडी गोडी जैसी ३**
**धरूनि हनुवटी दिधलें आलिंगन । कुरवाळुनि वदन नेत्र पुसी ॥ ४ ॥**
**मग काढूनि कंठींची सुमनतुळसीमाला । घातलीसे गळां नामयाच्या ५**
**सर्वांगसुंदर पाहे कृपादृष्टी । पुसे जिवीची गोष्टी कृपासिंधु ॥ ६ ॥**
**निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान खेचर । नरहरी सोनार आदीकरोनी ॥७॥**
**समस्त भक्त मिळुनि लोटांगणीं येती । आलिंगन देती नामयातें ।८।**
**अनिवार सुमनें वर्षताती सुरवर । गगनीं जयजयकार शब्द होती ९**
**ऋषिगण गंधर्व मिळुनि सकळीक । येती दृष्टी सुख घ्यावयासी ॥१०॥**
**तंव रुक्माबाई आरती घेउनि आली वेगें । ओवाळिले दोघे देवभक्त ११**
**कौतुकें नाम्याची धरुनी हनुवटी । पाहे कृपादृष्टी घडिये घडिये १२'**

पुढें मग नामदेवानें यात्रेप्रीत्यर्थ मोठें मावंदें केलें. मावंद्यास सर्व संतमंडळी जमली होती. असो. पुढें कांहीं दिवसांनीं लौकरच ह्मणजे शके १२७२ सालीं आषाढ शुद्ध एकादशीचे दिवशीं नामदेव श्रीपांडुरंगास नमस्कार करून ह्मणाला, 'महाराज मला आतां समाधि घेण्यास आज्ञा द्या! कारण आयुष्य संपत आलें व तशांतून आतां माझी आशाही पण कोणती राहिली नाहीं. आतां चरणीं ठाव द्यावा एवढीच प्रार्थना आहे. त्यावेळेस देव ह्मणाले, 'नामदेवा! तुला अक्षय वैकुंठसुख देतों तूं वैकुंठीं चल.' तेव्हां नामदेव ह्मणाला.--

**'वैकुंठासी आह्मां नको धाडूं हरि । वास दे पंढरीं सर्वकाळ ॥ १ ॥**
**वैकुंठ खोपट जुनाट झोंपडी । नको आडाआडी घालूं आह्मां ॥ २ ॥**
**वैकुंठीं जाऊनी काय वा करावें । उगेंची बैसावें मौनरूपीं ॥ ३ ॥**
**नामा ह्मणे येथेंचि हो ठेवी । वास सदा देई चरणांजवळी ॥ ४ ॥'**

'देवा! मी तुझा निष्काम भक्त आहे, आणि तूंही कोणाची गरज न ठेवणारा मालक आहेस; तुझा माझा चाकर मालकाचा मुळींच संबंध नाहीं. ह्मणून माझें पुनः पुनः एवढेंच मागणें आहे की मला येथें आपल्या पायापाशीं स्थळ द्या कारण.—

'वतन आमुचें मिरास पंढरी। विठोबाचे घरी नांदणूक ॥ १ ॥
सेवा करूं तेथें नित्य महाद्वारीं। नामाचे उजरी जागवून ॥ २ ॥
साधु संतां शरण जाऊं जिवेंभावें। प्रसाद स्वभावें देती घेती ॥ ३ ॥
नामाह्मणे आह्मी पायरीचे चिरे। संत पाय हिरे वरी देती ॥ ४ ॥

आतां मात्र नामदेव ऐकत नाहीं यास समाधि दिलीच पाहिजे असें जाणून श्री पांडुरंगानीं आषाढ कृष्ण त्रयोदशीचे दिवशीं आपला प्राणापेक्षांही अतिप्रिय शिष्य जो नामदेव त्यास महाद्वाराखालीं समाधि घेण्यास आज्ञा दिली. आज्ञे प्रमाणे नामदेव महाद्वाराचे पायरीखालीं समाधिस्त होण्यास जों जाऊं लागतो तोंच त्याच्या कुटुंबातली सर्व मंडळी तेथें जमा झाली व त्यांनीं एकच आकांत मांडिला. त्यांत दामशेटी, गोणाबाई, जनाबाई यानीं तर फारच आक्रोश केला. तीं ह्मणालीं, 'नामदेवा! आमच्या अगोदर तूं कसा समाधि घेतोस. आधीं आमची व्यवस्था कर, नंतर तूं समाधि घे. त्याचप्रमाणें राजाबाई ह्मणाली 'महाराज' दारिद्र्याच्या संबंधानें मी आपणांस कांहीं वाईट शब्द बोललें त्यामुळें आपण मनांत राग धरून मला सोडून जाता काय! तर असें न करितां आपल्या हातानें माझी व्यवस्था करून मग आपण काय करणें तें करावें. कारण, स्त्रियांला पतिवांचून दुसरी गतिच नाहीं. तें ऐकून नामदेवास मोठें संकट पडलें व तो देवाच्या मुखाकडे पाहूं लागला. तेव्हां भगवंतानीं त्या सर्वांस अशी आज्ञा केली कीं, तुह्मी सर्वजण जेथें नामदेव समाधिस्थ होत आहे त्याचाठिकाणीं त्याचे सभोंवती समाधि घ्या. असें देवांचें भाषण ऐकून दामशेटी आदिकरून सर्वांस मोठा आनंद झाला; व ते सर्वजण नामदेवा बरोबर संतांस व श्री विठ्ठलास साष्टांग नमस्कार करून मुखानें 'श्री विठ्ठल श्री विठ्ठल' असा नामाचा गजर करीत करीत महाद्वाराचे पायरीखालीं शिरले; व अशा प्रकारें नामदेवानें आपल्या सर्व कुटुंबासहवर्तमान शके १२७२ सालीं आषाढ वद्य त्रयोदशीस महाद्वारीं समाधि घेतली. नामदेवाच्या कुटुंबांतील सर्वांनीं समाधि घेतली असें वर लिहिलें खरें परंतु त्याची थोरली सून त्या वेळीं माहेरीं गेली होती, ती मात्र मागें उरली; हें तिच्याच अभंगावरून सिद्ध होत आहे.—

'पूर्व संबंधें मज दिधलें बापानें। शेखीं काय जाणें कैसें झालें?
प्रसूतीलागीं मज आणिलें कल्याणा। अंतरला राणा पंढरीचा॥ २॥

पुढें तिलाही देवांनीं आपल्या पायापाशीं आश्रय दिला. त्यावेळचा तिचा एक अभंग उपलब्ध आहे. तो असाः—

'जोडोनिया पाणी करि विनवणी। धांव चक्रपाणी पांडुरंगा॥ १॥
कोणा निरविलें हें नाहीं कळलें। येई गे विठ्ठले मायबहिणी॥ २॥
ऐकोनिया धांवा धांवला अनंत। शंख चक्रांकित उभा पुढें॥ ३॥
उचलोनि मुकुंदा घाली वसंगळां। सांभाळी विठ्ठला तुझा तूंचि॥ ४॥
देव ह्मणे तुझ्या पूर्वजांसी भाक। दिधलें तें एक सांगतों मी॥ ५॥
तुमची वंशावळी पोशिन मी नित्य। ह्मणुनि कुरवाळीत पद्मकरीं॥ ६॥
येरीं चरणांवरी ठेवियला माथा। कृपाळुवा अनंता सांभाळावें॥ ७॥
ध्यानीं धरुनि मूर्ति सबाह्य अंतरीं। आतां या उपरी न देखें कांहीं।८।
लाडाई ह्मणे देवा घेई हृदयांत। देवें मग गुप्त केली तिये॥ ९॥'

याप्रमाणें नामदेवाच्या परिवारासह त्याच्या समाधीचा समारंभ श्रीविठ्ठलांनीं केला. फक्त नामदेवाचा 'मुकुंद' नांवाचा नातु मात्र मागें एकटा उरला होता. असो. आतां नामदेवाच्या घरांतील दासी जी जनाबाई—जिचें नांव वाचकांनीं मागें अनेकदां वाचिलें असेल तिची थोडीशी माहिती येथें देतों.

गोदातीरीं गंगाखेड ह्मणून एक गांव आहे, तेथें 'दमा' या नांवाचा एक शूद्र गृहस्थ होता. तो महा भगवद्भक्त होता. त्याच्या स्त्रीचें नांव करुंड असें होतें. ती ही महा पतिव्रता होती. दमा प्रत्येक वारीस पंढरीस जात असे. पोटीं संतति नसल्यामुळें तो नेहमीं दुःख करी. पंढरीचे एके वारीस आला असतां त्यानें, 'मला पुत्रसंतान दे' अशी पांडुरंगाची प्रार्थना केली. त्या रात्रींच तो निद्रिस्थ असता त्यांस असें स्वप्न पडलें कीं, 'तुला पुत्र कांहीं होणार नाहीं पण एक कन्या फार सद्गुणी होईल; व ती तुझ्या कुळाचा उद्धार करील. ती कन्या पूर्वजन्मीं कृतायुगांत पद्मिनी, त्रेतायुगांत मंथरा, द्वापारयुगांत कुब्जा, अशी होती; व तीच तुझ्या उदरीं येईल. तिचें नांव जनाबाई असें ठेव. तिचा आणि नामदेव यांचा परस्पर संबंध असल्यामुळें तूं ती कन्या दामशेटी यांस अर्पण कर.' असें स्वप्न पाहून त्यास आनंद झाला, व त्याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर ही मुलगी झाली. तिचें नांव जनाबाई असें ठेविलें. ती कन्या ६।७ वर्षांची झाल्यावर एका वारीस तिला घेऊन येऊन दमाजीनें दामशेटीचे स्वाधीन केलें व हिचा सांभाळ करा असें सांगितलें.

त्याप्रमाणें दामशेटीनें तिचें चांगलें पालन केलें, व ती नामदेवाचे संगतीस असल्यामुळें महाभगवद्भक्त झाली. तिनें आपल्या अतुल भक्तिप्रभावानें देवांस अगदीं आपलेंसें करून घेतलें होतें. देव तिच्या घरीं नेहमीं जेवावयास जात. तिला दळूं कांडूं लागत. शेण गवऱ्या वेंचूं लागत. तिला न्हावूं माखूं घालीत. अशीं अनेक प्रकारचीं तिचीं कामें देव स्वतः करीत. तिनें हें सर्व वृत्त अभंगरूपानें लिहून ठेविलें आहे; ह्मणून तें आह्मीं आपल्या शब्दांनीं न देतां तिच्या अभंगांतील उतारे घेऊनच देतों.

‘ एक प्रहर रात्र झाली । फेरी विठ्ठलाची आली ॥ १ ॥
हळुंच मागतो खायाला । ह्मणे काय देऊं तुला ॥ २ ॥
करिं धरोनि नेला आंत । वाढी पंचामृत भात ॥ ३ ॥
प्रेम सुखाचा ढेंकर दिला । जनी ह्मणे विठो धाला ॥ ४ ॥

‘ एक प्रहर रात्र शेष उरल्यावरी । येउनि शेजेवरी बैसे देव ॥ १ ॥
उठ जनाबाई घेई वो दळण । आवडीचें गाणें गाई प्रेमें ॥ २ ॥
नुठलीया मानेखालीं घालि हात । अंगें नेसवीत लुगडियासी ॥ ३ ॥
दळणाची पाटी अंगें उचलीत । शेजारीं बैसत दळूं लागे ॥ ४ ॥
नेणो पूर्वी काय तप थोर केलें । निधान जोडिलें पंढरीचें ॥ ५ ॥
तैसाचि तो सवे येवोनि बाहेरी । वेंचोनिया भरी शेणी हातीं ॥ ६ ॥
ओझें झालें ह्मणे पाटी पीतांबरीं । घेवोनि पाठारीं घरा आले ॥ ७ ॥
सर्व काम माझें करी चक्रपाणी । आतां कैची जनी नामयाची ॥ ८ ॥’

एकदां देव जनांबाईस दळूं लागावयास गेले असतां तेथें आपल्या गळ्यांतील रत्नजडीत पदकांचा हार व अंगावरील शालजोडी विसरून आले; व घाईंत तिची वाकळ पांघरून आले. काकडआरतीचेवेळीं पुजारी पहातात तों देव वाकळ पांघरलेले. पुढें देवाच्या आंगावरून वाकळ काढून पहातात तों गळ्यांतील रत्नजडित पदकांचा हारही नाहीं. हें पाहून तर त्यांस फारच नवल वाटलें. पुढें सरकार मदतीनें शोध करतां करतां तो हार जनाबाईनें नेला असेल, असा बडव्यांनीं तर्क केला. याबद्दल जनाबाईचा अभंग सांपडतो तो.—

‘ विठोबाचें पदक गेलें । बडवे ह्मणती जनीनें नेलें ॥ १ ॥
नाहीं नेलें म्यां जनीनें । सख्या विठ्ठलाच्या आणें ॥ २ ॥
वाकळ झाडोनीया दावी । पदक पडलें जनीचे ठायीं ॥ ३ ॥
मिळोनिया दहा गडी । पडली जनाईवर उडी ॥ ४ ॥
दंडा लाविल्या काढण्या । धांव विठ्ठला धांवण्या ॥ ५ ॥

माझे वेळे कोठें गेला । जनी ह्मणे विठ्ठल मेला ॥ ६ ॥
चंद्रभागीं रोविला शूळ । आलें जनाईशीं मूळ ॥ ७ ॥
त्या शूळाचें झालें पाणी । ह्मणे नामयाची जनी ॥ ८ ॥

जनाबाईनें कोणतेंही काम करण्यास आरंभ केला कीं, देव येऊन तें तिला करूं लागत. एकेदिवशीं जनाबाई नहाण्या करितां डोकीचे केश सोडून बसली असतां देवांनीं तेथें येऊन तिला मोठ्या प्रेमानें न्हावूं घातलें. याबद्दल जनाबाई ह्मणते.—

'तुळसीचे वनीं । जनी उकलिते वेणी ॥ १ ॥
हातीं घेउनिया लोणी । डोई चोळी चक्रपाणी ॥ २ ॥
माझ्या जनिला नाहीं कोणी । ह्मणुनि देव घाली पाणी ॥ ३ ॥
जनी सांगे सर्व लोकां । न्हाऊं घाली माझा सखा ॥ ४ ॥'

एवंच कांय कीं, जनाबाईनें भगवंताला नामदेवाप्रमाणेंच आपल्या अगदीं अंकित करून घेतलें होतें व असें होण्याला तिची अनुपम भक्तिच कारण होय ! तर अशा या भक्तिधेनुकेची कांस बळकट धरली असतां सर्व गोष्टींत सिद्धता मिळते यांत मुळींच संदेह नाहीं !

आतां उपसंहारादाखल दोन शब्द लिहून हा भाग आटोपता घेऊं. नामदेव जातीनें शिंपी होता ह्मणून त्याला शूद्र समजतात; पण तो शूद्र नसून क्षत्रियकुलावतंस होता. 'शिंपी' हा शब्द 'सीवी' शब्दाचा अपभ्रंश आहे. परशुराम अवतारीं क्षत्रीय अतिशय प्रबल झाल्यावरून व मुख्यत: सहस्रार्जुनानें जमदग्नीस मारिल्यावरून परशुरामांनीं निःक्षत्रिय पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा केली व तसें एकवीसवेळां केलेंही. त्यावेळीं कित्येक क्षत्रियांनीं स्वजीवरक्षणार्थ वेषांतर केलें होतें; त्यांत सहस्रार्जुनाच्या दोघा मुलांनीं आपला क्षत्रियधर्म टाकून, हातांत असलेल्या धनुष्याची गज कातर करून व बाणाची सुई करून ते वकदालभ्याश्रमीं लपून राहिले होते. तेसमयीं त्यांस परशुरामानें, 'तुह्मी कोण' असें विचारतां ते ह्मणाले कीं, 'आह्मीं सीवि.' त्यांचाच हा वंश आहे; याला हरिवंशांत असा आधार सांपडतो.—

तस्य पुत्र शतस्यासन् पंचशेषा महात्मनः ॥ १ ॥
शूरसेनश्च शूरश्च धृष्टोक्तः कृष्ण एव च ॥
जयध्वजश्च नाम्ना सीदावंत्यो नृपतिर्महान् ॥ २ ॥'

नामदेवाच्या कवितेचें स्वरूप शुद्ध व सोज्वळ आहे. त्यांनीं अभंग पुष्कळ केले पण त्यापैकीं फारच थोडे प्रसिद्ध आहेत. तीर्थावळी व समाधि अशीं

दोनच काय तीं स्वतंत्र प्रकरणें उपलब्ध आहेत. भागवतांतील दशमस्कंधावरही यानें कांहीं कविता केल्या आहेत असें आढळतें. याची सर्व कविता सांपडत नाहीं ही फार दुःखाची गोष्ट आहे. नामदेवानें आपल्या अभंगाच्या शेवटच्या चरणांत 'नामा' असें पद घातलें आहे. याची कविता गोड, प्रेमळ व भक्तिरस प्रधान आहे. क्लिष्टतेचें नांव सुद्धा नाहीं. प्रसाद तर ओतप्रोत भरला आहे. याची कांहीं कविता ज्ञानवैराग्यपरही आहे. तथापि त्याचा ओढा परमेश्वरप्राप्तीकडे विशेष असल्यामुळें त्याचीही मनोवृत्ति त्याच्या कवितेंत अगदीं स्पष्ट दिसून येते.

प्रसिद्ध मोरोपंत यांनीं नामदेवाची तारीफ केली आहे. ते ह्मणतात.—

भक्तिप्रताप लोकीं अत्यद्भुत याचि नामदेवाचा ।
परमप्रिय भक्त, सखा कीं आत्मा आप्तकाम देवाचा ॥ १ ॥
किंबहुना नाम्याची भक्ता दासी जनी तसी वाणी ।
खाणी पातक, आणी तरिच खळाच्याहि लोचनीं पाणी ॥ २ ॥
भक्तिसुखाधिक मानुनि मुक्तिसुख कदापि याचिना ज्यां तें ।
अत्यद्भुत आयकिलें सद्वृंदीं नमुनि याचि नाम्यातें ॥ ३ ॥'

असो. आतां नामदेवानें उपाधिविरहित होण्याकरितां ज्याचा परिस नदींत फेंकून दिला होता व तो मागितल्यावरून ज्याला त्यानें सर्व चंद्रभागेंतील वाळू परिसमय करून दाखविली होती त्या परिसाभागवतानें केलेल्या आरतीनें नामदेवाला आरती करून हा चरित्रभाग आटोपूं.

### आरती ( नामदेवाची. )

जन्मतां पांडुरंगें । जिव्हेवरि लिहिलें ॥ शतकोटी अभंग । प्रमाण कवित्व रचिलें ॥ १ ॥ जय जय जी भक्तराया । जिवलगा नामया ॥ आरती ओवाळीतां । चित्त पालटे काया ॥ ध्रु.॥ घ्यावया भक्तिसुख । पांडुरंगें अवतार ॥ धरूनियां तीर्थमिषें । केला जगाचा उद्धार ॥ जय० ॥ २ ॥ प्रत्यक्ष प्रचीती हे । वाळवंट परिस केली ॥ हारपली विषमता । द्वैतबुद्धि निरसली ॥ जय० ॥ ३ ॥ समाधि महाद्वारीं । श्रीविठ्ठलचरणीं ॥ आरती ओवाळीतो । परिसा कर जोडूनि । जय० ।४।

---

## नामदेवाच्या कवितेंतील वेंचे.

मागें दिलेल्या चरित्रांत नामदेवाच्या कवितेचे बरेच मासले आले आहेत ह्मणून येथें आतां एकदोनच घेऊं.

## अभंग.

कलियुगाचें मुळें । झालें धर्माचें वाटोळें ॥ १ ॥
पलंगीं बैसवूनी राणी । माते हातीं अणवी पाणी ॥ २ ॥
स्त्रिये पाटावाची चोळी । माता अखंड चिंध्या गाळी ॥ ३ ॥
ऐसा कलियुगींचा महिमा । ह्मणे विष्णुदास नामा ॥ ४ ॥

सांप्रत अर्धवट इंग्रजी शिक्षणानें बहकून गेलेलीं मुलें आपल्या मातापितरांविषयीं व वाडवडिलांविषयीं जी बेपर्वाई व अनुदारता दाखवितात तिचें चित्र कवीनें वरील अभंगांत अत्युत्तम वठवून दिलें आहे.

'गंगा गेली सिंधूपाशीं । त्याणें अव्हेरिलें तिसी ॥ १ ॥
तरि तें सांगावें कोणाला । ऐसें बोले वा विठ्ठला ॥ २ ॥
जळ कोपलें जलचरा । माता अव्हेरि कुमारा ॥ ३ ॥
जनी ह्मणे शरण आले । पाहिजे ते उद्धरिले ॥ ४ ॥'

'जातिहीन चोखामेळा । त्याला भक्तीचा कळवळा ॥ १ ॥
त्याचा जाला ह्मणीयारा । राहे घरीं धरी थारा ॥ २ ॥
देव जेवी तया घरा । त्याचा भक्तिभाव खरा ॥ ३ ॥
देव बाटवीला तेणें । हांसे जनी गाय गाणें ॥ ४ ॥'

'आह्मी बळवंताच्या दासी । कोण गर्भवास सोसी ॥ १ ॥
करूं यमासी ताडण । आमुचा धनी नारायण ॥ २ ॥
जनी ह्मणे हरी । पाप उरों नेदी उरी ॥ ३ ॥'

नामदेवाच्या घरच्या सर्व माणसांत कवित्वस्फूर्ति होती असें मागें सांगितलेंच आहे. त्याच्या आईचे व बायकोचे कांहीं अभंग उपलब्ध आहेत; त्यांतील एकेक मासल्याकरितां घेऊं:—

'गोणाई ह्मणे नाम्या सांडी देव-पिसें । बळें घर कैसें बुडविशी ॥१॥
जनाचीं लेंकुरें वर्ततातीं कैशीं । तूं मज झालासी कुल-दीपु ॥ २ ॥
धन्य धन्य पुत्रकलत्र नांदती । अभाग्याचे चित्तीं पांडुरंग ॥ ३ ॥
यातें जे अनुसरती त्यांचें नुरे कांहीं । हा देव नोहे पाहीं घर-घेणा ४
याची भक्ति कैशी लौकिका वेगळी । संसाराची होळी केली नाम्या५
गोणाई ह्मणे नाम्या हें रे नव्हे भलें । घर त्वां बुडविलें कुळासहित ६

'घरधन्यानी केला गुरु । बाई मी आतां काय करूं ॥
असून नाहीं हा संसारू । चमत्कारू कृपेचा ॥ १ ॥

धांव पाव गे मेसाई । कवणाचेंही न चले काई ॥
सत्यपण तुझिये ठायीं । असून नाहींसें करीं हं ॥ १ ॥
मंत्र घेतलासे जैसा । घरीं संतांचा वोळसा ॥
वोस पडो या हरिदासां । गेले न येती मागुती ॥ ३ ॥
' काय सांगूं यांच्या रीती । सोसें पायवणी पिती ॥
अवघे भांबुरभुतें होती । नाचताती आनंदें ॥ ४ ॥
एकमेकांच्या पडती पायां । लौकिकांतुन गेले वायां ॥
ह्मणती ये गा पंढरीराया । ब्रह्मानंदें डुल्लती ॥ ५ ॥
भोळी सासू गोणाबाई । पांढरास्फटीक ब्याली काई ॥
त्यानें जोडिला शेष–शायी । ह्मणे राजाई काय करूं ॥ ६ ॥'

' दोन प्रहर रात्र पाहोनि एकांत । राजाई वृत्तांत सांगे माते ॥ १ ॥
अहो रखुमाबाई विठोबासी सांगा । भ्रतारासी कां गा वेडें केलें ॥२॥
वस्त्र पात्र नाहीं खायाजेवायासी । नाचे अहर्निशि निर्लज्जसा ॥ ३ ॥
चवदा मनुष्यें आहेत माझे घरीं । हिंडती दारोदारीं अन्नासाठीं ।४।
बारा मार्ग तुह्मीं उमजोनी सांगा । नामयाची राजा भक्ती नव्हे ५ '

या वरील तीन अभंगांवरून नामदेवाची घरची स्थिति इतकी शोचनीय असतांही त्याची संसाराचेठायीं किती विरक्तता होती व तो किती जबर भगवद्भक्त होता वगैरे गोष्टींचें चांगलें स्पष्टीकरण होत आहे.

## जनाबाईकृत पद.

सुंदर माझें जातें ग ! फिरे बहुत । ओंव्या गाऊं कौतुकें तूं येरे बा ॥ १ ॥ जिव शिव दोनी खुंटे हो ! प्रपंचाचे नेटे हो ॥ लावुनि पांची बोटें तूं ये रे ! बा ! ॥ २ ॥ सासू सासरा दीर तीसरा । ओंव्या गाऊं भ्रतारा तूं ये रे ! बा ! ॥ ३ ॥ बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी । ओंव्या गाऊं बसुनी तूं ये रे ! बा ! ॥ ४ ॥ प्रपंच दळण दळिलें पीठ भरीलें । सासुपुढें ठविलें तूं ये रे ! बा ! ॥ ५ ॥ सत्वाचें आधण ठेविलें पुण्य वैरीलें । पाप तें वोतुन गेलें तूं ये रे ! बा ! ॥ ६ ॥ जनीन जातें गाईलें कीर्ति राहीली । थोडासा लाभ होईल तूं ये रे ! बा ! ७

# एकनाथ.

आई किंवा बाप या शब्दांत जितकी जादू भरली आहे तितकीच किंबहुना तिच्याहून जास्त गुरु शब्दांत भरली आहे. या शब्दाच्या अर्थाकडे विचारपूर्वक पाहूं लागल्यास, त्यांत फारच अर्थगांभीर्य असून, त्या अर्थाची निःसीम व्याप्ति दिसूं लागते. व्यापक अर्थाचा समावेश करणारा गुरु शब्दाच्या जोडीचा दुसरा एकादा शब्द क्वचितच आढळेल. गुरूची व्याप्ति इतकी अचाट आहे कीं, गुरुरूपाव्यतिरिक्त एक काडीसुद्धां भासणार नाहीं; कारण वेळेवर काडीपासून देखील कांहीं हित होतें, आणि गुरु ह्मणजे हित करणारा ह्मणून अखिल जडचैतन्यात्मक सृष्टींत गुरु कसा ओतप्रोत भरला आहे. परंतु ही सर्व जडचैतन्यात्मक सृष्टि गुरुमय कशी आहे, ही प्रचीति ज्याच्या कृपेकरून होते ती 'सद्गुरूची' व्यक्ति मात्र एकच असते. पित्यापेक्षांही अधिक उपकार करणारे अनेक सत्पुरुष जगांत भेटतील पण जनक हा जसा प्रत्येक व्यक्तीचा एकच असतो, तसा सद्गुरुही एकच असतो. परंतु पिता व सद्गुरु यांची तुलना केली तर पित्यापेक्षां सद्गुरूची योग्यता अधिक ठरते; कारण त्याचे उपकार अति मोठे असतात. जीवाचा जन्म होणें हेंच त्याच्या भवबंधास कारण आहे आणि जन्म होण्यास मूळकारण पिता आहे. अर्थात् पित्यानें जन्म देणें ह्मणजे भवपाशांत गुंतविणें आहे; आणि सद्गुरु जीवास भवपाशांतून मुक्त करितात ह्मणून पित्यापेक्षांही सद्गुरु श्रेष्ठ आहेत. सद्गुरूस देण्यायोग्य अशी उपमाच जगांत नाहीं. किंबहुना साक्षात् ब्रह्माविष्णुमहेश्वरांचीही उपमा गुरूस शोभत नाहीं. कारण हे देव रज, तम आणि सत्व अशा गुणांनीं युक्त आहेत आणि सद्गुरु गुणविकृतिरहित आहेत; ह्मणून त्यांस साक्षात् परब्रह्माचीच उपमा शोभते. तर असे जे परब्रह्मस्वरूपी सद्गुरु त्यांची प्राप्ति झाल्याशिवाय जगांतील कोणताच पुमार्थ साध्य होणार नाहीं, हें काय सांगावयास पाहिजे !

अशा सद्गुरूंची प्राप्ति त्यांची मनोभावें व एकनिष्ठपणें सेवाचाकरी केल्याशिवाय होत नाहीं. प्रस्तुत चरित्राचे नायक जे एकनाथमहाराज त्यांची आज हिमालयापासून तों तहत रामेश्वरापर्यंत साधुत्वाच्या व कवित्वाच्या संबंधानें जी कीर्ति दुमदुमत आहे त्याला सर्वस्वी त्यांची अनुपम सद्गुरुसेवाच कारण आहे. यांची सद्गुरुचरणांवर किती जबर निष्ठा होती हें पुढील चरित्र वाचलें असतां कळून येईल.

एकनाथाची मूळ पीठिका भास्करपंतापासून सांपडते. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. यांचें मूळ गांव पैठण. यांना भानुदास ह्मणून एक मुलगा होता. तो सदाचारसंपन्न असून परमभक्तिमान् होता. त्याची प्रथम फारशी प्रसिद्धि नव्हती; परंतु एके प्रसंगीं त्यानें आपल्या अतुळ भक्तिप्रभावानें विजयनगरच्या राजानें नेलेली पांडुरंगाची मूर्ति परत पंढरपुरास आणिली आणि तेव्हांपासून याची कीर्ति चोहोंकडे पसरली. त्याला पुढें चक्रपाणी या नांवाचा मुलगा झाला. तोही आपल्या बापाप्रमाणेंच परम विष्णुभक्त असून नीतिमान् असे. चक्रपाणीस सूर्यनारायण नांवाचा पुत्र झाला. हाच एकनाथाचा पिता होय.

सुर्योजीपंतांच्या पत्नीचें नांव रुक्मिणीबाई असें होतें. तीही महासाध्वी होती. या भगवन्निष्ठ दंपत्याचे पोटीं एकनाथ शके १४७० ह्मणजे इ. स. १५४८ या वर्षी पैठण येथें जन्मला. एकनाथाचीं मातापितरें त्याच्या बालपणांतच निवर्तल्यामुळें त्याच्या संगोपनाचा भार सर्वस्वी त्याच्या वृद्ध आजाआजीवरच पडला.

एकनाथाची वृत्ति लहानपणापासूनच मोठी शांत व समाधानी असे. इतर मुलांप्रमाणें तो हट्ट कधींच करीत नसे. तो इतका सहनशील होता कीं, समवयस्क मुलांनीं त्याची किती जरी थट्टा मस्करी केली तरी तो कधींच रागावत नसे. या त्याच्या अलौकीक गुणांमुळें तो सर्वत्रांना प्यार असे. त्याचें अकृत्रीम सौजन्य पाहून तर त्याच्या आजास व आजीस त्याला कोठें ठेवूं आणि कोठें न ठेवूं असें होत असे. धूळाक्षर, लेखनवाचन व साधारण व्यवहारिक हिशोबठिशोब त्याला त्याच्या आजानें घरींच शिकविले. चक्रपाणीनें त्याचें मौंजीबंधन त्याच्या सहाव्या वर्षींच केलें. मग त्याच्याकडून वेदाध्ययन करविलें. त्याची बुद्धि इतकी तीव्र होती कीं, त्याच्या गुरूला त्याला दुसऱ्यांदा पाठ सांगण्याची पाळी क्वचितच येई. वेदाध्ययनांतही एकनाथाची अपूर्व स्मरणशक्ति चांगली नजरेस येत असे! बरोबरच आहे स्वच्छ आरशापुढें जी वस्तु येईल तिचें प्रतिबिंब त्यांत पडणारच! कथा किंवा पुराण श्रवणकरण्याचीही एकनाथास फार आवड असे. ज्ञानेश्वर, नामदेव, गोराकुंभार, सांवतामाळी इत्यादि भगवद्भक्तांच्या कथांत तर तो इतका तल्लिन होत असे कीं, आपणही त्यांच्या सारखेंच व्हावें असे विचार त्याच्या मनांत एकसारखे घोळूं लागत.

अशा प्रकारच्या विचारांत निमग्न होऊन तो एकेदिवशीं एका शिवालयाचे गाभाऱ्यांत चिंतातुर होऊन बसला असतां अकस्मात् सिंहनादाप्रमाणें

गंभीर आकाशवाणी झाली कीं, 'देवगडावर जनार्दनपंत नांवाचा एक सत्पुरुष यवन बादशहाचे पदरीं आहे, त्यास गुरु कर ह्मणजे तुझा इष्टहेतु सिद्धिस जाईल.' तो अश्रुतपूर्व ध्वनि श्रवण करतांच त्यास पराकाष्ठेचा आनंद झाला व त्या आनंदाच्या भरांत त्यानें त्या आकाशवाणींतील शब्दांचें पुनः पुनः उच्चारण केलें. नंतर कांहीं वेळानें, आज आपल्याला एका अपूर्व वस्तूची जोड मिळाली अशी आपल्या मनाशीं खुण गांठ बांधून तो आनंदानें घरीं परत गेला.

आकाशवाणीची वार्ता त्यानें कोणालाच सांगितली नाहीं. त्यानें हळूं हळूं देवगडास जाण्याची तयारी चालविली; परंतु पैठण सोडण्याचा विचार मनांत आला ह्मणजे त्याला भडभडून येई. 'आपण येथून गेलों ह्मणजे आपल्या वियोगानें आपल्या मागें आपल्या वृद्ध आजा आजींची काय स्थिति होईल' हा विचार मनांत आला ह्मणजे त्याचा कंठ दाटून त्यास गहिंवर येई, अंगास कंप सुटे व तो ओकसाबोकशीं रडावयास लागे. परंतु विवेकानें लागलाच मनाला आळा घालून त्यानें समाधान करून ध्यावें व जगाची क्षणभंगुता, ब्रह्मज्ञानापासून होणारा आनंद, व कर्णरंध्रांत घुमणारा तो अश्रुतपूर्व गंभीर ध्वनि ह्यांची आठवण होऊन त्यानें दुखाःश्रूचें परिमार्जन करावें व देवगडास जाण्याचा बेत कायम करावा.

याप्रमाणें बेत करितां करितां एकेदिवशीं पहांटे त्यानें खरोखरच कोणास न कळूं देतां पैठणास राम राम ठोकला. पैठणाहून निघण्याचे पूर्वीं मात्र त्यानें घरच्या माणसांस काळजी न लागावी ह्मणून आपला बेत एका पुराणीका जवळ सहज सांगुन ठेविला होता. असो.

अशाप्रकारें एकनाथ एकाएकीं नाहींसा झाल्यामुळें बिचाऱ्या चक्रपाणीची व त्याच्या पत्नीची काय अवस्था झाली असेल याची कल्पना वाचकांनीच करावी. मुलगा नाहींतर नाहींच, परंतु नातवाचे तोंडाकडे पाहून जो आज पुत्रशोकाचा विसर पडत होता व ह्मातारपणांत आधार भूत होऊन ज्यानें आजपर्यंत सुख व समाधानच दिलें, त्या आधारभूत स्तंभाचें अस्तित्व अकस्मात् अनिश्चित् झाल्यामुळें निराधार व निराश्रित होऊन तीं दोघेंही अत्यंत दुःखी झालीं. ज्या पुराणिकाला नाथानें आपला जाण्याचा बेत कळविला होता व ज्याच्याकडून नाथाच्या अदृश्य होण्याची थोडी फार माहिती मिळण्याचा संभव होता, तो पुराणीकही याचवेळेस काकतालीय न्यायानें पैठणांतून नाहींसा झाला होता. याप्रमाणें नाथाचें कुशलवृत्त कळून बिचाऱ्या चक्रपाणीची काळजी दूर होण्यास कांहींच साधन नव्हतें.

५३५ ०६१६७

इकडे एकनाथ पैठणाहून जो निघाला तो मजल दरमजल करीत करीत कांहीं दिवसांनीं देवगडास येऊन पोहोंचला. वाटेनें त्याचे फार हाल झाले हें सांगावयास नकोच; कारण त्या बालकास चालण्याची व ऊन तान्ह सोसण्याची संवय कोठून असणार? आतां पुढील वृत्त देण्यापूर्वीं जनार्दन स्वामींचें कांहीं वृत्त दिलें पाहिजे.

या महात्म्याचा जन्म फाल्गुन कृष्ण षष्ठीस झाला. जन्मशक व वार उपलब्ध नाहीं. जनार्दनपंत हा देशस्थ अश्वलायन ब्राह्मण होता. या सत्पुरुषाचें मूळठिकाण चाळीसगांव असून याचेकडे तेथील देशपांडेपणाचें काम होतें. पुढें तो आपल्या विद्वत्तेच्या व सद्वर्तनाच्या जोरावर मोठमोठ्या हुद्याच्या जागा मिळवून, शेवटीं दौलताबाद येथील यवनपादशहाचा मुत्सद्दी होऊन बसला. जनार्दनपंत टाकाचा जसा धड होता तसा युद्धशास्त्रांतही पूर्ण वाकबगार होता.

मुसलमानांसारख्या अविंधाची सेवा करीत असतांही हा महात्मा अत्यंत स्वधर्मपरायण होता. तो शांकरमताचा पूर्ण अनुयायी असून गाणगापूर येथील प्रसिद्ध नृसिंरसरस्वतीचा पट्टशिष्य होता. या थोर महात्म्यानें आपल्या तपोबलाच्यायोगानें केवळ हिंदूसच चकित न करितां परमद्वेष्ट्या यवनासही धर्माच्या अद्भुत प्रभावानें दिपवून टाकिलें व याचमुळें प्रत्येक गुरुवारीं, जनार्दनपंतांची दत्तात्रेयाची पुजा निर्विघ्नपणें शेवटास जावी ह्मणून, मोंगलदरबार बंद असून गुरुवार हा सुटीचा दिवस मानला होता.

"राजधुरेचें जबाबदारीचेंकाम, पातशहाचा करडा अंमल व समशेर-कुराणाची दीन दीन शब्दध्वनित भयंकर गर्जना, इतकीं विघ्नें नियमभंग करण्यास मूर्तिमंत उभीं असूनही या पुण्यपुरुषाची स्नानसंध्या, समाधि व दत्तात्रयमहापूजा, ह्यांत वालाग्रही अंतर कधीं पडलें नाहीं. ह्या पुरुषाची अध्यात्मज्ञानांत इतकी प्रवीणता असे व त्यांचें आचरण इतकें शुद्ध असे कीं, ब्रह्मस्वरूपीं लय लागून दत्तात्रेयाच्या प्रत्यक्ष दर्शनाचाही अलभ्य लाभ या महा पुरुषास होत असे."

असो. मागें सांगितल्याप्रमाणें एकनाथ देवगडांत जो आला तो थेट ज्या दिवाणखान्यांत जनार्दनपंत कांहीं राजकीय कागदपत्र पहात बसले होते तेथें येऊन दाखल झाला. पंत कामांत गुंतले आहेत असें पाहून तो क्षणभर मुकाट्यानें एका कोंपऱ्यांत उभा राहिला. इतक्यांत जनार्दनपंत सहज जों वर पहातात तों अष्टवर्षांचा चिमुकला बालक त्यांच्या दृष्टीस पडला. त्याना तो ब्रह्मचारी वेष धारण केलेला बालक पाहून फार कौतुक वाटलें.

त्यांनीं त्याला बोलावून जवळ बसवून घेतलें व त्याची योग्य ती विचारपूस केली. पंतांची सौम्य मुद्रा, त्यांचें तेजःपुंज शरीर व मायाळू भाषण ऐकून एकनाथास पराकाष्टेचा धीर आला व त्यानें त्यांना मोठ्या पूज्यबुद्धीनें सर्व वृत्त निवेदन केलें, पंतांनींही, 'तुझ्या अंगीं पात्रता आली ह्मणजे तुला उपदेश करूं' असें त्याला अश्वासन देऊन आपल्याजवळ ठेवून घेतलें,

जनार्दनपंताची किल्ल्यावर आपल्याजवळ राहण्याची आज्ञा होतांच, एकनाथास फार आनंद झाला. नंतर त्यानें आपल्या आंगचे नम्रत्वादि अनेक सद्गुण दाखवून गुरुजींची पूर्ण मर्जी संपादन केली. त्यानें सद्गुरूंची मर्जी सुप्रसन्न राखण्याकरितां आपला जीव धोक्यांत घालावा, अनेकप्रकारचें साहसकर्म करावें व प्रसंगविशेषीं असह्य वेदना सोसाव्या परंतु त्यांच्या सेवेंत तिळभरही अंतर पडूं देऊं नये.

जनार्दनस्वामींनीं आपल्या शिष्याचा निग्रह किती आहे हें पाहण्यासाठीं त्यास अचाट व दुष्कर अशीं कृत्यें करण्यास सांगितलीं, भयंकर व घोर अरण्यांत सुलिभ पर्वतासारख्या अत्युच्च गिरिशिखरावर तपश्चर्यादि करण्यास सांगितलें पण इतक्याही संकटांस त्यानें कधीं जुमानिलें नाहीं. तो लवकरच जनार्दनस्वामींचा पट्टशिष्य झाला. तो नित्य आपल्या गुरु बरोबर वेदांत-विषयावर चर्चा करीत बसे. गुरूजींनींही कधीं कमी न करितां आपल्या शिष्योत्तमाच्या अध्यात्मविषयसंबंधी शंका दूर कराव्या व अमृतानुभवादि ब्रह्मपर ग्रंथांतील रहस्य त्याला विषद करून सांगावें.

स्वामीजनार्दनाच्या सहवासानें एकनाथ वेदांतासारख्या गहन विषयांत जसा निष्णात झाला होता तसा तो युद्धकौशल्यांतही फार निपुण झाला होता. त्यानें अनेकप्रसंगीं आपल्या गुरूची तरफ घेऊन रणांगणांत समशेरबहाद्दरी गाजविली. एकदां तर असा चमत्कारीक प्रसंग ओढवला कीं, देवगडावर अकस्मात परचक्र आलें. रणशूर जनार्दनपंतासारखा शूर सरदार जवळ दुसरा कोणीच नसल्यामुळें पातशहानें 'शत्रूवर एकदम चालकरून जावें' असा पंतांस हुकूम सोडिला. त्यावेळीं पंत समाधि लावून बसले होते व एकनाथ जवळ उभा राहिला होता. पातशहाकडचा हुकूम पाहतांच एक-नाथ विचारांत पडला. त्याला असें चमत्कारिक कोडें पडलें कीं, 'स्वामींस राजाज्ञा विदित करावी तर समाधि भंग होतो, न करावी तर राजाज्ञा मोडते व पुनः विलंब लागल्यामुळें काय अरिष्ट गुजरेल कोण जाणें? इतक्यांत त्याला तोफांचे भयंकर आवाज ऐकूं येऊन सर्वत्र अंधःकार व धूळ दिसूं लागली. तेव्हां ही वेळ आतां विचार करण्याची नाहीं असें ठरवून

त्यानें लागलींच युद्धाचा पोषाक चढविला व ' जयस्वामी जनार्दन ' ह्मणून दाराबाहेर पडला. तयार असलेल्या सैन्याला शत्रूवर एकदम तुटून पडण्याची इशारत देऊन आपणही वेशीचे दरवाजे एकदम उघडून शत्रूचे तोंडावर जाऊन पडला. त्याचें हस्तकौशल्य पाहून उभयपक्षांकडील लोक अगदीं चकित झाले ! थोडक्याच अवकाशांत त्यानें शत्रुसैन्याची दाणादाण करून त्यांस हाकलून लाविलें !

अशाप्रकारें अलौकिक विजय संपादन करून **एकनाथ** समरभूमींतून जो निघाला तो थेट गुरुदर्शनास आला. त्यांना साष्टांगनमस्कार घालून तो त्यांच्यासमोरच मोठ्या विनयानें उभा राहिला. स्वामी **जनार्दनां**नीही आपल्या विजयी शिष्याच्या अलौकिक शौर्याची, समयसूचकतेची, स्वामिभक्तीची व धारिष्टाची फार तारीफ केली व मोठ्या प्रेमानें त्याची पाठ थोपटली.

याप्रमाणें एकनाथानें गुरुसेवेचें खडतर व्रत एक तप पर्यंत आचरिल्यावर ब्रह्मोपदेश धारण करण्याची पात्रता त्याच्या आंगीं येत चालली व स्वामी **जनार्दनां**नींही यास आतां लवकरच उपदेश करावा असा निश्चय केला.

एकनाथ जसा इतर गुणांनीं मंडित होता तसाच तो व्यवहारचतुर असून लेखणीचा मोठा खंबीर होता. तो बाका कारकून असून त्याचें अक्षर दिव्य असे; ह्मणून **जनार्दनपंतांनीं** दप्तरांतील हिशेब राखण्याचें जबाबदारीचें काम त्याच्यावरच सोंपविलें होतें. एकेदिवशीं सायंकाळीं जनार्दनपंतांनीं नाथांस सांगितलें कीं, ' उद्यीक दप्तराची तपासणी व्हावयाची आहे, तेव्हां हिशेब तयार करून ठेवावा. ' नाथांनींही ' फार उत्तम आहे ' ह्मणून सांगितलें.

मग ते दिवशीं रात्रीं पादसंवाहनादि गुरुसेवा झाल्यावर **एकनाथ** हिशोब जमविण्यास बसला. त्याचें लिहिणेंपुसणें चोख असल्यामुळें भानगड नव्हतीच. सुमारें अर्ध घटकेचे आंत सर्व हिशोब तयार झाला. परंतु जमेचा व खर्चाचा मेळ बसण्यास पाव आण्याचें अंतर पडूं लागलें. त्यानें जंग जंग पछाडलें पण चूक ह्मणून सांपडेना. इतक्यांत **जनार्दनपंत** अकस्मात् जागृत होऊन पहतात तों, एकनाथाचे खोलींत दिवा असून कांहीं ध्वनि ऐकूं येत आहे ! मग नाथाचे खोलीजवळ जाऊन पहातात तों **एकनाथाचा** दफ्तराचे मोठमोठे ढीग सोडून बेरजेचा तडाखा चालला आहे ! तहान लागून घशाला कोरड पडली आहे ! एकसारख्या बसण्यानें पाठ ताटकळून जाऊन नेत्र आरक्त झाले आहेत ! असा हा प्रकार पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलें; व ते नाथाच्या खोलींत जाऊन त्याच्या जवळ उभे राहिले. इतक्यांत हस्तदोषानें विपरीत पडलेला आंकडा आढळून पाव आण्याची चूक सांपडली.

चूक सांपडतांच आपण आज कृतकृत्य झालों असें वाटून एकनाथानें आनंदभरांत मोठ्या हर्षानें टाळ्या पिटिल्या व मोठ्यानें गदगदां हांसूं लागला. नाथास इतका परमानंद होण्याचें काय कारण आहे तें विचारावें ह्मणून जनार्दनपंत खाली बसले व त्यास प्रश्न केला.

आपल्याजवळ गुरुश्रेष्ठ बसले आहेत हें पाहून एकनाथ चपापला व घाईघाईनें उठून उभें राहून विनयानें त्यानें परमानंद होण्याचें सर्व वृत्त निवेदन केलें. एकनाथाचें तें भाषण ऐकून जनार्दनपंतांस गहिंवर आला व त्यांनीं त्याचा हात धरून मोठ्या ममतेनें त्यास आपल्याजवळ बसविलें; आणि सद्गदित अंतःकरणानें ह्मणाले:–' हे शिष्योत्तमा! तुझ्या एकनिष्ठभक्तीच्या योगानें मी फार संतुष्ट झालों आहे. तुला ब्रह्मोपदेश करण्याविषयीं दिलेलें वचन पुरें करण्यास प्रस्तुत प्रसंग फारच उत्तम आहे. नाथा एक पैशाची चूक शोधून काढण्याकरितां तुझें चित्त इतकें एकाग्र होऊन गेलें होतें कीं, मी बराच वेळ तुजजवळ उभा असूनही तुला यत्किंचित्सुद्धां कळलें नाहीं. अशाचप्रकारें मायारूप चूक शोधून काढण्यास जर तूं एकाग्रता धारण करशील तर मग ब्रह्म तुझ्या पाठीशींच उभें आहे ह्मणून समज. वस्त्राचे धागे पृथक् पृथक् केले असतां जशी ' धोतर ' ही संज्ञा नष्ट होउन कापूस मात्र रहातो त्याचप्रमाणें केवळ अज्ञानेंकरून भासणारें जें हें जगत् त्या ठिकाणीं अद्वैतदृष्टीनें पाहूं लागलें ह्मणजे ब्रह्माखेरीज दुसरा पदार्थ नाहीं असें तुला स्पष्ट दिसून येईल. तरी या पाव आण्याची चूक लक्षांत वागवून द्वैतभावाची घातुकचूक काढून टाक; ह्मणजे तादात्म्य पावून तूं ब्रह्मानंदांत निमग्न होशील. पुनः हें लक्ष्यांत ठेव कीं, परमार्थ साधण्याकरितां प्रपंच सोडण्याची गरज नाहीं. प्रपंचांत राहून निराधार अर्भकांचें योग्यरीतीनें संरक्षण करूनही परमेश्वरप्राप्ति होते. आश्रमचतुष्टय यांपैकीं कोणत्याही आश्रमांत राहून जीवन्मुक्त होतां येतें. त्यांतल्यात्यांत गृहस्थाश्रमाची थोरवी विशेष आहे कारण कीं, त्यांत राहून प्रपंच व परमार्थ हे दोन्ही साधितां येतात. ' इतकें बोलून जनार्दनस्वामींनीं एकनाथाच्या कानांत ब्रह्मविद्येचा गुरुमंत्र सांगितला व मस्तकीं हात ठेवून अनुग्रह दिला. ही गोष्ट फाल्गुन कृष्ण ६ स घडली.

नंतर ब्रह्मविद्येच्या परम गुप्तभांडाराच्या किल्ल्या हातीं आल्यामुळें एकनाथास कृतकृत्य झालोंसें वाटलें व त्यानें सद्गदित होऊन मोठ्या भक्तीनें आपल्या सद्गुरुमाउलीस नमस्कार करून त्यांच्या चरणीं लेखणी वाहिली.

स्वामी जनार्दनास दत्तात्रेयांचें साक्षात् दर्शन होत असे असें मागें सांगि-

तलेंच आहे. एकेदिवशीं त्यांनीं आपल्या या पट्टशिष्यास दत्तात्रेयांचें साक्षात् दर्शन करविलें. दत्तात्रेयांचें तें सुरम्य स्वरूप पाहून एकनाथ थक्क होऊन गेला आणि असह्य दुःख भोगिल्याचें व गुरुसेवेचें आज सार्थक झालें असें त्यानें मानिलें. दत्तात्रेयांनीं त्यास वर उचललें आणि मस्तकावर हात ठेवून सुप्रसन्न वदनानें त्यास आशीर्वाद दिला कीं, " तूं अलौकिक पुरुष होशील. तुझ्या वक्तृत्वाची व कवित्वाची लोकोत्तर कीर्ति पसरून भागवत रामायणावरील टीका तुझ्या हातून फार उत्तमप्रकारच्या होतील. तूं अनेक चमत्कार करून लोकरीति सुधारण्याचें यश संपादन करशील." अशा-प्रकारें दत्तदर्शन झाल्यावर ही गुरुशिष्यांची अपूर्व जोडी परत देवगडावर आली.

दत्तदर्शन झाल्यापासून जनार्दनपंतही एकनाथाची योग्यता विशेष मानूं लागले. नंतर जनार्दनपंत आपल्या पट्टशिष्यास बरोबर घेऊन नाशीक-त्र्यंबकचे यात्रेस गेले. मार्गांतच त्यांची व चंद्रभट्ट नांवाच्या एका विद्वा-नाची गांठ पडली. जनार्दनपंतांचा आपल्यास निरंतर सहवास असावा अशी चंद्रभट्टानें इच्छा दर्शविल्यावरून स्वामींनीं त्यांस समागमें घेतलें.

चंद्रभट्ट हा विद्वान् ब्राह्मण असून पुराण सांगण्यांत त्याचा हातखंडा असे. 'भागवतावर पुराण असें चंद्रभट्टानेंच सांगावें' अशी त्याची ख्याति होती. असो. मग त्या तिघांनीं नाशिक त्र्यंबकास जाऊन सर्व परमपवित्र तीर्थें अवलोकन केलीं व ते परत पंचवटीस आले.

चंद्रभट्टानें पंचवटीस असतां भागवतावर सुरस पुराण सांगावें व त्याच्या वक्तृत्वाची जनार्दनस्वामींनीं नेहमीं वाहवा करावी. याचवेळीं त्यांनीं एकना-थास चतुःश्लोकी भागवतावर प्राकृत टीका करण्यास सांगितलें. गुर्वाज्ञेप्रमाणें एकनाथानें पंचवटीस असतां सुबोध व सरळ अशी भागवतटीका तयार करून गुरूस अर्पण केली. नंतर तेथून निघून ते तिघेही देवगडास आले. येथें आल्यावर कांहीं दिवस साधुसमागमाचा उपभोग घेतल्यावर चंद्रभट्टानें अकस्मात् देह ठेविला. जनार्दनपंतांनीं त्याची समाधि देवगडावरच बांधिली. या चंद्रभट्टाचे समाधीची अशी मौज आहे कीं, यवनाकडून तिचा उच्छेद न व्हावा ह्मणून त्यांनीं तिचा आकार मदारीसारखा केलेला आहे! ही मदारी समाध प्रवाशांच्या अजून दृष्टीस पडते!

नंतर एकेदिवशीं जनार्दनपंतांनें एकनाथास सांगितलें कीं, 'प्रभुसत्तेनें तुझे सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत तरी तूं आतां सांप्रदायानुरूप तीर्थयात्रा करून नंतर पैठणास जा; वृद्ध आजाची सेवाचाकरी हेंच तुझें कर्तव्य. तें नीट बजावून गृहस्थाश्रमी हो; व प्रपंच आणि परमार्थ हीं दोन्हीं साध.'

गुरुमुखांतून निघालेलीं हीं वाक्यें श्रवण करितांच एकनाथास फार गहिंवर आला. गुरुवियोग आतां होणार हें पाहून त्यास अतोनात वाईट वाटलें. स्वामी जनार्दनाचीही तीच अवस्था झाली. कोणाच्याच तोंडांतून शब्द निघेना. परस्परांकडे पाहून उभयतांनीं एक समयावच्छेदेंकरून एकमेकांस दृढ आलिंगन दिलें.

गुर्वाज्ञा अक्षरशः पाळणारा एकनाथ नंतर यात्रा करण्यास सिद्ध झाला. वैराग्याचा वेष धारणकरून स्वामीजनार्दनांस त्यानें साष्टांग नमस्कार केला; व तो तीर्थयात्रा करण्याकरितां किल्ल्याबाहेर पडला.

इकडे एकनाथाची कांहींच वार्ता समजत नाहीं हें पाहून बिचाऱ्या चक्रपाणीची प्रकृति काळजीनें अधिकाधिक क्षीण होत चालली. त्याचें संसाराविषयीं अगदीं मन विटलें. एकनाथ आज येईल, उद्यां येईल, कोणीतरी त्याची खुशालीची बातमी सांगेल ह्या आशेनें त्या उभयतां वृद्धांनीं अश्रु गाळीत काळाचीं कैकवर्षें काढिलीं. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें तो परगांवीं गेलेला पुराणिक कामकाज आटोपल्यावर पैठणास माघारां आला. पुराणीक आल्याची बातमी लागतांच चक्रपाणीस अत्यानंद झाला व तो त्याच पावलीं त्याच्याकडे काठी टेंकीत टेंकीत गेला; व त्यानें त्यांस 'माझ्या नाथास आणिलें काय ?' ह्मणून विचारिलें. पुष्कळ वर्षें पैठणांत नसल्यामुळें त्या बिचाऱ्यास नाथासंबंधी कांहींच माहिती नव्हती तेव्हां अर्थातच त्यानें 'कोण नाथ ?' ह्मणून चक्रपाणीस विचारिलें. पुराणिकाच्या तोंडचीं हीं अक्षरें श्रवण करितांच चक्रपाणीस मूर्च्छा येऊन तो जमिनीवर निचेष्टित पडला. तेव्हां आश्चर्यचकित झालेल्या पुराणिकानें त्यास सावध केलें. शुद्धीवर आल्यावर चक्रपाणीनें त्याची फार निंदा केली व एकनाथाची हकीकत त्यास सांगितली. हें सर्व वृत्त ऐकतांच व चक्रपाणीची ती दीन अवस्था पाहतांच त्याच्या पोटांत तडतडां तुटूं लागलें. त्याला पराकाष्टेचें दुःख झालें. त्यानें आपले कामकाजाचे सर्व कागदपत्र चक्रपाणीस दाखवून आपल्या निर्दोषत्वाविषयीं त्याची खात्री केली. नंतर त्याला मागील सर्व गोष्टींचें स्मरण झालें व त्यानें तें सर्व वृत्त चक्रपाणीस निवेदन केलें; व त्यास वचन दिलें कीं, 'मी देवगडीं जाऊन हरप्रयत्नानें एकनाथास घेऊन येतों.'

मग त्यानें तावडतोब दौलताबादेस जाऊन जनार्दनपंतांची भेट घेतली व त्यांस एकनाथाची सर्व हकीकत सांगितली. तें ऐकून जनार्दनपंतांस फार वाईट वाटलें. मग त्यांनीं, "एकनाथ खुशाल आहे, तो सद्गुणी व सदाचार संपन्न असून ज्ञानी झाला आहे. तीर्थयात्रा करून तो लौकरच पैठणास

येईल," असें सांगितलें व चक्रपाणीचें समाधान करण्याविषयीं सांगून त्याला देण्याकरितां पुराणिकाजवळ एक पत्र लिहून दिलें. पत्र घेतल्यावर पुराणिक ताबडतोब पैठणास परत आला.

पैठणास आल्यावर पुराणिकानें एकनाथाचें कुशलवृत्त चक्रपाणीस सांगितलें व जनार्दनस्वामींनीं दिलेलें पत्र स्वाधीन करून ह्मणाला कीं, "तीर्थयात्रा करीत करीत जेव्हां **एकनाथ** पैठणास येईल, तेव्हां ही 'जनार्दन पत्रिका' त्यास दाखवावी ह्मणजे तो पुढें तीर्थयात्रेस न जातां पैठणांतच राहील."

ज्याच्या अस्तित्वावरच येऊन बेतली होती तो एकनाथ सुखरूप आहे हें ऐकून बिचाऱ्या चक्रपाणीचें व त्याच्या वृद्ध पत्नीचें काळीज सुपाएवढें झालें असेल हें सांगावयास नकोच.

इकडे एकनाथही गुर्वाज्ञेप्रमाणें तीर्थयात्रा करीत करीत पैठणास आला. गावांत किंवा शहरांत न उतरतां एखाद्या धर्मशाळेंत किंवा देवाळयांत उतरावें व भिक्षा मागून उदरपोषण करावें असा त्याचा क्रम असे. या नित्य नियमाप्रमाणें पैठणास आल्यावर शहरांत न जातां, ज्या शिवालयांत आकाशवाणीचा गंभीर ध्वनि ऐकिला होता त्याच देवालयांत तो राहिला. एके दिवशीं सायंकाळीं **एकनाथ** भिक्षेस निघाला असतां त्याची व **चक्रपाणी**ची गांठ पडली. **एकनाथ** तरुण व अवलियाचे वेषांत असल्यामुळें चक्रपाणीस एकाएकीं ओळखूं आला नाहीं. ओळख पटल्यावर चक्रपाणीनें 'एकनाथा' ह्मणून उंच स्वरानें हांक मारिली तोंच त्याचा गळा दाटून आला, नेत्र अश्रुपूरित झाले व तोंडांतून शब्द स्पष्ट निघेना. एकनाथाचीही तीच अवस्था झाली. त्यानें धांवत जाऊन चक्रपाणीस मिठी मारिली!!!

त्या वेळचा प्रसंग काय वर्णावा! ज्याच्याविषयीं तेरा वर्षें एकसारखा निदिध्यास लागला होता तो एकनाथ येऊन भेटल्यामुळें चक्रपाणीस झालेल्या आनंदाचें वर्णन करण्यास ही लेखणी असमर्थ आहे! नंतर एकनाथानें आपलें इतिवृत्त चक्रपाणीस निवेदन केलें. पुढें मग 'गुर्वाज्ञेप्रमाणें तीर्थयात्रा शेवटास नेऊन लागलाच मी पैठणास येतों.' असा हेतु त्यानें प्रदर्शित केल्यावरून चक्रपाणीनें **जनार्दनपत्रिका** त्याचे स्वाधीन केली. त्यानें ती पत्रिका मस्तकीं धारण केली व मग वाचली. ती अशी:—

"अनेक आशीर्वाद. पौत्रवियोगानें शोकाकुल झालेलीं तुझीं घरचीं माणसें तुझ्याविषयीं काळजी वहात आहेत! तुझ्यावर अवलंबून राहणारीं माणसें जीं तुझीं आजा व आजी, तीं निराश्रित व दीन होऊन अत्यंत क्लेश भोगीत आहेत! वार्धक्यावस्थेंत तुझ्यावेरीज दुसरे कोणाचाच त्यांस आधार नस-

त्यामुळें, ह्यावेळीं त्यांची सेवाचाकरी करणें हीच तुझी तीर्थयात्रा, हेंच तुझें शील व ब्रीद व यांतच तुझा पुरुषार्थ आहे. ह्याकरितां ही पत्रिका पाहिल्यावर पुढें न जातां तेथेंच मुक्काम कर व आपल्या आजास व आजीस निरंतर संतोषित राख. कळावें हा आशीर्वाद."

जनार्दन देशपांडे, मुक्काम गड दौलताबाद.

एकनाथाची गुरुभक्ति इतकी अवर्णनीय होती कीं, पत्रिकेंतील अक्षरांप्रमाणेंच त्यानें पुढें वर्तन केलें. 'ही पत्रिका पाहिल्यावर पुढें न जातां तेथेंच मुक्काम कर' अशीं त्या पत्रिकेंत अक्षरें असल्यामुळें हा शिष्यश्रेष्ठ पत्रिका हातांत पडली त्यावेळेस ज्या भूमिप्रदेशावर उभा राहिला होता त्या भूमीपासून तिळमात्र मागें पुढें न जातां त्याच भूमिप्रदेशावर मठी बांधून राहिला. ह्या मठीप्रदेशावर त्याची मोठी भक्ति असे. पुढें लोकांनीं ही मठी उत्तमप्रकारचें भव्यमंदिर बनविलें व त्यासच 'नाथमंदिर' असें ह्मणूं लागले.

असो. पुढें एकनाथाची अलौकिक कीर्ति ऐकून व त्याचें सद्वर्तन व लोकोत्तर गुण पाहून विजापूर येथील एका कुलीन व सदाचारसंपन्न गृहस्थानें आपली उपवर झालेली कन्या ह्या पुरुषश्रेष्ठास दिली. एकनाथ लोकप्रिय असून लोकाश्रयांत यत्किंत् कमतरपणा नसल्यामुळें पैठणकरांनीं विवाहसमारंभ फारच बहारीचा उडविला. व्याही सधन असल्यामुळें त्यानेंही कोणतीच उणीव दाखविली नाहीं. चक्रपाणीनें आपल्या नातसुनेचें नांव 'गिरजाबाई' असें ठेविलें. गिरजाबाई आपल्या पतीप्रमाणेंच अत्यंत सत्त्वस्थ, सुशील व नम्र होती; त्याप्रमाणेंच ती महा पतिव्रता होती. हा सर्वगुणसंपन्न जोडा पाहून चक्रपाणीस वाटे कीं, प्रत्यक्ष विवेक व शांतिच मनुष्यरूपानें आपल्या घरीं अवतरलीं आहेत.

एकनाथास गिरजाबाईचे पोटीं तीन अपत्यें झालीं. प्रथम कन्यारत्न झालें. तिचें नांव 'गोदुबाई' असें होतें. हिला नाथ प्रेमानें 'लीलाबाई' असें ह्मणत. ती पैठणामध्यें कोणी चिंतोपंत नांवाचे सद्गृहस्थ होते त्यांचेकडे दिली होती. हिचेच पोटीं मुक्तेश्वर नामक प्रख्यात कवि जन्मला. गोदुबाईचे पाठीवर 'हरि' नांवाचा पुत्र झाला. हाच पुढें हरिपंडित या नांवानें संस्कृतभाषाभिज्ञत्वाच्या संबंधानें काशीक्षेत्रांत गाजला. एकनाथाचा हा मुलगा आपल्या पढतमूर्खत्वाच्यायोगानें बापावर रुसून काशींत जाऊन राहिला होता. रुसण्याचें कारण हेंच कीं, 'मी एवढा पंडित असून, बापानें प्राकृत भाषेंत पुराण सांगून माझ्या अब्रूस बट्टा लावावा हें बरोबर नाहीं!' पुढें एकनाथ स्वतः काशींत गेला व आपल्या मुलास चार समजुतीच्या

गोष्टी सांगून त्यानें त्यास पैठणांत आणिलें. याच्या पाठीवर एकनाथास 'गंगाबाई' नांवाचें तिसरें अपत्य झालें. हिला कर्नाटकांत एका कुलीन घराण्यांत दिलें होतें.

ह्याप्रमाणें संसारसुखाचा व सद्गुणी नातवाच्या नांदत्या संसाराचा सुखसोहळा बरेच दिवस पाहिल्यावर चक्रपाणीनें व त्याच्या पत्नीनें (सरस्वतीबाईनें) देह ठेविला. वेदांतांत पारंगत असलेल्या नाथास आजाचें व आजीचें दुःख मुळींच झालें नाहीं! चक्रपाणीचें और्ध्वदेहिक होऊन कांहीं दिवस लोटतात तोंच एकनाथाचें दैवत जें जनार्दनस्वामी, ते फाल्गून कृष्ण षष्ठीस देवगडीं समाधिस्थ झाल्याची वार्ता एकनाथास कळली. 'या जनार्दनपंचकाचें असें मौजेचें समकालिनत्व आहे कीं, १ जनार्दन जन्मदीन, २ जनार्दन दत्तदर्शन, ३ जनार्दनानुग्रह, ४ जनार्दनदेहावसान, ५ व जनार्दनशिष्यसमाधि ह्या पांचही गोष्टी एकाच तिथीला ह्मणजे फाल्गून कृष्ण षष्ठीस घडल्या.' असो. गुरुंनीं देहपरित्याग केलेला श्रवण करून कांहींमात्र दुःख न दाखवितां फाल्गून कृष्ण षष्ठीचा उत्साह एकनाथानें फार चांगला केला. बरोबरच आहे. "जनार्दनच विश्वरूपानें भासावयास लागला; त्यांत मरणें व जगणें हें संभवत नाहीं," असा विचार मनांत येऊन नाथाचें चित्त निरंतर विकाररहित असे!

ह्या महात्म्याची इतकी कीर्ति होण्याला त्याचें अप्रतीम वक्तृत्व कारण झालें. याचें कीर्तन ऐकावयास लोकांच्या झुंडीच्याझुंडी पडत. त्याच्या अंगीं तात्कालिक कविता करण्याचा मोठा गुण असे. त्याची वाणी मधुर, भाषा सरळ व सुबोध व विषयविवेचन उपमा दृष्टांतांनीं परिप्लुत असल्यामुळें त्याचें कीर्तन किंवा पुराण आबालवृद्धांस समजत असे. वर्णहीन महारमांगापासून तों वर्णश्रेष्ठ ब्रह्मवृंदापर्यंत, सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांस, एकनाथाचें कीर्तन पहावयास सांपडे; तात्पर्य या सत्पुरुषाच्या वाक्पीयूष सेवनास पंक्तिप्रपंच कधींच होत नसे.

एकनाथाचे ठिकाणीं दुसरा अलौकिक गुण दातृत्व हा होता. ह्या पुण्यपुरुषानें आपलें सर्वस्व अन्नशांतींत खर्च केलें. एकनाथाचें घर ह्मणजे जराग्रस्त व निराश्रित दुबळ्यालोकांचें माहेर होतें. याचेठायीं अद्वैत तर इतकें बाणून गेलें होतें कीं, त्याच्या शुद्ध व पवित्र अंतःकरणांत लहानमोठ्याची किंवा ज्ञातिभेदाची भावना अजीबात नाहींशी झाली होती. एकदां तर यानें पितृतिथीला क्षण दिलेल्या ब्राह्मणांस एकीकडे ठेवून, क्षुधेनें पीडित झालेल्या एका अंत्यजास श्राद्धीय अन्न वाढून त्याला तृप्त करून सोडिलें!

एकनाथ सहनशीलतेचा मूर्तिमंत पुतळाच होता असें ह्मटलें तरी चालेल. एकेदिवशीं असा चमत्कार घडला कीं, हा सत्वस्थ ब्राह्मण गंगेवरून स्नान करून येत असतां, एक उन्मत्त मुसलमान याचे अंगावर थुंकला. तो प्रकार पाहून तोंडांतून चकारशब्द न काढितां एकनाथ पुन्हा गंगेवरून स्नान करून आला. पूर्वींप्रमाणेंच त्या यवनानें थुंकण्याचा विधि केला. तरीही कांहींएक न बोलतां नाथांची स्वारी पुनः गंगेवर गेली! नंतर त्या अविंधानें थुंकावें व नाथानें पुनः स्नान करून यावें, असा प्रकार सायंकाळपर्यंत चालला होता. हा सहनशीलतेचा व दुराग्रहाचा झगडा पाहण्यास लोकांची फार गर्दी जमली! अखेरीस त्या यवनाचें तोंड थुंकतां थुंकतां दुखून त्याचा तोच खजील झाला व त्यानें एकनाथाची क्षमा मागितली! ह्याचेठिकाणीं भूतदया तर इतकी लोकोत्तर होती कीं, त्यानें गोदातीरीं तापलेल्या वाळूवरील पोरकीं पोरें व चुकलेलीं अतिनीचांचीं व अंत्यजांचींसुद्धां मुलें कडेवर घ्यावींत, त्यांस आपल्या अंगवस्त्रानें स्वच्छ करून खाऊ देऊन तीं उगीं करावीं व त्यांस महारवाड्यांत नेऊन त्यांच्या मातापितरांचे स्वाधीन करावें!

वर सांगितलेल्या गुणांशिवाय निरभिमान, निरिच्छता, आत्मनिग्रह, स्थैर्य, समचित्तत्व, विषयवैराग्य, परोपकार आदिकरून जे गुण खऱ्या साधूच्याठिकाणी अवश्य पाहिजेत ते सर्व गुण एकनाथाचे आंगीं पूर्णत्वानें वसत होते. ह्या अलौकिक पुरुषाच्या बोलण्यांत व करण्यांत काडीमात्र तफावत नसे. तात्पर्य ‘ चित्ते वाचि क्रियायांच महतामेकरूपता ’ हा भारवीकवीनें साधुपुरुषांविषयीं केलेला सिद्धांत एकनाथाला पूर्णपणें लागूं पडतो. वरील सद्गुणसमुच्चयाशिवाय अमानुष, अतर्क्य व लोकोत्तर असे अद्भुत चमत्कार करून दाखविण्याचेंही सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें.

नाथानें अनेक चमत्कार केले ते सर्व येथें देणें अशक्य आहे. श्राद्धीय अन्न अंत्यजांस वाढिल्यावरून पैठणच्या ब्राह्मणांनीं त्याला बहिष्कृत केलें. त्यावेळीं त्यानें आपल्या योगसामर्थ्यानें त्यांचेच पितर श्राद्धास आणिले व त्यांना थक्क करून सोडिलें. त्याचें पुराण श्रवण करण्यास प्रत्यक्ष भागीरथी मनुष्यरूप धारण करून येत असे. एकदां तिच्या स्वरूपास भुलून दोन कामांध पुरुष तिच्या मागें लागले. त्यावेळीं ती गोदातटाकीं जाऊन एकदम गंगेंत अंतर्धान पावली. एकनाथास दुसरे दिवशीं ही हकीकत कळतांच त्यानें त्या पुरुषद्वयास खरा मजकूर सांगून त्यांस सदुपदेश केला. त्या वेळेपासून पैठणास अशी चाल पडली आहे कीं कोठेंही पुराण व्हावयाचें असलें

ह्मणजे पुराणिकाजवळच ‘ गंगेचा पाट ’ ह्मणून एक पाट मांडितात! व हळदीकुंकवाच्या वाट्या ठेवितात! एकदां एकनाथ निद्रिस्त असतां त्यांच्या घरांत कांहीं चोर शिरले. त्यावेळीं त्यांची दृष्टि जाऊन ते आंधळे बनले. पुढें मग एकनाथाच्या कृपानुग्रहानें त्यांना दृष्टि प्राप्त झाली! नाथांचा मुलगा हरिपंडित हा बापावर रुसून काशींत जाऊन राहिला होता हें मागें सांगितलेंच आहे. त्यावेळीं नाथानें ‘ मी प्राकृत पुराण सांगणार नाहीं व परान्न घेणार नाहीं ’ या अटीवर त्यास समजावून परत पैठणास आणिलें. एकदां एका भाविक वृद्ध स्त्रीनें नाथांला आपले घरीं मोठ्या आदरानें भोजनास बोलाविलें वरील करारामुळें नाथांस रुकार देववेना. शेवटीं बापलेकांच्या विचारानें असें ठरलें कीं हरिपंडितानें आपल्या घरची सामुग्री नेऊन तेथें पाकनिष्पत्ति करावी व बापलेकांनीं तेथेंच भोजन करावें. उभयतां तें भोजन करीत असतां त्या वृद्ध स्त्रीनें भाविकपणानें नाथांसाठीं खरपूस पोळ्या भाजून ठेविल्या होत्या; त्या आणून तिनें मोठ्या प्रेमानें दोघांचे पानांवर वाढिल्या! पोळ्या पानावर पडतांच ‘ अब्रह्मण्यं! अब्रह्मण्यं! ’ ह्मणून मोठ्यानें ओरडत हरिपंडित पानावरून उठला! त्याच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोहोंचली. त्यानें बापावर व त्या वृद्ध स्त्रीवर यथेच्छ तोंडसुख घेतलें व त्या पत्रावळी उचलून बाहेर फेंकून दिल्या; व हात धुवून घरांत येतो तों, पुनः जागच्याजागीं पत्रावळी आहेतच! याप्रमाणें पंडितांनीं रागानें पत्रावळी काढाव्या व त्या पुनः पूर्ववत् उत्पन्न व्हाव्या! असा प्रकार कांहीं तासपर्यंत चालल्यावर पंडितांची कंबर ठणकूं लागून ते अगदीं दमून गेले आणि आपला पिता असाधारण पुरुष आहे अशी त्यांची खात्री झाली. एकदां पैठणकरांनीं ‘ कांहीं चमत्कार दाखवा ’ अशी नाथांस विनंति केल्यावरून त्यांनीं एकेदिवशीं शिवालयांत भजन करीत असतां शिवापुढील पाषाणमय नंदीकडून गवत खावविलें. हा अमानुष प्रकार पाहून लोक आश्चर्यांत निमग्न झाले. नंतर त्या नंदीनें कीर्तन समाप्त झाल्यावर उंच उड्डाण केलें व गोदावरींत धाडकन् उडी घातली! हा नंदी त्या नदींत अजून आहे व पैठणास जाणाऱ्यांच्या अद्याप तो दृष्टीस पडतो! **एकनाथाच्या** निस्सीम भक्तीच्यायोगानें संतुष्ट झालेले श्रीभगवान् ब्राह्मणाचे रूपानें ‘ कृष्णंभट ’ हें नामाभिधान धारणकरून एकनाथाचे घरीं राहिले होते. **कृष्णंभट्टानें** एकनाथाचें पूजेचें साहित्य तयार करून द्यावें, त्याला गंध उगाळून द्यावें, त्याचे घरीं कावडीनें पाणी भरावें, व हरएक प्रसंगीं देवानें आपल्या भक्ताची बाजू राखावी. ‘ ज्या रांजणांत भक्तिभावाचा भुकेलेला भगवान् पाणी भरीत

असे, तो भव्य रांझण एकनाथाच्या साधुत्वाच्या अलौकिक कीर्तीची साक्ष देत, प्रतिवर्षी फाल्गून कृष्ण षष्टीचेदिवशीं पैठणामध्यें लक्षावधि लोकांना नाथाचें स्मरण करीत आहे! त्याप्रमाणेंच ह्या साधुपुरुषाच्या साधुत्वाचा परिमल दरवळून टाकणारें सहाण खोडही नाथांच्या भक्तांनीं जतन करून ठेविलें आहे!

नाथाची कीर्ती केवळ साधुत्वासंबंधाचीच नसून वाग्देविचाही तो एक आवडता लाल होता. त्याची कविता खऱ्या रसिकांस व मर्मज्ञास तल्लीन करून सोडणारी आहे. त्याच्या कवितेचा मुख्य गुण ह्मटला ह्मणजे सुबोधत्व व भाषेचा साधेपणा हा होय. त्याच्या कवितेंत कृत्रिम रचना मुदलींच नाहीं. नाथांप्रमाणें कवित्वशक्तीची साहजीक भरारी फारच थोड्या कवींच्या ठिकाणीं दृष्टीस पडते. शब्द गोड असून खुबिदार असतात. वर्णन करण्याची हतोटी चांगली असते; व त्यामुळें वाचक जसजसा निराळा प्रसंग वाचीत जातो, तसतशा त्याच्या चित्तवृत्ति विकसित होत जातात. ज्ञानेश्वराप्रमाणें नाथाच्या कवितेंत जुनाट शब्दांचा भरणा मुळींच नाहीं. त्यांची कल्पनाशक्ति अचाट असल्यामुळें स्वतंत्रकविता करण्यांत तो पुरा कसबी होताच व त्या शिवाय संस्कृतकाव्यांतील मराठी भाषेंत व्यक्तकरून दाखविण्याची करामतही त्याला चांगली साधली होती. ह्मणून खरा कवि व उत्तम टीकाकार हीं दोन्हीं विशेषणें ह्या पुरुषास शोभतात. त्यानें महाराष्ट्र भाषेंत कविता केली ह्मणून त्याची त्यावेळच्या पंडितांनीं फार गांजणूक केली. संस्कृतग्रंथावर टीका केल्याबद्दलचा त्याजवर आरोप ठेविला होता. काशीकरांनीं त्यास थेट काशीपर्यंत खेंचीत नेलें! तेथें गेल्यावर काशींतील पंडितांचा व त्याचा बराच वादविवाद झाला. एकनाथाच्या कोटीक्रमापुढें पंडितजन फिके पडले. एकनाथाच्या विद्वत्तेच्या तेजामुळें काशींतील विद्वान् मंडळी अगदीं दिपून गेली व 'हा कोणी तरी विलक्षण पुरुष असावा असें त्यांस वाटलें. नंतर त्यांनीं एकनाथाच्या त्या प्राकृत भागवत ग्रंथाला पालखींत मिरवून त्याचे सातसायास केले व एक एक प्रत प्रत्येक काशीकरानें उतरून घेतली. एकनाथाचेवेळीं मराठींत ग्रंथ लिहिण्याचें काम किती जिवावरचें होतें याची साक्ष वरील हकीकतच देत आहे.

एकनाथाचे ग्रंथ चरित्रविषयक आणि अध्यात्मविषयक असे दोन प्रकारचे आहेत. भावार्थरामायण व रुक्मिणीस्वयंवर हे दोन ग्रंथ चरित्रविषयक असून एकनाथीभागवत, स्वात्मसुख, चतुःश्लोकीभागवत टीका, हस्तामलक, व आनंदलहरी हे पांच ग्रंथ अध्यात्मिक आहेत. शिवाय त्यानें

अभंग व पदेंही पुष्कळ केलीं आहेत. भावार्थरामायण व रुक्मिणीस्वयंवर हे ग्रंथ अत्यंत चटकदार असून त्यांतील निरनिराळे प्रसंग कवीनें इतक्या शिताफीनें वर्णिले आहेत कीं, ग्रंथ वाचतांना हर्ष, शोक, आनंद, आश्चर्य, करुणा, प्रसन्नता, गांभीर्य आदिकरून वृत्तींचे ठसे अंतःकरणावर हुबेहुब उमटत जातात. आध्यात्मग्रंथांत नाथानें तर अगदीं कमाल करून सोडिली आहे. या ग्रंथांतील विषय अवघड असूनही तो नाथांनीं अगदीं मनांत भरण्यासारखा सोपा केला आहे. निरनिराळे आश्रम कोणते, त्यांचीं लक्षणें कशीं असावींत, खरा संन्यास कोणता, षड्रिपु कसे जिंकावे, शमदमादि देवता कशा दक्ष ठेवाव्या ह्या सर्व गोष्टींचा विचार नाथानें उपमादि अलंकार योजून स्पष्ट करून दाखविला आहे; व तेणेंकरून सर्व अध्यात्मक ग्रंथ, शांतिरसानें थबथबून गेले आहेत. एकनाथाच्या अभंगांमध्यें सुद्धां धर्माविषयीं व नीतिविषयीं फारच उत्तम प्रकारचें विवेचन केलें आहे.

नाथांच्या मनांत ज्ञानेश्वरीवर टीका लिहिण्याचें फार होतें परंतु त्यांना तसें न करण्याबद्दल दृष्टांत झाला होता असें ह्मणतात. त्यावरून मग त्यांनीं तो नाद सोडून फक्त गुढ शब्दांची मात्र व्याख्या केली. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ शके १२१२ त केला असून पुढें ३०० वर्षांनंतर त्याचा प्रसार होऊन लोकांस त्याची गोडी लागली. याचें सर्व श्रेय एकनाथास आहे. त्यांनीं हें महत्कृत्य शके १५१२ तारणनाम संवत्सर माहे भाद्रपद शुद्ध ६ कपिलाषष्ठीचे दिवशीं केलें! त्यासंबंधाच्या ज्ञानेश्वरीच्या शेवटीं नाथांनीं चार पांच ओंव्या केल्या आहेत; त्या अशा:—

'शके पंधराशें बारोत्तरी । तारण नाम संवत्सरीं ॥
एकाजनार्दन अत्यादरी । गीता ज्ञानेश्वरी प्रति शुद्ध केली॥ १ ॥
ग्रंथ पूर्वींच अतिशुद्ध । परि पाठांतरीं शुद्ध अबद्ध ॥
तो शोधूनीया एवंविध । प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥ २ ॥
'नमो ज्ञानेश्वरा निष्कळंका । जयाची गीतेची वाचितां टीका ॥
ज्ञान होय लोकां । अतिभाविकां ग्रंथार्थियां ॥ ३ ॥
बहुकाळ पर्वणी गोमटी । भाद्रपदमास कपिलाषष्ठी ॥
प्रतिष्ठानीं गोदातटीं । लेखनकामाठीं संपूर्ण जाली ॥ ४ ॥

ही नाथाच्या हातची ज्ञानेश्वरीची शुद्ध केलेली प्रत अद्याप पैठणास आहे ह्मणून सांगतात. असो. "याप्रमाणें आपल्या साधुत्वाच्यायोगानें व कवित्वाच्यासंबंधानें, हा पुरुष हिमालयापासून तों तहत दक्षिणटोंकापर्यंत

सोळाव्या शतकांत गाजत असतां व तत्वज्ञान आणि नीतिपर उपदेश ह्याचें खाद्य चारून, नीतिभ्रष्ट व अज्ञानजनसमूहाची पारमार्थिक उन्नति करण्याविषयीं, सतत चाळीस वर्षं एकसारखी जिवापाड दगदग करीत असतां इ. स. १६०९ ह्मणजे शके १५३१ त फाल्गून कृष्ण पंचमीचे दिवशीं त्याची प्रकृति बिघडून त्याला थोडी मूर्च्छा आली."

"मूर्च्छा जाऊन सावध झाल्यावर एकनाथानें उद्धव व इतर शिष्यवर्गास सांगितलें कीं, उदयीक माझें प्रयाण आहे, ह्याकरितां प्रातःकाळीं गोदातीरच्या वाळवंटावर उद्यांचें कीर्तन करून नंतर दोनप्रहरचे सुमारास या देहाचें सृष्टिनियमाला अनुसरून विसर्जन करूं."

"एकनाथ समाधिस्त होणार ही बातमी हां हां ह्मणतां आसपास दहावीस कोसांत पसरली; आणि लांबलांबचे लोक या पुण्यपुरुषाचें शेवटचें दर्शन घ्यावें ह्मणून धांवून आले."

"संकेताप्रमाणें दुसरे दिवशीं गोदातटाकीं नाथांचें कीर्तन झालें. कीर्तन समाप्त होऊन आरती झाली व खिरापती वांटल्या; मग सर्व लोकांचें शांतवन करून त्यांस अभंगवाणीनें उपदेश करीत व सर्वांचा निरोप घेत घेत एकनाथ गोदावरींत गेले. सर्व प्रेक्षकजन त्यांच्या तोंडाकडे टकमक पहात, 'गेला! गेला! चालला! चालला!' असे दुःखाचे उद्गार काढीत आहेत इतक्यांत त्या भाग्यशाली एकनाथाच्या मुखांतून 'जय जनार्दन' असा गंभीर ध्वनि निघून, सर्व जगास चटका लावणारा, हा अजब तारा फाल्गून कृष्ण षष्ठीचे दिवशीं दोनप्रहरीं गोदानदींत अस्तंगत झाला!!!"

"नाथानें गोदावरींत जलसमाधि घेतल्यावर मग चालीप्रमाणें और्ध्वदेहिक संस्कार केले. पुढें चिताशोधनाचे दिवशीं पहातात तों त्याठिकाणीं एक तुळशीचें व एक पिंपळाचें अशीं दोन सुंदर रोपें दृष्टीस पडलीं. तेव्हां ही नाथांचीच साक्ष असें भाविकभक्तांनीं मानून त्यांभोंवतीं वृंदावन बांधिलें आणि वर नाथांच्या पादुका स्थापन केल्या. ह्याच पादुकाची, प्रस्तुत, पैठणामध्यें नदीचे कांठीं समाध असून, फाल्गून कृष्ण षष्ठीस ( नाथषष्ठी ) मोठा उत्साह होतो."

येथपर्यंत एकनाथमहाराजांसंबंधीं व त्यांच्या गुरुसंबंधीं उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली. आतां एकनाथांची श्रीधरादि कवींनीं जी प्रशंसा केली आहे ती देऊन व मयूरपंतांच्या आर्येनेंच त्यांच्या ब्रह्मीभूत आत्म्याला एकवार प्रेमपुरःसर प्रणिपात करून अल्पसमजुतीप्रमाणें रंगविलेलें हें नाथांचें चरित्रचित्र वाचकाचे हवालीं करूं."

‘जो भानुदास-कुल-भूषण । प्रतिष्ठानवासी परिपूर्ण ॥
त्या एकनाथें ग्रंथ संपूर्ण । बहु रसाळ कथियेले ॥ १ ॥’
—श्रीधर.

‘मागें संतवरदानीं । एकनाथ बोलिले रामायणीं ।
तैशीं माझीं प्रसाद बोलणीं । वरद-वाणी नसे कीं ॥ १ ॥’
—महिपति.

‘नमिला शमि लास्य-प्र-द शांति-जल-धी एकनाथ तो भावें ।
शोभावें ज्याचें यश विश्वीं ज्या देव-वृंद लोभावें ॥ १ ॥’
—मोरोपंत.

---

## एकनाथांचे काव्यांतील सुरस वेंचे.

एकनाथाच्या काव्यांत विशेष मजेची गोष्ट ही कीं, ज्याप्रमाणें एखादा चतुर वैद्य एखाद्या कष्टसाध्य रोग्यास त्याच्या आवडीचे व प्रीतीचे पदार्थ खावयास देऊनच बरा करितो त्याप्रमाणेंच एकनाथानें चरित्रविषयवर्णनांत रूपकालंकारानेंच नीतीचा उपदेश केला आहे. उदाहरणार्थ रुक्मिणीस्वयंवरांत कृष्णाचें व रुक्मिणीचें लग्न लागण्याचे वेळीं, वरपक्षाकडील मंडळी आली त्यावेळच्या समारंभाचें हें वर्णन पहाः—

“ भरूनि रजतम औषध । करूनि अग्नियंत्र सन्नद्ध ॥
कृष्णापुढें अतिविनोद । एक प्रबद्ध दाविती ॥ १ ॥
अग्नि लावूनि ठायीं ठायीं । ममता जाळिती हवाई ॥
गगना उसळली पाहीं । धुवोन ठायीं निमाली ॥ २ ॥
मोहयंत्रीं सुमनमाळा । अग्नीपुष्पें भासती डोळा ॥
फुलें ह्मणती अबला । पाहतां डोळां तें राख ॥ ३ ॥
हातीं धरूनि कृष्णलीला । जाळिती कामाचा हातनळा ॥
धरूं नेणती त्या बरळा । जिवीं जिव्हाळा पोळती ॥ ४ ॥

याप्रमाणें सर्व रुक्मिणीस्वयंवर उपमादृष्टांतानें व रूपकानें भरून जाऊन पदोपदीं कवि उपदेश करितातः—‘ बाप हो ’ अहंकार सोडा; मोहांत गुंतु नका. मायापटल दूर झुगारून द्या; शुद्ध आनंदमय चित्स्वरूप ओळखा. द्वैतभाव सोडून द्या. रुक्मिणीचें स्वयंवर ह्मणजे जीव आणि शिव याचें ऐक्य आहे.

‘ ये ग्रंथींचें निरूपण । जिवाशिवा होतसे लग्न ॥
अर्थ पाहतां सावधान । समाधान सात्विका ॥ १ ॥ ’
रुक्मिणीस्वयंवर अ० १८.

खालील उताऱ्यांत एकनाथानें मदनपीडित झालेल्या भीमकीची अवस्था हुबेहूब उठवुन दिली आहे. ती वाचण्याजोगी आहे.—

'डोळा न लागेची शेजेसी । निद्रेमाजी देखे श्रीकृष्णासी ॥
तेणें स्वप्न सुषुप्तीसी । जागृतीसी न आठवे ॥ १ ॥
करूं जातां उदकपान । घोटासवें आठवे कृष्ण ॥
विसरली भूक तहान । लागलें ध्यान हरीचें ॥ २ ॥
तोंडीं घातलिया फोडी । घेऊं विसरली ते गोडी ॥
कृष्णीं लागलीसे गोडी । अनावडी विषयाची ॥ ३ ॥
पाय ठेवितां धरणीं । कृष्ण आठवी रुक्मिणी ॥
सर्वांगें थरथरोनी । रोमांचित होऊनी ठाके ॥ ४ ॥'

रु. स्व. अ. ५

कामशरांनीं विव्हल झालेल्या तरुणीची दुःसहस्थिती किती नाजूक व चातुर्यानें दर्शविली आहे! ह्या वर्णनावरून व त्यांतील डावपेंचांवरून कामदेवानें स्वरहस्याचा जणूं उपदेशच कवीस केला होता असें भासतें! दुसऱ्या पक्षीं अर्थ दृष्टीनें ध्यानयोग व भक्तियोग साहजीक बाणून तादात्म्य व तल्लीन झालेल्या जीवाच्या शुद्ध व पवित्र एकतानतेचें हें एक हुबेहूब चित्र आहे असें भासतें!

भावार्थरामायणांत वीररस तर अगदीं ओतप्रोत भरला आहे. उदाहरणार्थ हा एक खालील वेंचा पहा.—

'राजा दशरथ कौसल्येचें दोहदलक्षण विचारीत असतां, तिला अकस्मात् आवेश येऊन नेत्र आरक्त झाले, भृकुटी वर चढल्या, अंगांतील कंचुकी ताडकन् फाटली व भिल्लिणीप्रमाणें काचा मारून क्रोधाविष्ट होऊन वर उठून उभी राहिली व उच्चस्वरानें ह्मणते.—

'———येरी ह्मणे दे धनुष्यबाण ।
करूं लंकेचें निर्वाण । मारूं दारुण राक्षसां ॥ १ ॥
केउता गेला रे हनुमंत । अंगद सुग्रीव जांबुवंत ॥
अजुनि रावणाची मात । जगांआंत उरलीसे ॥ २ ॥
बाण घेवोनि स्वांगें । छेदूं कुंभकर्णाचे टांगें ॥
भेदुं रावणाचीं सर्वांगें । भिडतां मागें मी न सरें ॥ ३ ॥
केउते गेले रजुत्पती । लंका उलथा रे हातोहातीं ।
पाडा पाडा चारी भिंती । दुर्ग किती आह्मांसी ॥ ४ ॥

राक्षसांच्या शिरकमळीं । लंकेपुढें चेंडूफळी ॥
राक्षस रुधिराच्या कल्लोळीं । तृप्ती कंकाळीं करूं आजी ॥५॥

बालकांड अ० ५

दशरथ रामाला वनवासास पाठवून आपलें वचन पूर्ण करण्यास कांकूं करतो, असें पाहून कैकयी त्वेषानें ह्मणते.——

' नपूंसक तूं सूर्यवंशीं । राम न धाडवे वनवासासीं ॥
शेखीं स्त्रियांच्या पाया लागशी । निःसंग होसी तूं एक ॥ १॥
अति दीन हीन तूं होसी । लाज लाविली तूं सूर्यवंशासी ॥
बोलिला बोल पैं सांडिसी । कृपण होसी नृपनाथा ॥ २ ॥
पायां पडलीया साठीं । मी न सोडी वरद गोष्टी ॥
देणें नाही तुझे पोटीं । महा हट्टी होसि राया ॥ ३ ॥
तूं तव न देसि वरदान । मज ह्मणसी महाविघ्न ॥
तरि मी आपुला देईन प्राण । सुख संपूर्ण हो तुह्मां ॥ ४ ॥

अयोध्याकांड अ० ५—

कैकेयीच्या मुखांत घातलेल्या या वरील शब्दांवरून कवि मानवी स्वभावाचा पूर्ण परिक्षक होता असें दिसतें. ' हा वरील चुटका ह्मणजे बेफाम व शिरजोर स्त्रिया सर्वथैव पूज्य पतीची कितपत परवा बाळगतात ह्याचें दर्शक होय. त्याच प्रमाणें दोन किंवा अधिक बायकांच्या दादल्याची किती फटफजीती होते, सवतीमत्सर कसा असतो, व विषयासक्त आणि स्त्रैणपुरूष स्त्रियांमुळें कसा बिल्ली होऊन जातो, या गोष्टी वरील उताऱ्यावरून स्पष्ट होतात.

राम वनवासाला जावयाला निघाला तेव्हां सीतेनें ' मीही बरोबर येतें ' असा आग्रह धरिला. त्यावेळीं रामानें तिची अनेक प्रकारांनीं समजूत केली परंतु तें कांहींच न जुमानतां तिनें त्याला एकच उत्तर दिलें; तें असें:—

' जवळी असतां रघुटिळक । कंटक होती निःकंटक ॥
विष तें होय पीयूष । परमसुख वनवासीं ॥ १ ॥
तुज सांगातें वनवास । तो मज वैकुंठ कैलास ॥
तुज वेगळा संसार वोस । दुःख असो समज तेव्हां ॥ २ ॥
पति प्रियेचें निजजीवन । पति प्रियेचें निजनिधान ॥
पति प्रियेचें निजभूषण । तेणे वीण ते अति दीन ॥ ३ ॥

पति प्रियेची निजमूर्ती । पति प्रियेची निजात्मगती ॥
पति प्रियेची परम शांति । होय उपपत्ति त्याविण ॥ ४ ॥
पति प्रियेचें निजशोभन । पति प्रियेचें गतीगमन ॥
पति प्रियेचें प्रेमधन । तेणें वीण ते अति दीन ॥ ५ ॥
तूं तव माझा प्राणनाथ । तुजवेगळा मज प्राणांत ॥
माझा परमात्मा रघुनाथ । हृदयस्थ अवधारीं ॥ ६ ॥
जेव्हांचि तुझें वन-प्रयाण । तुजसवें येती माझे प्राण ॥
मागें राहवितां जाण । अचुक मरण मज रामा ॥ ७ ॥
ह्मणोनि धरिले दोन्ही चरण । गहिंवरें गळताती नयन ॥
जालें पतिपाद प्रक्षालन । श्रीराम पूर्ण तुष्टला ॥ ८ ॥ '

अयोध्याकांड. अ० ६०.

खऱ्या पतिव्रतेला वरील विचार किती शोभतात! वरील कैकेयीच्या आणि या सीतेच्या उद्गारांत किती अंतर! 'ज्याच्या जिवावर सर्व सौभाग्याची मदार, जो पति स्त्रियांचें केवळ अधिदैवत, ज्याची सेवाचाकरी हेंच पतिव्रतेचें कर्तव्य, हीच तीर्थयात्रा व हाच मोक्ष, अशा ईश्वरतुल्य पतीविषयीं खऱ्या सदाचरणी साध्वीचें प्रेम व पूज्यबुद्धि हीं किती असतात, हें सीतेच्या वरील उद्गारांवरून कवीनें चांगलें दाखविलें आहे.

स्थलाच्या मानानें विचार करितां वर दिलेले उतारे फार झाले. हे सर्व वेंचे नाथांच्या चरित्रविषयक ग्रंथांतील आहेत. आतां त्यांच्या अध्यात्मपर ग्रंथांतील दोन तीन नमुने दाखवूं.

खरें तप कोणतें व तें कशास ह्मणावें ह्याविषयीं चतुःश्लोकीं भागवत टीकेंत एकनाथानें चांगलें विवेचन केलें आहे.—

' तप ह्मणजे नव्हे स्नान । तप ह्मणजे नव्हे दान ॥
तप नव्हे शास्त्राख्यान । वेदाध्ययन नव्हे तप ॥ १ ॥
तप ह्मणजे नव्हे योग । तप ह्मणजे नव्हे याग ॥
तप ह्मणजे वासना त्याग । जेणें तुटती लाग कामक्रोधाचे ॥२॥
जेणें दंभलोभ निःशेष आटे । अहंममता समूळ तुटे ॥
याच नांव तप गोमटें । मानी नेटपाटें विधाता ॥ ३ ॥

' ह्या वर सांगितलेल्या ' तप ' शब्दाच्या व्याख्येप्रमाणें प्रत्येक मनुष्यमात्राला तपस्वी होण्याचा अधिकार आहे, परंतु वासनेचा त्याग करून विषयोपभोगावर पाणी सोडण्याचा कोणाला तरी धीर होतो आहे काय ?

'प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयभूमीवर, मोठमोठे रथी, महारथी शस्त्रास्त्रांनीं ताडनकरून, ती भूमि पादाक्रांत करीत आहेत. ह्याकरितां हृदयांगणावर निरंतर चाललेल्या द्वंद्वयुद्धांत, जो कोणी तलवार गाजवील, तोच शूर असा नाथांचा अभिप्राय आहे.–

'जिंतला शत्रूंचा संभार । एक शौर्याचा विचार ॥
रणीं मर्दुनी अरि–वीर । तो शूर येथें मानेना ॥ १ ॥
प्रवाह रूपें अनिवार । जीवभाव लागला थोर ॥
त्यातें जिंकी तो महावीर । परमशूर बोलिजे ॥ २ ॥
जिंकोनी जीवाचे स्वभाव । चिदानंदाची राणीव ॥
भोगिजे स्वराज्य वैभव । हें परम गौरव शौर्याचें ॥ ३ ॥'

एक० भाग० अ० १९.

निरनिराळीं राष्ट्रें काबीज करण्याकरितां समर करणें, आणि इंद्रियदमन करण्याकरितां रण करणें या दोन्ही प्रसंगांचे परिणाम फार भिन्न भिन्न आहेत पहिल्याचा परिणाम ऐहिक परंतु नश्वर उन्नतींत होतो व दुसऱ्याचा पारमार्थिक, चिरकालिक व अलौकिक अभ्युदयांत होतो!

ईश्वरप्राप्तीकरितां घरदार सोडण्याची गरज नाहीं. संसारांत राहूनही ईश्वराचेठिकाणीं चित्तवृत्ति ठेविली असतां तो प्राप्त होतो. त्याचप्रमाणें ईश्वरप्राप्तीच्या आड श्रीमंती किंवा गरीबी, अथवा कूळ व जातीही येत नाहीं–

'माझा भावार्थ जेथें होय । तेथें मी जाती कुळी न पाहें ॥
मी भावाचेनि लवलाहें । वश्य होय निज भक्ता ॥ १ ॥
मजमध्यें रंगली चित्तवृत्ति । यालागीं विसरला गृहासक्ति ॥
त्याशीं ग्रहस्थाश्रमींच माझी प्राप्ती । निश्चयें जाण उद्धवा ॥ २ ॥'

एक० भाग० अ० १७.

'एका ईश्वराशिवाय यमयातना चुकविणारा व जन्ममरणापासुन सुटका करणारा दुसरा कोणी समर्थ नाहीं. करितां ईश्वराचें नामस्मरण करून आपली सायुज्यता संपादन करा' असा नाथांचा जागोजाग उपदेश आहे. पूर्वजन्म, पुनर्जन्म व यमयातना हीं सर्व खरीं आहेत, असें एकनाथाचें मत पदोपदीं व्यक्त होतें.—

## अभंग.

'भक्तिवीण पशू कशासि वाढला । सटवीनें नेला कैसा नाहीं । १ ।
काय माय गेली होती भूतापाशीं । हरि नये मुखासी अरे मूढा । २ ।

पातकें करितां पुढें आहे पुसता । काय उत्तर देतां होशील तूं ॥ ३ ॥
अनेक यातना यम करवील । कोण सोडवील तेथें तुजला ॥ ४ ॥
एका जनार्दनी सांगताहे तोंडें । आहा वाचा रडे बोलतांची ॥ ५ ॥

ह्या वरील अभंगावरून एकनाथ किती स्पष्टवक्ता आणि निर्भीड होता, ह्याची बरीच कल्पना आमच्या वाचकांस करितां येईल.

'मूर्तिपूजेविषयीं एकनाथाचे विचार शुद्ध आणि नीतीला अनुसरून आहेत. कोंबड्या किंवा बकरीं मारून त्यांचा नैवेद्य देवास अर्पण करण्याची जी घातुक आणि घाणेरडी चाल कित्येक जातींत आहे, ती अत्यंत निंद्य आहे असें एकनाथाचें मत आहे.'

## पद.

बंदे ! हुषार रहना बे ! । साहेब राजी रखना बे ! ॥ धृ० ॥ गांजा दारू मत पीयो यारो । अक्कल गुंग होती ॥ अपने पल्लवका दाम खरचकर मुखमे मखिया जाती ॥ १ ॥ जुवेबाजी मत करो यारो ! । अक्कल गुंग होती । अपने पल्लवका दाम खरचकर । शिरपर जुतिया पडती ॥ २ ॥ रंडीबाजी मत करो यारो ! । अक्कल गुंग होती । अपने पल्लवका दाम जाकर । हातमें चवरी आती ॥ ३ ॥ एका जनार्दनका बंदा अक्कल तुजकूं देता । दिल जाहे तो शिकले प्यारे! नहि तो जा गू खाता ॥ ४ ॥

## पद

भजन बिन धिग चतुराई ग्यान ॥ धृ० ॥ पोथी पुरान बाचत सबही । काम नही गुरुग्यान ॥ १ ॥ लोक कहे हम अतमग्यानी । ग्यान नही अभिमान ॥ २ ॥ एका जनार्दन गुरुका बंदा । भक्ति भजनमो प्राण ॥ ३ ॥

नाथांच्या पदांत, अभंगांत व ओंव्यांत औत्सुक्य, प्रेम आणि शांतिरस, किती भरलेला आहे त्याची कल्पना वाचकांस वरील वेंचे वाचून निदान अंधुक अंधुक तरी होईल अशी आशा आहे!

# दासोपंत.

'अरण्यामध्यें एका राजाच्या पारध्यांनीं एका गरीब हरणास वेढून त्याचेंभोंवतीं पाश पसरले; एकीकडून वणवा पेटवून दिला व दुसरीकडून कुत्रीं उभीं केलीं व चवथ्या बाजूनें, त्यांनीं धनुष्य सज्ज करून बाण टाकण्यास प्रारंभ केला. अशा अडचणींत त्या बिचाऱ्या हरिणानें ईश्वराचा धांवा करितांच ईश्वरीइच्छेनें पारध्याच्या धनुष्याची दोरी तुटली, कुत्रीं दुसऱ्याच एका ससाचे मागें लागलीं, वणव्यानें मागलें पाशांचें जाळें जाळलें व तोही पावसाच्या वृष्टीनें विझून गेला! ही लहानशी पौराणिक गोष्ट आपणांस काय शिकविते बरें? 'देव तारी त्याला कोण मारी' किंवा 'तारत्यापुढें मारत्याचें कांहीं चालत नाहीं,' हें महातत्व ही गोष्ट आपणांस शिकवीत नाहीं काय? तात्पर्य तो परमात्मा पाठीराखा असल्यावर एकापेक्षां एक अशीं भयंकर किती जरी संकटें येऊन कोसळलीं तरी त्यांचा त्याच्या कृपाप्रसादापुढें काय पाड? परंतु अशाप्रकारें ईश्वराला आपला पाठीराखा करून घेण्याचें काम अनन्यभक्तीशिवाय होत नाहीं. ईश्वरभजनाशिवाय दुसरें चांगलें ह्मणून ज्यांना कांहीं दिसतच नाहीं अशा अनन्यगतिक चित्तानें उपासना करणारांची सर्वप्रकारची चिंता व काळजी सर्वतोपरी त्या भक्तवत्सलासच असते. कायावाचामनेंकरून उत्पन्न होणारीं सर्व कर्मे जे परमेश्वरास अर्पण करून त्याची उपासना करतात त्या एकनिष्ठ उपासकांचें तो काय ह्मणून करीत नाहीं? सर्व कांहीं करतो. त्यांना संसारसागरांतून पैलतीरास नेण्याचा तर त्यानें मक्ताच घेतला आहे. महाभयंकर अशा या संसारार्णवाचें उग्ररूप पाहून गर्भगळीत झालेल्या प्राणीमात्रांस धीर देऊन त्यांना पैलतीरास नेण्याकरितां, निरनिराळ्या नांवांच्या हजारों नावा करून भगवान् या संसारोदधीमध्यें स्वतः तारूं झाले आहेत. कोणास ध्यानाचे कांसेस लावावें, कोणास आपल्या नामरूप नौकेंत बसवावें, कोणाचे पोटाखालीं प्रेमाची सांगड द्यावी, अशाप्रकारेंकरून त्यांना सायुज्याचे किनाऱ्यास लावावयाचा त्याचा क्रम जगाचे आरंभापासून अव्याहतपणें चाललेला आहे. ह्यामुळें भक्तांना स्वतःबद्दलची कोणत्याहीप्रकारची चिंता तिळप्रायही करावी लागत नाहीं.

अनन्यभक्तीचा महिमा असा अगाध आहे. अशाप्रकारची भक्ति एकदां अंतर्यामीं उत्पन्न झाली ह्मणजे मग त्या भक्तजनांना मोक्षही सुलभ होतो. पण यामुळें होतें काय तर ते ईश्वरास आपला कायमचा ऋणी करून ठेवि-

तात. अशा अनन्यगतिक भक्तांच्या ऋणांतून परमेश्वराला मुक्त होतां येत नाहीं, किंबहुना त्यांच्यापुढें त्याचें कांहीं एक चालत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. कारण खरे भक्त जे आहेत ते 'वृष्टीशिवायच समुद्र जसा पाण्यानें तुडुंब भरलेला असतो त्याप्रमाणें ते (भक्त) कोणच्याही उपचाराशिवाय सदासर्वदां संतुष्ट झालेले असतात.' त्या नित्यतुष्टांना ईश्वरानें तरी काय द्यावें? ह्मणून स्वतः षड्गुणैश्वर्य संपन्न असूनही त्यास त्या भक्तलोकांच्या ऋणामुळें सदैव त्यांचे आधीन व्हावें लागतें.

कौरवसमेंत दुःशासनानें द्रौपदीवर जेव्हां हात टाकून तिचें वस्त्रहरण करण्यास आरंभ केला तेव्हां, 'गोविंद! गोविंद!' अशी तिनें आरोळी मारल्याबरोबर श्रीकृष्णास थेट द्वारकेहून यावें लागलें. असें हें ऋण जबरदस्त आहे. हें तरी फार लांबचें उदाहरण आहे. आतां एकादें आपलें अलीकडचें कां होईना. दुष्काळचेवेळीं दामाजीपंतानें सरकारी धान्याचीं सर्व पेवें गोरगरिबांस वाटून दिल्यावरून त्यास विजापुरचे बादशहापुढें जेव्हां धरून नेलें तेव्हां श्रीपांडुरंगास विठ्या माहराचें सोंग घेऊन बादशहाकडे सर्व पैशाचा भरणा करावा लागला नाहीं काय? अशा प्रकारचाच चमत्कार या चरित्रांत आहे.

बेदरच्या ब्राह्मणी पातशहांच्या रियासतींत नारायणपेठ ह्मणून एक तालुक्याचें ठाणें होतें. तेथें दिगंबरपंत देशपांडे नांवाचे एक सुखवस्तु गृहस्थ रहात असत. तालुक्यासंबंधींचें सर्व कामकाज ब्राह्मणी पातशहानें यांच्यावरच सोंपविलें होतें. ते मोठे धार्मिक व ईश्वरनिष्ठ असत. त्यांची पत्नी पार्वतीबाई ही फार साध्वी स्त्री होती. तिचे पोटीं त्यांना शके १४७३ भाद्रपद वद्य अष्टमीस ह्मणजे इ. स. १५५१ त एक मुलगा झाला हाच प्रस्तुत चरित्राचा नायक होय. त्याचें नांव दास. त्यालाच पुढें लोक 'दासोपंत' ह्मणून ह्मणूं लागले. दासोपंत अत्यंत सुस्वरूप होते. त्यांचे चरित्रकार त्यांच्या स्वरूपासंबंधी ह्मणतात.—

'सुहास्यवदन, आकर्णनयन। सरळनासिक गौर वर्ण॥
आजानुबाहु सर्वलक्षणसंपन्न, । अनुपम्यजगीं अवतरले॥ १॥'

दिगंबरपंतांनीं योग्यकालीं आपल्या पुत्राचे उपनयनविवाहादि सर्व संस्कार केले. तत्कालीन परिपाठाप्रमाणें त्यांनीं दासोपंतांना शिक्षणही परिपूर्ण दिलें होतें. असो. अशाप्रकारें दिगंबरपंत आपल्या पुत्रासहवर्तमान आनंदानें व सुखानें कालक्रमणा करीत असतां त्या प्रांतांत एकेवर्षी मोठा दुष्काळ पडला;

त्यामुळें अर्थातच दिगंबरपंतांचे हातून पातशाही रसद वेळेवर पोंचली नाहीं. ह्मणून त्यांस पातशाही सेवकांनीं त्यांच्या पुत्रासह धरून बेदरास नेलें. हिशोब करितां त्यांच्याकडे दोन लक्ष रुपये बाकी निघाली. ती मागतां—

'येरू ह्मणे' अवर्षणामुळें । सरकार पैका बाकी राहिले; ॥
आपण दयाळु केवळ। क्षमा आतां करावी ॥ १ ॥
आपुलें अभय असल्यास जाण । द्रव्य देईन करोनि यत्न ॥'

असें दिगंबरपंतांचें भाषण ऐकतांच पातशहा ह्मणाला.—

'तुझे सुटकेसी पाहिजे धन । त्यास तूं देई लोकांसि जामीन ॥
नातरी पुत्रास येथें ठेवून । जाऊन पाठवी द्रव्य कीं; ॥ १ ॥
एक मासाचा करूनी करार । तूं जाय येथूनि सत्वर ॥
पैका पोहचतां नेमावर। पुत्र येईल ॥ २ ॥
पैका न येतां मासाअंतीं । तुझा पुत्र मिळेल मम यातीं ॥
हें तरी जाण तूं निश्चितीं । ' ऐसें पातशहा सांगतसे ॥ ३ ॥'

व त्याप्रमाणें त्यानें दिगंबरपंतापासून करारनामाही लिहून घेतला. 'रसद एक महिन्याचे आंत पोंचती करीन; न केल्यास मुलगा बाटवावा' अशी अट लिहून देतांना त्या सहृदय पित्यास काय वाटलें असेल याची कल्पना करणें कठीण आहे. बिचारा धाय मोकलून रडूं लागला; व स्वपुत्राचे गुणानुवाद गाऊन आपलें हृदय पिटूं लागला. परंतु दासोपंतानें मोठ्या गंभीर वाणीनें आपल्या पित्याचें शांतवन केलें कीं,

'——— तोच हृदयस्थ असतां श्रीयोगीराज ॥
त्यालाच असे आपली लाज। चिंता किंनिमित्य पैं करितां ?॥१॥
तोचि आमुचा कुलदैवतें । तोचि रक्षील मातें ? ॥ ॥
तो जगदात्मा निश्चितें । तो सन्मुख असतां, भय काये ? ॥ २ ॥
ज्याचे स्मरणे भवभयउडे । ज्याचे स्मरणमात्रें कैवल्यजोडे ॥
ज्याचे स्मरणें सहजानंद घडे। हें काय बापुडें या लागीं ? ॥ ३ ॥
आपण न करितां अनमान । प्रयाण करावें देशालागून ॥
द्रव्यही देईल तोचि जाण । भेटही सत्वर घडेल ॥ ४ ॥'

अहाहा! हे शब्द ऐकून कोणाला ह्मणून समाधान वाटणार नाहीं! वय पाहिलें तर केवळ सोळा सत्रा वर्षांचें—केवळ आईबापांचे मांडीवर लोळण्याचें! व विचार पाहिले तर मोठमोठ्या तत्वज्ञान्यांसही लाजविण्याजोगे! आपल्या

पुत्राचें हें असें अलोट ज्ञान व अपूर्व भगवन्निष्ठा पाहून दिगंबरपंतांस फार धन्यता वाटली असेल हें काय सांगावयास पाहिजे!

असो दासोपंताला पातशहाजवळ ठेवून दिगंबरपंत तेथून जे निघाले ते मजल दरमजल करीत करीत लवकरच स्वदेशीं येऊन पोहोंचले. गांवीं आल्यावर त्यांनीं पैका जमविण्याकरितां पुष्कळ खटपट केली परंतु दुष्काळाचे दिवस असल्यामुळें कांहीं एक उपयोग झाला नाहीं. इकडे महिन्याची ठरलेली मुदत भरत आली. बिचारीं उभयतां नवराबायको पुत्राच्या काळजीमुळें एकसारखीं झुरणीस लागलीं. परंतु उपाय काय! ईश्वरावर सर्व भरंवसा टाकून बिचारे स्वस्थ बसले! इकडे दासोपंतास बादशहा पोटापाण्याकरितां दररोज एक रुपया देत असे. तो रुपया घेऊन दासोपंत बेदराजवळच झरणीनृसिंह नांवाचें एक क्षेत्र आहे तेथें प्रतिदिनीं स्नानाकरितां जात असत. तेथें जाऊन दासोपंतानें.—

‘ नित्य स्नान मात्र करून । तो रुपया द्यावा ब्राह्मणाकारणें ॥
आपण करावें उपोषण । हृदयीं ध्याता दत्तमूर्ति ॥ १ ॥
तें ध्यानच अमृतपान । त्यांनीं करीत होते अनुदिन ॥
तेणें योगें दैदीप्यमान । बाल दिसतसे सर्वांसी ॥ २ ॥ ’

नित्य असें करीत असावें. महिना भरण्याच्या आदल्यादिवशीं सकाळीं दासोपंताला आपल्यापुढें बोलावून आणवून बादशहा त्याला ह्मणाला.—

‘ आज संध्याकाळपर्यंत । वाट पाहणें निश्चित ॥
द्रव्य आलिया तूंतें । पाठवीन सत्य पित्याकडे ॥ १ ॥
जरि न येईल आज द्रव्य । तुजला करूं यवन निश्चयें ॥
यांत कांहीं नसे संशय । सत्य, सत्य, रे सकुमारा ॥ २ ॥ ’

हे वाक्प्रहार त्याच्या हृदयांत बाणासारखे भिनले. त्याची मुखश्री म्लान झाली. डोळ्यांवाटे घळघळां अश्रु वाहूं लागले. अंतःकरण चिंतेनें करपून गेलें. चहूंकडे त्याला उदास व भयाण दिसूं लागलें. अशाप्रकारें सर्वत्र निराशा दिसूं लागल्यावर त्यानें एकनिष्ठपणें परमेश्वराचा धांवा मांडला—

‘ जय जय अत्रितनया! आनंदनिलया। आनंदकारक भक्तसमुदाया ॥
आतां तुजवांचून श्री योगिराया । शरण जाऊं कोणासी? ॥ १ ॥
तुज ऐसा नसे दयाळू । तुज ऐसा नसे कृपाळू ॥
तुलाच असे माझा कळवळू । कैवल्यकंदा, करुणार्णवा! ॥ २ ॥

मी जन्मलों ज्यांचे उदरीं । ते बाप राहिले देशांतरीं ॥
तूं बाप असती हृदयांतरीं । यास्तव बाहतों तुजलागीं ॥ ३ ॥
हा तो यवनरूप व्याघ्र । मज गिळूं पाहे समग्र ॥
तरी कृपाशस्त्रें वधूनि शिघ्र । रक्षीं मातें दयाळा ॥ ४ ॥
हा तो यवनरूप समुद्र । यांत बुडवूं पाहतो निर्धार ॥
तरि तूं तारक कर्णधार । काढीं वेगें कृपाळा ! ॥ ५ ॥
हा तो यवन काळसर्प । दंशून करावा काळरूप ॥
ऐसें इच्छितों, तूं चिद्रूप । गारुडी असतां भय काये ? ॥ ५ ॥
हा यवनरूप वडवाग्नि । यांत लोटूं पाहतो मजलागुनि ॥
तरि तूं कृपाघन वर्षूनि । शीतळ करीं, रे श्यामांगा ॥ ६ ॥
आतां तुजवीण मज बाळातें । कोण रक्षील, गा दीनानाथ ॥
धांव धांव गा श्रीअवधूत । अंत किती पाहतोसी ? ॥ ७ ॥

असो. अशाप्रकारें तो दिवसही निघून गेला. महिन्याचा शेवटचा दिवस उगवला तरी दिगंबरपंतांचा किंवा पैशाचाही पत्ता लागेना. इकडे तर दासोपंताला भरदरबारांत यावनीधर्माची दीक्षा देण्यास काजी सिद्ध झाला. बिचारा दासोपंत तर डोळे मिटून श्रीदत्तात्रेयाचें ध्यान करीत स्वस्थ बसला होता. तो मुळींच देहावर नव्हता. त्यावेळीं त्याची अवस्था कशी झाली ह्मणाल तर.—

'तेव्हां त्याचे दृष्टीस न पडे जन । जनीं दिसे जनार्दन ॥
जनार्दनीं वृत्ति रंगली पूर्ण । देहभ्रांति सहज पैं ॥ १ ॥'

इतक्यांत दिगंबरपंतांकडून एक महार रसद घेऊन आला अशी चोपदारानें दरबारांत येऊन बादशहास वर्दी दिली. त्या महाराला दरबारांत आणवून 'तूं कोण? कोठून आलास ?' वगैरे माहिती बादशहानें त्याला विचारिल्यावरून त्या महारानें सांगितलें कीं, 'मी दिगंबरपंताचा अत्यंत विश्वासुक सेवक आहे. मला त्यांनीं दोन लाख रुपयांच्या हुंड्या देऊन पाठविलें आहे. माझें नांव दत्ताजी. मी त्यांच्या घरीं आज सातपिढ्या चाकरी करीत आहे.' इतकें बोलून त्यानें बादशहापुढें द्रव्याच्या राशी ओतल्या. रुपये मोजीपर्यंत तो तेथें होता नंतर तो एकाएकीं गुप्त झाला ! बादशहाला दत्तोबा महाराचा अगदीं वेध लागला. बादशहाचे सेवकांनीं त्या महाराकरितां त्रिखंड शोधिलें पण त्याचा कांहीं पत्ता लागला नाहीं. बरोबरच आहे. ब्रह्मादिकांच्याही

जो कधीं दृष्टीस पडावयाचा नाहीं तो यःकश्चित पापी माणसांच्या कसा नजरेस पडावा! असो. बादशहानें नंतर दासोपंताला नानाप्रकारचे वस्त्रालंकार देऊन त्याच्या घरीं पोचतें केलें दासोपंत घरीं आल्यावर त्याच्या मातापितरांस काय वाटलें असेल याची नुस्ती कल्पनाच केली पाहिजे. तो आनंद वर्णन करावयास मानवी शब्दभांडार खास अपुरें पडेल. दिगंबरपंतांना वाटलें कीं,—

'———हा उत्पन्न " आजच आमचे उदरीं पैं आला ॥ १ ॥
किंवा व्याघ्रमुखांतून बाहेर आला। कीं काळें नेतां खालीं टाकिला ॥
अथवा अमृत पिऊन सजीव झाला। एकाएकीं दैव बळें ॥ २ ॥'

मग त्यांनीं पुत्रोत्सवाप्रीत्यर्थ पुष्कळ दानधर्म केला; ब्राह्मणसंतर्पणें घातलीं व मोठा उत्सव केला. पुढें मग बापानें विचारिल्यावरून दासोपंतानें बेदरास घडलेलें सर्व कच्चें वर्तमान त्यास सांगितलें. हा वेळपावेतों दासोपंतास वाटत होतें कीं, 'आपल्यास आपल्याच पित्यानें सरकारी पैसा भरून सोडविलें.' परंतु दिगंबरपंतानें खरें वृत्त कळविल्यावर त्यास फार विस्मय वाटला. त्याला त्या पाडेगारानें नुस्तें वेड भरलें. जळीं, स्थळीं, काष्टीं, पाषाणीं त्याला तो दत्तोबा पाडेगारच दिसूं लागला.

ह्या आकस्मिक दैवी कृपेनें दासोपंताच्या वृत्तींत चमत्कारिक फरक पडून त्या दिवसापासून तो अगदीं विरक्त झाला. 'सह्याद्रिपर्वतांत मातापुरनामक गावीं श्रीदत्तात्रेयांची वस्ती आहे' असें त्यानें आपल्या वाडवडिलांचे तोंडून ऐकिलें होतें; ह्मणून त्यानें तेथें जाण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें एकेदिवशीं केलेंही! घरांतून निघतांना त्याची स्थिति काय झाली ह्मणून सांगूं.—

'घर सोडून पुढें ठेवितां पाउलें। पाउलापाउलीं दत्तच भरलें।
दशदिशा दत्त कोंदाटलें। दत्तच दिसे चराचरीं ॥ १ ॥
वृत्ति रंगतां दत्तपायीं। दत्तच दिसे बाह्यांतर हृदयीं ॥
कोण मी? कोठें जातों? यासमयीं। हें भान कांहीं नसेची ॥ २ ॥'

असो. अशाप्रकारें दासोपंत घरांतुन जे निघाले ते हिलालपुरास आले. तेथून पुढें प्रेमपुरास जाऊन मल्हारीमार्तंडाचें त्यानें दर्शन घेतलें. मग नांदेडाहून ते मातापुरीं गेले. देवीचें दर्शन घेतल्यावर त्यानें सह्याद्रीचे शिखरावर चढण्यास आरंभ केला. शिखरावर गेल्यावर दासोपंतानें त्या ठिकाणीं श्रीअवधुत दर्शनाकरितां बारा वर्षेपर्यंत घोर तपश्चर्या केली. एकेदिवशीं रात्रीं श्रीदत्तात्रेयांनीं त्यास स्वप्नांत दृष्टांत दिला कीं,——

'गंगातीरीं राक्षस भुवन । तेथें तूं जाय येथून ॥
वाळवंटीं पादुका जाण । असे माझ्या सत्यत्व ॥ १ ॥'
'तेथें तूं तप करीत असतां । सहज होईल साक्षात्कारता ॥
भेटेन मी अवधूता । अनायासें तुजलागीं ॥ २ ॥

स्वप्नांतील दृष्टांताप्रमाणें ते तेथून निघून राक्षसभुवनीं आले. तेथें आल्यावर त्यांनीं—

'————————॥ मांडून तेथें दृढासन ॥
प्रारंभिलें अनुष्ठान । अवधूताच्या प्राप्तीस्तव ॥ १ ॥
अवधूतीं प्रवेशून चित्तवृत्ति । अन्नादि विषय समूळ त्यागिती ॥
अवधूतप्राप्तीस्तव निश्चितीं । तप करितसे दुर्धर ॥ २ ॥
अवधूताचें ध्यान अर्चन । तेंच पंताचें अशनपान ॥
अवधूतावांचूनि एक क्षण । न गमे ज्यासि अवस्थात्रयीं ॥ ३ ॥
अवस्थात्रयीं अवधूतमूर्ति । हृदयीं आठवून निश्चितीं ॥
यापरी तप करितां निगुती । वर्षे झाले द्वादश ॥ ४ ॥'

अशा प्रकारें दारुण तपश्चर्येचीं १२ वर्षे पूर्ण होतांच दासोपंतापुढें प्रत्यक्ष श्री दत्तमूर्ती प्रकट झाली. त्यांनीं पंतास पोटाशीं धरून त्याच्या तोंडावरून मोठ्या प्रेमानें हात फिरविला व मोठ्या आनंदानें ते त्यांस ह्मणाले.—

'आतां मी असे सुप्रसन्न । वर माग इच्छित मन ॥
ते करीन मनोरथ पूर्ण । अविलंब योग या काळीं ॥ १ ॥'

अशी ही वरदवाणी ऐकतांच पंतांनीं त्यांच्या चरणावर लोटांगण घातलें आणि करद्वय जोडून विनंति केली कीं,—

'जयजयाजी दत्तात्रेया । भक्तवत्सला, स्वानंदनिलया ॥
हेंच मागणें आपुले पायां । पायींच थारा पैं द्यावा ॥ १ ॥
आपुले चरणीं जें सुख । तें ब्रह्मांडीं नसे देख ॥
मजला जाणूनि पाईक । पादुका करूनि ठेविजे ॥ २ ॥
मी तो पामर, मतिमंद, दीन । मज कोणीच नसे चरणांवांचून ॥
माझें द्विजत्व रक्षिलें स्वयें प्रगटून । मनुजरूपें सर्वस्वें ॥ ३ ॥
किती आठवूं उपकारां ? । उत्तीर्ण नव्हे, जी दातारा ॥
मज नको संसारवारा । श्रीदिगंबरा दयाळा ॥ ४ ॥
कामक्रोधादि वैरी । मज जाच करिती परोपरीं ॥
तूंच तारीं, वारीं, गा भवारि, । भयनाशका दयाब्धे ॥ ५ ॥'

अशाप्रकारचें पंताचें भाषण ऐकून त्यांना फार आनंद झाला. मग त्यांनीं पंतास आपल्यासमोर बसवून व त्यांचे मस्तकीं अभयहस्त ठेवून त्यांना गुरुसांप्रदायाप्रमाणें गुपरूदेश दिला.

दासोपंतांस श्रीदत्तात्रेयदर्शन व गुरूपदेश विशीच्या सुमारास झाला असावा. त्या नंतर भगवद्भजनाव्यतिरिक्त त्यानें आपला काळ मुळींच वाया जाऊं दिला नाहीं. कोठें तरी एकांतवासांत रहावें, व यदृच्छेनें गळून पडलेलीं पानें व फळेंमात्र भक्षून जीवाचें रक्षण करावें. अशा क्रमानें त्यानें वीस वर्षें काढिलीं व परमेश्वराची कृपा पुर्णपणें संपादन केली.

गुरुपदेश झाल्यापासून दासोपंतानें महाराष्ट्रीयांच्या धर्माची व भाषेची उत्कृष्ठ सेवा केली. असें सांगतात कीं, त्यांस लिहिण्यास दररोज एक दौतभर शाई लागत असे. त्यांचें जाड ढोबळ हस्ताक्षर व त्यानें रचलेले ग्रंथ पाहिले ह्मणजे या आख्यायिकेची सत्यता सहज लक्षांत येतें.

दासोपंत नित्य जोगाईच्या आंब्यास रहात असत. आंब्याचे गार्ग्यगोत्री देशपांड्ये दासोपंताचे शिष्य होत. देशपांड्यांच्या घराण्यांतील 'शितोपंत' हा दासोपंताचा पहिला शिष्य झाला. दासोपंताच्या वंशजांचीं दोन घरें सध्यां जोगाईच्या आंब्यांस आहेत. त्यांना थोरलें देवघर व धाकटें देवघर अशा संज्ञा आहेत. दासोपंताचे एक वंशज सध्यां नागपुराजवळील चंद्रपुरास व दुसरे बेदराजवळील बावगीस आहेत. आंबेयेथील देवघरांत दासोपंतांनीं केलेले खालील ग्रंथ आहेत.–१ गीतार्णव, २ गीतार्थबोध, ३ अवधूतराज, ४ ग्रंथराज, ५ प्रबोधोदय पुर्वार्ध व उत्तरार्ध, ६ स्थूलगीता, ७ वाक्यवृत्ति (गद्य), ८ पंचीकरण, ९ पदार्णव, १० दत्तात्रेयमहात्म, ११ गीताभाष्य, १२ सार्थगीता, १३ अवधूतगीता, १४ अनुगीता, कांहीं स्तोत्रें, पूजा वगैरे यांपैकीं कांहीं ग्रंथ प्राकृत आहेत व कांहीं संस्कृत आहेत.

यांपैकीं एकट्या गीतार्णवाचीच संख्या सव्वालाखावर आहे. अवधूतराजाची पांच हजार आहे. पदार्णवांतही मुळ सवालक्ष पदें होतीं असें सांगतात. सध्यां सुमारें पांच हजार उपलब्ध आहेत. गीतार्थबोधचंद्रिकेचे अठरा अध्याय आहेत. वाक्यवृत्ति गद्य असून प्रश्नोत्तररूप आहे. मराठींतील पहिला गद्य ग्रंथ हाच आहे असें वाटतें. दासोपंताच्या पंचीकरणासंबंधानें येथें एक बाब नमूद करून ठेवण्यासारखी आहे; ती ही कीं, हें सबंध पंचीकरण एका पासोडीवर लिहिलें आहे. ही पासोडी बरोबर चोवीस हात लांब व अडीच हात रुंद आहे. शिवाय 'आगमनिगम' या नांवाचा दत्तसांप्रदायासंबंधीं एक ग्रंथ आहे. हा श्रीमद्भागवताएवढा आहे.

दासोपंताच्या कवितेपैकीं पदेंच काय तीं काव्यांत मोडतील. बाकीचे सर्व ग्रंथ वेदांतशास्त्रपर आहेत. आपल्या अंगचें अलौकिक कवित्वसामर्थ्य जनांच्या दृष्टीस पडून आपला त्यांनीं बहुमान करावा, अशी मनीषा त्यांच्या हृदयांत कधींही आली नाहीं. याप्रमाणें त्यानें निरनिराळ्या प्रसंगीं जें काव्य केलें तें केवळ स्वकर्तव्यबुद्धीनेंच केलें असल्यामुळें त्यांत कृत्रिमपणा असा मुळींच आढळत नाहीं. पदलालित्य, अलंकारांची यथोचित योजना, चित्तवृत्ति तटस्थ करून टाकण्यासारखी वर्णनशैली इत्यादि कवित्वास शोभा आणणारे गुण त्याच्या कवितेंत आढळत नाहींत. परंतु सत्कवीच्या कृतींत आढळणारे सहृदयता, प्रसादादि जे प्रधानगुण—कवितेचे केवळ जीव कीं प्राण होत—त्यांची प्रतीति **दासोपंताच्या** प्रत्येक पदांत व ओवींत पूर्णपणें होण्यासारखी आहे. त्याला स्वतःचें पांडित्य मिरविण्याची मुळींच हांव नसल्यामुळें तो आपला आशय जनचित्तांत पूर्णपणें ठसण्याविषयीं अगदीं साध्या नित्याच्या व्यवहारांतल्या दृष्टांतादिकांचा उपयोग करीत असे. त्याच्या कवितेचा विषय केवळ आध्यात्मिक असल्याकारणानें गांभीर्य हा गुण तींत पूर्णपणें आढळतो. त्याची एकंदर कविता शांतरसानें परिपूरित असून प्रेमळ किंवा भाविक वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या चित्तांत भक्तिभाव दृढ करणारी आहे. दासोपंताच्या कवितेचें हें असें साधें, गंभीर व प्रसादगुणयुक्त स्वरूप असूनही तींत धर्मविषयक अत्यंत गहन व उदात्त कल्पनांचें निरूपण अगदीं सहजरीतीनें केलें आहे. या आमच्या विधानाची प्रतीति त्यांच्या कवितेचें अध्ययन केल्याशिवाय यावयाची नाहीं.

दासोपंतानें आपला ‘ गीतार्णव ’ नामक प्रचंड ग्रंथ ‘ बुटेदरडी ’ नांवाच्या एका गुहेंत बसून लिहिला; व या ग्रंथाच्या रचनेस पूर्ण एक तप ह्मणजे बारा वर्षें लागलीं असें ह्मणतात. ही ‘ बुटेदरडी ’ कोठें आहे, हें ठाऊक नाहीं. **दासोपंत** व **एकनाथ**स्वामी यांचा परिचय विशेष असे. या दोघां सत्पुरुषांसंबंधी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. हा सत्पुरुष आपल्या वयाच्या ६९ व्या वर्षीं ह्मणजे शके १५३७ माघ वद्य षष्ठीस समाधिस्थ झाला. या साधुपुरुषासंबंधीं याहून कांहींच जास्त माहिती उपलब्ध होऊं नये, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे.

अलीकडे **ग्रंथमाला** व **महाराष्ट्रकवि** ह्या दोन मासिक पुस्तकांतून ज्या पांच सहा संतमालिका प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांपैकीं बहुतेकांत दासोपंताचें नांव आढळतें. यावरून हें निर्विवाद आहे कीं, संत या नात्यानें पूर्वीच्या लोकांत दासोपंताची योग्यता फारच मोठी मानली जात असे.

## दासोपंताच्या काव्यांतील कांहीं वेंचे.

**पद.** ( राग–कांबोद–मल्हार. )

पैलु कागु बोले काये ? । माझा नयनु स्पंदतु आहे ॥
दत्तु अझुनी कां नये ? । मन वेधलें, परति न लाहे ॥
वियोगु आंगीं न साहे । त्रिविधतापु बाधिताहे ॥
जा, वो ! वेगु करा, माये ! । याचे दाखवा येकुवेळ पाये ॥१॥

आतां न धरवे धीरू । लागला भवविखारू ॥
दुजा नेणें उपचारू । एकु समर्थु श्रीआदिगुरु ॥ धृ० ॥
देवो गुरू बापु, माये ! । दत्तु आत्मा, माझा सैये !
तयाची वाट मी पाहें । सर्वे जाइन, पुढती न ये ॥
आनंदु आजि वाटताहे ! भाव पालटले, गे ! बाइये ! ॥
दिगंबरीं भेटि होये, । ऐसें चिन्ह भासताहे ! ॥ २ ॥

ह्या पदांत विरहिणी नायिका, नायक जो दत्तु त्याच्या भेटीविषयीं किती उत्कंठीत झाली आहे हें फारच मजेदार रीतीनें दाखविलें आहे. येथें शृंगार संवलित भक्तिरस प्रत्येक अक्षरांत भरला आहे. वरील पद्यावरून दासोपंतही साधुश्रेष्ठ तुकारामाप्रमाणेंच प्रेमस्वरूपाच्या अत्युच ‘ मधुर ’ स्थितीसच पोंचले होते असें दिसून येतें. त्यांनीं ईश्वरासंबंधीं ‘ पति ’ अशीच भावना केली होती. प्रेमाच्या या अत्युच्च मधुरस्थितीचें वर्णन श्रीजयदेवाच्या व तुकोबारायांचे चरित्रांत केलें आहे.

**पद.** ( राग–देशी. )

सेर-खदिर-सर्प-संगति घडलीसे, चंदना ! रे ! ॥
पासीं लसनराशि, कें गुणें उरसी चंदना ? रे ! ॥
हृदय कठिण करी, परगुण न धरी, चंदना ! रे ॥
गुणा भुलसी तरि पडसील बाहेरि, चंदना ! रे ! ॥
अरे रे रे रे रे रे ! परिस तुं, सज्जना ! रे ! ॥
खळसंगु असतां साधुत्व काय उरे ? सज्जना ! रे ! ॥ धृ० ॥
शिला पानीय वरि घसणी पडलीसे, चंदना ! रे ! ॥
करवत कुठार तुजचिलागीं पैल, चंदना ! रे ! ॥
घालुनि दहनावरि पाहों पाहाती थोरी चंदना ! रे ! ॥
दिगंबरा वांचून न धरीं आन साधु, चंदना ! रे ! ॥ २ ॥

ही अन्योक्ति कितीतरी रमणीय आहे! दुर्जन संगतीपासून उत्पन्न होणाऱ्या त्रासाचें यांत किती मार्मिक विवेचन केलें आहे!

**ओंव्या.**

'चिंता पुरुषातें बंधन। चिंता जातीच मरण॥
चिंता सुखाचें छेदन। दुःखदाती॥ १॥
चिंता हृदयींचा रोगु। चिंता नाशी परम योगु॥
आंगीं लागला सुख भोगु। भोगूं नेदी॥ २॥
इंद्रियातें करी शोषण। देहावरी नये मन॥
चिंता भ्रमवी मन। नेदी विश्रांति॥ ३॥
दैन्य घडवी वदन। तटस्थ राहती करचरण॥
निमिषोन्मेष ही नयन। विसरोनी जाती॥ ६॥
कार्यातें सांडोनि करणें। उगींचि रहाती जडपणें॥
न स्फूरती विषय ज्ञानें। चिंते करितां॥ ७॥
भक्षितां न कळे अन्न। न कळे बोलतां वचन॥
मन इंद्रियां न मिळे। इंद्रियें अर्थां॥ ९॥
आंगा खुपे शेज। गंधु न कळे जाणिज॥
डोळां देखिलें मनुज। वोळखेना॥ १०॥
आगीवीण चिंता जाळी। सुखांशु अवघा गिळी॥
चिंते ऐसें भूमंडळी। दुष्ट नाहीं॥ ११॥'

—गीतार्णव.

खरोखर! चिंतेसारखा व्याधि दुसरा कोणताच नाहीं. परमार्थपर जन प्रपंचाला जे इतके भितात, त्यास मुख्य कारण चिंता आहे. चिंता काळीज खात असते. ती जीवाच्या परमार्थाचा नाश करते, ह्मणून साधुजन तीस मनस्वी भितात; आणि ही चिंता प्रपंचांत फार असते, ह्मणून त्यांस प्रपंच नकोसा वाटतो. कुटुंबी मनुष्यास किती काळजी असते आणि ती त्याचे काळजास कशी तोडीत असते, हें त्याचें त्यालाच विचारिलें पाहिजे. त्याची कल्पना दुसऱ्यास करतां यावयाची नाहीं. वरील उताऱ्यांत कवीनें चिंतेचें स्वरूप फारच उत्तम रेखाटलें आहे.

गीतार्णवाचे आरंभीं दासोपंत श्रोत्यांची विनंति करितात.—

'हें प्राकृत आरुष बोलणें। नव्हे त्रिषयो तुह्मांकारणें;॥
परंतु गीतेचेनि येणें। संबंधें आइकावें॥ १॥

स्वमति चालिला अर्थु । न कळतु गीताभावार्थु ॥
तथापि न चुके परमार्थु । ह्मणौनि आइकावें ॥ २ ॥

आतां इतकी विनंति करून देखील जर आपण माझ्या वेड्यावांकड्या बोलण्याकडे लक्ष्य देत नसाल तर—

'मीचि मातें श्रोता । मीचि मातें वक्ता ॥
मननरूपें हे गीता । विचारितु असें ॥ १ ॥
श्री अवधूताचेनि स्मरणें । बोधला अर्थु स्वानुसंधानें ॥
तो आत्मा बुद्धि बोधणें । आपुलिया मना ॥ २ ॥
ऐसा विचारु करितां । मीचि श्रोता आणि वक्ता ॥
आरंभीत असें गीता । ह्मणे दिगंबानुचरु ॥ ३ ॥
न पाहे श्रोतयांचें वदन । न करी भाष्याधारें विवरण ॥
स्वस्वानुभवें हें मन । न ह्मणौनि संपादीं ॥ ४ ॥
आइकेल तेणें आइकावें । मानेल तेणें घ्यावें ॥
नावडे तेणें नेघावें । दोहीं श्रवणीं ॥ ५ ॥

वरील उताऱ्यावरून दासोपंताच्या आंगचे निस्पृहता नम्रत्वादि गुण चांगले दिसून येतात. शिवाय त्याचेवेळीं महाराष्ट्रभाषावधूची किती अनास्था व अवहेलना होत असे हेंही कळतें. प्राकृत भाषेसंबंधी कवीनें वर काढिलेले उद्गार, ह्मणजे बिचाऱ्या महाराष्ट्र भाषेवर तत्कालीन पंडितांचा किती रुसवा होता ह्याचे द्योतक आहेत.

कुरुक्षेत्रावर दोन्ही सैन्यें येऊन भिडल्यावर मोठमोठ्या योद्ध्यांनी वीरश्री उत्पन्न करण्याकरितां आपापले शंख जोरानें वाजविले. त्या भीषणध्वनीचे योगानें चहूंकडे जी अवस्था झाली तिचें कवि वर्णन करितो.—

चौदा ही गर्जती भुवनें । पृथ्वी आणि गगन जाणें ॥
भूतें ही प्रतिनादें तेणे । स्फुरतीं जालीं ॥ १ ॥
विश्वतोमुखें नादु क्षरे । ऐसें जालें येणेंप्रकारें ॥
एवं प्रतिनादवूनि विश्व अंबरें । नादु कैसा ! ॥ २ ॥

दासोपंताच्या घेण्यासारख्या आणखी पुष्कळ रसभरित ओंव्या आहेत; परंतु त्या येथें जास्ती देण्यास अवकाश नाहीं; याबद्दल फार वाईट वाटतें.

# मुक्तेश्वर.

संतांचा कृपानुग्रह होणें फार दुरापास्त आहे. तो प्राप्त करून घेण्यास त्यांच्या चरणीं मनाची एकतानाच लाविली पाहिजे. जे केवळ दयेचे सागर, उपरतीचें माहेरघर, प्रेमगंगेचे ओघ, स्वानंदसुखाचे मेघ, परमार्थाचें सदन, भवरोगाची चिकित्सा करून त्यावर जालीम मात्रा देणारे वैद्यराज, असे हे संत कां द्रव्यानें वश होत असतात? वास्तवीक पाहिलें तर संत आणि इतर जन दिसण्यांत समसमान दिसतात; परंतु इतर जन विषयानंदांत निमग्न असतात आणि संतजन आनंदघन असून ब्रह्मानंदांत नेहमीं डोलत असतात. बगळे आणि हंस दिसण्यांत सारखेच शुभ्र दिसतात; परंतु दूध आणि पाणी वेगवेगळें करण्याचें कसब हंसाच्याच अंगीं असतें. कावळे आणि कोकिळ एकत्रच रहातात आणि वर्णांतही पण ते सारखेच असतात; परंतु वसंतऋतूंत पंचमस्वरानें गाण्याचें काम कोकीळच करितात. कस्तूरी आणि काळी चिकणमाती दिसण्यांत सारख्याच दिसतात, परंतु आपल्या सुखद परिमळानें सर्वांना संतुष्ट करण्याचें जें कस्तूरीचें काम तें मृत्तिकेच्यानें होईल काय! दूध आणि ताक सारखेंच पांढरें असतें, परंतु दुधांत जें स्वारस्य आहे तें ताकांत असतें काय? तात्पर्य संतांचें महात्म्य अनुपम असतें. संतांना उपमा संतांचीच दिली पाहिजे! अशा निरुपम संतांना अनन्यभावानें शरण गेलें असतां काय ह्मणून होणार नाहीं? मुलांना खाऊ दिला असतां ज्याप्रमाणें त्यांच्या पितरांना संतोष वाटतो किंवा एकाद्या अर्भकाला कडीं खांदीं खेळविलें ह्मणजे ज्याप्रमाणें त्याच्या मातेचें हृदय स्नेहानें आर्द्र होतें त्याचप्रमाणें संतपूजन केलें असतां प्रत्यक्ष भगवानच संतुष्ट होतो. संतानुग्रहानें अंधळे डोळस होतात, लंगडे पर्वत चढतात, मूढ वाचस्पति होतात व मुक्यांना वाचा फुटते. एकनाथमहाराजांपाशीं 'गावबा' नांवाचा एक मनुष्य होता. गावबा हा लहानपणीं अत्यंत मंद व मूर्ख असून त्याला बोलतांही येत नव्हतें. परंतु पुढें नाथांच्या सहवासानें व त्यांच्या प्रसादानें त्याला चांगलें बोलतां येऊं लागलें व तो नाथांच्या बरोबरीनें कविताही करूं लागला.

भावार्थ रामायणाच्या युद्धकांडाचे ४४ अध्याय झाल्यावर एकनाथांच्या मरणाचा समय येऊन ठेपला. तेव्हां 'माझ्या मागें गावबा ग्रंथ लिहून समाप्त करील' असें नाथांनीं आपल्या अनुयायास सांगितलें व गावबाच्या मस्तकीं हात ठेविला. पुढें एकनाथ समाधिस्त झाल्यावर गावबानें नाथांच्या आज्ञेप्रमाणें

रामायण ग्रंथ समाप्त केला. या संबंधाचा उल्लेख युद्धकांडाचे शेवटीं गावबानेच केला आहे.—

### ओंव्या.

' माझि मिरासी मूर्खपण । नेणें पदबंध व्याख्यान ॥
माथां हात ठेवोनि जनार्दन । वदवी रामायण निज सत्ता ॥१॥
जनार्दनाची कृपा ऐसी । मूर्खा हातीं रामायणासी ॥
वदविलें रामकथेसी । कृपा ऐसी संताची ॥ २ ॥
सद्गुरुची कृपा घडे । तैं पांगूळ पर्वत चढे ॥
एकनाथें तेणें पाडे । केलें रोकडे मजसरतें ॥ ३ ॥

युद्धकांड. अ. ९२.

अशाप्रकारें उपजत मूढ असून पुढें संतांच्या कृपानुग्रहानें विद्वान झालेल्यांचीं अनेक उदाहरणें देतां येतील. प्रस्तुत चरित्रनायकाच्या चरित्रांत ही अशाच प्रकारचा चमत्कार वाचकांच्या दृष्टीस पडेल.

मुक्तेश्वराचा जन्म शके १५३१ ह्मणजे इ. स. १६०९ त झाला. त्याच्या आईचें माहेरचें नांव गोदावरी, सासरचें नांव गंगाबाई, आणि एकनाथानें प्रेमानें ठेवलेलें व मुक्तेश्वरानें बोबडेपणीं उच्चारलेलें लाडके नांव लीला होतें. भागवतश्रेष्ठ एकनाथानें आपल्या मुलीचें लाडकें नांव परमेश्वराची दुहिता जी माया तिच्या टोपण नांवावरून ठेवावें हें साहाजिक आहे. मुक्तेश्वराच्या बापाचें पाळण्यांतील नांव चिंतामणी व लौकिकांतील नांव विश्वंभर होतें. मुक्तेश्वर ह्या टोपण नांवाचा वारंवार उल्लेख करितो. परंतु आईचें नांव अगोदर व बापाचें नांव पाठीमागून असा क्रम मुक्तेश्वराचे सर्व काव्यांत आढळतो असें होण्याचें कारण काय असावें कांहीं कळत नाहीं; कदाचित् तो आईचा अतिशय लाडका असावा, किंवा त्याचें तशी आईवर पराकाष्टेचें प्रेम असावें असें वाटतें. मुक्तेश्वराचें गोत्र अत्रि व सूत्र अश्वलायन असावें. त्याचे उपनांव मुद्गल होतें असें ' तो मुद्गल चिंतामणिसुत ' ह्या सभा पर्वाच्या उपसंहारांतील तिसऱ्या ओवीच्या प्रथम चरणावरून दिसतें. मुक्तेश्वराचें मूळगांव पैठण हें होतें व त्याचा जन्महीं पण तेथेंच झाला. त्याचें सर्व बाळपणचें शिक्षण नाथांपाशींच झालें. तो जन्मतः मुका होता, पण नाथांनीं आपला वरदहस्त त्याचे मस्तकीं ठेवुन त्याला वाचा दिली अशी एक आख्यायिका आहे व तिला त्याचा दाखलाही पण आहे. मुक्तेश्वरानें श्रीएकनाथमहाराजांवर दोन तीन आर्या केल्या आहेत; त्यांपैकीं एकींत तो ह्मणतो.—

'कोणे मुक्या हातीं रामायण वदवी । समुद्रवलयांकित श्री कोणाची झाली ॥ ऐसा अगम्य महिमा जाणती अनुभवी । भावें मुक्तेश्वर वांछित पदपदवी ॥ जयदेव जयदेव जय एकनाथा । सज्जनवृंदामाजीं देखों अधिकता ॥ ध्रु० ॥ ६ ॥'

मुक्तेश्वराच्या बालपणाविषयीं याहून जास्त फारशी माहिती मिळत नाहीं. एवढें मात्र खचीत कीं, त्याचें शिक्षण तुटपुंजें झालें नसून तें चांगलें झालें होतें असें त्याच्या ग्रंथांवारून निदर्शनास येतें. तो जाडा पंडित होता. वेद-शास्त्रांचें अध्ययन त्यानें उत्कृष्ट केलें होतें. त्याचप्रमाणें संस्कृत काव्यनाटकादि ग्रंथांशींही त्याचा दृढ परिचय होता.

'सांप्रत आपल्यासमोर असलेल्या विद्याभ्यासाचें क्षेत्र पूर्वीच्या विद्याभ्यासाचे क्षेत्रापेक्षां फारच अवाढव्य आहे. तें सर्व ओलांडून जाणें हें तर मनुष्याच्या एका जन्माला दुःसाध्यच आहे पण त्यांपैकीं एकाद्या भागाचें यथासांग आक्रमण होणेंसुद्धां दुरापास्त आहे. विद्याभ्यासाचें मान सध्यां फार वाढलें आहे खरें परंतु या सर्व विद्या जड व क्षणभंगुर असून त्या भौतिकसुख देणाऱ्या आहेत. आपल्या देशांतील लोकांनां सध्यां जें शिक्षण मिळत आहे तें सर्व भौतिक आहे. याहून उच्च अशा पारमार्थिक सुखाच्या प्राप्तीचें शिक्षण सध्यां मुळींच मिळत नाहीं. पूर्वीचा प्रकार फार निराळा होता. सर्व लोकांस विशेषतः ब्राह्मणांस धार्मिकशिक्षण प्रथम काळजीपूर्वक देण्यांत येत असे. मौंजिबंधन झाल्यानंतर प्रथमतः नित्याचारासंबंधीं विषयांचें अध्ययन करण्याची वहिवाट सर्वत्र होती. वेदाभ्यास सांगोपांग करणें किंवा न करणें, ही गोष्ट जरी विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेवर अवलंबून होती तरी नित्यनैमित्तिककर्म व थोडासा संस्कृत भाषेचा अभ्यास, बाळबोध व मोडी लिहिणें, इतकें शिक्षण उच्चवर्गीतील बहुतेकांस मिळत असे. ब्राह्मणानें किंवा इतरांनीं आपापल्या धर्माप्रमाणें वागावें, या निर्बंधामुळेंच भौतिकविषयांच्या शिक्षणापेक्षां पारमार्थिकशिक्षण आपोआपच जास्त मिळत होतें; तात्पर्य संस्कृताचा अभ्यास ब्राह्मणामध्यें तरी निदान जारीनें सुरू होता. ज्ञानेश्वरमहाराजांनीं सोळा वर्षांच्या आंत शंकराचार्यांचें भाष्य समजण्या इतका अभ्यास करून बावीस वर्षांचें वय होण्यापूर्वी आपले भावार्थदीपिकादि अद्वितीय ग्रंथ निर्माण केल्याची प्रसिद्धि आहे. नाथांचीही अशीच गोष्ट आहे. रामदासांचाही तोच प्रकार. आतां समर्थांच्या ग्रंथावरून ते जाडे विद्वान् होते असें जरी ह्मणतां येणार नाहीं, तथापि 'उपनिषदें आणि भागवत'

यांच्यासारखे कठीण ग्रंथ त्यांस चांगले परिचित होते असें ह्मटलें पाहिजे; आणि त्याप्रमाणें त्यांनीं दासबोधाचे आरंभीं पहिल्याच दशकांतील पहिल्याच समासांत स्पष्ट सांगितलें आहे. हीं तरी फार मागचीं उदाहरणें झालीं. अगदीं अलीकडचीं ह्मणजे पेशवाईतलीं कां पहाना! नानासाहेब पेशव्यांचे-वेळीं ह्मणजे पेशवाईचे ऐन अमदानींत पूर्ववयांत संस्कृताचा जारीनें अभ्यास करण्याची प्रवृत्ति होती. नानासाहेबांनीं त्यांचा कनिष्ठ बंधु रघुनाथराव यांस पाठविलेल्या पत्रांत रघुवंश व चाणाक्यसूत्र यांचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याविषयीं लिहिलें आहे. वास्तवीक पाहिलें तर पेशव्यांचा शिपाइगिरी हा मुख्य बाणा, त्यांना चाणाक्यसूत्राचा अभ्यास जरी अवश्य होता, तरी रघुवंशासी त्यांस कांहीं कर्तव्य नव्हतें. यावरून पेशवाईचे स्वराज्यांत संस्कृताचा अभ्यास करण्याकडे लोकांचा बराच कल होता असें ह्मटलें पाहिजे.'

असो. तात्पर्य काय कीं, मुक्तेश्वर हा चांगलाच संस्कृतमर्मज्ञ होता; आणि याला दुसरा पुरावा असा कीं, मराठी भाषेंत महाभारताचीं अठरा वीस कवींनीं भाषांतरें अगर रूपांतरें केलीं आहेत, पण मुक्तेश्वरी भारताची गोडी, वर्णनशैली व योग्यता एकालाही लागत नाहीं.

पूर्वसांप्रदायानुरूप मुक्तेश्वरानें सर्व तीर्थयात्रा केल्या असाव्या असें त्याचे ग्रंथांवरून दिसतें. हल्लींच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें हल्लींची यात्रापद्धतीही बदलली आहे. हल्लीं जसें सर्व देशभर लोहमार्गाचें जाळें पसरलें आहे तसें पूर्वी नव्हतें; व त्यामुळें पूर्वींच्या यात्रेकरूंना सर्व यात्रा पायींच कराव्या लागत. अशाप्रकारें पायीं यात्रा केली असतां ती ज्ञानप्राप्तीस कारणीभूत होते. त्यांतल्यात्यांत पुनः एकाकीं व निष्कांचन स्थितींत केलेली यात्रा जास्त फायदेशीर होत असेल यांत संदेह नाहीं; कारण सर्वप्रकारच्या आधिभौतिक दुःखांचा यांत अंशतः तरी अनुभव येतो. देशस्थितीचें चांगलें ज्ञान होतें. निरनिराळ्या लोकांचे आचारविचार कळतात. त्यांच्या स्वभाववैचित्र्याची माहिती कळते. सृष्टचमत्कारांचें सूक्ष्म निरीक्षण करण्यास सांपडतें; व तें पाहून मन थक्क होतें आणि ईश्वराच्या कर्तबगारीची धन्यता वाटून साहजीकच त्याच्याविषयीं विचार करण्याकडे मनाचा कल झुकतो. आतां विरुद्धपक्षीं पैशाचेठिकाणीं दोन पैसे खर्च करून प्रवासाचें दुःख होऊं न देण्याविषयीं झटणाऱ्या हल्लींच्या चैनी यात्रेकरूंस तीर्थयात्रेपासून पुण्यावांचून दुसरे फायदे कांहींच होत नाहींत, असें ह्मटलें तरी चालेल व तें पुण्य तरी कितीसें संग्रहीं पडत असेल हा प्रश्नच आहे; कारण हल्लींची बहुतेक मंडळी केवळ लोकांनीं चांगलें ह्मणावें ह्मणूनच धर्मपरायणतेच्या व दांभिकत्वाच्या पोकळ

पांघरुणाखालीं यात्रा करितात! 'चारी धाम यात्रा करून आलेल्या आधुनिकांस जर देशासंबंधीं प्रश्न केले, तर त्यास आगगाडीच्या पोर्टर तिकिटकलेक्टरांच्या व तीर्थस्थळांतील पोलिसच्या बंदोबस्ताच्या गोष्टींशिवाय इतर गोष्टींबद्दल कांहीं देखील बोलतां यावयाचें नाहीं!' परंतु मुक्तेश्वरानें चित्त, डोळे व कान उघडे ठेवून भरतखंडभर तीर्थयात्रा केली होती व त्यामुळें त्याची प्रतिभा उज्वळ झाली होती आणि ईश्वरभक्तिही पूर्णपणें बाणली होती. याचा परिपाक त्याच्या काव्यांत जागोजाग चांगल्याप्रकारें दृष्टीस पडतो.

मुक्तेश्वरानें आपल्या बापापासूनच गुरूपदेश घेतला होता. तो दत्तोपासक होता कारण त्याच्या समाधीवर सांप्रदायानुरूप श्रीशंकरांची पिंडी किंवा विठ्ठल रखुमाईच्या मूर्ति नसून **दत्तात्रेयाचीच** मूर्ति आहे. शिवाय त्यानें त्याबद्दल भारतांत अनेकठिकाणीं उल्लेखही केला आहे. तथापि त्याच्या पितृवंशाची कुलस्वामिनी कोल्हापुरची **जगदंबा** होती; व याबद्दल त्यानें वनपर्वाच्या उपोद्घातांत उल्लेख केला आहे. मातृवंशाकडील कुळस्वामी सोनारीचा **भैरवनाथ** हा होय. मोरोपंताचाही हाच कुलस्वामी होता. श्रीभैरवनाथाचें विख्यात मंदिर करमाळ्यापासून पंधरा मैलांवर आहे. चैत्र कृष्णपक्षांत सोनारी गांवीं दहा वीस हजारापर्यंत यात्रा भरते. सभामंडप देवगावच्या पाटलांनीं शके १६८० मध्यें बांधला. निंबाळकरांकडून या मंदिरास मागें मोठें उत्पन्न होतें. सध्यां सुमारें सातशें रुपये साल आहे. या भैरवनाथावर मुक्तेश्वरानें एक सुंदर आरतीही केली आहे; ती पुढें उताऱ्यांत दिली आहे.

मुक्तेश्वर गृहस्थाश्रमी होता. त्याला **निरंजन** नांवाचा एक मुलगा होता. त्याचा वंश अद्याप सुरू आहे. मुक्तेश्वराचे वंशज कविता करीत असत. रा. **भाऊबोवा तेरवाडकर** ह्मणून एक सद्गृहस्थ कोल्हापुरांत रहात असतात. ते मुक्तेश्वरांच्या वंशजांपैकीं एकाच्या मुलीचे वंशज आहेत. त्यांच्या संग्रहीं मुक्तेश्वराच्या वंशजांचीं काहीं काव्यें आहेत असें ऐकिवात आहे. वर दिलेल्या हकीकतीपेक्षां मुक्तेश्वरासंबंधी जास्ती कांहींच माहिती उपलब्ध नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. कृष्णातटाकीं, वाडी, औदुंबर वगैरे स्थळीं दत्ताचा साक्षात्कार जागृत असल्यामुळें, मुक्तेश्वर यात्रेच्या निमित्तानें नरसोबाच्या वाडीस आला असतां त्याचा काळ वाडीपासून अडीच मैलांवर असणाऱ्या **तेरवाडास** झाला. मृत्युशक उपलब्ध नाहीं. तेरवाड येथें पंचगंगेच्या तीरीं मुक्तेश्वराची समाधि बांधिली आहे. ही समाधि पूर्वीं अगदीं उघडी होती. सध्यां ह्मणजे अलीकडील पांचपन्नास वर्षांत मुक्तेश्वराच्या वंशजानीं तिजवर छप्परवजा एक खोपट बांधिलें आहे. हें खोपट पावसापाण्यापासून समा-

धीचा बचाव व्हावा ह्मणून बांधिलेलें नाहीं. कारण, गंगेला महापूर आला असतां त्या छपराचा कांहींएक उपयोग होण्यासारखा नाहीं. नंदादीप लावण्यास व पूजाअर्चा करण्यास सुलभ जावें ह्मणून हें छपर उभारलेलें आहे. मुक्तेश्वराचे वंशज जे तेरवाडचे इनामदार ते या समाधीपुढें सभामंडप चढविणार आहेत असें समजतें.

मुक्तेश्वरकविपासून चवथा पुरुष मुक्तेश्वरबुवा त्याला कोल्हापूरच्या शंभुछत्रपतीनें थोरल्या मुक्तेश्वराच्या समाधीची पूजाअर्चा, उत्साह, ब्राह्मणसंतर्पणादि करण्याकरितां शके १६४९ ह्मणजे इ. स. १७२७ प्लवंग संवत्सरीं वरील गांव इनाम करून दिला. तो अद्याप त्यांच्या वंशजाकडे आहे.

मुक्तेश्वराच्या अंगीं कविताशक्ति चांगली होती. त्याची वर्णनाची शैली प्रौढ असून त्याच्या वाणींत माधुर्य हा गुण विशेष आहे. त्यानें सबंध भारत प्राकृतांत केलें होतें परंतु त्यांपैकीं पहिलीं चार पर्वें मात्र हल्लीं प्रसिद्ध आहेत. अलीकडे सौप्तिकपर्वही सांपडलें आहे. त्यानें प्राकृत रामायणही केलें आहे. हेंही इतके दिवस अनुपलब्ध होतें; परंतु तें आतां मुद्रित होऊन प्रसिद्ध झालें आहे असें ग्रंथमालेवरून कळतें. शतमुखरावणाख्यान व शुकरंभासंवाद हीं दोन प्रकरणेंही छापून प्रसिद्ध आहेत. तसीच त्यानें भागवतावरही सुंदर आणि रसभरित अशी प्राकृत टीका केली आहे असें ह्मणतात; पण तो ग्रंथ अद्याप अनुपलब्ध आहे. हे सर्व ग्रंथ ओंविबद्ध आहेत. त्यानें कांहीं पदें, आरत्या, भूपाळ्याही केल्या आहेत.

मुक्तेश्वराप्रमाणें रसाळ आणि व्याकरणशुद्ध अशा ओंव्या दुसऱ्या कोणत्याही कवीच्या नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. त्याच्या कवितेंत शृंगार, वीर आणि करुणा हे रस चांगले साधले आहेत. उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत इत्यादि अर्थालंकारही त्याच्या कवितेंत पुष्कळ आढतात.

इतर कवींप्रमाणें यानेंही आपल्या ग्रंथांत कालनिर्देश केला नाहीं; तरी पण त्याच्या भारताच्या अंतर्गत प्रमाणांवरून त्याचा काळ कांहींसा ठरवितां येतो.

'मुक्तेश्वराच्या काव्यांत पश्चिममहाराष्ट्रांतील त्यावेळच्या राज्यक्रांतीचा दूरचा असा एकच अस्पष्ट उल्लेख आहे. मुक्तेश्वर भारत लिहित असतां शिवाजीची सत्ता त्याला दृग्गोचर झाली नव्हती इतकेंच नव्हे तर तिची वार्ताही त्याला नव्हती असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. शिवाजीच्या चळवळीचा असा काळ ह्मटला ह्मणजे इ. स. १६६० चे पूर्वीचा होय. अर्थात् मुक्तेश्वरानें आपलें भारत इ. स. १६६० चे सुमारास लिहिलें

असावें. काव्यें लिहिण्याचेवेळीं शिवाजीची चळवळ लक्ष्य वेधण्यासारखी असती, तर मुक्तेश्वरानें तिचा नामनिर्देश खास केला असता, कारण त्यानें १६५० च्या सुमारास दुसऱ्या कित्येक क्षुल्लक गोष्टींचा उल्लेख केला आहे. आदिपर्वाच्या पंधराव्या अध्यायांत खालील ओंव्या आहेत —

'वर्णव्यवस्था जया देशीं । कुमारीखंड ह्मणिजे तयाशीं ॥
म्लेच्छमंडळ सिंधुप्रदेशीं । एक वर्ण नर तेथें ॥ १ ॥
अष्टादश आणि बावन्न । उत्तम, मध्यम, कनिष्ठ वर्ण ॥
यांहीं वसविले देश संपूर्ण । भोगिता तो एक नरनाथ ॥ २ ॥
यावेगळे एक वर्णी । सिंधुपरिसरीं सिंधुस्थानीं ॥
मंडळें भरिलीं बहुत यवनीं । तेथेंही स्वामित्व तयाचें ॥ ३ ॥
जावी, जंगी, फिरंगी, क्रूर । नाई, इंग्रेज, मल्लोबार ॥
काबे, कावटे, कंकम, खर । जळतस्कर मांसाशी ॥ ४ ॥
रूमशाम, खोरासान । मुलतान, हबसान, अर्बस्थान ॥
उजबेख, पठाण तुर्कमान । बदकशान, मेवात ॥ ५ ॥
घोडेमुख धेनूमुख । सूकरमुख, रासभमुख ॥
वानरमुख ऋक्षमुख । मानवहार जयांचा ॥ ६ ॥

आदिपर्वाच्या चाळीसाव्या अध्यायांत खालील ओवी आहे.—

एक फिरंगी रक्तवर्ण । खुरासनी पांडुरवर्ण ॥
बर्बर जन्मले कृष्णवर्ण । स्थूल घ्राण लंबोष्ठ ॥ १ ॥

ह्याप्रमाणें मुक्तेश्वरानें जावी ह्मणजे डच, फिरंगी ह्मणजे पोर्तुगीज, इंग्रेज, काबे ह्मणजे उखामंडळांतील वाघेर, काठे ह्मणजे काठेवाडी, कंकमखर ह्मणजे कोंकणांतील चांचे, घोडे, गायी, डुक्कर, गाढव, माकड, आस्वल वगैरे जनावरांचे मुखवटे घालणारे तुर्कस्थानांतील लामा लोक—अशा नानाप्रकारच्या लोकांचा उल्लेख केला आहे. यावरून असें दिसतें कीं, कोळवण, कऱ्हाड, करवीर, ठाण्याजवळचे सोपारे, मलबार, कर्नाटक, मल्याळ वगैरे दक्षिणेंतील व महाराष्ट्रांतील देश त्याला माहित होते; व या प्रांतांतून हिंडतांना त्याला ह्या म्लेंच्छलोकांच्या दुष्टस्वभावाची माहिती प्रत्यक्ष किंवा कर्णोपकर्णीं तरी निदान झाली असावी, ह्यांत संशय नाहीं. ज्या अनेक लोकांचीं नांवें मुक्तेश्वरानें दिलीं आहेत, त्यांपैकीं कित्येक त्यानें सुरत, दाभोळ वगैरे शहरीं पाहिले असावे असें दिसतें; व याचा प्रमाणही आहे. फिलिफ अंडर्सन नामक एका इंग्लिश गृहस्थानें 'दि इंग्लिश इन् वेस्टर्न

इंडिया ' नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत तो सुरतेसंबंधीं असें ह्मणतो कीं, ' नानाप्रकारच्या लोकांनीं गजबजलेलें असें सुरतेसारखें शहर साऱ्या दुनियेंतही दुसरें कोणतें नसेल. इथल्या बाजारांत गुजराथी आणि मराठे लोक दिसतात इतकेंच नाहीं तर सिंधी, पारशी, आरबी, अर्मेनियन्, इराणी, यहुदी, इंग्लिश, डच आणि पोर्तुगीज असे भिन्न भिन्न राष्ट्रांतील लोकही दिसतात. ' तात्पर्य काय कीं मुक्तेश्वरानें आपल्या तीर्थयात्रेच्यावेळीं जे जे देश व लोक पाहिले त्यांचीं नावें त्यानें आपल्या भारतांत गोंविलीं आहेत. कोळवण, मळबार, कोंकण हीं नावें मूळ भारतांत नाहींत, पण तीं मुक्तेश्वराच्या भारतांत आहेत. अत्यंत जुन्या गोष्टींसंबंधीं कोणी कवि लिहूं लागला तरी तो आपल्या वेळच्या कोणत्या तरी गोष्टींचा समजून किंवा न समजून उल्लेख करितो. मुक्तेश्वराचीही गोष्ट अशीच आहे. इंग्रेज, पोर्तुगीज, डच, डफ्रेंख, पठाण हीं मूळ भारतांत नसलेलीं नावें मुक्तेश्वराच्या भारतांत आलीं आहेत. ह्या उल्लेखांवरून मुक्तेश्वरांचा काळ नक्की ठरवितां येतो; व तो काळ ह्मणजे १६६० चे आंत बाहेर असला पाहिजे.

याला आणखी एक दुसरें प्रमाण असें आहे कीं, इंग्रेज, डच, फिरंगी या नांवांचा जसा हा कवि वारंवार उल्लेख करितो तसा तो फ्रेंचलोकांसंबंधीं एकदांसुद्धां करीत नाहीं. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, मुक्तेश्वराचेवेळीं फ्रेंचलोक हिंदुस्थानांत आले नव्हते. प्रसिद्ध फ्रेंचमुत्सद्दी कोल्बर्ट यानें फ्रेंच इंडिया कंपनी इ. स. १६६४ त स्थापिली व फ्रेंचलोकांनीं आपली पहिली वखार सुरतेस इ. स. १६६८ त घातली. एका फ्रेंच ह्मणजे फुरांशिस कस्तानानें श्रीशिवाजीमहाराजांना एक पत्र पाठविलें. तें पत्र ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' नामक पुस्तकाच्या आठव्या खंडांत छापिलें आहे. तें इ. स. १६६८ च्या नंतरचें आहे. तेव्हां ज्याअर्थीं मुक्तेश्वर फ्रेंचलोकांचा उल्लेख इंग्रेजलोकांबरोबर करीत नाहीं त्याअर्थीं ते लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच किंवा फार तर ते लोक आल्यावर थोडक्याच दिवसांनीं या कवीचा काळ झाला असावा असें ह्मणणें भाग पडतें.

पुन: तिसरें प्रमाण असें कीं, श्रीसमर्थ रामदासस्वामींच्यावेळच्या प्रसिद्ध कवींचीही नावें मुक्तेश्वराच्या कवितेंत आढळत नाहींत. फक्त ज्ञानेश्वरांचा, एकनाथाचा व जनार्दनपंताचा उल्लेख मुक्तेश्वर करितो. देहूकर तुकारामबोवांची माहिती त्याला नव्हती. पंढरीच्या विठोबाचा व वाडीच्या दत्ताचा उल्लेख तो करतो; परंतु देहूहून पंढरीस वाऱ्या करणाऱ्या तुकोबाची माहिती त्याला नव्हती. ह्यावरून इ. स. १६४९ च्या अगोदर त्यानें भारत लिहिलें

असावें असें वाटतें. इ. स. १६४९ त तुकोबाराय स्वर्गस्थ झाले. नंतर पुढें तुकोबांची कीर्ति दहावीस वर्षें पसरत चालली व ती पसरत असतां तिचा पल्ला आपल्यापर्यंत येऊन पोहोंचण्याला हा कवि जिवंत नव्हता असें दिसतें.

हीच गोष्ट आणखी एका प्रमाणानें सिद्ध करितां येते. आदिपर्वांतील २१ व्या अध्यायांत मुक्तेश्वरानें निरनिराळ्या देशांतील युद्धपद्धतीचें वर्णन केलें आहे. त्यांत खालील ओंव्या आहेत.

'शिंगणी चापीं शरसंधान । उत्तरदिशेचें युद्ध दारुण ॥
करकाठिया खेंचणें प्राण । गौड युद्ध या नांवें ॥ १ ॥
सलंब भाले कोपरखेडी । गर्जतां झुंजती इडेपाडी ॥
दे अभिचार युद्धप्रौढी । क्षात्रधर्मी बोलिले ॥ २ ॥
खेटक करवाळें सतेज । सूड साधनी विशाळ पैज ॥
त्या नांवें महाराष्ट्र झुंज । खंडिताही न खंडे ॥ ३ ॥
कटी कटारे तडक हातीं । उघड आंगीं सत्वरगती ॥
तें कर्णाटकयुद्ध ह्मणती । रणपंडित निर्धारें ॥ ४ ॥
आपादमस्तकावरी ओढण । आड करूनि परतें मारण ॥
तैलंगयुद्ध तें जाण । आंध्रदेशस्थ बोलती ॥ ५ ॥
लोहवृश्चिक वाम करीं । सव्य असिलता दुधारी ॥
मारीत लोटणें पुढारी । बर्बरयुद्ध या नांवें ॥ ६ ॥
करीं यष्टी अर्धचंद्राकार । तेंचि करूनि हत्यार ॥
दक्षिण समुद्रीं प्रखर । कर्णफाटे झुंजती ॥ ७ ॥
नौकायानीं यंत्रमारें । पोत भंगिती पाणीमारें ॥
वातवेगीं पळावें त्वरें । फिरंगीयुद्ध या नांवें ॥ ८ ॥

तसेंच आदिपर्वाच्या २१ अध्यायांत कवि ह्मणतोः—

'श्रीरंगपट्टण शिवकांची । समुद्रवासी गडवासियांचीं ॥
स्थळें जिंकून दुर्जनांचीं । अपार वस्तू आणिल्या ॥ १ ॥'

वरील उताऱ्यांत महाराष्ट्रांतील लोक शत्रूचा सूड उगविण्याच्या कामीं विशाळ पैज मारतात, लखलखीत पाणीदार तरवारींनीं लढतात आणि खंडताही खंडले जात नाहींत असें सांगितलें आहे. तेलंगीलोक धनुष्यानें, बर्बर लोक वाघनखानें व फिरंगीलोक गलबतावरील तोफांनीं झुंजतात, असा पुढील ओंव्यांचा अर्थ आहे. आतां शिवाजीनें १६६० च्या पुढें गलबतें, तोफा, घोडे, गड, वाघनखें, तरवारी, भाले व क्वचित् तिरकमठे, या सर्वांचा

उपयोग केलेला प्रसिद्ध आहे. १६६० च्या पुढें, इतकेंच नव्हे तर १६५९ त अफझुलखानाचा मोड झाला त्यावेळीं जर मुक्तेश्वर असता तर महाराष्ट्र युद्धाचें त्यानें दिलें आहे त्याहून निराळें वर्णन दिलें असतें. तशांत मुक्तेश्वर ह्मणजे तुकारामासारखा शांत कवी नव्हता. महाराष्ट्रांत तुकारामाच्या भोंवतीं शिवाजीची चळवळ चालली असतां सामाजिक व धार्मिक विषयांतच तो गढून गेलेला होता. तुकारामाप्रमाणें मुक्तेश्वर नुसत्या मानसिकसुख-दुःखाचेंच जाळें विणीत बसणारा नव्हता. मुक्तेश्वरानें सर्व भरतखंड दृष्टीनें पाहिलें असून, निरानिराळे देश व परदेशांतील म्लेंच्छ यांचीं वर्णनें, प्रसंगीं सहेतुक विशेषणांचा उपयोग करून देण्याइतकें त्याचें मन संस्कारक्षम होतें. त्यावेळीं शिवाजीच्या उदात्त पराक्रमाची वार्ता जर त्याच्या ध्यानांत येण्यासारखी मोठी असती, तर तिचा उल्लेख त्यानें आपल्या काव्यांत, सहेतुक विशेषणांच्या रूपानें किंवा तुलनेच्या ओघांत सहज केला असता; परंतु मराठ्यांच्या व मावळ्यांच्या पराक्रमांचा उल्लेख करण्याच्या ऐवजीं गडवासियांची ह्मणजे डोंगरी किल्ल्यांवरील मावळ्यांची गणना तो दुष्ट अशा दुर्जनांत करतो. अर्थात इ. स. १६५० किंवा १६४० च्या अगोदर मावळांतील किल्यावरील मावळेलोक मुक्तेश्वराला 'प्रवाशी' या नांवानेंच माहीत होते. मुक्तेश्वराच्या कारकीर्दींत पैठण कांहीं वर्षें अहमदनगरच्या पातशाहींत व कांहीं वर्षें विजापुरच्या पातशाहींत मोडत असे. ह्या दोन्ही पातशाहींच्या अमलांत सह्याद्रीच्या किल्ल्यावरील लोक लहानसहान बंडाळी करीत; तिचा उल्लेख मुक्तेश्वरानें आदिपर्वाच्या २१ व्या अध्यायांतील २७ व्या ओवींत केला आहे. सारांश मुक्तेश्वराचें भारत १६५० चे आधीं लिहिलें गेलें व त्याचा अंतही पण ई. स. १६६० चे सुमारास झाला असें ह्मणावें लागतें.

मुक्तेश्वराची व त्याच्या कवितेची प्राकृत कवीश्वरांनीं पुष्कळ प्रशंसा केली आहे.—

'जे चातुर्य-राजधानीचे कळस । मुक्तेश्वर मुद्गलदास ॥
ज्याचे ग्रंथ पाहतां सु-रस । ब्रह्मानंद उचंबळे ॥ १ ॥'

—श्रीधर.

'श्री मुक्तेश्वर कवि-वर यातें कोण न शुभेच्छु वंदील! ॥
वंदीं लक्ष जयाचें, ज्याचें यश भव्य जेंवि मंदील ॥ १ ॥
मुक्तेश्वरकृत भारत आवडतें विठ्ठलासि कीं पर्व ॥
सर्व श्रवणें हरितें आशा कविंच्या अशेष ही गर्व ॥ २ ॥'

—मोरोपंत.

'जो चातुर्याचा निशाकर । कीं विवेकसागरींचा पोहगार ॥
तो कवि प्रसिद्ध मुक्तेश्वर । तयासी नमस्कार सद्भावें ॥ १ ॥'

—महीपती.

---

## मुक्तेश्वराचे कवितेंतील वेंचे.

### भूपाळी.

उठिरे गोपाळा ! उघडी स्वरूप लोचना । सरली अविद्याराती उदय झाला रविकिरणा ॥ इंद्रिय-गोधन नेई निर्गुण कानना । सुटलीं मानस वत्सें तुजविण नाकळती कोणा ॥ ध्रु० ॥ प्रबोध पहांट झाली सरले तिमिर तम-रज । गुरुकृपेचा अरुण दावी सुरंगसम तेज ॥ आत्मादिनकर पाठीं प्रकटे तात्कालिक सहज ! । जिवचंद्राचें मंडळ तेणें झालें निस्तेज ॥ १ ॥ दृश्यभास चांदणिया असते ठायिच लोपलिया । लिंगदेह कमळींचे मधुकर सुटले आपसया । बुद्धिबोध चक्रवाकें मिनली आपाणियां ॥ देहबुद्धि कुमुदिनी सुकोनी गेलीसे विलया ॥ २ ॥ योगविद्येच्या पंथें साधकवृंदें चालियलीं । उपनिषद्भागार्थ शब्द केला कोकिळीं । वाग्वादाचे उलूक निघती मौनाचे ढोलीं । विकल्प अटवी साही चोरी सांडियली ॥ ३ ॥ विरागरश्मी जवळीं धरितां चित्त रविकांत । आत्मा वन्हि प्रकटे विषयवन हें जाळीत ॥ तृष्णेच्या श्वापदावरी प्रळय अद्भुत । विश्व हें लटिकें मूढां मृगजळवत ॥ ४ ॥ जार व्यसनीं जिव हा झाला उदर्मी सुविचार । वासना कुंटिणीचा सहजे खुंटला व्यापार ॥ लीन श्वंभर स्वामी उठिला सत्वर । चाले मुक्तेश्वर संगीं धरूनियां कर ॥ ५ ॥

वरील भूपाळींत मुक्तेश्वराच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें रूपक फारच सर्वोत्कृष्ठ साधलें आहे. यांतील मथितार्थ असा आहे कीं, 'हे इंद्रियचालका ! गोपाळा ऊठ व आपले स्वरूपलोचन उघड. अविद्या ऊर्फ मायारूप रात्र संपून ज्ञानरूप सूर्याचीं किरणें उदय पावलीं आहेत. इंद्रियरूपी ओढाळ गुरें निर्गुण अरण्यांत घेऊन जा. विषयेंद्रियसंयोगानें पुष्ट होणारीं मानसरूपी वांसरें तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला आकळत नाहींत. 'मी जड नव्हें, आत्मा आहें,' या बोधाचा उदय झाला व अज्ञानांधकार विलयाला गेला. गुरुकृपेचा अरुणोदय होऊन आत्मस्वरूप सूर्याचा प्रकाश

फांकला; व मी ब्रह्म आहे हा अनुभव येतांच जीवरूपी चंद्राचें जीवपण मावळलें. ब्रह्मतेज नेत्रांत कोंदल्यामुळें दृश्यसृष्टिरूपी चांदणें दिसेनासें झालें. लिंगदेहरूप कमलांतील आत्मारूपीं भ्रमर सहज खुले झाले. बुद्धि व अहमात्मारूप चक्रवाकयुग्माची अहंकारानें ताटातूट केली होती पण सुदैवानें त्यांचें ऐक्य झालें. आत्मबुद्धिरूप सूर्योदय होतांच देहबुद्धिरूप कमलिनी कोमेजून गेली, साधकवृंदांनीं योगमार्गाचा आश्रय केला. उपनिषदरूप कोकिलांनीं गायिलेल्या परमतत्वाचा बोध होतांच वाग्वादरूपीं दिवाभीतें सहजच पळून गेलीं. विकल्परूप अरण्यांत दडून बसलेले कामादि सहा चोर निघून गेले. वैराग्यरूप सूर्यकिरणांत चित्तरूप रविकांतमणि धरतांच आत्मारूप अग्नि प्रकट झाला व त्यानें हें विषयारण्य जाळून टाकिलें. तृष्णारूप श्वापदांवर अद्भुत प्रळय ओढवला; तात्पर्य आत्मतृप्तीमुळें तृष्णा नाहींशी झाली. जग मृगजळासारखें लटकें भासूं लागलें. जार व्यसनांतच गुंग झालेला हा जीव आतां सुविचाराचा व्यापार करूं लागला; व जन्ममृत्यूंच्या येरझारा घालणाऱ्या वासनारूप कुंटिणीला सहजच कांहीं धंदा राहिला नाहीं. असें होतांच लीलाविग्रही विश्वंभरस्वामी उठून उभा राहिला व मुक्तेश्वर त्याचा हात धरून चालूं लागला.

## पद.

सांग पा वैराग्य कोठें रे। सर्व विटंबिलें पोटें रे॥ धृ०॥ बाइल सांडून शिष्यिण मेळविली। घर सांडून मठ माया रे। सोदर त्यागुनि शिष्याचि भावसे। जिविकेसि घातला पाया रे। उदिम सांडुनि भिक्षेसी हिंडणें देशाउरी दंड काया रे ॥ २ ॥ सावण सांडुनि गेरूसि नाशिलें संन्यास घेतला काचा रे । मिष्टान्न भिक्षे लागुनि धांवती जिव्हा वेधली त्यांचा रे। करूंनयेतें झांकून करिती सर्व ब्रह्म म्हणती वाचा रे। लीलाविश्वंभर नेणवे जंववरी। मोक्ष तो पावेल कैंचा रे ॥ ३ ॥

प्रपंचांत सुखानें पोट भरत नाहीं म्हणून केवळ पोट भरण्याकरितांच हुरमुजीनें रंगविलेले कपडे वापरून व कांखेंत झोळी मारून तोंडानें ‘ अहं ब्रह्म! अहं ब्रह्म! ’ म्हणत हिंडणाऱ्या दांभिक ब्रह्मवाद्यांच्या जिव्हाग्रीं वरील पद्य झोंबेल नाहीं बरें!

वरील पद्यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, परमार्थाकरितां प्रपंचावर पाणी सोडणाऱ्यांवर मुक्तेश्वराचा विशेष कटाक्ष होता.

## पद.

अंतरीं वासना खोटी रे । कायसा राम राम वोटीं रे ॥ धृ० ॥ हरिदास मी एक लोकांत आगळा । सुरस माझें गाणें रे । थाटमाट संगीत गाणें नाचणें निरूपणि अर्थ जाणे रे ॥ १ ॥ पुढें निघे त्यामी मागेंचि लोभी माजला मत्सरमानें रे ॥ २ ॥ अंतरिं कामक्रोध बाहेरी देवाचि भजना हांसे रे । दासांचिये पायीं पदरज होणें हरिहर ह्मणिजे वाचे रे । लीलाविश्वंभर भावासि भूलला द्वार हि राखे त्याचें रे । खांदीं बैसउनि नेउनि वैकुंठा आपुलें पदरज साचे रे ॥ ३ ॥

बाह्यात्कारीं नामस्मरणाचा आव घालून आंत जर शुचिर्भूतता नसेल, तर तो नामस्मरणाचा प्रयत्न व्यर्थ आहे, असा वरील पद्याचा भावार्थ आहे तोंडानें रामनाम घेऊन कृति करतांना ' मनः पूतं समाचरेत् ' वर्तन करणाऱ्या व नुस्ता वाचेचा गोंधळ करून थाटमाट, संगीत गाणें, नाचणें करणाऱ्या नाटकी व दांभीक हरिदासांचा मुक्तेश्वराला फार तिटकारा होता असें वरील पद्यावरून दिसतें.

## आरती भैरवनाथांची.

जयदेव जयदेव जय भैरवनाथा । सुंदर पद्युग तूझें वंदिन निज माथा ॥ धृ० ॥ भैरवराया गौरव दे मज भजनाचें । रौरव संकट नाशन जनना निधनांचे । निशिदिनिं दे देवा मज गुणकीर्तन वाचे ॥ कैरव पदनखचंद्रीं कलिमलमनसाचें ॥ १ ॥ भवभय भंजन सज्जनरंजन गुरुदेवा । पदरज अंजनलेता प्रकटे निजठेवा ॥ जेव्हां दर्शन देशी भाग्योदय तेव्हां । अनंत पुण्य साधे लाधे तव सेवा ॥२॥ कलिमलशमना । दमना । दानव दे पाणी । डमरूरव अमरातें निर्भय सुखधानी । काशी रक्षक तक्षक मालाधर चरणीं । तोडर मिरवी अरिगण मस्तकिं मणिकरणीं ॥ ३ ॥ लक्षी करुणाचक्षीं अनुचर निजपक्षीं । भक्षी दुष्टा नष्टा सुष्टा संरक्षी । साक्षी कर्माकर्मीं जगदंतरकुक्षीं । मुमुक्षुपक्षी वसती तव पद सुरवृक्षीं ॥ ४ ॥ सोनारी पुरधामीं भैरव कुलस्वामी । स्मरतां सत्वर पावे संकटिं हरि नामीं ॥ इच्छित दासा देशी जो जो जे कामीं । मुक्तेश्वरीं हेतू निश्चय कुलधर्मी ॥ ५ ॥

वरील पद्यावरून असें दिसतें कीं, अर्थालंकाराप्रमाणेंच यमकानुप्रासादि

शब्दालंकार साधण्यांतही मुक्तेश्वर वाकबगार होता. सदरहु आरती कर्णमधुर असून प्रेमळही आहे.

वर दिलेले उतारे मुक्तेश्वराच्या अमुद्रित स्फुट कवितेपैकीं आहेत. आतां भारतांतून दोन चार वेंचे देऊं.

शकुंतला सासरीं जावयास निघाली असतां कण्वऋषि तिला कुलक्षण त्यागाविषयीं सांगतात.—

'परघर अटण परघर वस्ती । जार जारिणीची संगती ॥
एकटशय्या एकट वस्ती । हें कुलक्षण कुलवंते ॥ १ ॥
क्षणक्षणीं चंचळपणें । चिरि निरिया सरसावणे ॥
कच्छ फेडणें घालणें । हें कुलक्षण कुलवंते ॥ २ ॥
हृदय दावुनि घाली पदर । पुरुष अवलोकुनि वाढवी हार ॥
परकियासि एकांत विचार । हें कुलक्षण कुलवंते ॥ ३ ॥
बहु हांसणें बहु बोलणें । सदा हांसत गोष्टी करणें ॥
परत परतोनी निरखणें । हें कुलक्षण कुलवंते ॥ ४ ॥
आणिका वर्णी निंदी भर्ता । पति त्यागूनि धावे तीर्था ॥
पुरुष अव्हेरूनि देवता । भजतां दूषण कुळवंते ॥ ५ ॥

—आदिपर्व अ० ९.

वरील उपदेश कुलस्त्रियांनीं अंतर्यामीं सांठविण्यासारिखा नाहीं असें कोण ह्मणेल? पाश्चात्य युवतींचें अनुकरण करून अंगांत जाकिटें घालण्याची हांव धरणाऱ्या आमच्या अलीकडील तरुण मुलींनीं वरील उपदेश समग्र वाचण्यासारखा--नाहीं, मनन करण्यासारखा आहे. तरुण स्त्रियांकडून हरहमेष घडणाऱ्या क्षुल्लक प्रमादांवरही कवीचा किती रोंख होता याचें वरील उतारा द्योतक आहे.

पुढें शकुंतला दुष्यंताकडे गेल्यावर त्यानें तिला ओळख दिली नाहीं, इतकेंच नाहीं तर तूं माझी पत्नीच नाहींस असें सांगितलें, तेव्हां शकुंतला ह्मणते.—

'सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तोचि परब्रह्म ॥
सत्यापाशीं पुरुषोत्तम । सर्वकाळीं तिष्ठतो ॥ १ ॥
असत्य तेंचि पैं पातक । असत्य तोची महानरक ॥
असत्याचेनि संगें दुःख । अनंत जन्म भोगिती ॥ २ ॥
सत्यामृताची कनक वाटी । जोडिली न सांडेभूतटीं ॥
असत्य विषाची नरोटी । पवित्र हातें नातळे ॥ ३ ॥'

सत्याची किंमत अवर्णनीय आहे. आपले पूर्वज किती सत्यप्रिय होते हें महशूरच आहे; परंतु आम्ही अलीकडे त्या श्रेष्ठ सद्गुणाला पाठमोरे झालों आहों. असत्य शब्द व कुमार्गांत पडलेलें पाऊल कधींच माघारें येत नाहीं. म्हणून सत्यापासून न ढळण्याबद्दल प्रत्येकानें बाणा बाळगिला पाहिजे. भीष्म विचित्रवीर्यास म्हणतात.—

‘उष्णता सांडील वैश्वानर । प्रभा त्यागील पद्मिनीवर ॥
हिमांशु दवडील हिमकर । परि मी सत्य सांडीना ॥ १ ॥
शब्दविषय सांडील गगन । रूप तेज स्पर्श पवन ॥
रस विषय जीवन । सत्य माझें चळेना ॥ २ ॥
पृथ्वी सोडील अंगींचा गंधु । परि मी नातळे असत्यशब्दु ॥
अनाचारीं संचरे साधु । हें कैसेनि घडेल ? ॥ ३ ॥’

इतका सत्याचा प्रखर बाणा बाळगणारे हरीचेलाल आमच्या हल्लींच्या पिढिंत आतां किती सांपडतील बरें ?

सुपुत्र कोणास म्हणावें याविषयीं मुक्तेश्वर सांगतो.—

‘पिता गुरु पिता देवो । पितृ सेवे शरीर जावो ॥
ऐसा ज्याचा निश्चय भावो । तो एक धन्य पुत्र ॥ १ ॥
अपूर्व तितुकें दे आवडी । वेंचू नेणें जोडिली जोडी ॥
बहुकाळ वांचो हे गोडी । धरी तो धन्य सुपुत्र ॥ २ ॥’

इंग्रजी शिक्षणानें आमचे काय अपरिमित फायदे झाले असतील ते असोत परंतु एवढी गोष्ट मात्र खरी कीं वाडवडिलांचा व आईबापांचा पदोपदीं अवमान कसा करावा, हें इंग्रजी शिक्षणानें आमच्या तरुण पिढीला चांगलें शिकविलें ! अर्धवट इंग्रजी शिक्षणानें बेहोष झालेल्या व आईबापांना कःपदार्थ मानणाऱ्या आधुनिक मुलांनीं वरील ओंव्या एकदांतरी नजरेखालीं घालाव्या !

कृष्ण व भीमार्जुन जरासंधाकडे बटुवेषानें युद्धदान मागण्याकरितां गेले असतां जरासंध त्यांना म्हणतो:—

‘जरासंध असतां जीत । नरेंद्र मोचनाची मात ॥
करी ऐसा वीरश्रीकांत । भुवनत्रयीं असेना ॥ १ ॥
खद्योत मिरवे रविमंडळा । मुंगी उचली ब्रह्मांडगोळा ॥
तैसें तुझें बोलणें बरळा । शक्तीहूनी अचाट ॥ २ ॥’

हें त्याचें बोलणें ऐकून कृष्ण त्यास ह्मणतोः—

‘ सरला सुकृताचा तंतु । आयुष्य तैला झाला अंतु ॥
माझिये हस्तीं व्यजन वातू । भीमरूपें उद्वेला ॥ १ ॥
तो झडपतां सत्वर गती । प्राणदीप पंचज्योती ॥
मालवोनी पडेल क्षितीं । गात्र पात्र पालथें ॥ २ ॥ ’

हीं लहानशीं प्रश्नोत्तरें किती तरी वीरश्रीजनक आहेत!

अस्पर्श व एकवस्त्रा द्रौपदीला सभेंत ओढून आणिल्यावर तो चांडाळ तिच्या वस्त्राला हात घालून तिला विवस्त्र करूं लागला. तेव्हां अशा दुःखांत द्रौपदी कृष्णास उद्देशून ह्मणतेः—

‘ तुझें व्यापकत्व काय झालें । माझें हृदय कां सोडिलें ? ॥
एवढें निर्वाण कां मांडिलें ? । अहो कृष्णे जननी ये ॥ १ ॥
सर्वी सर्वत्र तुझे कान । सर्व देखणे तुझे नयन ॥
माझें नायकसी वचन । एवढें व्यसन न देखसी ॥ २ ॥
कृष्णे तूं स्नेहाळ माउली । तूंची कृपेची साउली ॥
जरी तुवां उपेक्षा केली । तरी मग जिणें कायसें ? ॥ ३ ॥
वस्त्रें हिरोनि अवकळा । येथें झालिया गोपाळा ॥
तुझे पाय याची डोळां । कवण्या मुखें अवलोकूं ॥ ४ ॥ ’

वरील छोट्याशा धाव्यांत किती तरी प्रेमळता भरली आहे! इतकें प्रेमळ मनानें भगवंताचें ध्यान केल्यावर तो दीनवत्सल दयाघन धांवून आल्याशिवाय कसा राहील?

शुक्राचार्यांचे तपाला विघ्न करण्याकरितां निघालेल्या रंभेचें व तिच्या सख्यांचें कवि वर्णन करतो:—


‘ चरणीं गर्जती नूपुरें । तींच वाजलीं रणतुरें ॥
योगाभ्यासी भेदुरे । तयां ध्यानीं सरताती ॥ १ ॥
रक्त रंगाचीं करारें । तींच मिरविती खड्गाकारें ॥
नयनकटाक्षाचेनि शरें । नेमें विंधिती नेमियां ॥ २ ॥
उदरीं त्रिवळीचिया रेखा । तेचि कटार खोंविली देखा ॥
पाखराचीं कुळें एका । खेटकाकारें शोभती ॥ ३ ॥
कठिण कुचाग्र अणि पाळी । तेचि भालियाचीं फळे ॥
हृदयें नरांचीं कोंवळीं । विदारिती कौतुकें ॥ ४ ॥

अंगीं चंदनाची उटी । तेंच वज्रकवच नेहटी ॥
कस्तुरी रोविली ललाटीं । तेचि टोप बाणले ॥ ५ ॥'

वर निर्दिष्ट केलेलीं ईश्वरदत्त शस्त्रास्त्रें धारणकरणाऱ्या युवतींपुढें शुक्राचार्यासारख्या पुरुषांशिवाय इतरांचा टिकाव लागणें दुरापास्त आहे. असल्या दुर्निवार्य शस्त्रांचा मारा प्रतिहत करण्याकरितां शुक्राचार्यासारखींच अभेद्य कवचें धारण केलीं पाहिजेत. शुक्राचार्यांचें कवि वर्णन करतो.—

————'तो जितेंद्रिय सत्वमूर्ति ॥
चर्चिली निष्ठेचि विभूती । तेणें सर्वांग शोभलें ॥ १ ॥
ब्रह्मरसें ओतिलें । तैसें तेज मुखासी आलें ॥
निश्चय कमंडलीं भरलें । ज्ञानोदक सर्वदा ॥ २ ॥
सत्य धृति अलोभ क्षमा । ऐशी तपोगुण महिमा ॥
दिधली नसे तया गरिमा । नाहीं आथिले पणाचीं ॥ ३ ॥
परतत्वीं लय मनाचा । तेणें उदय प्रसन्नतेचा ॥
संगीं परम धारणेचा । कुशासनीं मिरवत ॥ ४ ॥

असो. मुक्तेश्वराच्या काव्योदधींतून आणखी पुष्कळ सुंदर सुंदर रत्नें निवडून काढितां येतील; परंतु तीं सांठविण्यास मुबलक जागा नसल्यामुळें जास्ती घेण्यास धीर होत नाहीं !



# रामदास.

आज जगाचे इतिहासांत महाराष्ट्राचें व त्यांतील लोकांचें जें नांव निघत आहे, महाराष्ट्रांत किंबहुना समग्र आर्यावर्तात हिंदूंची आज शेंडी व दांडी जी कायम राहिली आहे, ब्राह्मण व त्यांचीं यज्ञोपवीतें जीं चोहोंकडे चमकत आहेत, आर्यांचीं देवालयें व त्यांचे कळस जे आज सर्वठिकाणीं—जीर्णावस्थेंत कां होईना—झळकत आहेत, गायींचें जें थोडेंफार दूध प्यावयास मिळत आहे व त्याचप्रमाणें भारतधर्माचें जें थोडेंबहुत स्वरूप दृष्टीस पडत आहे त्या सर्वांचें श्रेय श्रीसमर्थ **रामदास**स्वामी व त्यांचे परमशिष्य श्री छत्रपति **शिवाजी**महाराज या उभयतां सत्पुरुषांकडे आहे. त्यांतल्यात्यांत वरील गोष्टींबद्दल **रामदास**स्वामींचेच एकंदर महाराष्ट्रीयांवर विशेष उपकार आहेत. नावेवर नावाडी पुष्कळ असतात परंतु ती नांव वल्हवून सुरक्षित-निभावून नेण्याचें जडजोखमीचें काम कर्णधाराच्याच सल्ल्यानें व्हावें लागतें, त्याचप्रमाणें श्री **शिवाजी**महाराजांनीं म्लेंच्छांच्या मायावी कचाटींत सांपडलेल्या महाराष्ट्राला मुक्त करण्यास जे अव्याहत श्रम केले व त्यांत त्यांना जें अपूर्व यश मिळालें त्यांचें सर्व श्रेय श्री**रामदास**स्वामींच्याच उपदेशाला दिलें पाहिजे. स्वधर्म व स्वदेश यांच्या प्रीतीनें समर्थांनीं जे लहानमोठे प्रयत्न केले त्यांचीं फळें त्यांच्या हयातींत तर त्यांना चाखावयास सांपडलींच, परंतु त्यांच्या पश्चातही ह्या फळांच्या अप्रतीम माधुर्याची गोडी महाराष्ट्रीय जन आजतागाईत घेत आहेत. तात्पर्य गेल्या दोन तीन शतकांत महाराष्ट्रांत जे अनेक सत्पुरुष होऊन गेले त्यांत समर्थांचें चरित्र जितकें विचारणीय आहे तितकें दुसरें कोणाचेंच नाहीं; हें अगदीं निर्विवाद आहे. त्यांच्या चरित्राची पारमार्थिकदृष्ट्या जितकी योग्यता आहे तितकीच ऐतिहासिकदृष्ट्याही आहे. नाशकापासून करवीरापर्यंतच्या प्रदेशास समर्थ 'आनंदवन' असें ह्मणत असत. या आनंदवनभुवनांत समर्थांचें नांव ज्याला माहीत नाहीं व ज्याच्या संग्रहाला स्वामींचा एखादा ग्रंथ नाहीं असा एकादा माणूस निदान ब्राह्मणांत तरी सांपडणें दुर्मिळ आहे. त्यांच्या विचारसरणीनें महाराष्ट्रांतील लोकांच्या मनाचा भेद इतका खोल केलेला आहे कीं, त्यांनीं रचलेल्या मनाचे श्लोकांपैकीं एकाद्या श्लोकाचा एकादा चरणही ज्याच्या कानावरून गेलेला नाहीं असा एकादा मनुष्य अठरापगड जातींत

सुद्धां मिळावयाचा नाहीं. तेव्हां अशाप्रकारें सर्व दृष्टींनीं विचारणीय ठरलेल्या समर्थांच्या चरित्राचा येथें त्रोटकरीतीनें विचार करण्याचें योजिलें आहे.

बेदरयेथें **कृष्णाजीपंत** ठोसर नांवाचे एक सुखवस्तु गृहस्थ रहात असत. हे अश्वलायनशाखेचे जामदग्न्यगोत्री देशस्थ ब्राह्मण. तें गांव त्यांनीं शके ८८४ त राज्यक्रांतीच्या व दुष्काळाच्या कारणानें सोडिलें. नंतर ते गोदावरी–तीरीं मौजे हिवरें तर्फ तालखेड प्रांत बीड येथें सकुटुंब येऊन राहिले. त्यांच्या **दशरथपंत** नांवाच्या मुलानें तेंही गांव सोडून देऊन वडगांव नामक पायगस्त झालेल्या गांवीं वस्तीकरून तें गांव पुनः वसविलें व त्याचें नांव जांब असें ठेविलें. तेथें येऊन राहिल्यावर त्यांनीं कुळकर्णपणाची वृत्ती संपादन केली. त्यांच्या वंशांत **सूर्याजीपंत** नांवाचा एक अत्यंत धार्मिक व सत्वशील असा पुरुष झाला व हाच पुरुष आमच्या चरित्रनायकाचा जनक होय. यांच्या पत्नीचें नांव **राणूबाई**. ही मर्यादशील, सद्गुणी व पतिव्रता होती. **सूर्याजीपंत** मोठे सूर्यभक्त होते. त्यांनीं बारा वर्षें सूर्याची आराधना केली. त्यांस शके १९२७ सालीं पहिलें अपत्य झालें, त्याचें नांव **गंगाधर**; यास लोक ‘ श्रेष्ठ ’ या नांवानें संबोधीत असत. त्या नंतर तीन वर्षांनीं ह्मणजे १९३० सालीं सूर्याजीपंतांना दुसरा पुत्र झाला, त्याचें नांव **नारायण**, हेच समर्थ **रामदास** होत. हा मारुतीचा अवतार अशी प्रसिद्धि आहे. समर्थांचें बालपण खोडकरपणांत बरेंच गेल्याचें दिसतें. झाडांवर चढणें, नदींत डुंबणें हे त्यांचे आवडीचे खेळ असल्याचें दिसतें. पुढें हुशार निपजणारीं मुलें लहानपणीं चपळ व व्रात्य असतात, असा बऱ्याच वेळां अनुभव येतो; व या सार्वत्रिक अनुभवाला समर्थ अपवाद नव्हते हें पुढील चरित्रावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. समर्थ तर इतके अचपळ होते कीं त्यांनीं एकदां झाडावरून खालीं असलेल्या डोहांत उडी टाकिली डोहांत खडक होता; त्यावर डोकें आपटून उजवीकडे मोठें टेंगूळ आलें; तें अंतःकाळपर्यंत तसेंच होतें.

या उभयबंधूंना पितृसुख फार दिवस लाधलें नाहीं. समर्थांच्या सातव्या वर्षींच **सूर्याजीपंतांनीं** इहलोकचा कारभार आटोपला. अशी जरी स्थिति होती तरी समर्थांचा पुष्कळ अभ्यास झाला असला पाहिजे. कारण ‘ ब्राह्मणें बाळबोध अक्षर । घडसून करावें सुंदर ’ या त्यांच्या वचनाप्रमाणें उत्तम अक्षर, नित्यनैमित्तिककर्में व थोडासा संस्कृताचा अभ्यास इतकें सात वर्षांत होणें समर्थांसारख्या तीव्र बुद्धीचे मुलास अशक्य नव्हतें. **ज्ञानेश्वर** महाराजांनीं तर सोळा वर्षांच्या आंतच गीतेवर भाष्य लिहिण्याइतकें ज्ञान संपादन

केलें होतें हीच गोष्ट एकनाथाची. यावरून पूर्ववयांत संस्कृताचा अभ्यास करण्याची त्यावेळीं तरी निदान महाराष्ट्रांत जारीनें प्रवृत्ति होती असें ह्मणावें लागतें. समर्थांच्या काव्यावरून, ते जाडे संस्कृतज्ञ होते, असें जरी ह्मणतां येणार नाहीं, तरी 'उपनिषदें आणि भागवत' यांसारखे कठिण ग्रंथ त्यांस चांगले कळत होते असें ह्मटल्यावांचून गत्यंतर नाहीं व त्यांनींही ही गोष्ट दासबोधाच्या पहिल्याच समासांत निष्प्रांजलपणें सांगितली आहे. एवंच संस्कृतांतील अर्थ समजण्याइतकें त्या भाषेचें ज्ञान व बहुश्रुतपणा त्यांनीं संपादन केला होता असें ह्मणतां येईल. असो.

सूर्याजीपंतांनीं परलोकच्या सफरीला निघण्यापूर्वींच या उभय पुत्रांचें व्रतबंधन करून श्रेष्ठांचें लग्नही केलें होतें. अंबडकर देशमुखांच्या कन्येशीं श्रेष्ठांचा विवाह झाला होता. समर्थांचा विवाहविधि पाहण्याचें त्यांचे नशीबीं नव्हतें. समर्थ आजन्म ब्रह्मचारी राहिले. त्यांचा विवाह करण्याकरितां त्यांच्या आईनें मात्र जिवाचा व्यर्थ आटापीटा केला; परंतु तींत तिला यश आलें नाहीं; कारण समर्थांनीं लग्नाचे वेळीं 'सावधान' हे शब्द कानीं पडतांच पोबारा केला; व संसारास अखेरचा नमस्कार करून घर सोडिलें. ते थेट नाशकास गेले. यावेळीं त्यांचें वय अवघें बारा वर्षांचें होतें. नाशीक येथें गेल्यावर त्यांनीं पंचवटींत मंत्रपुरश्चरण केलें. एकनिष्ठ तपश्चर्या हें मनःशुद्धीचें साधन, बंधमोक्षाला कारण मनच; त्या चंचल मनाला ज्यांनीं ताब्यांत आणिलें त्यांच्या हातून कोणता अद्भुत चमत्कार होणार नाहीं. इतर चमत्कार जरी बाजूस ठेविले तरी ज्याहून दुसरें कांहीं चंचल नाहीं अशा मनाचा पूर्ण पराजयकरणें हा कांहीं लहान सहान चमत्कार नाहीं.

मनोजयाचें हें महत्कृत्य साध्यकरून घेतल्या नंतर त्यांनीं देशस्थिति अवलोकन करण्यासाठीं तीर्थाटणें केलीं. त्यांनीं गंगोत्रीपासून रामेश्वरापर्यंत सर्व देशांत प्रवास केला. या प्रवासांत त्यांनीं आर्यावर्तांतील दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम अशीं सर्व तीर्थें केलीं. एवढी तीर्थयात्रा करावयास त्यांना बारा वर्षें लागलीं. यावेळीं त्यांनीं पंपासरोवर, किष्किंधानगरी, ऋष्यमूक पर्वत इत्यादि रामायणप्रसिद्ध स्थानेंहीं पाहिलीं. वाटेंत त्यांनीं जागजागीं आपले मठ स्थापन केले. बद्रिकाश्रमीं श्री मारुतीरायांनीं त्यांस दर्शन दिलें व त्यांना पादुकादि प्रसाद देऊन त्यांच्यावर अनुग्रह केला, असें बखरकार लिहितात पण ही गोष्ट मात्र खरी कीं, ह्या वेळपर्यंत त्यांचा पोषाख साधाच होता. येथपासून तो बदलला. हुरमुजी वस्त्रें, माळ, पादुका व कुबडी अशाप्रकारचा पोषाख त्यांनीं येथेंच धारण केला, असें अनुमान होतें.

पूर्वीच्या तीर्थयात्रांशीं सांप्रतच्या आगगाडीनें किंवा आगबोटींनीं सुखकर झालेल्या यात्रेची तुलना केली असतां हल्लींची यात्रा जास्त सुखकर वाटेल खरी, परंतु पायवाटेनें, जवळ एक कपर्दिकही नसतां, सर्वप्रकारच्या आधिभौतिक दुःखांचा अंशतः अनुभव घेऊन केलेली यात्रा, जितकी ज्ञानप्राप्तीस कारण होईल तितकी सांप्रतची चैनीची यात्रा होणार नाहीं हें कबूल करावें लागेल. व्यावहारीक शिक्षण प्रत्यक्ष प्राप्तकरून घेण्यास एकाकी व निद्रव्य पर्यटनासारखा मार्ग नाहीं. या प्रवासांत त्यांनीं आपला चरितार्थ भिक्षावृत्तीवर चालविला होता. या भिक्षावृत्तीचें निरूपण करीत असतां ते सांगतात.

' भिक्षा ह्मणजे कामधेनु । सदा फळ नव्हे सामान्यु ॥
भिक्षेस करी जो अमान्यु । तो करंटा योगी ॥ १ ॥

तसेंच चातुर्यलक्षणें सांगतांना ही समर्थ सांगतात.—

' कुग्रामें अथवा नगरें । पहावीं घरांचीं घरें ॥
भिक्षामिषें लहान थोरें । परीक्षून सोडावीं ॥ १ ॥

केवळ उदरंभरण करणें एवढाच भिक्षेचा हेतु असूं नये; तर समाजस्थिती नीटपणें दृष्टीस पडावी असा त्यांत उदात्त अंतस्थ हेतु असावा. अशा हेतुनेंच समर्थांनीं सर्व देशाटण केलें. त्यांनी इतक्या प्रवासांत जें पाहिलें, अनुभविलें व ऐकिलें त्याचेंच **दासबोध** हें उत्कृष्ठ फळ होय.

यात्रेहून परत आल्यानंतर मातोश्रीस व श्रेष्ठांस भेटण्याचा संकल्प करून समर्थ जांबेस गेले. पुष्कळ दिवसांनीं भेटलेल्या मुलास पाहून राणुबाईस किती आनंद झाला असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. कांहीं दिवस तेथें राहिल्यावर समर्थांनीं मातोश्रीकडे जाण्याविषयीं आज्ञा मागितली. मातोश्री ह्मणाली, ' नारोबा, आजपर्यंत गेल्यास येणेंकरून फार दुःख झालें; आणि आतांही जाईन ह्मणतोस, तर माझी वाट काय? बाबा! तूं इतक्या भुतचेष्ठा कोठून शिकून आलास! तुला कांहीं भुताखेताची बाधा झाली नाहीं ना? त्यावर समर्थांनीं उत्तर दिलें:—

## पद.

" होतें वैकुंठीचे कोनीं । शिरलें अयोध्याभुवनीं ॥ लागे कौसल्येचे स्तनीं । तेंचि भूत गे माय ॥ १ ॥ जातां कौशिक राउळीं । अवलोकितां भयंकाळीं ॥ ताटिका ते छळोनि मेली । तेंचि भूत० ॥ २ ॥ मार्गीं जातां वनांतरीं । पाय पडला दगडावरी ॥ पाषाणाची झाली

नारी । तेंचि भूत० ॥ ३ ॥ जनकाचे अंगणीं गेलें । शिवाचें धनु भंगिलें ॥ वैदेही अंगीं संचरलें । तेंचि० ॥ ४ ॥ जेणें सहस्त्रार्जुन वधिला । तो हा तत्काळचि भ्याला ॥ धनु देऊनि देह रक्षिला । तेंचि० ॥ ५ ॥ पितयाचे भाकेशीं । कैकयीचे वचनाशीं ॥ मानुनि गेलें अरण्यासी ॥ तेंचि० ॥ ६ ॥ चौदा संवत्सर तापसी । अखंड हिंडे वनवासी ॥ सांगातें भुजंग पोसी । तेंचि० ॥ ७ ॥ सुग्रीवाचें पालन । वाळीचें निर्दालन ॥ तारीं पाण्यावरि पाषाण । तेंचि० ॥ ८ ॥ रक्षी मरणीं बिभीषण । मारी रावण कुंभकर्ण ॥ तोडी अमरांचें बंधन । तेंचि० ॥ ९ ॥ वामांगीं स्त्रियेला धरिलें । धावुनि शरयूतीरा आलें ॥ तेथें भरतासी भेटलें । तेंचि० ॥ १० ॥ सर्वां भूतांचें हृदय । नाम त्याचें रामराय ॥ रामदास नित्य गाय । तेंचि० ॥ ११ ॥

मग त्यांनीं तिला भागवतांतील ‘ कपिलमहामुनि व देवहूति ’ हें आत्मानात्मविचारपर कथानक सांगून तिचें कसेंबसें समाधान केलें. नंतर ते लवकरच कृष्णातीरीं राहण्याचा निश्चय करून माहुलीसंगमाजवळील जरांड्या डोंगरावर येऊन राहिले. येथें समर्थांची व जयरामस्वामींची गांठ पडली; नंतर कांहीं काळानें रंगनाथस्वामींचीही गांठ पडली. ते त्यांस निगडीस घेऊन गेले. क्रमाक्रमानें देहूचे तुकारामबोवा, चिंचवडचे मोरया गोसावी ब्रह्मनाळचे आनंदमूर्ति व त्यांचे गुरु रघुनाथस्वामी यांच्याही भेटी झाल्या. समर्थ या संतमंडळीस वडिलांप्रमाणें मानीत. जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, केशवस्वामी, आनंदमूर्ति व रामदासस्वामी या स्वामीपंचकास त्याकाळीं ‘ दास पंचायतन ’ ह्मणून ह्मणत असत. असो.

नंतर रामदासस्वामी तेथून चाफळ खोऱ्यांत आले. त्यावेळीं तेथें नरसो मलनाथ हे शिवाजीमहाराजांतर्फे मामलतदार होते. यांनीं समर्थांपासून अनुग्रह घेऊन त्यांस चांफळास मठ करून दिला. शके १५७० सर्वधारीनाम संवत्सरीं चांफळास समर्थांनीं श्रीरामचंद्राचें मंदीर बांधिलें. त्यांनीं आपल्या सर्व शिष्यमंडळीस देवळाच्या संबंधानें अधिकार नेमून दिले होते. त्याप्रमाणें अद्यापर्यंत ते चालत आहेत. याविषयीं समर्थांनीं एक डफगाणें केलें आहे तें.—

## डफगाणें.

भोंवता डोंगराचा फेर । मध्यें देवाचें शिखर ॥ पुढें मंडप सुंदर । नव खणांचा ॥ १ ॥ चहूं खांबांची रचना । वरत्या चोवीस कमाना ॥—

कम कटाव नगना । समाधान ॥ २ ॥ नाना तरु आंबे वनें । दोहीं-कडे वृंदावनें ॥ वृंदावनें जगज्जीवनें । वस्ती केली ॥ ३ ॥ पुढें उभा कपिवर । पूर्वेकडे लंबोदर ॥ खालीं दाटलें दरबार । ठायीं ठायीं ॥ ४ ॥ दमामे चौघडे वाजती । धडाके भांड्यांचे होती ॥ फौजा भक्तांच्या साजती । ठायीं ठायीं ॥ ५ ॥ माही मरातबे निशाणें । मेघडंबरें सूर्यपानें ॥ पताका छत्र्या सुखासनें । दिंड्या विंझणें कुंचे ॥ ६ ॥ काहळे कर्णे बुरुंग बांके । नानाध्वनी गगन झांके ॥ बहु वाद्यांचे धबके । परोपरी ॥ ७ ॥ टाळमृंदुग उपांग । ब्रह्मविंगे चुटक्या चंग ॥ तानमाने माजे रंग । हरिकथेसी ॥ ८ ॥ घंटा घांटा शंख भेरी । डफडीं पांवे वाजंतरी ॥ भाट गर्जती नागरी । परोपरी ॥ ९ ॥ उदंड यात्रेकरू आले । रंगीं हरिदास मिळाले ॥ श्रोते वक्ते कथा चाले । भगवंताची ॥ १० ॥ इत्यादि० ॥

यावेळीं श्रीशिवाजीमहाराजांच्या उत्कर्षास नुकताच कोठें आरंभ झाला होता. समर्थांची कीर्ति ऐकून श्रीशिवाजीमहाराजांस त्यांस भेटण्याची इच्छा झाली. दोनचार वेळ राजश्री दर्शनास गेले, परंतु समर्थ वारंवार अरण्यवास करीत असल्यामुळें त्यांची भेट दुर्लभ असे. शके १५७१ वैशाख शु० शनिवारीं स्वामीदर्शन झाल्याशिवाय अन्न ग्रहण करणार नाहीं असा शिवरायांनीं संकल्प केला. 'निश्चयाचें बळ । तुका ह्मणे तेंचि फळ' या साधूक्तीनुरूप शिवाजीमहाराजांस समर्थांनीं स्वप्नांत दर्शन दिलें; तरी प्रत्यक्ष दर्शनाची इच्छा कमी झाली नाहीं. अखेरीस समर्थांचें प्रत्यक्ष दर्शन घेण्याची लालसा मनांत धरून शिवाजी राजे स्वामींचा शोध करीत करीत वाईस आले; तेथें त्यांस समर्थांकडून पत्र आलें तें:—

## ओंव्या.

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥ तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ॥ सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ २ ॥ देवधर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ॥ हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥ ३ ॥ उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ॥ धूर्त तार्किक सभानायक । तुमच्याठायीं ॥ ४ ॥ या भूमंडळाचेठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ॥ महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुह्मांकरितां ॥ ५ ॥ आणीकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती ॥

धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥ ६ ॥ कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ॥ कित्येकांस आश्रय झाले । शिवकल्याण राजा ॥ ७ ॥ तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ॥ ऋणानुबंधें विस्मरण झालें । काय नेणुं ॥ ८ ॥ सर्वज्ञ मूर्ति धर्ममूर्ति । सांगणें काय तुह्मांप्रती ॥ धर्मस्थापनेची कीर्ति । संभाळली पाहिजे ॥ ८ ॥ उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागिलें ॥ प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ ९ ॥

सदरहु पत्र वाचून शिवाजी सद्गदीत झाले. पत्र घेऊन येणाऱ्या शिष्याबरोबर राजश्रींनीं विनंतीपत्र दिलें. त्यांत आशीर्वादपत्र पावलें; आनंद झाला; कृपा करून दर्शनेच्छा पूर्ण करणार स्वामी समर्थ आहेत असा मतलब होता. दुसरे दिवशीं शिवाजीमहाराज चिटणीस मुजुमदारादि मंडळीस बरोबर घेऊन चांफळास गेले. स्वामींची स्वारी मठांत नसून शिंगणवाडीचे मारुतीस गेली आहे असें कळताच ते दिवाकरभट्ट नामक एका समर्थांच्या शिष्यास बरोबर घेऊन शिंगणवाडीस गेले. तेथेंही स्वामी नव्हते. ते खिंडीचे खालीं बागेंत होते. तेथें जाऊन शिवाजीमहाराजांनीं स्वामींपुढें श्रीफळ ठेविलें व स्वामीस साष्टांग दंडवत घातला. स्वामींनींही त्यांच्यावर अनुग्रह करून त्यांचे मस्तकीं वरदहस्त ठेविला; व श्रीफळ, मूठभर माती, मूठभर लीद व मूठभर खडे याप्रमाणें प्रसाद त्यांचे पदरांत घातला. त्यावेळीं शिवाजीमहाराजांनीं कृतकृत्यता मानून साष्टांग दंडवत घालून मोक्षोपदेश देण्याविषयीं व परमार्थनिरूपणाविषयीं विनंति केली. त्यावेळीं स्वामींनीं त्रयोदशाक्षरी मंत्राचा उपदेश करून आत्मानात्मविचारही थोडक्यांत सांगितला. हा उपदेश ‘ लघुबोध ’ या नांवानें दासबोधांत प्रसिद्ध आहे. त्यावर शिवाजीमहाराजांनीं हात जोडून पुनः विनंति केली कीं, इतर मंडळींप्रमाणें आपली सेवा करून आपल्या संनिध राहण्याची मला आज्ञा व्हावी. आजपर्यंत राज्यव्यवहार चालविला तो पुरे. त्यावर समर्थ सहास्य ह्मणाले:— ‘ तुह्मी क्षत्रिय, राज्यरक्षण, प्रजापालन, देवब्राह्मणसेवा हा तुमचा धर्म. तुमचे हातुन पुष्कळ कार्य होणें आहे. म्लेच्छमय पृथ्वी झाली आहे. त्याचें निवारण तुमचे हातुन करवून धर्मस्थापना करावी अशी श्रीरघुपतीची इच्छा आहे, यांतच परमार्थ आहे. पूर्वीं राजे झाले त्यांची कीर्ति पुराणांतरीं आहे ती श्रवण करितच आहां. तुमचे पूर्वज कोणत्या वंशांतले तेंही लक्षांत ठेवावें. त्यापैकीं शिसोदसिंह, पृथ्वीपालसिंह व लक्ष्मणसिंह इत्यादिकांचे प्रताप लक्षांत आणून राजधर्म व क्षात्रधर्म पाळावा, हेंच तुह्मांस उचित.’

यासमयीं समर्थांनीं शिवाजीस सांगितलेली नीति सर्वांनीं लक्षांत ठेवण्याजोगी आहे; ह्मणून तींतील कांहीं वेंचे खालीं देतों.—

‘ आधीं मनुष्य ओळखावे । योग्य पाहुनि काम सांगावें । निकामी तरी ठेवावे । एकीकडे ॥ १ ॥ पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापि नये उणें । कार्यकर्त्याच्या गुणें । कार्य भाग होतो ॥ २ ॥ कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहीं एक असला हेकाड । तरी समर्थपणें पाठवाड । केली पाहिजे ॥ ३ ॥ अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार । शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥ ४ ॥ मनुष्य राजी राखणें । हींचि भाग्याचीं लक्षणें । कठीणपणें दुरी धरणें । कांहीं एक ॥ ५ ॥ समयीं मनुष्य कामा येतें । तया कारणें सोसिजें तें । न्याय सांडितां मग तें । सहजचि खोटें ॥ ६ ॥ न्यायसीमा उल्लंघूं नये । करावे अत्यंत उपाय । तरी मग पाहतां काय । उणें आहे ॥ ७ ॥ उदंड मुंडें असावीं । सर्वही एक न करावीं । वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें ॥ ८ ॥ मोहरा पेटला अभिमाना । मग तो जिवास पाहेना । मोहरे मिळवूनि नाना । वरी चपेटे करी ॥ ९ ॥ देखोनी व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती बारा वाटा ॥ मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ॥ १० ॥ रायांनीं करावे राजधर्म । क्षत्रीं करावे क्षात्रधर्म ॥ ब्राह्मणीं करावे स्वधर्म । नाना प्रकारें ॥ ११ ॥ तुरंग शस्त्र आणि स्वार । पहिला पाहवा विचार ॥ निवडूं जातां थोर थोर । शत्रु पळती ॥ १२ ॥ ’ क्षात्रधर्म. ‘ जयास जिवाचें वाटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये ॥ कांहींतरी करूनि उपाय । पोट भरावें ॥ १ ॥ विन्मुखमरणीं नर्क होती । वांचूनि येतां मोठी फजीती ॥ इहलोक परलोक जाती । पहाना कां ॥ २ ॥ मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ॥ फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ ३ ॥ नजरकरार राखणें । कार्य पाहूनि खतल करणें ॥ तेणें रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होतीं ॥ ४ ॥ मर्दें तकवा सोडूं नये । ह्मणजे प्राप्त होतो जय ॥ कार्यप्रसंग समय । ओळखावा ॥ ५ ॥ दोन्हीं दळें एकवटे । मिसळताती लखलखाटें ॥ युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडुनी ॥ ६ ॥ देव मात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ॥ आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ ७ ॥ मराठा तितका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ॥ येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ ८ ॥ मरण हाक तों चुकेना ।

देह वांचवितां वांचेना ॥ विवेका होऊनि समजाना । काय करावें ॥ ९ ॥ देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ॥ देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं ॥ १० ॥ देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ॥ मुलखबुडवा कां बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥ ११ ॥ विवेकविचार सावधपणें । दीर्घप्रयत्न केलाचि करणें ॥ तुळजावरानेंचि गुण । रामें रावण मारिला ॥ १२ ॥ अहो हे तुळजा भवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी ॥ रामदास ध्यातो मनीं । यन्निमित्त ॥ १३ ॥'

असो. नंतर समर्थांनीं महाराजांच्या जवळच बसलेले निळो सोनदेव व बाळाजी आवजी हे त्यांच्या खातरींतले व कारभारांत निकट संबंधाचे आहेत असें पाहून त्यांस पुढें बोलावून त्यांस सेवाधर्म सांगितला. हाही प्रत्येक सेवकानें व सेवक बाळगणारानें अक्षयीं ध्यानांत ठेवण्याजोगा आहे ह्मणून त्यांतून हे खालील कांहीं वेंचे काढिले आहेतः--

'सेवकीं सेवाचि करावी । स्वामी आसूदकीं द्यावी ॥ तरीच पाविजे पदवी । कांहींएक ॥ १ ॥ समर्थाचें मनोगत । तैसेंचि वर्तणें उचित ॥ तेथें चुकतां आघात । नेमस्त आहे ॥ २ ॥ सेवक तोचि अडेना । शब्द भुईस पडेना ॥ काम चुकलें हें घडेना । कदाकाळीं ॥ ३ ॥ स्वामीस जें अवश्य व्हावें । तैसें सेवकें न व्हावें ॥ होऊनि अडवावें । कोण्या विचारें ॥ ४ ॥ आपस्वार्थ उदंड करणें । आणि स्वामीकार्य बुडविणें ॥ ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सेवकाचीं ॥ ५ ॥ सेवकपणाचें मुख्य वर्म । कांहीं नसावें कृत्रिम ॥ कृत्रिम केलिया संभ्रम । कैंचा पुढें ॥ ६ ॥ धनी कार्जी जितुका सावधान । सर्वकाळ परिछिन्न ॥ त्यासि चोरितां निदान । बरें नव्हे ॥ ७ ॥ थोडी बहुत लालुच करणें । आणि महत्कृत्य बुडविणें ॥ महत्त्व जातां लाजिरवाणें । जनामध्यें ॥ ८ ॥ सेवक विश्वास दाविती । वैरियाकडे मिळोनि जाती ॥ त्यां चांडाळांसी गति । कोठेंची नाहीं ॥ ९ ॥ सकळ लोक स्वामियाचे । मागें पुढें अवज्ञेचे ॥ सेवक उगेचि मूर्ख नाचे । शब्द बोले ॥ १० ॥ धूर्तपणें अंतरसाक्षी । नानाप्रकारें परीक्षी ॥ दूरी गेला परी लक्षी । सर्व कांहीं ॥ ११ ॥ ह्मणोनि ऐसें न करावें । करणें तें नेमस्त करावें ॥ नानाकारणें धरावें । अंतर प्रभूचें ॥ १२ ॥ समर्थासी सांडून सेवकजन । सेवकाकडे लाविती मन ॥ ते जाणावे

परमहीन । नीच कोटीचे ॥ १३ ॥ ऐसे नेणतां चूक पडती । जाणते अवघेची जाणती ॥ निकामी आणि गर्व करिती । मूर्खपणें ॥ १४ ॥ सेवक जनावरी विश्वासिला । तो सेवकीं जेर केला ॥ समर्थ पराधीन झाला । हेंही अपूर्व ॥ १५ ॥ कामाकारणें ठेविले । काम पाहूनि वाढविले ॥ तेही उगेचि गर्वें फुगले । कोण्या हिशोबें ॥ १६ ॥ या कारणें बद्लीत जाणें । सेवक आज्ञेच्या गुणें ॥ तरीच समर्थपणें जाणें ॥ समर्थांसी ॥ १७ ॥ काम नासलें तरी नासावें । परि सेवकाधीन न व्हावें ॥ दास ह्मणे स्वभावें । बोलिलों न्याय ॥ १८ ॥ न्याय अन्यायासी मानेना । विवेक अविवेक्या कळेना ॥ पुण्यमार्ग आवडेना । पापी जनासी ॥ १९ ॥ सेवक बहुतांसी असती ॥ परी पाहों नये हे प्रचीती ॥ तथापि हे क्षमा श्रोतीं । केली पाहिजे.।२०॥'

असो. शिवाजीमहाराज तेथें तीन दिवस राहिले. चौथे दिवशीं भोजनोत्तर समर्थांनीं महाराजांस निरोप दिला. नंतर महाराजही स्वामीस नमस्कार प्रदक्षणा करून व आज्ञा घेऊन प्रतापगडास जावयास निघाले. घरीं गेल्यावर त्यांनीं तो समर्थांचा प्रसाद सर्व कुटुंबीयांस व परिवाराचे मंडळीस दिला. 'लीद, माती, खडे व नारळ असा प्रसाद दिला यांतील भाव काय?' असें मातोश्री जिजाबाईनीं विचारिलें, तेंव्हां महाराजांनीं सांगितलें कीं, 'लीद हें पागांच्या वृद्धीचें दर्शक; मातीच्या रूपानें पृथ्वीची प्राप्ति दर्शित होते. खडे हे किल्यांच्या वृद्धीचें चिन्ह होय; व श्रीफळ सर्व अभीष्टार्थ पूर्तीचें दर्शक आहे.'

अनुग्रह झाला त्यावेळीं छत्रपतींचें वय बेवीस वर्षांचें होतें. तेंव्हांपासून दर गुरुवारीं स्वामी असतील तेथें जाऊन आठ दिवसांत झालेलें वर्तमान समर्थांस निवेदन करण्याचा व पुढील कर्तव्याविषयीं आज्ञा घेण्याचा क्रम राजश्रींनीं ठेविला होता.

असो. त्यावेळची श्रीतुकाराम महाराजादि संत मंडळी दरसाल आषाढ वद्य एकादशीस पंढरपुरास जात असत. परंतु श्रीसमर्थ तेथें जात नसत. तेंव्हां एकानें त्यांस तेथें श्रीविठ्ठल दर्शनास येण्याविषयीं आग्रह केला त्यावेळीं ते ह्मणाले, 'उपास्य दैवत त्या ठिकाणीं नाहीं तस्मात् येणें होत नाहीं.' तो हंसून ह्मणाला, 'श्रीरामाव्यतिरिक्त कोणतें स्थळ आहे? आणखी शिवाय पंढरीस मारुतीचें अधिष्ठान आहे तर आपण चलावें.' हें बोलणें दासांस पटलें आणि ते त्याप्रमाणें त्यांच्या बरोबर पंढरीस गेले. त्यांनीं तेथें गेल्यावर प्रथम मारुतीचें दर्शन घेतलें मग श्रीविठ्ठलाचें घेतलें.

स्वामीच्या मनांत श्रीरामाशिवाय अन्य दैवताचा रिघाव होईना. त्यांस विठोबा दाशरथीरूपानें धनुष्यबाणयुक्त दिसले त्यासमयीं समर्थांनीं श्रीविठ्ठलाचा स्तव केला तो:—

अभंग

' येथें उभा कां श्रीराम मनमोहन मेघश्याम ॥ १ ॥
काय केले धनुष्यबाण । कर कटावरि ठेवून ॥ २ ॥
काय केली सीताबाई । येथें राही रखुमाई ॥ ३ ॥
काय केलें वानरदळ । येथें मेळविले गोपाळ ॥ ४ ॥
काय केली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी ॥ ५ ॥
काय केली शरयू गंगा । येथें आणिली चंद्रभागा ॥ ६ ॥
रामदासीं जैसा भाव । तैसा झाला पंढरिराव ॥ ७ ॥ '

समर्थ डोंगरांत, वनांत वारंवार वस्ती करीत तेणेंकरून त्यांस पाण्याच्या ठिकाणांविषयीं चांगली माहिती असावी असें दिसतें. कारण एकेसमयीं शिवाजीमहाराज चाफळास दर्शनार्थ आले असतां समर्थ त्यावेळीं रायघळींत होते; ह्मणून ते तिकडे गेले. समर्थांस दंडवत करून हात जोडून शिवाजीमहाराज उभे राहिले असतां त्यांनीं त्यांस बसावयास सांगून विचारिलें कीं, ' तुमचें तोंड इतकें म्लान कां दिसतें ? कांहीं तहानबिहीन लागली आहे काय ? ' महाराजांनीं विनंति केली कीं, ' तहानेनें प्राण अगदीं कासावीस झाले आहेत. ' हें ऐकून समर्थांनीं आपल्या कुबडीनें जवळील एक दगड खालीं ढकलून दिला; तों तेथून सुंदर उदक निघूं लागलें. हें अजून ' कुबडीतीर्थ ' या नांवानें प्रख्यात आहे.

दर गुरुवारीं समर्थांचें दर्शन घेण्याचा शिवाजीमहाराजांनीं संकल्प केला होता व ते तो अत्यंत निष्ठेनें पाळीत; परंतु राज्यकारभार—आणि तोही सामान्यप्रकारचा नव्हे—चालवून क्रमांत अंतर पडूं न देणें हें त्यांस फारच अवघड पडे हें सांगावयास नको; ह्मणून एकेसमयीं महाराजांनीं स्वामीस विनंति केली कीं, ' आपणांजवळ नेहमीं असावें अशी इच्छा आहे, तरी रायगडीं किंवा प्रतापगडीं अथवा परळीस वास करून मजकडून सेवा घ्यावी. महाराजांचें तें अत्यंत लीन भाषण ऐकून समर्थांस आनंद झाला व तें त्यांनीं मान्य केलें. समर्थ तेथें ( परळीस ) येऊन राहिल्यापासून परळीचें नांव सज्जनगड असें ठेविलें. स्वामींकरितां उरमोडीच्या सरकारी बागेंत संध्यामठी बांधून दिली. समर्थांना विडा खाण्याचा छंद फार होता. त्या खर्चाकडे तर्फ मेढेंखोरें येथील जकातीचें उत्पन्न नेमून दिलें.

एकेवेळीं परळी येथें समर्थ दर्शनार्थ शिवाजीमहाराज आले असतां त्यांनीं समर्थांस जीनसामानासुद्धां एक घोडा नजर केला, तो पाहून समर्थांची मर्जी खुश झाली व त्यांनीं तात्काळ घोड्याचीं बंधनें सोडून तो मोकळा करविला व आपण त्याची अयाळ धरून चटकन् त्यावर उडून बसून त्याला चांगला फेरफटका देऊन आणिलें. या वरील गोष्टीवरून समर्थांचें अश्वारोहणपटुत्व चांगलें व्यक्त होतें. त्या घोड्याचें नांव त्यांनीं '**रामबाण**' असें ठेविलें होतें.

आमच्या महाराष्ट्र संतमालिकेंत रामदासांसारखा राजकारस्थानी साधु **ब्रह्मेंद्रस्वामी**शिवाय दुसरा कोणी दिसत नाहीं. परंतु या उभयतांची जर निःपक्षपातानें कोणी तुलना केली तर त्याला समर्थांनाच श्रेष्ठत्व द्यावें लागेल, हें निर्विवाद आहे. महाभारतांतील कृष्णाशीं मात्र यांची तुलना पुष्कळअंशीं जुळते. गीतेनें ज्याप्रमाणें भारतीयोद्धयांस स्वकर्मास प्रवृत्त केलें त्याप्रमाणेंच **दासबोधा**नेंही महाराष्ट्रवीरांस आपलें कर्तव्य समजाऊन दिलें. गीता ज्यावेळीं उपदेशिली ती वेळ जशी आणीबाणीची होती, त्याप्रमाणेंच **दासबोधा**च्या रचनेची वेळही आणीबाणीचीच होती. गीतेमध्यें शत्रुनाशाचा राजरोस उपदेश केला आहे व **दासबोधांत** तो आडपडद्यानें केला आहे. दासबोधाच्या रचनेचा काल लक्षांत आणतां, त्यावेळीं महाराष्ट्रियांस जागृत करण्याचा प्रयत्न उघडपणें करणें शक्य नव्हतें असें ह्मणावें लागतें, कारण त्या कालीं संपूर्ण देश यवनाक्रांत झाला होता. अशावेळीं श्रीसमर्थ जर लोकांस उघड उघड क्षात्रस्वरूप दाखविण्याचा उपदेश करते तर ते सपशेल फसते. त्यांत त्यांना कालत्रयींही यश आलें नसतें. 'कायद्याच्या मर्यादेवर पाय ठेऊन आपलें कर्तव्य करणारांस कोणत्याप्रकारचा त्रास होतो हें सांप्रतच्या न्यायी राज्यांतही जर आपल्या अनुभवास येत आहे तर मग 'झोटींग पाच्छाई' असें जिला ह्मणत त्या राज्यांत, जेथें मर्यादाच ठरलेली नाहीं, अशा राज्यांत जो उपदेश करावयाचा होता त्याला कांहींतरी धार्मिक आच्छादनच पाहिजे होतें. **दासबोधां**तील तत्वज्ञानोपदेश हें कदाचित् बाह्यांग असून, मुख्य उद्देश निराळाच असेल. खालील वेंचे पाहिले असतां त्यांच्या उपदेशाचें मर्म कळून येईल:—

**राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच न द्यावें ॥**
**परपीडेवरी नसावें । अंतः करण ॥ १ ॥**

लोक पारखून सोडावे । राजकारणीं अभिमान झाडावे ॥
पुनः मेळवून घ्यावे । दुरल्या दोरें ॥ २ ॥

दशक १५ समास ३

तेथें कोणाचें चालेना । अणुमात्र अनुमानेना ॥
कट घालोनि राजकारणा । लोकां लावी ॥ १ ॥
लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद झाले ॥
भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ २ ॥

दशक ११ स. ५.

—राजकारणें मंडळ वेष्टी । चोहींकडे ॥ १ ॥
नष्टासि नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ॥
कांटीनें कांटी झाडावी । झाडावीं परि तें कळों न द्यावीं ॥
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करावें ॥
कित्येक खळक उगवावे । राजकारणांमध्यें ॥ १ ॥
खल दुर्जनासी भ्याले । राजकारण नाहीं राखिलें ॥
तेणें अवघें प्रकट झालें । बरें वाईट ॥ २ ॥
गलिमांच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुरफुरती भुजा ॥
ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थी ॥ ३ ॥
हीं धूर्तपणाचीं कामें । राजकाण करावें नेमें ॥
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ ४ ॥

या सर्व उताऱ्यांपेक्षां खालील उतारा फारच महत्वाचा आहे. यावरून समर्थांच्या अंतर्बाह्य स्वरूपावर चांगलाच प्रकाश पडतो. ते ह्मणतात.—

लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ॥
जाण जाणोनि धरावे । जवळ दुरी ॥ १ ॥
अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नसतां व्यर्थ जातें ॥
जाणूनि शोधावीं चित्तें । नानाप्रकारीं ॥ २ ॥
अधिकार पाहोनि कार्य सांगणें । साक्षेप पाहोनि विश्वास धरणें ॥
आपला मगज राखणें । कांहींतरी ॥ ३ ॥
हें प्रचीतीनें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें ॥
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणी एकें ॥ ४ ॥

" हें सर्व अनुभवाचें काम आहे. अमुक करावें तमुक करावें, अमुक

पाहिजे तमुक होईल तर बरें, अशाप्रकारचे उपदेश करणारे वाटेल तितके मिळतील, पण ‘ आधीं केलें मग सांगितलें ’ असें स्पष्टपणें सांगणारे सत्पुरुष जेव्हां देशांत उत्पन्न होतात तेव्हांच त्या देशाचा उद्धार होतो. सध्यां आमच्या दुर्दैवानें अगोदर सांगणारे पुरुष पुष्कळ आहेत. आधीं करणारे नाहींत, इतकेंच नव्हे, तर प्रथम बोलल्याप्रमाणें मागाहून करणारेसुद्धां नाहींत ! अशाप्रकारचे उद्गार या ठिकाणीं काढण्याचा प्रसंग यावा, तेव्हां ‘ विधेरिच्छा बलीयसी , असें ह्मणावें लागतें. ”

आतां आपण समर्थांच्या चरित्राचा पारमार्थिकदृष्ट्या विचार करूं. ते लहानपणापासूनच अगदीं विरक्त होते. त्यांनीं रामभक्तीचा सांप्रदाय वाढवून शेंकडो शिष्य केले. समर्थांनीं आपले सर्व पट्टशिष्य कसोटीस लावून पाहिले—होते असें त्यांच्या बखरींतील गोष्टींवरून दिसतें. या त्यांच्या पट्टशिष्यांत उद्धवगोसावी, कल्याणस्वामी, भीमस्वामी श्री छत्रपती शिवाजी महाराज वगैरे पुरुष शिष्य व वेणूबाई, आकाबाई, बहिणाबाई, इत्यादि शिष्या प्रसिद्ध आहेत. ही सर्व मंडळी विरक्त असून सर्वदा समर्थाबरोबर असे. वरील शिष्यांपैकीं कल्याणगोसावी व वेणूबाई यांची कविता बरीच उपलब्ध आहे. समर्थांचें कवित्व कल्याण लिहीत असे. कल्याणस्वामींचें बरेंच काव्य डोंबगांवयेथील त्यांच्या मठांत आहे, असें ऐकिवांत आहे.

वेणूबाईनेंही एक ग्रंथ लिहिला आहे, त्याचें नांव सिद्धांतराम. ही वेणूबाई विदुषी असून ब्रह्मवादिनी होती असें तिच्या ग्रंथावरून दिसून येतें. तिनें आपल्या ग्रंथांत जागोजाग संस्कृत वचनें प्रमाणादाखल घेतलीं आहेत; तसेंच त्यांत कित्येक श्रुतिही आहेत; यावरून तिला संस्कृताचें ज्ञान चांगलें होतें असें दिसतें. स्त्रियांस श्रुतिवचनें उच्चारण्याचा अधिकार नाहीं ही शास्त्रसिद्ध पण कोती समजूत दासांच्या मनास शिवत नव्हती, असें दिसतें. नाहीं तर त्यांनीं बाईच्या ग्रंथांत श्रुतीस थारा मिळूं दिला नसता. यावरून स्वामींच्या मानसीक धैर्याची कल्पना करितां येईल. पुढील एका उताऱ्यावरूनच बाईचा बहुश्रुतपणा दिसून येईल.

अनंतयुगांची मांडणी । अनंत अवतार अनंत करणी ॥
भूत भविष्य-वर्तमान गुणीं । गुणीं त्रिगुणीं व्यापक ॥ १ ॥
सांख्य वेदांत न्यायवाद । पांचरात्रादि शैव शाक्त भेद ॥
पातंजली योग प्रसिद्ध । पाणिनि शब्द होताती ॥ २ ॥

कर्मवादी ब्रह्मवादी । आत्मवादी शून्यवादी ॥
द्वैतवादी अद्वैतवादी । आत्मारामीं देखतसे ॥ ३ ॥

-निवृत्तिराम समास ८.

आत्मारामीं निश्चळबुद्धि । बुद्धीपाशीं कार्यसिद्धि ॥
ह्मणोनि बुद्धिवाद नानाविधि । सद्गुरुनाथें सांगितलें ॥ १ ॥
सद्गुरुनाथ हित सांगती । प्रपंचीं लोकउपाधि असती ॥
कांहीं गलबल्यांत निवळ होती । संत साधुसमागमें ॥ २ ॥
संतसाधु ज्ञानी उदास । जगदुद्धाराचा हव्यास ॥
एकांतीं राजकारणें सावकाश । राजयोगें विचरती ॥ ३ ॥
राजयोगें भक्तियोगें । ज्ञानयोगें वैराग्ययोगें ॥
जगदुद्धार लागवेगें । विवेकी संत करिताती ॥ ४ ॥
विवेकें संतीं काय केलें । पूर्णापूर्ण व्यापक विवरिलें ॥
आत्मा निरंजन विभागूनि दिधलें । पूर्णव्यापक निरंजन ॥ ५ ॥

-निवृत्तिराम समास १९.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजही कविता करीत असत असें दिसतें. त्यांची कविता फारशी उपलब्ध नाहीं; तरी पण परळीच्या श्रीराजन्मोत्सवांत त्यांचीं कांहीं पदें अद्यापि ह्मणण्याची वहिवाट आहे. त्यांतील एक पद येथें मासल्याकरितां देतों:—

## पद.

महाराज गरीब नवाज! अजि हो महाराज। ठारीं वनवाज ॥ धृ० ॥
सेवक हो सेवा मंगो । इतना साहेब काज ॥ १ ॥
बंदा कमिनकही नतु साहेब तेरी लाज ॥ २ ॥
छत्रपत तुम शेकदार शिव राखो हमारी लाज ॥ ३ ॥

समर्थ-शिष्या बहिणाबाई ही सुद्धां कविता करीत असावी असें दिसतें. तिनें केलेला एक अभंग सांपडला आहे तो असा:—

'रांड तेचि खरी जिचे मुखीं नाहीं हरी । ते जाणावी निर्धारीं जन्मरांड ॥ १ ॥ टिळे टोपी माळा वर नराचा आकार । जाळावा विचार ज्ञानेंविण ॥ २ ॥ बहिणी ह्मणे ज्यासी नाहीं आत्मज्ञान । तें जाणावें श्वान जन्मा आलें ॥ ३ ॥'

सदरहुप्रमाणेंच भीमस्वामीही प्रसंगोपात कविता करीत असत. हे भीमस्वामी शहापूरच्या मठाचें आधिपत्य चालवीत असत. त्यांस शिवाजीमहा-

राजानीं कर्नाटकांत जातेवेळीं तिकडे धर्मोद्धार करण्यासाठीं समर्थांच्या अनुज्ञेनें नेलें. तिकडे गेल्यावर व्यंकोजीमहाराजांनीं त्यांस तंजावरास ठेवून घेतलें व त्यांना तेथें मठ बांधून दिला. तेथें असतां भीमस्वामींनीं समर्थांस खालील पत्र पाठविलें:—

समर्थां नमस्कार साष्टांग आधीं । अपत्यें सुखें घालुनी मी त्रिशुद्धी ॥
विनंति प्रभू ऐकिजे जी स्वभावें । असे मी दुरात्माचि नाना स्वभावें १
दयासागरें हो मला थोर केलें । बहू सेवकांमाजि तें मेळवीलें ॥
कृपेनें दिलें सौख्य तें अंतरीचें । परी भोगणें लागलें या देहाचें २
कसें दुर्भर आणिलें या स्थळाला । पदीं स्वामिच्या थोर वीयोग झाला ॥
जगीं धन्य ते लाधलीं पादसेवा । नसे तें मला पूर्व माझाचि ठेवा ३
मनोभावना स्वामिच्या पादपद्मीं । असे लागली वृत्ति हे पूर्ण सद्मीं ॥
परी देहप्रारब्ध माझें झडेना । समर्था प्रभू योग तूझा घडेना ॥ ४ ॥
अखंडीत हे वासना भेटि व्हावी । प्रभूपायिंची धूळ माथां पडावी ॥
मनींचें मनीं जाणशी स्वामिराया । किती वाढवूं हा सविस्तार वाया ५
महाभक्तभावार्थ हा रामचंद्रें । मुखें माझिया बोलवीला नरेन्द्रें ॥
यथातथ्य वीचार हा साभिमानें । प्रभू श्रोतया जाणवीला भीमानें ६

असो. या सर्व शिष्यांची योजना त्यांनीं निरनिराळ्या मठावर केलेली होती. त्याचप्रमाणें त्यांनीं शहापूर, मसूर चांफळादि अकरा ठिकाणीं मारुतीचीही स्थापना केली होती.

याप्रमाणें अनेक शिष्यांस योग्य मार्ग दाखवून, झालेली धर्मग्लानी दूर करून, योग्य पुरुषांची योग्य जागीं योजना करून, सतत पन्नास वर्षेंपर्यंत देशसेवा कायावाचा मनानें यथासांग बजावून, स्वामींनीं शांतमनानें परलोकीं जाण्याची तयारी केली. त्यांना जो कार्यभाग करावयाचा होता तो सर्व त्यांनीं अगोदरच उरकून घेतला होता. ते त्रिविध तापांतून मुक्त झाले होते. भगवद्भक्तीनें त्यांचें सबाह्यांतर निर्मळ झालें होतें. अनेक प्रकारच्या व्यक्तींशीं निरंतर सहवास असल्यामुळें, मानवीस्वभावाचें त्यांस पूर्ण ज्ञान झालें होतें.' ते अत्यंत कल्पक, विनोदी व सहनशील होते. त्यांच्या आंगचा दुसरा एक मोठा गुण ह्मटला ह्मणजे निरिच्छता हा होय. या गुणाची खालील उदाहरण चांगली साक्ष देतें. एकदां शिवाजीमहाराजांनीं त्यांची पाद्यपूजा करून सर्व राज्यच त्यांना अर्पण केलें. समर्थांनीं ही त्याचा तात्पुरता स्वीकार करून तें पुनः शिवरायांच्या स्वाधीन केलें, आणि त्यांस

सांगितलें कीं, 'हें माझ्या नांवानें तूंच चालीव. माझ्या स्वामित्वाची इतकीच खूण असावी कीं, तुझ्या फौजेचा झेंडा भगवा असावा. तेव्हांपासूनच मराठ्यांच्या सैन्यांत भगव्याझेंड्याची चाल पडली.—आणखी असेंही ऐकण्यांत आहे कीं, शूद्र वगैरे हलक्या जातींचे हिंदूंत पूर्वी 'जोहार' ह्मणण्याची चाल असे; परंतु समर्थांच्या सांगण्यावरून शिवाजीनें 'राम राम' ह्मणण्याचा प्रघात सुरु केला. तोच हल्लीं चालू आहे. या एका लहानशा गोष्टीवरूनच त्यांची समाजावर कसली छाप होती हें चांगलें दिसून येतें. असो. अशाप्रकारें इहलोकीं कर्तव्य करावयाचें कोणतें याचा त्यांनीं पूर्ण विचार करून जें कार्य करावयाचें होतें. तें त्यांनीं पूर्ण रीतीनें बजावल्यामुळें त्यांची परलोकच्या यात्रेला निघण्याची सर्व कांहीं तयारी झाली होती. ते ह्मणतात.—

माझा देह तुज देखतां पडावा । आवडी हे जीवा फार होती ॥ १ ॥
फार होती परी पुरली पाहतां । चारी देह आतां हारपले ॥ २ ॥
हारपले माझे सत्य चारी देह । आतां निःसंदेह देहातीत ॥ ३ ॥
निःसंदेह झाला देवा देखतांची । चिंतिलें आतांची सिद्ध झालें । ४ ।
सिद्ध झालें माझें मनींचें कल्पिलें । दास ह्मणे आलें प्रत्ययासी ॥५॥

अशाप्रकारें ज्यांचें मन तयार झालें असतें, त्यांची मनाला सर्वदा तयारी असते. पण असे पुरुष क्वचितच असतात. स्वामीनें ज्याच्या योगानें आपणास मृत्यूचें भय वाटेल अशा सर्व गोष्टींचा पूर्वींच त्याग केला होता; व त्या प्रसंगाला ते अगदीं तयार होऊन राहिले होते. परमेश्वराचें एकाग्र चित्तानें स्मरण करीत असतां त्यांचें माघ वद्य ९ शके १६०३ सालीं देहावसान झालें. 'वरील अभंगाप्रमाणें पाहिलें तर 'देहावसान' हा शब्द अप्रस्तुत आहे. कारण त्यांना आपले स्थुलादि देह हारपून गेले आहेत, असें पूर्वींच वाटत होतें.'

'समर्थांच्या चांफळच्या मठाचा योगक्षेम चालावा ह्मणून शिवछत्रपतींनीं १६०० सालीं ३३ गांव, कांहीं इनाम जमीन आणि १२१ खंडी धान्य याप्रमाणें नेमणूक करून दिली होती. तीपैकीं बरीच सांप्रत त्यांच्या वंशजाकडे चालत आहे. समर्थ नैष्टिक ब्रह्मचारी असल्यानें त्यांचा प्रत्यक्ष वंश असणें शक्यच नाहीं. अर्थात् हा वंश त्यांच्या वडील बंधूंचा ह्मणजे श्रेष्ठांचा आहे.'

येथपर्यंत समर्थांचा चरित्रभाग आटोपला. आतां त्यांच्या काव्यासंबंधीं व ग्रंथांबद्दल चार शब्द लिहून प्रस्तुतप्रकरणाचा आपण समारोप करूं.

समर्थांनीं लोकोपकारार्थ पुष्कळ कविता केली. ती सुलभ, मार्मीक व भक्तिरसप्रधान आहे. कवितेचा बराच महत्वाचा गुण जो प्रसाद तो तर त्यांच्या कवितेंत भरपूर आहे. ' रसात्मकं काव्यम् ' या नियमाप्रमाणेंही त्यांच्या कवितेंत रसाविर्भाव व्यक्त करणारीं स्थळें पुष्कळ सांपडतील. शृंगाररसाचा त्यांना अत्यंत तिटकारा असे. त्या रसाबद्दल स्वामी ह्मणतातः–

शृंगारादि नवरसिक । त्यांमध्यें सांडावें एक ॥
स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूच नये ॥ १ ॥
लावण्य स्त्रियांचें वर्णितां । विकार बाधिजे तत्वतां ॥
धारिष्ठापासून श्रोता । चळे तात्काळ ॥ २ ॥
ह्मणोनि तें त्यागावें । जें बाधक गा स्वभावें ॥
घेतां अंतरीं ठसावें । ध्यान स्त्रियांचें ॥ ३ ॥

दशक १४. समास ६.

अशारीतीनें त्यांनीं शृंगाराचा निषेध केला असल्यामुळें रामायणांत त्यांनीं सीतादेवीचेंही वर्णन केलेलें नाहीं!

' वीररस मात्र त्यांच्या काव्यांत ओतप्रोत भरला आहे; याचीं उदाहरणें रामायणांत जिकडे तिकडे सांपडतात. एकनाथ, मुक्तेश्वर, रामदासादि संत व कविमंडळी ज्याकाळांत उत्पन्न झाली त्याकाळच्या इतिहासाकडे जरी वर वर नजर फेंकली तरी, तो मोठा वीरश्रीचा व धामधुमीचा काळ होता, असें दिसून येईल. महाराष्ट्रांत शिवाजी उत्पन्न झाला, तो एकटाच होता असें नाहीं तर त्याच्याच तोडीचे अनेक स्वार्थत्यागी शिवाजीच्यावेळीं उत्पन्न झालेले होते. नुसत्या दारूनें आवाज होत नाहीं, त्यास अग्नि व तोफ वगैरे पदार्थांची जरूर असते. हे सर्व पदार्थ एकत्र असले ह्मणजे दारूचा उपयोग होतो त्याप्रमाणें सर्व महाराष्ट्रदेश स्वदेश-स्वधर्माच्या अभिमानानें शिवाजीमय झालेला होता. इतकी वीरश्री देशांत जी एकदम उत्पन्न झाली ती दासांच्याच प्रयत्नानें झाली. वीररसांत समर्थ किती बहार करीत हें पाहणें असल्यास भीमरूपी स्तोत्रें वाचावीं. बीभत्स व हास्यरसाचीही उदाहरणें दासबोधांत सांपडतात. दासबोधांतील निद्रावर्णनाचा समास हें बीभत्स व हास्यरसाचें उत्कृष्ठ उदाहरण आहे. तिसऱ्या दशकांतील पांचव्या समासापैकीं, वृद्धवर्णनपर ओंव्या ( १६ पासून ४६ पर्यंत ) ही बीभत्सरसाचें

उत्कृष्ठ उदाहरण होत. युद्धकांड प्रसंग ३ तिसरा श्लोक १९ ते ७९ पर्यंत दहा श्लोकांत, त्रिजटेनें सीतेस युद्धभूमि दाखविली, तें बहारदार वर्णनही बीभत्सरसात्मकच होय. याशिवाय दुसरींही आणखी पुष्कळ उदाहरणें देतां येतील.

समर्थांचा सर्वांत मान्य व मोठा ग्रंथ ह्मटला ह्मणजे 'दासबोध' हा होय. ह्याचे वीस दशक असून समास दोनशें आहेत. समर्थांनीं या महाग्रंथाला शके १५६६ च्या सुमारास आरंभ करून तो शके १५८१ त ह्मणजे अजमासें पंधरा वर्षांनीं संपविला. ऐतिहासिक दृष्टच्या या ग्रंथाची योग्यता फार मोठी आहे. या ग्रंथांत समर्थांनीं महाराष्ट्रीय जनांस केलेला उपदेश गीतेंत भगवंतांनीं अर्जुनास जो उपदेश केला आहे त्याहून तत्वतः तरी फारसा निराळा नाहीं. देशकाल वर्तमानानुरूप निरूपणांत व दृष्टांतांत मात्र जमीन अस्मानचा फरक आहे. शके १५५४ ह्मणजे इ. स. १६३२ त महाराष्ट्रांत भाषा, नीति, रीति, रिवाज, धर्म वगैरे गोष्टींत फारच शोचनीय स्थित्यंतर झालें होतें. राज्यसंस्था परधर्मी म्लेंच्छांच्या हातांत गेली होती व नीति व धर्म यांचा बहुतेक पूर्ण उच्छेद होऊन, हिंदुसमाज अत्यंत विस्कळीत झाला होता. ह्या विस्कळितपणाचें चित्र समर्थांनीं कलिधर्म निरूपणांत फारच मार्मिकपणानें रेखाटलेलें आहे. म्लेंच्छांनीं महाराष्ट्र पादाक्रांत केल्यापासून समाजांत अनन्वित प्रकार होऊं लागले होते. म्लेंच्छांचें वैभव पाहून महाराष्ट्रियांस स्वतःचे आचार, विचार, शास्त्र, देव, धर्म वगैरे सर्व कुचकामाचें वाटूं लागलें. स्वतःचीं देवस्थानें सोडून लोक मुसलमानी पिरांना भजूं लागले होते; इतकेंच नाहीं तर पुष्कळांनीं मुसलमानी धर्मही स्वीकारिला होता. चातुर्वर्ण्य नष्ट झाले; व सर्वत्र बेबंदशाही माजली. तीर्थक्षेत्रांचा धुव्वा उडाला. मूर्ति फोडल्या गेल्या, बायका भ्रष्ट केल्या. येणेंप्रमाणें नीतीचा व धर्माचा दाब नाहींसा होऊन हिंदूंच्या हातचें राज्य यवनांच्या हातीं जाऊन त्यांची मगरमिठी जास्तच बसली. अशावेळीं नीति, धर्म व राज्य स्थापून परमार्थाचा मार्ग लोकांना दाखविण्याचा समर्थांनीं निश्चय केला व त्या निश्चयाचेंच फळ 'दासबोध' हा होय. 'ह्यांत गीतेंतल्याप्रमाणें अनीतिमान् भाऊबंदांना मारून राज्य मिळविण्यांत पाप नाहीं, असा उपदेश केलेला नाहीं; तर, मुळींच अस्तंगत झालेल्या नीति धर्म व राज्य ह्या तीन संस्था कशा व का स्थापाव्या ह्याचें निरूपण केलें आहे. नीति, धर्म व राज्य हीं तीन परमेश्वराचीं ह्मणजे परमार्थाचीं अर्थात पूर्ण स्वातंत्र्याचीं मूर्त रूपें आहेत; तेव्हां त्यांची स्थापना व आश्रय करणें मुमुक्षूंना अत्यंत

अवश्यक आहे, हा दासांच्या उपदेशाचा मथितार्थ आहे. या ग्रंथांत समर्थांनीं वेदांताचें गूढ निरूपण करून व्यवहारनीति व राजनीति ही सांगितली आहे. हा ग्रंथ अत्यंत वक्तृत्वप्रचुर आहे. गचाळ किंवा मिळमिळीत असें एकही वाक्य यांत नाहीं. वक्तृत्वाचा ओघ इतका अप्रतिबद्ध आहे, शब्दांची योजना इतकी समर्पक आहे, आणि विवेचनसरणी इतकी चित्तवेधक आहे कीं, सिद्धांतविषय गहन असूनही तो काव्याप्रमाणें आल्हादकारक वाटतो; आणि इतकें असून भाषा अत्यंत साधी, सोपी व सरळ आहे. या ग्रंथांत त्यांनीं संसारांत राहून परमार्थ कसा साधावा हें शिकविलें आहे. ‘ प्रथमतः ग्रंथाचें नांव सांगून, नंतर त्यांनीं त्यांतील विषय व ते विषय ज्या पूर्वग्रंथाधारें प्रतिपादिले त्यांचीं नांवें व या ग्रंथाचे अधिकारी हीं सांगुन, पुढें ग्रंथाचा आरंभ केला आहे. नंतर शिष्टसांपदायाप्रमाणें व निर्विघ्नसिद्ध्यर्थ मंगलाचरण केलें आहे. नंतर सद्गुरु व संतसज्जन यांची प्रार्थना केली आहे. नंतर सभेचें वर्णन करून परमार्थ हा प्रपंचापेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें त्यांनीं प्रथमतः त्याचें वर्णन दिलें आहे. येथपर्यंतचा भाग शिष्टसंप्रदायानुरूप असल्यामुळें तो व्यावहारिकदृष्ट्यामुद्धां ग्राह्य आहे. तथापि खऱ्याविषयाला—बोधाला—यानंतर सुरवात झाली आहे. प्रथमतः ज्या देहाविषयीं आपण अभिमान बाळगितों, त्या देहाचें महत्व किती आहे, हें दाखविलें आहे. हें महत्वच ध्यानांत घेऊन कदाचित् एखादा मूर्ख भुलून जाईल, परंतु असें होऊं नये, याकरितां त्या देहाचीं व्यंगें सांगण्यासही समर्थ विसरले नाहींत. देहाच्यानंतर दुसरें—मी आणि नंतर माझें—जें घर ( संसार ) तें काय योग्यतेचें आहे हेंही स्पष्ट केलें आहे. ह्या दोहींची योग्यता प्रपंच व परमार्थदृष्टीनें आपल्या शिष्यांच्या मनांत बिंबविल्यावर समर्थांनीं मूर्खांचीं लक्षणें त्यागार्थ सांगितलीं आहेत. त्यांपैकीं बहुतेक लक्षणें संसारव्यवहार करणाऱ्या पुरुषानेंच व्यवहार करण्यासारखीं आहेत. मुमुक्षूला त्यांचा फारसा उपयोग नाहीं; कारण त्यांत सगळा व्यवहार भरलेला आहे. त्यानंतर कुविद्येचीं लक्षणें आहेत, तींही मूर्खांच्या लक्षणांचाच अनुवाद आहे, असें म्हटलें तरी चालेल. त्यानंतर भक्तिलक्षणें सांगतांनाही व्यवहाराचाच उपदेश केला आहे. सत्व, रज आणि तम असा त्रिगुणांचा क्रम सोडून समर्थांनीं प्रथमतः रजोगुणाचें वर्णन केलें आहे. वास्तविक पाहिलें तर उतरत्या अथवा चढत्या क्रमानें तम किंवा सत्व यांचें वर्णन प्रथम केलें पाहिजे होतें; परंतु तो क्रम येथें सोडिला आहे. याचें कारण असें आहे कीं, इहलोकीं वास आणि सुखादिभोग, ज्यांचा आम्हा प्रापंचिक

लोकांस नेहमीं सहवास असे आणखी इतर प्रकार यांचा रजोगुणामध्यें अंतर्भाव होतो फलाशा धरून कर्में करणें किंवा पूर्वकर्मफलाचा उपभोग घेणें हें रजोगुणाचेंच कार्य होय. तें आह्मां संसारीकलोकांना उपभोगावें लागत असल्यामुळें त्याचें निरूपण समर्थांनीं प्रथमतः केलें आहे. नंतर तमोगुण व सत्वगुण यांचें अनुक्रमानें निरूपण केलें आहे. मागें कुविद्येचीं लक्षणें सांगितलीं, तशींच आतां सुविद्येचीं लक्षणें सांगितलीं. त्यांतही व्यवहारीक पुरुषाला उपदेश आहेच. येथपर्यंत केलेल्या बोधांत दासांनीं सिंहावलोकन करून संक्षेपानें पुढें जो काय उपदेश करावयाचा त्याची मर्यादा तयार करून घेतली. नंतर तिसऱ्या दशकाचे प्रारंभापासून एका पुरुषाचें गर्भवासापासून मरेपर्यंतचें चरित्र समग्र दिलें आहे. त्यानंतर नवविधाभक्तीचें निरूपण केलें आहे; तेंही संसारी पुरुषांनींच विचार करण्यासारखें आहे. यानंतर उत्तरार्धाला प्रारंभ होतो. सूक्ष्मपणें पाहिलें असतां संसारी पुरुषाला ज्ञान जेणेंकरून प्राप्त होईल, अशाचप्रकारचें निरूपण यांत सांपडेल. अशीं स्थलें ग्रंथांत जागजागीं आहेत, लक्ष्यपूर्वक वाचणारांस तीं सहज सांपडतील. येथपर्यंत विषयमर्यादा ठरविलेली असल्यामुळें विषयक्रम बरोबर आहे; परंतु उत्तरार्धांतील विषयांची मांडणी तशी क्रमानें केलेली नाहीं.'

समर्थांनीं आपला उद्दिष्ट हेतु साधण्याकरितां जे बहुविध उपाय योजिले त्यांपैकींच 'मनाचे श्लोक' हा एक होय. या श्लोकांची रचना फारशी करिमाच्या वृत्ताप्रमाणें केली आहे. 'त्यांच्या वेळीं मुसलमानी पीर व त्यांचे तकिये महाराष्ट्राच्या लहानशा खेड्यांतूनही अति झाले होते; आणि अज्ञ सामान्य जनसमूह या पीरांच्या, त्यांच्या तकियांच्या व फकिरांच्या मायावी कचाटींत इतका सांपडला होता कीं, समर्थांना व शिवाजी महाराजांना त्याला मुक्त करण्यास नानाप्रकारचे लहानथोर उपाय योजावे लागले हें आरंभीं सांगितलेंच आहे. त्यांपैकींच फकीरी सवालांच्या अनुकरणानें सुचलेला हा वृत्तरचनेचा लहानसा परंतु मोठा गुणकारी उपाय होता. रामदासीश्लोक व फकीरी सवाल एकाचवेळीं ऐकून गांवोगांवच्या मार्मीकलोकांना पाच्छाईधर्माची परीक्षा करण्यास केवढी सवड झाली असेल हें सांगावयास नकोच.'' पुनः आणखी हे श्लोक अत्यंत सुबोध व नीतिपर आहेत, इतकेंच नव्हे, तर ते अशिक्षित मनुष्याला ही चटका लावण्याजोगे हृदयंगम आहेत; आणि ह्मणूनच ते वाचणारांस वाचावेसे वाटतात. खालील ही पांच सहा चरण जरी वाचून पाहिले तरी देखील वरील विधानाची सत्यता कळून येईल.

'जगीं सर्वसूखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधून पाहे ॥
'समर्थांचिया सेवकां वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे? ॥
, सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्पधारिष्ट पाहें ॥'
'असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा'
'भवाच्या भयें काय भीतोसि लंडी । धरी रे मना धैर्य; कामासि सांडी'
'धरी रे मना संगती सज्जनाची । जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनांची'

'अशा प्रकारें त्रिकालाबाधित सत्य विचार या श्लोकांत पदोपदीं आढळून येतात. हे श्लोक पाठकरण्याजोगे आहेत.

जनस्वभाव-गोसावी किंवा स्फुटसमासी ह्मणून समर्थांचा आणखी एक ७० सत्तर ओंव्यांचा लहानसा ग्रंथ आहे. यांत त्यांनीं सगुणभक्ति न करितां व कर्तव्यकर्माकडे लक्ष न देतां विरक्तीचें सोंग दाखविणाऱ्या भोंदूंची चांगली कानउघाडणी केली आहे. आपण साधु आहों हें दाखविण्यासाठीं लोक काय काय ढोंगें करितात, ते सर्व प्रकार एकसमयावच्छेदेंकरून या लहानशा प्रकरणांत पाहण्यांत येतील.—

हरपलें सांपडून द्यावें । चोरटे तत्काळ धरावे ॥
थोडें अन्न पुरवावें । बहुत जनांसीं ॥ १ ॥
ऐसें वर्तणें लोकीं । गेणें सार्थक नव्हे कीं ॥
अध्यात्मविद्या विवेकीं । जाणिजे तें ॥ २ ॥

या प्रकरणावरून अद्भुतचमत्कार दाखवून लोकाचें मन आपणाकडे वेधून घेणें समर्थांस इष्ट नव्हतें असें ह्मणतां येईल. समर्थांचीं अद्भुतचमत्कार परिपूर्ण चरित्रें अंधभक्तीनें वाचतांना वाचकांनीं ही गोष्ट अवश्य ध्यानांत ठेवावी.

समर्थांची थोर थोर महाराष्ट्रकवींनीं मोठी प्रशंसा केली आहे. उदाहरणार्थ—

'श्रीराम उपासक निर्मळ । जो भजन सरोवरींचा मराळ ॥
तो रामदास महाराज केवळ । भक्ति प्रबळवी जना ॥ १ ॥'

श्रीधर.

'श्रीरामदास मेघचि करितो हा दास मोरसा नाच ॥
श्रीरामाच्या जैसा मारुतिपादास मोर सानाच ॥ १ ॥'

मोरोपंत.

'बोध-राज रामदासांनीं । गीतीं आळविला कैवल्यदानी ॥
तैसीं माझीं प्रसाद-बोलणीं । वरद-वाणी नसे कीं ॥ १ ॥'

महिपति.

'सद्गुरु श्रीरामदासाचें भूषण । तेथें घाली मन चळों नको ॥ १ ॥'
'आत्मारामीं मन ठेवूनीया पाहे । रामदासीं पाहे आपणे या ॥ १ ॥'
'रामदास स्वामी सोयरा सज्जन । यासीं तूं नमन अर्पी बापा ॥१॥'
'मारुतीअवतार स्वामी प्रकटला । उपदेश केला तुजलागीं ॥ १ ॥'
तुकाराम.

असो. येथपर्यंत श्री समर्थ रामदासस्वामी त्यांचीं अपूर्व कृत्यें व त्यांची मनोहर कविता याबद्दल जेवढें सांगतां आलें तेवढें सांगितलें. आतां त्यांच्या ब्रह्मीभूत आत्म्यास एकवार पंतांच्याच आर्येनें प्रेमपुरःसर वंदन करून हा विस्तृत झालेला लेख संपवितों.

'द्विज 'सावधान' ऐसें सर्वत्र विवाह मंगलीं ह्मणती ॥
तें एक रामदासें आयकिलें त्या असो सदा प्रणती ॥१॥'

---

## 'समर्थांच्या कवितेंतील कांहीं वेंचे.'

समर्थांनीं ईश्वराविषयीं यथार्थ वर्णन केलें आहेः—

### अभंग.

कर्ता एक देव । तेणें केलें सर्व । तयापाशीं गर्व । कामानये ॥ १ ॥
देह तें देवाचें । वित्तकुबेराचें । तेथें या जिवाचें । काय आहे ॥ २ ॥
देता देववीता । नेता नेववीता । कर्ता करवीता देव ऐसा ॥ ३ ॥
निमित्ताचा धनी । केला असे प्राणी ॥ पाहातां निर्वाणी देव एक ॥ ४ ॥
लक्ष्मी हे देवाची । सर्व सत्ता त्याची । त्या विण जीवाची ॥ ऊर्मी नाहीं ॥५॥
ऐसा कोण आहे । मूकियाचा जाण । कळे ओळखण । न सांगतां ॥ ६ ॥
न सांगतां जाणे । अंतरींचा हेत । पुरवी मनोरथ । सर्वकांहीं ॥ ७ ॥
सर्व कांहीं जाणें । चतुराचा राणा । धन्य नारायणा । लीला तुझी ॥ ८ ॥

आतां कोठें धरूं भाव । बहुसाल झाले देव ॥ १ ॥
मुख्य पूजा पारंपार । एकाहूनि एक थोर ॥ २ ॥
माझे कुळींचीं दैवतें । सांगो जातां असंख्यातें ॥ ३ ॥
रामदासा देव एक । येर सर्वही मायिक ॥ ४

वरील अभंगावरून एक देव मानण्याविषयीं रामदासांचा कटाक्ष दिसतो.

ऐसें कैसें रे सोंवळें । शिवतां होतसे ओंवळें ॥ १

स्नान संध्या टिळे माळा । पोटीं क्रोधाचा उमाळा ॥ २ ॥
नित्य दंडीतोसी देह । परी फिटेना संदेह ॥ ३ ॥
नित्य नेम खटाटोप । मनीं विषयाचा जप ॥ ४ ॥
बाह्य केली झळफळ । देह बुद्धीचा विटाळ ॥ ५ ॥
रामदास दृढभाव । तयावीण सर्व वाव ॥ ६ ॥

देह विटाळाचा गोळा । कैसा होतोसी सोंवळा ॥ १ ॥
तुज कळेना विचारू । ऐसी यासी काय करूं ॥ २ ॥

## धांवा.

धांव रे रामराया । किति अंत पाहाशी ॥ धांव रे० ॥ धृ० ॥ प्राणांत मांडिलासे । नये करुणा कैसी पाहीन धणीवरी । चरण झाडीन केशीं । नयन शिणले बा । आतां केधवां येशी ॥ धांवरे० ॥ १ ॥ मीपण अहंकारें । अंगीं भरला ताठा । विषय कर्दमांत । लाज नाहीं लोळतां । चिळस उपजली । ऐसें झालें बा आतां । धांव रे रामराया ॥ २ ॥ मारुतीस्कंधभागीं । शीघ्र बैसोनि यावें । राघवें वैद्यराजें । कृपा औषध द्यावें । दयेचें पद्महस्त माझे शिरीं ठेवावें । धांव रे राम० ॥ ३ ॥ या भवीं रामदास । थोर पावतो व्यथा । कौतुक पाहातोसी । काय जानकी कांता । दयाळा दीनबंधु । भक्तवत्सला आतां । धांव रे रामराया ॥ ४ ॥

हा धांवा इतका प्रेमळ आहे कीं, तो तापत्रयांनीं व्यथित झालेल्या मनाला विसावा दिल्याशिवाय राहणार नाहीं.

• श्रेष्ठ परधामास गेले त्यावेळीं त्यांच्या मुलांस समर्थांनीं पाठविलेलें उपदेशपर पत्र.—

## श्लोक.

बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहू मानिती लोक येणें तुम्हांला ॥ धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो । बरा गुण तो अंतरामाजि राहो ॥ १ ॥ सदा दांत घासोनि तोंडा धुवावें । कळाहीन तें शुद्रमूर्खी नसावें ॥ सदा सर्वदा यत्न सोडूं नयेरे । बहूसाल हा खेळ कामा नयेरे ॥ २ ॥ दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें । प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें ॥ गुण श्रेष्ठ ऊपास्य त्याचें करावें । बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥ बहू खेळ खोटा सदालस्य खोटा । समस्तांसि भांडेलचि तो करंटा ॥ बहूतां जनांलागीं जीवीं भजावें । भल्या

संगतीं न्याय तेथें भजावें ॥ ४ ॥ हिशोबीं सदा न्याय सोडूं नये रे । कदाचीत् अन्याय होतां धका रे ॥ जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें । महासूख तेंही अकस्मात जातें ॥ ५ ॥ प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वायां । विवेकेविणें सर्व ही दंभ जायां ॥ बहू सज्जला नेटका साज केला । विचाराविणें सर्वही व्यर्थ गेला ॥ ६ ॥ वरी चांगला अंतरीं गोड नाहीं । तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ॥ वरी चांगला अंतरीं गोड आहे । तयालागीं कोणीतरी शोधिताहे ॥ ७ ॥ सदा अंतरीं गोड तें सांडवेना । कदा अंतरीं ओखटें देखवेना ॥ ह्मणूनी बरा गूण आधीं धरावा । महा घोर संसार हा नीरसावा ॥ ८ ॥ भलारे भला बोलती तें करावें । बहूतां जनांचें मुखें येश घ्यावें ॥ परी शेवटीं सर्व सोडूनि द्यावें । मरावें परी कीर्तिरूपीं उरावें ॥ ९ ॥ बरा ओखटा सर्व संसार झाला । अकस्मात येईल रे काल घाला ॥ ह्मणोनी भले संगतीं सत्य चाला । जनीं दास तो बोधिताहे मुलांला ॥ १० ॥

समर्थांची कविता इतकी रसाळ आहे कीं, तिच्यांतील वेंचे काढण्याचें काम खरोखरीच फार कठीण आहे. जी जी कविता वाचावी ती ती उतराबीशीच वाटते; कारण ती सर्वच चांगली आहे; आणखी चांगल्यांतून चांगलें तें काय निवडावयाचें ? तरी पण स्थलाच्या मानानें पाहतां काढिलें हेंच पुष्कळ झालें; कारण मागें चरित्रांतही बरेच वेंचे घेतले आहेत. या चरित्रांत समर्थांचीं एक दोन पत्रें घेतलीं आहेत. त्यांचा पत्रव्यवहार मोठा असावा असा अजमास आहे, परंतु तो सर्व मिळणें दुरापास्त आहे; कारण त्यांचा संचार व परंपरा अत्यंत वितृत आहे. त्यांचें प्रत्येक पत्र दासबोधाच्या तोडीचें आहे. त्यांतील उपदेश बिनमोल आहे. लहान मुलांस लिहिलेल्या पत्राचा जो नमुना वर दिला आहे त्याची किंमत कोण करील ? वाचकांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं हें पत्र आपल्या मुलाबाळांकडून मुखपाठ करून घ्यावें. समर्थांचीं उपदेशपर पत्रें ज्यांच्या संग्रहीं असतील त्यांनीं त्यांनीं तीं अवश्य प्रसिद्ध करावीं; व तसें केल्यास त्यांचे महाराष्ट्रियांवर अनंत उपकार होतील.

भाग पहिला

समाप्त.